म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ३४८

प्रभाकर पाध्ये

REFBK-0014263

# हिन्दी उर्दू

प्रभाकर पाध्ये

पाच रुपये

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

[illegible]
[illegible]
ক্ষি-২া
১১৫


वेष्टन :

प्रभाकर गोरे

किंमत पाच रुपये

हि र वी

उ ने



## प्रभाकर पाध्ये यांचे साहित्य

आजकालचा महाराष्ट्र (सहकार्याने) • प्रकाशांतील व्यक्ति
पाकिस्तान कीं पन्नास टक्के! • कलेचीं क्षितिजें
व्याधाची चांदणी • कृष्णकमळीची वेल
अर्धवर्तुळें • तीन तपस्वी • समाजवादाचा पुनर्जन्म
नवें जग : नवीं क्षितिजें • अगस्तीच्या अंगणांत
उडता गालिचा • तोकोनोमा
हिरवी उनें • युगोस्लाविया (इंग्रजी)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .............. वि: ..................
क्रमांक .............. नों दि: ..................
REFBK-0014263
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 16.283
(स्थळ प्रत)

प्रभाकर पाध्ये

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

पाच रुपये


© प्रभाकर पाध्ये

पहिली आवृत्ती : मार्च १९६४

मुद्रक : दत्ता सराफ
प्रीति प्रिंटर्स, भारत हाऊस, अपोलो स्ट्रीट
फोर्ट, मुंबई १ BR

प्रकाशक : ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन, ३५सी, ताडदेव रोड
मुंबई ३४ WB

माझ्या प्रवासलेखांचे उत्साहाने
प्रकाशन करणारे भटकळबंधु
सदानंद आणि रामदास यांस–





# अनुक्रम


- अल्मोडा : १
- धवलदर्शन : १९
- कौलालंपुर : ४१
- बँकॉक : ५२
- हाँगकाँग : ६७
- सउल : ८३
- बर्लिन : ९६
- व्हेनीस : १०८
- कारिओका : १२३
- रिओ : १३३
- ब्रासीलिया : १४१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्थळ प्रत

# अल्मोडा

हिमालयाच्या प्रथमदर्शनानें माझी थोडीशी निराशाच झाली. हा दोष अर्थात् हिमालयाचा नव्हता. माझा होता. पांचसात हजार फूट उंचीच्या प्रदेशांत होईल तितका फेरफटका करावा, एवढ्याच माफक महत्त्वाकांक्षेनें मी गेलों होतों. मस्तकांवर हिमाचा अखंड लेप घालून बसलेलीं हिमालयाचीं कभिन्न शिखरें तेथून सहसा दिसत नाहींत. निदान या हंगामांत दिसत नाहींत. दिसलीं तर उत्तमच; न दिसलीं तर या दिवसांत दिसतात तरी कोणाला,

असें मनाचें समाधान करून घेण्याची तयारी होती. इतक्या मर्यादित भक्तीला परमेश्वर पावला नाहीं तर त्याला दोष देण्यांत काय अर्थ आहे? पण कमी उंचीचा प्रदेश म्हणूनच तो घनदाट अरण्यानें भरलेला असावा अशी माझी अपेक्षा होती, आणि संस्कृतच्या तुटपुंज्या वाचनांत कल्पनाशक्ति जरा फाजील ओतलेली असल्यानें या अपेक्षेची तार अकारण ताणलेली होती. शिवाय मीं सिलोनचें अन् इण्डोचीनचें जंगल पाहिलेलें होतें. हिमालय काय यांना हार जाणार? अर्थात् भूगोलशास्त्राचें ज्ञान फारसें जागृत नव्हतेंच आणि म्हणून काठगोदामपासूनच 'अनिलैः कीचकाः पूर्यमाणाः' व 'सरलस्कंधसंघट्टः' असा प्रदेश पाहण्यासाठीं माझी दृष्टि अधीर झाली.

पण काठगोदामलाच हिमालय एकदम सामोरा येत असूनसुद्धां आमच्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत असतें त्याहून अधिक रान अगर झाडी दाखविणारा प्रदेश कोठें दिसेना. उलट हिमालय एका दृष्टीनें कमीच पडला. नाशिकला जातांना अक्राळविक्राळ आकाराचे सुळके दिसतात. कल्याण ते कर्जतच्या दरम्यान सह्याद्रीचीं अकल्पित आकारांचीं शिखरें आकाशरेषेला आश्चर्यकारक नक्षीची किनार जोडीत असतात. (या आकाशरेषेनें आजवर एकाहि कवीच्या प्रतिभेला भुलविलेलें अगर डिवचलेलें नाहीं याचें मला नेहमींच आश्चर्य वाटलेलं आहे.) सह्याद्रीच्या शिखरांवरचें निसर्गाचें हें खोदकाम येथें कोठेंच दिसलें नाहीं. उलट हिमालयाचीं येथलीं शिखरें अगदींच माफक, मामुली, पराक्रमशून्य वाटलीं. कोणताहि संसारी शेतकरी त्यांच्या डोक्यावर कुदळें मारूं शकत होता अगर आपल्या झोपडीचा खांब रोवूं शकत होता. हिमालयाचे ते नजर फिरविणारे कडे — येथला मोटरीचा प्रवास म्हणजे कपाळमोक्षाच्या कांठावरचा प्रवास, हें बधिर डोक्यांतहि घुमविणारे कडे — तेहि कोठें दिसत ना. आपली कुचेष्टा होत आहे, मोठ्या आशेनें येणाऱ्या आपल्या चाहत्यांची हिमालय निर्घृण वंचना करीत आहे असें वाटलें. नाहीं म्हणायला रातीघाटांत आपल्या अपेक्षेचा हिमालय आढळतो आहे असें वाटलें. येथें जंगल दाटलें आहे. झाडांनीं झिंजा पसरल्या आहेत. रस्ता एखाद्या प्रचंड नदीच्या कांठानें जातो असें नव्हे, ओढ्यानाल्यांच्या कांठानेंच तो धावतो; पण हे ओढेनाले खोल खोऱ्यांत आहेत. मोठमोठे कडे तुटलेले आहेत. त्यामुळें त्यांचें पात्र भयंकर वाटत आहे. दगडागोट्यांच्या भस्मट राशींतून वाहणारें काळेंकुट्ट

पाणी अजगराच्या डोळ्यांप्रमाणें लकाकत आहे. त्या पात्रांतल्या शिळा काळ-भैरवानें फेंकल्या असाव्यात अशी कल्पना करणें शक्य होत आहे. या ओढ्यांना ठिकठिकाणीं बांध घालून शेतीसाठीं पाट नेण्याचे उत्तरप्रदेशीय सरकारचे सिमिटी प्रयत्न, ' राजकीय निर्माण विभागा ' च्या पराक्रमी पाट्या ठिकठिकाणीं लावलेल्या असूनसुद्धां केविलवाणे वाटत आहेत. मध्येंच अप्सरेचें लावण्य मिरविणारा डाक-बंगला काळभैरवाला भुरळ घालण्यास असमर्थ ठरत आहे. ठीक, सुरू झालें हिमालयाचें खरें दर्शन, असें वाटत आहे. तोंच—

' गरमपाणी ' येतें आणि आपली तन्मय कल्पना कोसळते ! तोंपर्यंत भूभागाची उंचीहि पांच हजारांपासून तीन हजारांपर्यंत कोसळलेली असते ! गरमपाणी हा बसच्या युगांतला चहाकॉफीचा तळ ! गरमपाण्यांतलें पाणी अतिशय गार, पण प्रवासी हॉटिलातल्या गरम पाण्याकडेच धावतात ! शहरी गिऱ्हाइकांची गरम मिजास येथील ' रेस्टॉरन्टां ' च्या दर्शनी मिजाशीशीं सहज मिळून जाते. गरमपाण्याच्या रस्त्यांत आपण पुन्हां पृथ्वीतळावर येतों, आणि अल्मोड्याकडे जाणारा नवा धुरळट रस्ता येथूनच फुटत असल्यामुळें हिमालयाच्या अंतराळांत उड्या मारण्याची पुन्हां पाळीच येत नाहीं ! म्हणजे आजूबाजूचे डोंगर अगदीं ओणवे असतात असें नव्हे. ते चांगले उंच, अवाढव्य असतात. पण ते अगदींच उघडेओके असतात. चिडाचें एखादें चुकार झाडहि त्यांच्यावर आढळत नाहीं. उघड्या बोडक्या डोंगरांनाहि त्यांचें असें एक सौंदर्य असूं शकतें, पण त्यांचा आकार तसाच अक्राळविक्राळ असला तर. पण येथले डोंगर त्या दृष्टीनें अगदींच मवाळ ! आणि पुढें सुयाळबाडी येथें बस थांबली तेव्हां त्याचें स्वरूप तर पूर्ण मरगळलेलें ! तेथें दोनचार दुकानें होतीं तीं अगदीं पेंगुळलेलीं. त्यांच्यावरच्या माड्याहि पेंगुळलेल्या आणि या माड्यांच्या खिडकींतून पाहणारे चार डोळे झोपेनें तारवटलेले ! एका दुकानांत हुक्याच्या भोंवतीं पांचसहा पुरुष आडवे झाले होते. त्यांच्या गप्पा हुक्यांतल्या निखाऱ्यासारख्याच राखटलेल्या ! त्या साऱ्या सुस्त कारभारांत पलीकडच्या पानवठ्यावरील एका मुलीच्या हालचालींत काय तो जीव दिसला. तिनें कोणत्या तरी पोक्त स्त्रीचा ब्लाऊज चढविला होता, आणि त्या ब्लाउजच्या तलम रंगीन पोताचें चविष्ट कौतुक ती त्याच्यावर आपलीं इवलालीं बोटें पुनःपुन्हां फिरवून करीत होती. पण आमची बस सुरू झाली – आणि उडालेल्या धुळींत या मुलीची लज्जतदार आठवण पुरी

मारून निघाली. आमची बस करकरत आणि खसखसत चालली होती, पण निसर्गाचें प्रसन्न हिरवें दर्शन कांहीं होईना. वाटलें, झक मारली नि अलमोड्याला आलों. अल्मोडयाला जाऊं नका, तेथें माशांचा मनस्वी उपद्रव होतो, हा आ. रा. देशपाडयांचा उपदेश आठवूं लागला आणि अलमोडयाच्या वेशीवर गावांत केवळ शिरण्यासाठीं माणशीं एकेक रुपया देण्याची फर्मावणी झाली तेव्हां तर स्वतःच्या मूर्खपणाचा साक्षात्कार होतोसें वाटलें. ● ● ●

दर मैलागणिक दाटत असलेल्या निराशेंत एकदोन गोष्टींचा मात्र दिलासा मिळत होता. एक म्हणजे पृथ्वीला ' क्षमा ' म्हणणाऱ्या शब्दशास्त्राच्या खोल दृष्टीची प्रतीति आली आणि हिमालयांतील अरण्यांचें भरगच्च वर्णन करणाऱ्या संस्कृत लेखकांची कल्पनाशक्ति वस्तुस्थितीशीं अदक्षिण ओढाताण करीत नव्हती हेंहि ध्यानांत आलें. एका काळीं हा भाग घनदाट अरण्यानें भरलेला असेलच. आज मात्र या सफाचट भूमीवर मानवी अत्याचाराचे अनंत आघात दिसत होते ! ठिकठिकाणीं कुदळीचे अत्याचार आढळत होते. कुऱ्हाडीचे घाव जाणवत होते. फाळफावड्याची करामत दिसत होती. आगीची आठवण होत होती. मानवानें माजविलेला भ्रष्टाचार सर्वत्र पसरला होता आणि मानवी जीवन म्हणजे निसर्गाविरुद्ध केवढें घोर पावित्र्यविडंबन आहे याची प्रचीति येत होती. आज या भागावर निसर्गाचा सारा तळतळाट उसळलेला दिसत होता. सर्वत्र संताप नाचत होता. पण थोड्याच दिवसांत पावसाच्या सरी पडतील. तापलेल्या भूमीला पाणी मिळेल आणि पृथ्वीच्या गर्भांतून कोवळे कोंब बाहेर पडतील. सगळीकडे तिच्या अंतरंगांतील कृपेचे प्रवाह वाहूं लागतील. खरोखर, पृथ्वीला ' क्षमा ' म्हणणाऱ्या ऋषीला पृथ्वीतत्त्वाचा खोल साक्षात्कारच झाला होता !

दुसरी गोष्ट : शंकर म्हणजे हिमालयावरचें विशाल रूपक ही ऐकलेली गोष्ट अंतःकरणात उतरली. अद्याप हिमालयाच्या काळ्याकभिन्न कड्यावरील बर्फाच्या रुपेरी धारांचें दर्शन झालेंच नव्हतें. केशकलापावरच्या शुभ्र बालचंद्राची प्रतीति आलीच नव्हती. तरी पण सभोंवार पसरलेले उघडेबोडके तळपट भस्मट डोंगर, शंकराची वैरागी ही संज्ञा किती अभिजात आहे हें पटवीत होते. शंकराची कोपिष्ट अशी ख्याति आहे, आणि तो प्रलयंकरहि आहे. उजाड डोंगरावरच्या उन्हाच्या ज्वाळा या वैराग्याच्या कोपाची साक्ष पटवीत होत्या, आणि कांहीं दिवसानीं पाऊस कोसळूं लागला म्हणजे प्रलयंकर प्रकटला असें कसें वाटेल याची आतांच कल्पना येत होती. ● ● ●

गांवांत प्रवेश केला, देवदाराचें दर्शन झालें, शांत प्रसन्न झाडांच्या राया आढळल्या नि जीव भांड्यांत पडला. देवदाराच्याच जातीचीं चिडाचीं झाडें अर्थात् त्यापूर्वीच पाहिलीं होतीं. अल्मोड्याच्या परिसरांत त्यांची पद्धतशीर लागवडच आढळली होती. काठगोदामपासून पंधरा–वीस मैल आलों असूं तोंच बसमधली एक केरळकन्यका ओरडली होती "Oh ! Look ! A coniferm !" चिडाच्या झाडालाहि त्याचें एक सौंदर्य असतें. उंच सलग वाढणारें हें झाड एखाद्या नर्तकाच्या पवित्र्यांत उभें राहतें, सरळ पसरलेल्या फांद्याच्या वर वळलेल्या टोकांना दर्भासारख्या सळ्यांचे हिरवे गोंडे बांधून उभें राहतें. त्याच्या ताठ पवित्र्यांत एक रुबाब आहे. हिरव्या गुच्छांच्या त्याच्या फांद्यांत कलेचा एक झोंक आहे. त्याच्या बनाला एक व्यापक थाट आहे. त्याच्या फांद्यांतून वाहणाऱ्या वाऱ्याला एक भेदक सूर आहे. वाऱ्याला पाठ देणाऱ्या त्याच्या लवचिक पवित्र्यांत योगासनाची झेप आहे. तळाशीं पडलेल्या पिकलेल्या सळ्यांच्या लाल रंगांत एक खमंग ऐट आहे. या सळ्यांवरून स्केटिंग करीत असल्याप्रमाणें चालतांना होणाऱ्या सळसळींत एक खेळकर लकेर आहे. उघड्याओक्या डोंगराच्या बाजूवरचें अगर माथ्यावरचें चिडाचें राखीव बन पाहिलें कीं त्याच्या विस्तृत वैभवानें मन हरखतें, आणि एखाद्या शिखरावरचा दहावीस झाडांचा पुंजका कोंकणी ब्राह्मणबटूच्या टाळूवरील शेंडीसारखा वाटला म्हणजे मन खिदळतेंहि. पण मला चिडाच्या बनांत वनश्रीचा मुक्त मस्त विलास दिसला नाहीं. त्याच्या छायेंत थंडगार छायेचा गहिरा अनुभव आला नाहीं. त्याच्या सलग शेलाट खोडांत शक्तीचा साक्षात्कार झाला नाहीं. आणि त्याच्या नर्तकाच्या पवित्र्यांत गतिमानता जाणवली नाहीं. एखाद्या जुनाट मागस लोकनृत्याप्रमाणें तो प्राथमिक वाटला. चिडाचें बन पाहून दक्षिणेंतल्या माडाच्या बागांची आठवण होते. दोघांच्याहि सरळसोट रांगांत एकाच प्रकारचा रुबाब आहे. पण कोठें त्या तळपत्या कल्पवृक्षाचीं तेजस्वी छत्रचामरें आणि कोठें याचा विरळ विकल कारभार ! जपानी चिडाचा पर्णसंभारहि असाच विरळ आहे. पण त्या झाडाच्या अंगाला इतकीं कांहीं वक्र व्यवधानें असतात, एका जपानी चिडांत वाकड्या वळणाचे इतके कांहीं पेचदार प्रकार असतात कीं निसर्गाच्या 'मॉडर्निस्ट' कलेचाच प्रत्यय येतो ! त्या झाडाच्या वक्रसौंदर्याचा लवलेशहि हिंदुस्थानी चिडांत आढळत नाहीं.

उलट देवदाराच्या एका क्षणमात्र दर्शनानें भान हरपलें. देवदाराचें झाड म्हणजे निसर्गाचें मोठें कलासुंदर शिल्प आहे. मोठें ढंगदार शिल्प. डेरेदार शिल्प. चैतन्यमय शिल्प ! त्याच्या पर्णविस्ताराचें एक एक वलय म्हणजे समयीचें दीपकळ्यांनीं फुललेलें स्तबकच ! क्रमाक्रमानें निमुळत्या होत जाणाऱ्या पर्णसंभाराचा हा वृक्ष म्हणजे कळसाचें वैभव मिरवणारा एखादा दीपस्तंभच. किंवा अधिक अचूक बोलायचें म्हणजे कोरीव नक्षीकामाचा रंगदार विलास दाखविणारा जपानी पागोटा — स्तूप ! हिरव्या तेजाळ पर्णराजीनें शृंगारलेले आपले सहस्र बाहु उभारून हा वृक्ष उभा राहिला म्हणजे पंचमहाभूतांच्या दर्शनानें झालेला आनंद, वाटलेला संतोष, दाटलेली कृतार्थता व्यक्त करण्यासाठीं मुद्राभिनयाचा हा रंगदार थाटच मांडला आहे कीं काय असें वाटतें ! देवदार वृक्ष म्हणजे आकारशील नृत्याविष्काराचें एक विमुक्त उदाहरण ! त्याच्याशीं तुलना फक्त एका मोरपंख (सीडार) वृक्षाची होते. पण हिमालयांत मोरपंख फारसे नाहींतच. अल्मोड्याच्या परिसरांत सात-आठ दिसले पण देवदारांच्या वैभवशाली दर्शनानें विरमले होते बिचारे ! अगदीं खुरटले होते !

पण अल्मोड्यांत देवदारच काय ते आहेत असें नाहीं. इतर वृक्षहि आहेत. मोठे डेरेदार आणि छायादार वृक्ष आहेत. मनुष्य शेतीसाठीं वृक्षच्छेद करतो, पण वृक्षांच्या डोलत्या छायांत घर असल्याखेरीज त्याच्या वसातस्थानाला विश्रब्धता येत नाहीं आणि आजूबाजूला फुलझाडें लावल्याखेरीज त्याच्या दृष्टीला शांति लाभत नाहीं. अलमोडा उघड्याओक्या डोंगरांच्या कुशींत सामावलेलें आहे. समोरच्या डोंगरांच्या रांगा उघड्याओक्याच आहेत. त्यांच्यावर शेताच्या पट्ट्या आहेत. त्यांच्या वाकड्या वर्तुलाकार बांधांमुळें समोरच्या डोंगराचें एकंदर दर्शन ओहोटीनंतरच्या पुळणीसारखें दिसतें. लोकांचीं घरें (हिमालयांतल्या सर्वसाधारण घरांप्रमाणें) लादीगोट्यांचींच आहेत. या दगडाळ कारभारांत थोडीशी हिरवळ ओतण्यासाठीं लोकांनीं शक्य तेथें झाडें, फळझाडें आणि फुलझाडें लावलीं आहेत. चीड-देवदार आहेतच. पण आपल्याकडच्या झिंगासारखा दिसणारा बकैन, जपानच्या जिंको ची आठवण करून देणारी कुबानी, पानाच्या द्वारें शेवरीशीं नातें जोडणारा पांगर, आणि आपल्या रानधायरीचें व इतर जंगली वृक्षांचें स्मरण करून

देणाऱ्या तून, बांस, बेहाळ वगैरे वृक्षांची त्यांत भर आहे. सफरचंद, डाळिंब, जर्दाळू, इत्यादि फळझाडांनीं आवारें भरलेलीं आहेत. सावनी, बुगनवेलिया, गुलाब, मोगरा, दहालिया, जाईजुई, हैड्राजिआ वगैरे देशी विलायती फुलझाडांनीं बागा शोभलेल्या आहेत. अलमोड्याचें एकंदर दर्शन दगडाळच आहे, पण त्याचा खडबडीतपणा झाडांनीं आणि फुलझाडानीं सौम्य, सह्य बनविला आहे.

बाकी दगडाळ दर्शनाला आपण महाराष्ट्रीय थोडेच डरणार आहोंत? त्याच्यामुळें अलमोड्याबद्दल वाटली तर थोडीशी आपुलकीच वाटेल. आपला दगडाधोंड्यांचा देश. कोमल–नाजूकपणाबद्दल आपली कधींच प्रसिद्धि नव्हती. आपली भक्कमपणाबद्दल ख्याति. आपलीं घरेंहि भक्कम. भक्कमपणाच्या साधनेंत भकासपणा शिरला म्हणून आपण कधीं पर्वा केली आहे काय? अलमोड्याच्या घरांचा भक्कमपणा (आणि भकासपणाहि) अगदीं आपल्याला मानवणारा आणि आवडणारा आहे! अनेक घरें (क्षीरसागरांच्या तुकारामाश्रमाप्रमाणें ( नागर बराकींचें सविनय स्मरण करून देतात. त्यांची सपक चुनेसफाई आणि छपरावरील पत्र्यांचा गंजटपणा कळकट कळा निर्माण करतो. पण येथले अनेक बंगले पुणें नं. ४ च्या बंगल्यांची आठवण करून देतात. (त्यांत प्राचीन सदाशिव पेठेंतले खास 'सुवास' मिसळलेले असल्यानें अस्सल पुणेंकरच्या आत्म्याला येथें अगदीं आराम वाटेल!) पण विशेष म्हणजे येथल्या पहाडी चेहऱ्यांच्या गर्दींत मधूनच एखादा अव्वल महाराष्ट्रीय चेहरा आढळतो, त्याचा विचार करीत तुम्ही चालतां तोंच पहाडी हिंदीच्या प्रवाहात डाळिंब, शेगडी यांसारखे मराठी शब्द कानांस लागतात आणि मग एकदम पुण्याची ठेंच लागते! त्याचे असें आहे कीं फार पूर्वी पंत, पांडे, जोशी नांवाचे महाराष्ट्रीय ब्राह्मण अलमोड्यांत घुसले आणि अद्याप ते बेटीरोटी व्यवहाराच्या शिस्तीनें आपलें वैशिष्ट्य राखून आहेत. हें वैशिष्ट्य लोकांना पटलेलें आहे — आणि म्हणूनच या ब्राह्मणांना इतर उत्तर भारतीय ब्राह्मणांपासून वेगळे काढून त्यांना अद्याप 'भट' असें ते संबोधीत आहेत.

• • •

अलमोड्याच्या रस्त्यांतून फेरफटका हा एक अनुभव आहे. आज उन्हाळी पाहुण्यांच्या गर्दींत या अनुभवांत काहीं विषादकारक द्रव्यें मिसळ-

ण्याचा संभव आहे. पण त्याला इलाज नाहीं. तुम्हीहि त्यांतलेच आहांत. पण अलमोड्याची रचनाच अशी आहे कीं, त्याच्या रस्त्यावरून फेऱ्या मारतांना पाय थकणार नाहींत आणि दृष्टि दमणार नाहीं. उलट एका पातळीवरून दुसऱ्या पातळीवर तुम्ही अलगद जाल, आणि देखाव्याचे पडदे नकळतच पालटतील. अलमोडा एका लांबलचक डोंगराच्या डोक्यावर आडवें पसरलें आहे आणि बाजूवर उतरलें आहे; अलमोड्याचे मुख्य रस्ते दोन — एक डोक्यावरून गेलेला आणि दुसरा खालीं बाजूवरून समांतर जाणारा. हे रस्ते कधीं मिळून एक होतात, तर कधीं एका रस्त्याला दोन पदर फुटून त्यांतला एक दुसऱ्या रस्त्याला आपली निष्ठा अर्पण करण्यासाठीं वळतो. अलमोड्याची वस्ती या रस्त्यांच्या दरम्यान आहे आणि म्हणून या रस्त्यांवरून हिंडतांना एका बाजूला डोंगरांच्या अमर्याद रांगांशीं दृष्टि खेळते तर दुसऱ्या बाजूला मानवाच्या मर्यादित धडपडीनें दृष्टि अडते ! नगरपालिका ही या धडपडीची अर्थात् प्रमुख साक्षीदार. आपल्या हद्दींत पाऊल टाकण्यासाठीं ती चोपून रुपया वसूल करते, पण तो वसूल केल्यावर रस्त्याच्या मधोमध सुस्वागतमची पाटी लावून तुमचें स्वागत करायला ती विसरत नाहीं. ( आतां या सोज्वळ उत्साहांत तुमच्या घ्राणेन्द्रियावर अतिक्रमण करणाऱ्या दुर्गंधीचा बंदोबस्त करण्यास तिला फुरसत मिळत नाहीं त्याला इलाज नाहीं ! ) अलमोडा हें जिल्ह्याचें ठिकाण आहे. अर्थात् येथें सरकारी कचेऱ्यांना म्युनिसिपालिटीइतकेंच ( निदान ) महत्त्व आहे. या कचेऱ्यांवर हिंदीकरणाचा उत्साह उसळलेला आहे. म्हणून ' जिला स्वास्थ कार्यालय ', ' पर्वतीय उनी योजना ', ' कुटीर उद्योग विभाग ', 'अधिशाशी अभियन्ता', 'राजकीय उच्चतर माध्यमिक पाठशाला' अशा पाट्या त्यांच्यावर लटकत आहेत. (मधूनच एखाद्या अधिकाऱ्याला याचें विडंबन म्हणजे विडंबनाचें विडंबन !–करण्याची हुक्की येते आणि म्हणून तो आपल्या कचेरीवर ' कार्यालय और पम्पहौस ' अशी पाटी लटकवून मोकळा होतो ! ) हिंदीकरणाइतकाच उच्चारवैशिष्ट्याचा उत्साह उत्तर प्रांतांत जारी असल्यानें ' पैटमैन्स शौर्टहैन्ड ' अशीहि पाटी नजरेस पडते. हे अर्थात् जुने उत्साह आहेत. यांत आतां एका नव्याची भर पडली आहे. अलमोड्याच्या टणक नितळ रस्त्यांवर पक्क्या पांढऱ्या रंगांत रेखलेल्या ' क्विट् टी ' ( क्विट् इंडिया ' च्या चालीवर ) ' क्विट् लिपुस्टिक ', ' छोडो चहा', 'छोडो

मदिरा ' (' छोडो हिंद ') अशा घोषणा दर फर्लांगावर आढळतात! या पांचसहा फर्लांगांच्या रस्त्यावर दहापंधरा 'रेस्टूरेन्टें' आहेत; चारपांच हॉटेलें आहेत आणि स्त्रियांच्या प्रसाधनांचीं दोनतीन दुकानें आहेत – आणि त्यांची गिऱ्हाइकें या घोषणांवर पदक्षेप करीतच येत असतात. या पाट्यांच्या साहाय्यानें भाषा आणि घोषणांच्या साहाय्यानें चारित्र्याचा पोत कमावीत जात असतांनाच समोरच्या पर्वतांच्या रांगांकडे लक्ष जातें आणि भाषेच्या व चारित्र्याच्या प्रश्नांचा विसर पडतो. या रांगा ओक्यासुक्याच आहेत. खालच्या खोऱ्यांतलीं शेतें कोरडींच आहेत. त्यांतल्या ओढ्यांत खडखडाटच आहे. पण त्यांच्यावर वातावरणाचें निळें आवरण पसरलेलें आहे. हें निळें अंतर मागच्या रांगांवर गडद बनलें आहे. तें फाडून पलीकडच्या शुभ्र सत्याचा वेध घेण्याचा डोळे प्रयत्न करतात, पण तो फुकट जातो. मनांत निराशा दाटते आणि मागच्या धूसर रांगा काळसर दिसूं लागतात. मग ढग जमा होतात, आणि त्या गूढ सत्यावर चमत्कारिक लेप बसतात. इतक्यांत डाव्या क्षितिजावर पश्चिमेकडे धावणारा सूर्य पर्वताच्या शिखरावर टेकतो. समोरच्या धारेवर धगधगतें सुवर्ण पसरतें. त्यांत कुंकुमाच्या छटा मिसळतात. आकाशांतील ढगांचें अंतरंग लालीलाल होतें. त्यांच्या कडा सोनेरी प्रकाशानें उजळतात. हळूहळू सूर्यबिंब पर्वताआड उतरूं लागतें आणि लाल शोभा वरवर फांकूं लागते. वाटतें, एखाद्या प्रकाशरेषेनें तें मागचें भव्य सत्य आतां उजळलें असेल. पण त्याच्या·वरचे ढगच फक्त उजळलेले असतात. या उद्योगांत मावळत्या बिंबाची निसटती कडा डुबतां डुबतां पाह्यची ठरविलेली असते ती हुकते. मन अधिकच निराश होतें आणि हुरहुरलेल्या नजरेनें आकाशांत आतां लाल, पिवळ्या, निळ्या, जांभळ्या, नारिंगी रंगांचे पट्टे एकमेकांत मिसळत असतात, त्यांचा बदलता देखावा पाहूं लागतें – तोंच अंधार येतो. पर्वताच्या प्रचंड छायांनीं तो त्वरित आणलेला असतो आणि आपण म्हणतों, 'चला, आज नाहीं. आतां उद्यां.' म्हणतों, पण पाऊल ढळत नाहीं. पण उचलणें हा पावलाचा धर्मच. तेव्हां तें उचललेंच. शिवाय घरट्याकडे निघालेले कावळे तुम्हाला भानावर आणतात. अलमोड्याच्या कावळ्यांना पडसें झालेलें असतें. पण त्यांची बसकी कावकाव तितकीच त्रस्त करते. तुम्ही खरेंच त्रस्त असतां. त्रस्त मनःस्थितींत घरीं परततां. पण घराजवळजवळ येतां तसतशी तुमच्या त्रस्त निरा·

शतें एक चमत्कारिक पूर्ति जाणवते – अदृष्ट दृश्यांची पूर्ति ! – अनिर्वचनीय वचनांची पूर्ति – अबोध बोधांची पूर्ति ! ढगांनीं काळवंडलेलें तें गूढ सत्य कसें तरी दिसण्याऐवजीं न दिसलेलेंच काय वाईट ! दिसेल तेव्हां त्याचें अगदीं विमल दर्शन व्हायला हवें !

अलमोड्याच्या बाजारांतून देवदार हॉटेलांत परततांना आणखी एका विलक्षण पूर्तीचें समाधान मला नेहमींच लाभलें. एका वळणावर समोरच्या विरळ निळसर धुक्यानें भरलेल्या खोऱ्याचें दर्शन होई, आणि वाटे, हा समुद्र ! क्षणभराचाच भास. पण क्षणभरांत तो रिव्हिएराची स्मृति उजळून जाई. रिव्हिएराचीं शहरें अशींच डोंगराच्या कुशींत वसलेलीं आहेत. तेथले बंगले असेच बगलेंत वसलेले आहेत. तेथेंहि आजूबाजूला असेंच खडकाळ दर्शन आहे. तेथें वनश्रीचा विलास अधिक आहे आणि मानवाची झकपक अगदीं अद्ययावत् आहे हें खरें. पण तेथली खरी शोभा समोर पसरलेल्या प्रमाथी सागराचीच आहे. आवाहन आहे तें सतत साद घालणाऱ्या सागराचें आणि आव्हान वाटतें तें डोंगराच्या पायथ्याशीं अखंडपणें धडक घेणाऱ्या लाटांचें ! अल्मोड्याला समुद्र नाहीं – पण समुद्राच्या उसळत्या लाटांप्रमाणें एकामागें एक दिसणाऱ्या पर्वतांच्या रांगा आहेत. त्या हलत नाहींत, हेलावत नाहींत. डुलत नाहींत, डोलवत नाहींत. पण त्यांचें दर्शन तसेंच प्रमाथी वाटतें. रिव्हिएराच्या समुद्राच्या दर्शनानें माझें मन साता समुद्रापलीकडे सफरीला गेलें होतें. या रांगांच्या दर्शनानें माझें मन ‘ मंदाकिन्याः सलिलशिशिरैः ’ वाऱ्यांनीं पुलकित बनलेल्या अल्केमध्यें भटकायला गेलें. मानस सरोवराचें ‘ हेमाम्भोजप्रसवि सलिलं ’ चाखायला गेलें. क्रीडाशैल कैलासावर फेरफटका करायला गेलें.

हा काल्पनिक फेरफटका जाऊं दे. पण अलमोड्याच्या मार्केटांत फेरफटका केला नाहीं तर अल्मोड्याची सफर अगदीं फुकट ! हें मार्केट म्हणजे एक व्यक्तित्व आहे. दुकानें एकमेकांना अगदीं खेटून उघडीं आहेत, पण त्यांचे डोळे तारवटलेले आहेत. देह पेंगुळलेला आहे. येथें कोणाला आस्था नाहीं कीं अधीरता नाहीं. दुकानदाराला नाहीं तशी गिऱ्हाइकाला नाहीं आणि गिऱ्हाइकांना नाहीं तशी बघ्यांनाहि नाहीं. येथें कोणी कोणाची वाट पाहत नाहीं. कोणी कोणाशीं स्पर्धा करीत नाहीं. दुकान आहे म्हणून तें उघडतें, माल आहे म्हणून तो मांडला जातो, आणि संवय आहे म्हणून

विक्री होते. दुकानांत काय आहे आणि काय नाहीं हें कळत नाहीं आणि कोणाला त्याची पंचाईत नाहीं. त्या दुकानांतल्या बोहिऱ्याला आपण तेथें कशासाठीं बसलों आहोंत याचीच खात्री दिसत नाहीं. त्या चष्म्याच्या दुकानांत चष्मे आहेत कीं नाहींत न कळे; दुकानदाराच्या डोळ्यांवर जाड भिंगें आहेत एवढीच त्यांची निशाणी ! हें शिंप्याचें दुकान आहे, पण त्यांत कापडापेक्षां लाकूडफाटाच अधिक दिसत आहे. या इकडच्या 'सबकुछचीज' समारोहांत कापडाच्या गबाळ पिशवीपासून थर्मासच्या फर्मास नमुन्यापर्यंत सारे जिन्नस आहेत, पण मालकाच्या सर्व वस्तूंविषयींच्या समबुद्धीचें चक्क शून्यबुद्धींत रूपांतर झालें आहे ! पण या साऱ्याला एक अपवाद आहे – कापडाचीं दुकानें. या दुकानांत हालचाल आहे. रंगदार आणि ढंगदार हालचाल ! पण ती हवापालटासाठीं आलेल्या पंजाबी प्रमदांनीं निर्माण केलेली आहे. स्थानिक स्त्रियांचा त्यांत काहीं दोष नाहीं.

या मार्केटांत एकदां तरी गेलेंच पाहिजे. या टोकापासून त्या टोकापर्यंत एक तरी फेरी मारलीच पाहिजे. कुठल्याशा एका दुकानावर 'नकद यहां उधार पाकिस्तान' अशी पाटी आहे ती वाचून या आळसावलेल्या जगांतल्या विनोदबुद्धीचा शोध लावलाच पाहिजे. येथें अनेक जीव भेटतील, दृश्यें दिसतील. हा चांभार. तुम्हीं त्याच्याकडे दुर्लक्ष केलें तरी तुमचें पादत्राण त्यानें हेरलेलें आहे. बुटाला पत्री मारायची असली तर त्याच्याकडे जा, पण पालिश मात्र करून घेऊं नका. कारण तें काढून घेण्यासाठीं नंतर रुपया टिचवावा लागेल ! हा भूतियार पाहा. येथें ओझीं उचलण्यासाठीं तो मुद्दाम भूतानांतून आला आहे. मुंबईच्या हमालाची निशाणी जशी पाटी तशी याची दोरी. या दोरीचा एक फांस मालाला आणि दुसरा त्याच्या डोक्याला असें त्याचें तंत्र आहे. त्याला तुमचें सामान द्या – प्राण गेला तरी तें गळपटणार नाहीं; पण त्याच्या जवळ जाऊं नका. जन्म आणि मरण यांच्या दरम्यान आंघोळ करण्याची त्याला सवय नाहीं ! आणि हा फळविक्या ! हिमालयांतल्या सर्व रसगर्भ फळांचे नमुने मांडून तो बसला आहे, पण आपल्या 'चनिया–मनिया' वालीला आपल्या बोरांबद्दल जेवढी आस्था वाटते त्याच्या दशांशानें त्याला त्यांच्याबद्दल वाटत नाहीं. आणि ही पुस्तकांची पाणपोई पाहा. हिच्या पसाऱ्यांत कोकशास्त्रापासून अणुशास्त्रापर्यंत


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों वि: ....................

आणि भूपालचरित्रापासून भूपटचरित्रापर्यंत अनेक प्रकार आहेत आणि त्यांच्या धूळदार गठ्ठ्यांच्या आडोशानें रशिया – अमेरिकेचें ग्रांथिक शीतयुद्ध चाललेलें आहे. आणि आपल्या व्यवसायाचें बोधचिन्ह शेजारीं मांडून ऐटींत लोकरीचें विणकाम करीत असलेली ही ‘ जमादारीण ’...कमोडास नुसता स्पर्श केला तरी आपल्या आगेंमागेंच्या शंभर पिढ्या नरकांत जातील अशी धास्ती घालणाऱ्या अलमोड्याच्या अस्पृश्यतेस ती डिंवचीत आहे. पण ही जी पर्वतकन्यका येत आहे तिच्यापुढें या अछूतकन्येचा काय पाड ? तिच्या पावलांतला ठेका आणि ठसका तसाच आहे. तिच्या डोक्यावर गवताचा भारा असेल आणि त्याच्या वजनदार आंदोलनानें लयदार पावलें टाकीत ती जात असेल तर तुम्ही तिच्याकडे अवश्य पाहा. पुढून नव्हे, मागून—कारण तिच्या नितंबनर्तनाचा उन्मादक थाट आतांच दिसेल. साऊथ सी आयसलंडमधील आदिवासिनींच्या नितंबदर्शनाचें रसरंगवर्णन अनेक पाश्चात्य लेखकांनीं केलें आहे. त्याला जगांत तुलाना नाहीं अशी त्याची स्तुति त्यांनीं गाइलेली आहे. मी त्यांना दोष देत नाहीं, कारण त्यांनीं या पहाडी पोरींचें नितंबनर्तन पाहिलेलें नाहीं. पण तें पाहूनहि पंजाबच्या उन्हाळी पाहुण्या उंच टाचांच्या चपलांच्या साहाय्यानें ठसकत–ठुमकत चालण्याचा ( लष्ठ ) प्रयत्न करतात तेव्हां त्यांना काय म्हणावें !

पण या मार्केटचें भूषण निराळेंच आहे आणि तें अनपेक्षित आहे. व्यापारी पेठेंत कलेच्या प्रदर्शनाची अपेक्षा फारशी कोणी करीत नाहीं. पण येथें एकमेकांना खेटून असलेल्या दुखणीतिखणी दुकानांवरच्या सज्ज्यांच्या दर्शनी भागावर कोरीव कलेचा मुक्त विलास आहे. त्यांत कोमल कल्पनाविलासाचा नुसता उल्लास आढळतो. प्रत्येक सज्ज्याचा साचा एकच आहे, पण त्यावरचा कोरीव साज सज्ज्यागणिक वेगळा आहे – कोठें नक्षीदार जाळ्या तर कोठें कोरीव चित्राकृति. कलदार लाकडावरचें हें कोरीव काम म्हणजे सज्ज्याच्या मालकाचा जणुं मानबिंदु. एखाद्या प्रदर्शनांत कलाकृतींचे नमुने मांडून ठेवलेले असतात तसे हे नमुने वाटतात. त्यांच्यांत अक्षय सौंदर्याची एक झांक आहे. परंपरेचा एक पीळ आहे. म्हणून त्यांच्याविषयीं मोठी जपणूकहि आहे. मधूनमधून हे सज्जे कोसळूं लागले आहेत. पण त्यांना राखण्याची कोशीस आहे. कांहीं कांहीं अर्थात् अगदीं नवीन आहेत. त्यांच्या

पैकीं ज्यांनीं जुन्या कलेचें अनुकरण केलें किंवा कलेचा हव्यास धरलाच नाहीं त्यांची विनम्रता शोभून दिसते. पण सर्वांपाशीं अशी विनम्रता कुठली ? एका इमल्यानें फार ऐट आणली आहे. त्याची सिमेंट–कॉंक्रीटची गच्ची पार वर गेली आहे. 'सत्यं शिवं सुंदरम्' असें नांवहि त्यानें कोरून घेतलें आहे. सत्यं–शिवंबद्दल माहीत नाहीं, पण 'सुंदरम्' मात्र डोळ्यांत खुपतें. कलेचें हें कोरीव वैभव व्यापारी मोहल्ल्यांत उधळावें हें विशेष आहे. राजवाड्यांवर अगर देवालयांवर कलेचा असला साजशृंगार अपेक्षित असतो. व्यापाऱ्याच्या पेढीवर त्याची अपेक्षा नसते. पण अल्मोड्याच्या व्यापाऱ्यांच्या कलासृष्टींत पैशाचा धूर गेलेला नसावा. अद्यापहि नसावा – नाहीं तर येथले कोरीव खांब आणि नक्षीदार दरवाजे मुंबई–कलकत्त्याच्या फॅशनेबल दिवाणखान्यांत केव्हांच गेले असते – आणि तेथल्या मानीव कौतुकानें त्यांना लाज आली असती !

● ● ●

कलेचा हा संस्कारित स्पर्श शेजारच्या नंदादेवीच्या देवळाला होऊं नये याचें मात्र नवल वाटतें. पण नंदादेवी ही पहाडी लोकांची देवता आहे, आणि तिला कलेचे हे कोमल कारभार मानवत नसावेत. हिमालय हें शंकराचें वसतिस्थान, पण त्याच्या पुराणोक्त अनुचरांनीं मात्र समग्र हिमालयाऐवजीं हिमालयाचें एखादें शिखर देवतास्वरूप मानावें हा चमत्कारच होय. (नंदादेवी म्हणजे पार्वती असा अर्थ लावल्याखेरीज याची संगति लागूं शकत नाहीं.) कालिमातेप्रमाणेंच ही देवता मोठी रुधिरप्रिय आहे. (म्हणूनच तिला कलेचे नाजुक साज पसंत नसावेत.) या देवालयांत सालिना एक प्रचंड उत्सव होतो, तेव्हां निदान एक तरी रेडा बळी देण्यांत येतो. या प्रथेला इतिहास आहे. अल्मोड्याच्या एका राजाचा मुलगा एका मस्त महिषासुरानें पोटांत शिंग खुपसून मारला. तेव्हांपासून राजानें बळी देण्याची पद्धत पाडली. हा कोण, केव्हाचा राजा हें आज कोणाला माहीत नाहीं. पण जत्रेच्या दिवशीं रेड्याला अंगांत सुऱ्या खुपसून मारतात. तेव्हां त्याच्या हंबरड्यानें पुनीत होण्यासाठीं हजारों पहाडी लोक नंदादेवीच्या या मंदिराकडे धावतात. मंदिर या विधीला शोभेसेंच दगडाळ आहे. त्याची उभट घुमटी साधीच आहे, आणि तिच्यावर इकडे इतरत्र आढळला तसा लाकडी सज्जा बांधलेला आहे. घुमटीला मंदिराच्या प्रवेशद्वाराकडे तोंड केलेली एक पशूची मूर्ति बाहेरून लटका-

वलेली दिसली. ही डुकराची वाटली. म्हणजे डुक्कर हें या देवतेचें आवडतें वाहन ?–कीं, भक्तांना भेडसावणारें श्वापद ?

अलमोड्याच्या एका टोकाला नंदादेवीचें देऊळ तर दुसऱ्या टोकाला रामकृष्ण मिशनचा आश्रम. दोन टोकांमधलें हें अंतर अगदीं शोभून दिसतें. नंदादेवीची तामस उपासना आश्रमाला मानवणार नाहीं आणि आश्रमाची सात्विक सेवा नंदादेवीला रुचणार नाहीं पण हा आश्रम म्हणजे सेवकांचा सेवक. वर्षभर जनसेवा करून थकलेल्या स्वामींना आणि सेवकांना विश्रांति घेण्यासाठीं या आश्रमाची योजना. त्या दृष्टीनें आश्रमाची जागा अगदीं योग्य ठिकाणीं शोधलेली आहे. जेथून हिमालयाच्या कृष्णकभिन्न शिखरांवरील धवल धारांचें दर्शन (ज्या हंगामांत होऊं शकतें तेव्हां अर्थात्) सर्वोत्कृष्ट प्रकारें होतें त्या ब्रायटन पॉइंटच्या थेट खालीं खोऱ्यांत डोंगराच्या बाजूवर आश्रमाची योजना आहे. ब्रायटन पॉइंटवर उभें राहावें नि खालीं खोऱ्यांत पाहावें. आश्रमाचें साधेंच छप्पर ओलांडून जाणारी दृष्टि खालीं खोऱ्यांत पोंचते. खोऱ्यांत थोडी हिरवळ आहे. उतरत्या असम भूमीचे कोन–काटकोन साधून तिची लागवड झाली आहे. तिच्या टप्प्यांतून खालच्या ओढ्यांतलें पाणी दिसतें आणि प्रसन्नपणें लकाकतें. आम्ही प्रथम गेलों तेव्हां सूर्यास्त होऊन गेला होता. तिन्हीसांजच्या छाया थोड्या काळवंडून खोऱ्यांत पसरल्या होत्या. धुक्याचा विरल विस्तार त्या छायांत मिसळत होता. चारदोन दिवे प्रकाशत होते. त्यांनीं अध्यात्माचें गूढ आवरण घेतल्यासारखें. इतक्यांत पलीकडच्या टेकडीवर कसला तरी प्रचंड जाळ पसरला. दिव्यांचा गूढ प्रकाश आणि त्या जाळाचा जबरदस्त उफाडा यांनीं माझ्या डोक्यांत कसली तरी विचित्र गल्लत होऊं लागली आणि त्या अवस्थेंतच आश्रमांत माझें पाऊल पडलें.

आश्रमाच्या स्वामींनीं आमचें स्वागत केलें. पण बोलत बसायला वेळ नव्हता. प्रार्थनेची वेळ झाली होती. आम्हीहि प्रार्थनेसाठीं गेलों. प्रार्थनेची टिचभर खोली. त्यांत छोटासा देव्हारा. त्यावर तीन तसबिरी. भिंतीला शंकर, सरस्वती, कालिमाता (नंदादेवीशी आध्यमिक ऐक्य प्रस्थापित करण्यासाठीं ?) वगैरेंच्या तसबीरी. प्रार्थना सुरू झाली. स्वामीजींनी जपानी पद्धतीच्या, मधोमध गोळा असलेल्या वर्तुलाकार तबकडीवर ठेक्याचे टोले देण्यास सुरवात केली. एका स्वामीनें झांज धरली. दुसऱ्यानें घंटानाद सुरू केला. भक्तांनीं

डोळे मिटून टाळ्या सुरू केल्या. भजनाचें संगीत विलक्षण होतें. संस्कृत मंत्रांचे बंगाली उच्चार भयंकर होते. त्यांतच तेथें डोळे मिटून बसलेल्या बॉब-कट कॉलेजकन्यकेचें बाटगें ध्यान भर टाकीत होतें. पण थोडयाच वेळांत (रामकृष्णांच्या आणि विवेकानंदांच्या पुण्याईनें ) प्रार्थनेचें तन्मय वातावरण निर्माण झालें. मी त्यांत निमग्न झालों. इतक्यांत त्या भरगच्च खोलींत गाद्या-गिरद्यांनीं भरलेला एक पलंग होता. त्याच्याकडे लक्ष गेलें. पलंगावर स्वच्छ चादर आणि स्वच्छ उशा होत्या. मधोमध एक आडवा लोड होता आणि त्या लोडाला टेकून एका स्वामीची तसबीर होती. या तसबिरीची पूजा केलेली होती. तिला फुलांची माळ घातलेली होती. मागाहून समजलें कीं, ती आश्रमाचे आद्यचालक राममहाराज यांची तसबीर. पण या माहितीनें माझें चाळवलेलें चित्त ताळयावर आलें नाहीं. मनिलाच्या मग्तं-ग्गूळआसांनीं आपल्या मातोश्रीची खोली ती जिवंत असतांना जशी असे तशी ठेवलेली दाखविली होती त्याची आठवण झाली. आसांची भावना त्यांच्या खाजगी निवासस्थानांत खाजगी रीतीनें व्यक्त झाली होती आणि अगदीं स्वाभाविक वाटली होती. पण वेदांताचें मंत्रजागरण होणाऱ्या त्या खोलींत दिवंगत राममहाराजांना अगदीं पार्थिव देहानें विश्रांति घेण्यासाठीं केलेली ती व्यवस्था मात्र चमत्कारिक वाटली !

● ● ●

डॉ. बोशी सेन यांचा परामर्श घेतल्याखेरीज अलमोडयाची भेट सफल झाली असें म्हणतां येणार नाहीं. ‘ विवेकानंद ’ लॅबोरेटरी या वनस्पति-शास्त्रीय संशोधनमंदिराचे संस्थापक चालक डॉ. बोशी सेन यांचें ज्ञान नव्हे तर त्यांचें व्यक्तित्व त्या मंदिराच्या परिसरांत नांदतें. हसऱ्या, खोडकर, घाऱ्या डोळ्यांची, देखण्या चेहऱ्याची, सदृढ बांध्याची सेनबाबूंची उंचीपुरी, सत्तर वर्षें वयाची मूर्ति म्हणजे एक नवल आहे. प्रोटोप्लॅझमवर मौलिक संशोधन करून वैज्ञानिक जगांत मान्यता पावलेले, स्वतःच्या जीवनांत विज्ञान आणि अध्यात्म यांची एकात्म साधना करणारे, संशोधनाचा आनंद आणि जनसेवेची कृतार्थता यांचा यशस्वी मेळ साधणारे, सेनबाबू म्हणजे केवळ अलमोडयाचें नव्हे तर आजच्या भारताचें भूषण आहेत. पण त्यांच्या कार्यापेक्षां आणि त्यांच्या कीर्तीपेक्षा त्यांचें व्यक्तित्व मोहक आहे. त्यांच्या यशाचें, त्याहून अधिक म्हणजे त्यांच्या आयुष्यांत नांदणाऱ्या शुद्ध समाधानाचें रहस्य त्यांच्या व्यक्ति-

त्वांत आहे. त्यांचे आध्यात्मिक गुरु सदानंदस्वामी त्याना एकदा म्हणाले, 'इंग्रजांचें राज्य या देशांत आहे तें आमच्या कमकुवतपणामुळें. चारदोन गोरे अधिकारी मारून तो कसा दूर होणार!' - सेनबाबूंनीं लगेच बॉंब फेकून दिला. त्यांचे वैज्ञानिक गुरु सर जगदीशचंद्र बोस त्यांना म्हणाले, 'झाडाखालीं झाड वाढत नाहीं. तूं स्वतंत्र प्रयोगशाळा काढ.' – सेनबाबूंनीं त्या श्रेष्ठ वैज्ञानिकाशीं असलेलें अकरा वर्षांचें साहचर्य सोडलें आणि स्वतःच्या स्वयंपाकघरांत प्रयोगशाळा सुरू केली. लंडनला सर पॅट्रिक गिडीज म्हणाले, 'पदवी घेऊं नकोस – पदवीखालीं कार्य गुदमरतें.' – सेनबाबू पदवी घेतल्या खेरीजच परत आले. नेहरू म्हणाले, 'दिल्लीला या. पंचवीस एकर जमीन देतों. येथें प्रयोग करा.' – सेनबाबू उत्तरले, 'माझें कार्य पाहण्यास तुम्हांला थोडाच वेळ होणार आहे? फायली खाकेंत मारून कोणा तरी अंडर सेक्रेटरीचे उंबरठे झिजविणें मला जमणार नाहीं.' सेनबाबूंच्या जीवनवस्त्राचे धागे असे आहेत. राजकारणाबद्दल बोलतांना ते म्हणतील, 'Politics means policy is the best honesty' वनस्पतींच्या वाफ्यांशेजारून जातांना त्यांचे सुकलेले अंकूर पाहून त्यांचा चेहरा कसकसेल. पण लगेच ते म्हणतील, 'काय केलं पाहिजे माहीत आहे? परमेश्वराकडे (पाहिजे तर मि. नोबडीकडे असें म्हणा) अर्ज करून त्याला सांगितलें पाहिजे, तुझ्या हवामानखात्याचें कार्य नीट चाललेलें नाहीं.' त्यांच्या प्रयोगशाळेंतले मक्याचे आणि गव्हाचे अक्षरशः शेकडों नमुने पाहून तुमचे डोळे आश्चर्यानें विस्फारले म्हणजे सेन एक संस्कृत श्लोक म्हणतील आणि त्याचा भावार्थ सांगतील : सत्ता, संपत्ति आणि अभिमान यांचा मोह सोडा म्हणजे खरें सुख लाभेल.

सेनबाबू जितके वैशिष्ट्यपूर्ण तितकीच त्यांची अमेरिकन पत्नी वैशिष्ट्यपूर्ण. तशीच विद्वान. भारत सरकारनें प्रसिद्ध केलेलें त्यांचें 'कल्चरल यूनिटी ऑफ इंडिया' हें पुस्तक याची ग्वाही देईल. सेनबाबूंनीं एकपट प्रवास केलेला, तर यांनीं दहापट. पूर्वायुष्यांत त्यांचीं पावलें चीन, जपान, फिलिपीन्स, इंडोचीन आदींच्या प्रदेशांवर सहज फिरायला गेल्याप्रमाणें पडत. 'फिलिपीन्स-मध्यें फार नाहीं राहिलें मी – फक्त सहा महिने' अशा थाटांत या प्रवासा-बद्दल त्या बोलतात. त्यांच्या ग्रंथालयांतले 'एशिया' मासिकाचे बांधलेले खंड त्यांच्या प्रवासांतून जन्मलेल्या संपादनचातुर्याची ग्वाही देतात. एकदां हिंदु-

स्थानांत येऊन हिंदी लोकजीवनाचा अभ्यास करण्याची त्यांना इच्छा झाली. त्या एका खेड्यांत राहूं इच्छीत होत्या. ब्रिटिश सरकारनें त्याना एक खेडें दाखविलें. तें खेडें म्हणजे झारच्या पोटेमकीन खेडयाची आवृत्ति! त्या गांधीं-कडे गेल्या. गांधींनीं त्यांना एक खेडें दाखविलें. पण बाई स्वतंत्र. त्यांनीं एक कंपास घेतला. हिंदुस्थानच्या नकाशावर फिरविला. ओढलेल्या वर्तुळांत पेन्सि-लीचें टोंक टेकलें, आणि उठलेल्या टिंबावरच्या खेडयांत जाऊन मुक्काम ठोकला. भाषा माहीत नाहीं. चालरीत माहीत नाहीं. पण बाईपाशीं इच्छा होती. आणि अंतःकरण होतें. त्यांतूनच त्यांचें ' व्हॉइसलेस इंडिया ' हें पुस्तक निर्माण झालें आणि त्याच्यामुळेंच अनेक हिंदी व्यक्तींचा स्नेह जोडला गेला. आणि मग कांहींना प्रश्न पडला — यांना हिंदुस्थानांत ठेवायचें कसें? रामकृष्ण मिशनच्या सिस्टर क्रिस्तीनना युक्ति सुचली. म्हणाल्या, बोशींशीं लग्न करून घ्या, आणि खरोखरच त्यांचें लग्न झालें आणि गटर्ड्यूड इमर्सन गटर्ड्यूड इमर्सन सेन बनल्या! अलमोडयाच्या घरांत सेनबाबूंची पूजेची खोली आणि सेनबाईंची अभ्यासाची खोली एकमेकांना जोडून आहेत—आणि या दोघांत सव्वीस वर्षापूर्वी निर्माण झालेलें नाजुक नातें अद्याप तितकेंच नाजुक आहे!

सेनबाबूंची ओळख झाली आणि मला आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण बंगाल्याची तीव्रतेनें आठवण झाली. ते म्हणजे बंगालचे विख्यात कवि सुधिंद्रनाथ दत्त. सेन जगदीशचंद्रांचे आवडते, तर दत्त रवींद्रनाथांचे आवडते. सेनबाबूंनीं जगदीशचंद्रांबरोबर जगप्रवास केला, तर सुधीन दत्तांनीं रविबाबूं-बरोबर जगाला प्रदक्षिणा घातली. जगदीशचंद्रांनीं सेनबाबूंना विज्ञानांतलें विश्व दाखविलें, तर रविबाबूंनीं सुधीन दत्तांना विश्वांतलें काव्य शोधायला शिकविलें. दोघेहि आपापल्या गुरुबद्दल भक्तीनें आणि जिव्हाळ्यानें बोलतात. पण सेनबाबू आपले आध्यात्मिक गुरु स्वामी सदानंद यांच्याबद्दल अधिक बोलतात. स्वामी सदानंदांना विवेकानंदांचा साक्षात्कार त्यांना भेटण्यापूर्वीच कसा झाला हे सेन सांगतात, तर रविबाबूंना निसर्गाचा साक्षात्कार कसा होत असे याचें वर्णन सुधीन दत्त करतात. ' तुला प्रियमीलन साधायचें असेल तर तूं चेहऱ्याला भस्म फांसून तिच्याकडे ये. ' हें विवेकानंदांच्या तोंडचें गीत ऐकून स्वामी सदानंदांनीं आपला स्टेशनमास्तरचा पोषाख कसा उतरला, लुंगी कशी नेसली, चेहऱ्याला भस्म लावून ते विवेकानंदांप्रत कसे गेले, हें

सेनबाबू सांगतील; तर दुसऱ्या एका स्त्रीवर प्रेम असल्यामुळें आपण आपल्या पत्नीला अन्याय करीत आहोंत या विचारानें रविबाबू कसे कष्टी असत हें सुधीन दत्त सांगतील. दोघेहि आपापल्या गुरूबद्दल आर्त आपुलकीनें आणि जिवंत जिव्हाळ्यानें बोलतात. पण दोघांत फरक आहे. एकाची साधना आध्यात्मिक आहे, तर दुसऱ्याची सौंदर्यात्मक आहे. एकानें विज्ञानांत अध्यात्म शोधलें, तर दुसऱ्यानें जीवनांत काव्य अनुभवलें. पण दोघांचीं व्यक्तित्वें समृद्ध आहेत — मला तरी यापुढें एकाचें स्मरण दुसऱ्याची स्मृति जागृत झाल्याशिवाय होणें अशक्य आहे.

● ● ●

सत्यकथा : ऑगस्ट, १९५८

# धवल दर्शन

हिमालयांत येऊनहि मनोरंजनाचे आधुनिक उद्योग करायचे असतील, म्हणजे इंग्रजी चित्रपट पाह्यचे असतील, आइस्क्रीमचे निरनिराळे प्रकार चाखायचे असतील, मोतद्दारानें धरलेल्या घोड्यावर बेताबातानें बसून घोडदौडीचें समाधान मिळवायचें असेल, वल्ह्याचे हात न मारतांच नौकाविहाराचा आनंद लुटायचा असेल तर (कुमाऊ प्रांतांत) अल्मोड्याला येऊं नये. तेथें साधें रिक्शाचें-सुद्धां वाहन नाहीं. नैनितालला जावें. तेथें 'बोटिंग-राय-

डिंग 'ची सोय आहे. नाहीं तर राणीखेतला जावें. तेथें गोल्फ खेळण्याची व्यवस्था आहे. पण हिमालयांतलें भारतीयत्व अनुभवायचें असेल – जेथें महात्मा गांधींनीं अनासक्तियोग लिहिला त्या कौसानीच्या निसर्गसौंदर्यांत अध्यात्माचा संचार कसा झाला आहे याचा प्रत्यय घ्यायचा असेल, जेथें मार्कंडेयांनीं दुर्गासप्तशती लिहिली त्या बागेश्वराला शरयू आणि गोमती यांच्या प्रेमप्रसंगांत डुंबायचें असेल, कडकडीत हिंदुत्वाचा संचार पाश्चिमात्यांत झाला म्हणजे साधनेचा कोणता साक्षात्कार घडतो हें पाहण्यासाठीं 'कृष्णप्रेमी'च्या मिरतोळा आश्रमाला भेट द्यायची असेल, जोगेश्वरच्या प्राचीनांतल्या प्राचीन शिवमंदिराच्या परिसरांतलीं पावन दृश्यें पाह्यचीं असतील तर अलमोड्याला मुक्काम करावा. म्हणजे येथें फक्त अलमोड्याहून जातां येतें आणि इतर ठिकाणांहून नाहीं असें नाहीं. आजकाल हवें तेथून हवें तेथें जातां येतें. याला एव्हरेस्टहि अपवाद नाहीं. (एव्हरेस्टच्या आरोहणाची लंडन येथें झालेली अत्याधुनिक पूर्वतयारी येथें लक्षांत घ्यावी.) पण या साऱ्या ठिकाणीं अल्मोड्याहून जाणें हें अधिक स्वाभाविक आहे. अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या ठिकाणांना भेट देण्याची प्रेरणा अलमोड्यांतच अधिक मिळेल. या ठिकाणांच्या स्वयंभू भारतीयत्वाची ओढ अलमोड्याला आहे. नैनिताल-राणीखेतला ती किती आहे याबद्दल मला शंका आहे.

आतां असें असूनहि मार्कंडेयांच्या तपश्चर्येनें पुनीत झालेला तो शरयूंतला खडक मी डोळे भरून पाहूं शकलों नाहीं अगर मिरतोळा आश्रमांतील भजनानें माझी श्रवणशक्ति मी पवित्र करून घेऊं शकलों नाहीं, हें माझें दुर्भाग्य! पण कौसानी आणि जागेश्वर (आणि राणीखेतहि) येथें भाग्याची इतकी कांहीं कृपावृष्टि आमच्यावर झाली कीं अधिकाची आशा धरणें हा हावरेपणा ठरला असता आणि हावरेपणाच्या पोटी फजिती हें आजच्या ऐहिक युगांतहि खरें आहे.

कौसानीच्या रस्त्याला लागलों आणि पाऊस सुरू झाला. वाटलें, संपलें, आतां आमच्या सफरीवर पाणी – आणि अक्षरशः पाणी! कारण आमच्यापाशीं रेनकोट नव्हते नि छत्र्य हि नव्हत्या. पण कौसानीच्या सरकारी बंगल्याकडे जातां जातां पाहिलें तों पूर्वेकडच्या क्षितिजावर आकाशाची पट्टी

उघडली आहे आणि तिच्यांतून चांदीच्या धारांनीं रंगलेली हिमालयाचीं काळसर–निळसर शिखरें डोकावत आहेत. अर्थात् आम्हांला खात्री नव्हती. आकाश ढगांनीं तंग होतें आणि पूर्वेकडच्या फटींतसुद्धां ढग घुसलेच होते. सूर्य खालीं गेला होता आणि त्याचा प्रकाश पूर्वेच्या क्षितिजावर रंगण्याचा संभव ढगांनीं मारला होता. सायंकाळच्या छाया झपाट्यानें पसरत होत्या आणि त्यांत पावसाची काळोखी चमत्कारिक रीतीनें पसरली होती. आपण पाहतों तें शिखराचें सत्य कीं ढगांची माया याबद्दल निश्चिति नव्हती. आणि हिमालयाच्या त्या शुभ्र सत्यानें आम्हांला असें सुखासुखी दर्शन तरी कां द्यावें ? आमची तशी तपश्चर्याच कोठें होती ? आमच्या सफरीत साहसाची झेंपहि नव्हती आणि यात्रेची निष्ठाहि नव्हती. बसच्या आरामांत आम्ही आलेले. पण आम्ही आलों होतों ते मुख्यतः कौसानीचें निसर्गसौंदर्य पाहण्यासाठीं – कौसानीच्या डोंगराच्या टोकावरून, हिमालयाच्या अंगावर निसर्गानें सौंदर्याचे जे गालिचे पसरून ठेवले आहेत त्याचें दर्शन घेण्यासाठीं. ( कौसानी-सारखें सुंदर ठिकाण उभ्या स्वित्झर्लंडमध्यें नाहीं हें महात्मा गांधींचें मत आमच्या कानांवर आलेलें होतें, आणि सौंदर्यनिरीक्षक अशी गांधीजींची ख्याति नसूनसुद्धां त्या महापुरुषाच्या मताचे पाश आमच्या मनाभोंवतीं होतेच. ) एकूण आम्ही कौसानी पाहायला आलों आणि पहिल्याच पावलाला आमच्या नजरेंत आलें तें हें स्वर्गीय दृश्य. तरी पण खात्री नव्हती. ढगांनीं ही आमची चेष्टा तर चालविली नाहीं ना, असें सारखें वाटत होतें. पण बंगल्यावर आल्यावर चौकीदार म्हणाला,

' नहीं साब, यह ठीक त्रिशूल है । चार दिन बादल की बहुत भीड थी. कुछ नहीं दिखता था. लेकिन अभी, एक घंटेसे पहिले, बारिश हुई और यह खुल गया. '

मी म्हटलें, ' आमचं नशीब शिकंदर. '

आम्हीं पाहिलें, डोळे भरून पाहिलें. बंगल्याच्या समोर एक चबुतरा उभारला होता त्याच्यावर चढून पाहिलें. अनिमिष नेत्रांनीं पाहिलें. खालीं डोंगरांची रांग होती आणि वर दाटलेल्या ढगांची किनार होती, व मधल्या मोकळ्या भागांत मधूनमधून तुटलेला काळा कडा होता आणि त्याच्या शिखरांवरून बर्फाचे ओहळ उतरले होते. या मोकळ्या भागांतसुद्धां ढगांचा

संचार होताच. त्यांनींच हिमालयाचा तो अखंड कडा तोडला होता आणि त्याच्या शिखरांवरील बर्फाच्या राशींवर आपलीं मळकट लक्तरें सोडलीं होतीं. तरीदेखील बर्फाच्या थरांतून व्यक्त होणारा कडेकपारीचा काळा खडकाळ भाग स्वच्छ दिसत होता. त्याच्या अंगावरचें निसर्गाचें ओबडधोबड खोदकाम ध्यानांत येत होते. निळ्या अंतरामुळें त्याला एक प्रकारचें सौम्य सौंदर्य प्राप्त झालें होतें — आणि सायंकाळच्या काळ्या छाया त्यांत शिरल्यामुळें सौंदर्याला एक चमत्कारिक कळा प्राप्त झाली होती. तरीसुद्धां मावळत्या सूर्याचा प्रकाश कुठूनसा त्रिशूळावर पडला होता आणि त्याचीं तीन शिरें तीन तऱ्हांनीं दिसत होतीं.

हळूहळू ढगांनीं सुरू केलेलें ग्रहण काळोखानें पूर्ण केलें. काळ्या कडयांचीं शिखरें अधिकाधिक काळट–धुकट बनत गेलीं. जरा वेळानें तीं पार दिसेनाशीं झालीं आणि ढगाळलेल्या आकाशावर त्यांची फक्त एक अंधुक छटा उरली. कोणाला ठाऊक, खरी कीं खोटी ! पण डोळ्यांची ओढ कमी होत नव्हती. मात्र शक्ति अपुरी पडत होती. आंत हुरहुर आणि निराशा दाटली. अखेरची असहाय नजर टाकीत आम्ही बंगल्यांत आलों.

पण रात्रीं आकाश अगदीं निरभ्र झालें. चांदण्यांनीं चमचमूं लागलें. क्षितिजाकडे गूढ अंधार दाटला होता, तरी उद्यां सकाळीं स्वच्छ दर्शन होणार असा विश्वास वाटला, आणि सकाळीं ठीक पांच वाजतां उठव, असा चौकीदाराला इशारा दिला.

पांच वाजतां उठून पाहतों तों आकाश ढगाळलेलें. ढग विरळ होते. पूर्वेकडचा भाग बराचसा मोकळा होता. पण तिकडेहि ढग होतेच. उषःकालाचे रंग त्यांच्यावर खुलले होते, तरी मधूनमधून काळे पसरते डाग होते, आणि लवकरच ढग दाटून सारें क्षितिज व्यापून जाणार अशी भीति घालीत होते, पण ढगांच्या दरम्यान शुभ्र सिंचनानें सुशोभित झालेली कृष्णवर्णीय पर्वतराजी दृष्टीस पडत होती. हें दर्शन कालच्या इतकें स्वच्छ नव्हतें, पण अधिक विस्तृत होतें. काल फक्त त्रिशूळ दिसला होता. आतां नंदाघुंटीपासून पांचोलीपर्यंतचा विस्तार ( अर्थात् ढगांनीं ढागळलेला विस्तार ) दिसत होता. पण कांहीं झालें तरी कालच्या दृश्याची सर याला नव्हती. रात्रीं झोंपेंत एखादें गोडसें स्वप्न पडावें, त्यानें अंतरंग खुलून जावें, पण सकाळीं मात्र तें नीटसें आठवूं नये

आणि त्याच्या अस्पष्ट आठवांत वसली तरी हुरहूर मिसळावी, असें कांहींसें वाटलें.

समोरची ती श्रेणी अधिक स्वच्छ होईल म्हणून वाट पाहत बसलों तों तिच्यामागूनच सूर्य वर आला. ती रांग उजळण्याऐवजीं थोडी धूसरच बनली आणि अधिक स्वच्छ दर्शन होण्याची आशा मावळली. वाटलें, सूर्य कासराभर वर आला कीं त्याचे किरण शिखरावरच्या बर्फावर खुलतील आणि तें दृश्य उजळेल. पण चौकीदार म्हणाला, 'आतां नाहीं दिसलें तर सायंकाळीं दिसेल.' आम्ही हिरमुसले होऊन सकाळच्या बसनें जाण्याची तयारी करूं लागलों. पण आठ–साडेआठच्या सुमारास सहज बाहेर आलों तों काय चमत्कार! पूर्वेकडचें क्षितिज मोकळें झालें होतें — बरेंचसें मोकळें झालें होतें आणि हिमालयाच्या पर्वतराजीचें दर्शन पूर्वी कधीं झालें नव्हतें इतकें स्वच्छ होत होतें. म्हणजे चौखंबापासून पांचोलीपर्यंत सारा विस्तार अखंड दिसत होता असें नव्हे. मधूनमधून ढग होतेच आणि आमच्या दृष्टीची आणि आकांक्षेची चेष्टा करण्याचा त्याचा दुष्ट उद्योग सुरूच होता. पण निदान त्रिशूळ स्वच्छ दिसत होता. त्याचें खडकाळ अंग स्पष्ट दिसत होतें. बर्फाच्या ओहोळांनीं त्याच्या अजस्र शरीरावर केलेला शुभ्र सफेत रंगविलास लख्ख दिसत होता. त्याच्या छटा-उपछटाहि सांगतां येत होत्या. कालच्या-प्रमाणें आजहि त्रिशूळानेंच आपलें स्वरूपदर्शन प्रांजळपणें घडविलें होतें आणि त्याच्या अजस्र शक्तीचा असा कांहीं प्रत्यय येत होता कीं हें रूपदर्शन म्हणजे त्या विश्वरूपदर्शनाचीच एक कला तर नव्हे, असें वाटलें. पण त्या ढगांना मात्र या शक्तीची क्षिति दिसली नाहीं. (अतिपरिचयात् अवज्ञा!) एक मिस्किल ढग तर त्याच्यावर असा कांहीं पसरला होता कीं त्रिशूळामागें हे कोणतें दुसरें शिखर म्हणून आम्ही चर्चा करूं लागलों. अर्थात् आम्हांला कांहींच माहीत नव्हतें. अज्ञानाचे खडे कॅलिडिस्कोपमध्यें फिरविण्याचा तो प्रकार होता. पण त्यात गंमत होती. जरा वेळानें ध्यानांत आलें कीं हें दुसरें-तिसरें शिखर वगैरे कांहीं नव्हे, तर या मधोमध आडव्या पसरलेल्या ढगानें त्रिशूळाचे दोन भाग करून आमच्यावर दृष्टिभ्रमाचा प्रयोग केला होता.

मी चबुतऱ्यावर उभा राहून पाहत होतों. तोंच ढगांच्या प्रयोगाचें स्वरूप अगदीं निर्दय झालें. त्यांनीं शुभ्र शिखरांच्या रांगेवर आपला मलीन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



अनुक्रम ............ विः ............
क्रमांक ............ नों. दि. ............

पडदा पूर्ण पसरला. मी तसाच निराश नजरेनें पाहत राहिलों. आतां डोंगरांच्या अलीकडच्या रांगा तेवढ्याच निळट-काळट-धुकट रंगाचें आवरण घेऊन उभ्या असलेल्या दिसत होत्या. काल सायंकाळीं या अलीकडच्या पार्थिव रांगा आणि ती पलीकडची स्वर्गीय श्रेणी यांतला फरक स्वच्छ दिसला होता आणि स्वर्ग व धरा यांतला भेद मनावर ठसला होता. कालची ती स्वर्गीय स्मृति आणि आतांचें समोरच्या रांगांचें दृश्य यांचें एकदम मीलन झालें आणि स्वर्गसोपानाची कल्पना या येथेंच जन्माला आली असा साक्षात्कार झाला ! त्या चबुतऱ्यावरून शरयू-गोमतीचें विशाल खोरें आणि त्या खोऱ्यांत तळापासून दृष्टीस पडणाऱ्या डोंगराच्या रांगा — त्यांच्यामागच्या रांगा – आणि त्यांच्या मागच्या रांगा, अशा क्रमाक्रमानें एकामागें एक दिसणाऱ्या रांगा दिसतात आणि त्या खोऱ्यांतल्या रांगेपासून त्या स्वर्गीय पर्वतश्रेणीपर्यंत एकमेकांवर चढत जाणाऱ्या रांगा ऋषींच्या काव्यदृष्टीला स्वर्गसोपानाच्या विशाल पायऱ्या कशा वाटल्या असतील याची कल्पना येते. पांडवांनीं स्वर्गारोहण नक्की कोठें केलें मला माहित नाहीं, पण हिमालयाच्या मांडीवर बसून महाभारत लिहिणाऱ्या व्यासाच्या नजरेसमोर त्या प्रयाणाचा अर्थगर्भ वृत्तांत लिहितांना, कौसानीसमोरचा स्वर्गसोपान असावा अशी कल्पना करावीशी वाटते.

समोर तें खोरें होतें. खोऱ्यांत नदी होती. नदीचें पाणी शेतांत जात होतें. शेतापलीकडे घरें होतीं, झाडें होतीं. आणि त्यांतून येणारा धूर आकाशांत जात होता. या साऱ्या जीवनाच्या खुणा. जीवनाचा ओघ आणि वेग व्यक्त करणारीं चिन्हें, त्या भव्य विशाल स्वर्गसोपानाच्या दृष्टिपथांतच हें जीवन वहातें आणि वाढतें. आतां त्या स्वर्गसोपानाची अंतिम धारा दिसत नव्हती. ढगांत लोपली होती. पण त्याच्या चंदेरी तेजानें तें जीवन सदोदित भरलेलें असतें. त्याच्या रुपेरी हास्यानें तें हसतें. सौंदर्यानें तें बहरतें. विशालतेनें व्यापक बनतें. या विशालतेंत त्याला दैविकतेचा साक्षात्कार होतो आणि त्याचें अंतःकरण प्रार्थनामय बनतें. मग प्रत्येक वस्तु आणि प्रत्येक व्यक्ति त्या पर्वतराजाची, त्या त्रिशूलाची, त्या नंदादेवीची पुजा करूं लागतो. मनुष्य नेत्रांनीं, वृक्ष पल्लवांनीं, पक्षी गायनानें, पाणी प्रतिबिंबानें, अग्नि धूमाच्या रूपानें, वायू गंधनाद गोळा करून आणि निसर्ग आपली सारी विमल शोभा

उभी करून त्या स्वर्गीय सत्याची पूजा करूं लागतो. आणि मग अनंताची आणि अद्वैताची दृष्टि फुटते, आणि निसर्ग आणि मानव, चेतन आणि अचेतन यांच्या अंतःकरणाचें एकात्म संगीत साऱ्या खोऱ्यांत घुमूं लागतें!

पण एका ओढ्यांतून गिधाडांचा एक थवा एकदम उडाला आणि माझी दृष्टि भानावर आली आणि मग ध्यानांत आलें कीं या खोऱ्यांतल्या या जीवनाची धडपड आपल्या परिचयाची आहे. तिचा संबंध त्रिशूळाशी नाहीं, तर लखनौशीं. प्रार्थना नंदादेवीची नाहीं, सरकारी अधिकाऱ्याची, चिंता स्वर्गप्राप्तीची नाहीं. परमिट प्राप्तीची. ईर्षा स्वर्गसोपान चढण्याची नाहीं, फावड्यानें जमीन खोदण्याची. बुद्धि अर्घ्य देण्याची नाहीं, नदींत दोन चुळा टाकण्याची. वृत्ति विशालतेंत विलीन होण्याची नाहीं, घराच्या भिंतींत बंदिस्त होण्याची. जीवनाची ही चाल आपल्या परिचयाची आहे. तिच्या मागें उभारलेली तत्त्वज्ञानाची शिडीहि आपण पाहिलेली आहे. (आणि ही शिडी त्या स्वर्गसोपानापेक्षां महत्त्वाची आहे.) हिमालयाच्या शांत अलिप्त जगांतहि जीवनाची हीच रीत आहे. कौसानीच्या त्या चबुतऱ्यावर उभे राहा, समोरच्या क्षितिजाला जाऊन भिडणाऱ्या डोंगरांच्या रांगा पाहा, मागें देवदाराचे आणि चिडाचे वृक्ष नृत्याचे हावभाव करीत उभे आहेत त्यांच्याकडे दृष्टि टाका, त्यांच्या लोभस शाखांवर उडणाऱ्या पक्ष्यांचे सुरंगी पंख न्याहाळा, आणि अगदीं पावलापाशींच असणाऱ्या फुलझाडांवरील टपोऱ्या मखमली फुलांचें डोलणें पाहा – वाटेल, जगाचें काय वाटेल तें असो, येथें तर ॲटम बॉंब कोणी टाकणार नाहीं! नाहीं टाकणार कदाचित्. पण तपस्व्यांच्या या अलिप्त भूमींत येऊन साहेबानें लष्करी दृष्टीचे रस्ते बांधलेच ना! येथें ॲटम बॉंब कोणी टाकणार नाहीं, पण तो गोळा पेलणाऱ्या सत्तेचे पाश येथें येऊं शकतील. एका काळीं हे पाश आलेले नव्हते. येथील ऋषि स्वतंत्र होता. आत्मचिंतनांत मुग्ध होऊन जाण्याची पूर्ण मोकळीक त्याला होती, आणि तत्त्वज्ञानाचा विशाल विकास झाला. आजचें तत्त्वज्ञान आर्थिक विकासाचें आहे, आणि त्याचे पाश इथपर्यंत काय, पलीकडेहि पोचलेले आहेत.

● ● ●

कौसानीला उमटलेली रेघा पुढें आम्ही राणीखेतला गेलों तेव्हां कायम होती. किंबहुना ती अधिक ठसठशीत बनली. तेथें हिमालयाच्या धवल

शिखरांचें अधिक स्वच्छ दर्शन झालें. आम्ही दोन–अडीचला पोंचलों तेव्हांच हीं शिखरें ढगाचा पडदा फाडून डोकावूं लागलीं होतीं. आणखी दोन-अडीच तासांनीं आम्ही बाजारांत फेरफटका करायला निघालों. तेव्हां आणखी कांहीं खट्याळ ढग बर्फांच्या विस्तारांत शिरून त्यांचें रूप येथें तेथें मलीन करीत होतेच, पण आम्ही बाजारांत आलों, तेथल्या छोट्याशा कट्टयावर एक बाग आहे तेथें जाऊन बसलों, तो – समोर हिमालयाचा, नजरेच्या डाव्या फेंकी-पासून उजव्या फेंकीपर्यंत डगडगीत पसरलेला शुभ्र सफेत विस्तार! चांगला दोनशें मैलांचा विस्तार! एका टोकाला केदारनाथ व दुसऱ्या टोकाला नम्पा! असा ऐसपैस विस्तार दिसण्याचे हे दिवस नव्हते. पण आमचें नशीबच जोरावर! आमची शेजारीणबाई नंतर म्हणाली, 'काय हो, किती सुंदर देखावा! गेले दोनतीन दिवस दिसतोय, पण आजच्यासारखा कधींच दिसला नव्हता.'

प्रत्येकजण विचारतो, 'कसा वाटला हा विस्तार?' 'कसा आहे तुमचा हिमालय?' या एका युगोस्लाव्ह मित्राच्या प्रश्नाला जें उत्तर कित्येक वर्षांपूर्वीं मीं दिलें होतें तेंच या प्रश्नाला दिलें. त्या मित्राला मीं म्हटलें होतें, 'हिमालय कसा आहे सांगू? हिमालय हिमालयासारखा आहे. म्हणजे त्याला दुसऱ्या कशाची तुलना नाहीं.' हिमालय पाहण्यापूर्वीं दिलेलें हें उत्तर तो पाहिल्यानंतर माझें मलाच पटलें! हिमालयाची अजस्रता, हिमालयाची भव्यता, हिमालयाचीं हिमगौर शिखरें, यांच्याशीं कशाची तुलना करायची असेल तर कल्पनाविलासाचा आश्रय करावा लागेल आणि कल्पनाविलास म्हणजे सत्याशीं एक प्रकारचा गोडसा लपंडाव! या लपंडावाच्या खेळांत फारसें न गुरफटतां मी एवढेंच म्हणेन कीं स्वर्गसोपानाची कल्पना एकामागें एक उंचावणाऱ्या हिमालयाच्या रांगांनीं स्फुरली असली, तर कुबेराची अलका-नगरी हिमालयाच्या श्वेतगौर श्रेणीच्या दर्शनानें जन्माला आली. कामेतचें शिखर मला एथन्सच्या भग्ननगरींतील एखाद्या स्तम्भमालिकेप्रमाणें वाटलें, तर नंदादेवीचें शिखर पाहून मला दिल्लीच्या सेंट्रल सेक्रेटरीएटवरील घुम-टीची आठवण झाली. आकाशावर रेखलेली हिमालयाची बर्फाच्छादित रांग पाहिली कीं, एखाद्या राजनगरीच्या प्रासादांनीं आणि मंदिरांनीं निर्माण केलेल्या आकाश रेषेची आठवण होते. अर्थात् सकाळच्या सूर्यप्रकाशांत

हिमालयाचीं शुभ्र शिखरें सुवर्णाच्या तेजानें तळपूं लागलीं म्हणजे भव्य भव्य भवनांच्या स्फटिकमण्यांवर सूर्यकिरणांची किमया सुरू झाली, किंवा चतुर्थीच्या चंद्रानें हिमालयाच्या शिखरावर रजतरसाची चमचम सुरू केली कीं हीं नक्षत्रांचीं प्रतिबिंबपुष्पेंच फुललीं असें कालिदासाच्या प्रतिभेला न वाटावें तर कोणाच्या ? पौर्णिमेच्या प्रकाशांत हिमालयांवरील रजतधारांचें तेज तरळलें म्हणजे हे चंद्रमणि पाझरले असें न वाटलें, किंवा वाऱ्याच्या झपाट्यानें एखाद्या शिखरावरचें बर्फ इतस्ततः उडालें म्हणजे कुबेराच्या आतिथ्यांत रमलेल्या शंकराच्या हास्याचाच हा स्फोट झाला अशी कल्पना न सुचली, तर संस्कृत कवींचे संकेत एकाएकी गळून पडले असेंच म्हणावें लागेल. आणि अर्थात् हिमालयाच्या शुभ्र श्रेणीवर मेघ तरंगूं लागले आणि मावळत्या सूर्याच्या प्रकाशांत त्यानीं निळ्या, तांबड्या, हिरव्या, पिवळ्या, जांभळ्या रंगाचा विलास सुरू केला कीं त्यांची दृष्टि अलकेच्या 'सचित्र' प्रासादांकडे धावणारच. मग सूर्याच्या किरणांनीं हिमदर्पणावर प्रकाशाचे पुंज फुलले कीं हीं सुवर्णपुष्पेंच फुललीं असें काव्याच्या धाऊक निर्मात्यांना वाटलें तर त्यांत नवल काय ?

हिमालयाच्या उत्तुंग धारेवरच्या शुभ्र राशी हे यक्ष गंधर्वांचे प्रासाद, हा तपस्व्यांचा पुण्यसंचय, हा महाकवीचा कल्पनाविलास, हे भारतीय वाङ्मयांतलें परंपरागत काव्य आहे. पण त्रिशूळाच्या दर्शनानें असलें कोमल काव्य सुचत नाहीं. चार वेळां आम्हाला त्रिशूळानें दर्शन दिलें. एकदोनदां अगदीं मुक्त दर्शन दिलें. पण प्रत्येक वेळीं मला साक्षात्कार झाला तो शक्तीचा, सामर्थ्याचा, हिमालयाच्या अजस्र अंतरंगाचा. हिमालयावरचे बर्फाचे थर पाहून महाकवींना 'राशीभूतः प्रतिदिनमिव त्र्यम्बकस्याट्टहासः' असें वाटत असेल. पण त्रिशूळाच्या दर्शनानें मला हास्याची प्रतीति आली नाहीं, तर शक्तीची. हें शिवहास्य नव्हतें, ही शिवभक्ति होती. खरोखर त्रिशूळ हें नांव या शिखरास देणारा कवि केवढा थोर अंतर्ज्ञानी होता !

या शक्तीच्या साक्षात्कारानें आम्ही धुंद झालों होतो. पण खालच्या रस्त्यावरून जाणाऱ्यांना-येणाऱ्यांना त्याचें कांहीं वाटत नव्हतें समोर उमललेल्या स्वर्गीय देखाव्याकडे कोणी ढुंकून पाहत नव्हतें. कदाचित् त्यांना त्याची अपूर्वाई नसेल. कदाचित् बाजारी व्यवहारानें त्यांच्या अंतःकरणाचा

चुना केला असेल! काय हवें तें असेल. आम्हांला त्याची पर्वा नव्हती. आम्ही आमच्या अंतःप्रतीतींत दंग होतों. मस्त होतों. हिमालयाचें शुभ्र सत्य आम्हाला आतां समजलें होतें. हिमालय आतां आमच्या अंतरंगांत ओतला गेला होता. त्याच्या–आमच्यांत नातें निर्माण झालें होतें. आम्ही हिमालयाचे आणि हिमालय आमचा, अशी प्रतीति आली होती. आणि जे जे हिमालयाचे ते ते सारे एकमेकांचे, अशी साक्ष मिळाली होती. आपली सर्वांची संस्कृति, इतिहास, अभिमान जीवनाची धारणा, हीं सारीं हिमालयाचीं, हिमालयांत उत्पन्न झालेलीं—या महान् सत्याचा साक्षात्कार घडला होता. आतां हिमालयाच्या शिखरांची शक्ति मी कोकणच्या कड्यावर धडक घेणाऱ्या सिंधुसागराच्या लाटांत पहात होतों; मानससरोवरांतील हंसांचें शुभ्र तेज मला आतां कन्याकुमारीच्या सागरसंगमावरील लाटांच्या फेसांत दिसत होतें; मार्कंडेयाच्या तपस्येची पूर्ति मला आतां अगस्त्याच्या सागरसंचारांत दिसत होती, आतां बाजारांतल्या बेपर्वाईची मला काय पर्वा होती?

कौसानीहून अलमोड्याला परत येतांनाची गोष्ट. सोमेश्वरला आल्यावर समजले कीं बस तासभर थांबणार आहे. चौकशी केली. जवळच एक जुनें शिवालय असल्याचें समजलें. गेलों. त्या ठिकाणच्या पहिल्याच दर्शनानें शंकराला योग्य स्थान अशी खात्री पटली. मंदिर बखळीसारख्या जागेंतच होतें, पण त्याला आवार होतें. आवार म्हणजे एका पडक्या गडग्याची व्यवस्था! आवाराच्या प्रवेशद्वारापाशींच एक देवदाराचें झाड होतें. देवदाराच्या मस्त सौंदर्यावर लुब्ध झालेल्या माझ्यासारख्यांचा सूड उगविण्यासाठींच जणुं तें उभें होतें. झिंज्या पिस्कारून डोंबाऱ्याचा खेळ करणारें एखादें पिशाच्च! जणुं त्याचेंच दर्शन होण्यासाठीं इकडे येण्याची बुद्धि झाली! त्याच्यापुढें साक्षात् शिवलिंगाचें दर्शन तुच्छ! पण तेथल्या शिवलिंगांनाहि तशीच शिस्त होती! त्यांची तीन मंदिरें, सारीं जमिनींत खचलेलीं! ढोपरांनीं चालल्याशिवाय आंत प्रवेश अशक्य! पण एका शिवलिंगासमोर साक्षात् ब्रम्हयाची मूर्ति लीन होऊन राहिली होती तेथें तुमचीआमची काय मिजास! दुसऱ्या मंदिरांत मीं पूर्वीं कधीं न पाहिलेलें पंचमुखी लिंग दिसलें. आणि तिसऱ्या मंदिरासमोर एक कमान होती तिनेंच मनाचा कबजा घेतला. त्या कमानीच्या दोन स्तंभांपाशीं दोन शिळा उभ्या करून ठेवलेल्या होत्या. आणि त्यावरचें कोरीव काम

म्हणजे पुराणवस्तुसंशोधकांना एक आव्हान होतें. आमच्यांत एक विद्वान् पुराणवस्तुसंशोधनाप्रमाणेंच चित्रकलेची साधना करणारा होता. त्याची संशोधक बुद्धि गुंग झाली, तेव्हां त्यानें चित्ररेखाटनाचा मार्ग स्वीकारला. त्याच्या कागदावरच्या त्या आकृतीवर संशोधकांनीं डोकें घासल्यावर ज्ञानाचे जे काय स्फुलिंग उडायचे असतील ते उडतील. मीं तरी तें कोरीव काम अतिप्राचीन आहे असा निर्णय घेऊन त्याच्या रेषांचा अर्थ लावण्यास सुरवात केली. खडबडीत हातांनीं कोरलेली स्त्री आणि पुरुष अशा दोन मूर्ति हातांत प्राथमिक आयुधें घेऊन आणि धड ना मोर, धड ना घोडा, धन ना बकरी, असा एक प्राणी शेजारीं उभा करून, मस्त नृत्यांत दंग झाल्या आहेत, एवढा त्यांच्या प्राचीनत्वाचा पुरावा मला पुरे होता. मी एका नजरेनें त्या शिळांकडे पहात होतो. आणि एका नजरेनें वेशी-वरच्या त्या वृक्षाकडे पाहत होतों आणि या स्थानाच्या प्राचीनत्वाच्या याच् दोन खऱ्या साक्षी अशी मनाशीं खूणगांठ बांधीत होतों. तें गुप्तकालीन शिल्पकलेचें कौशल्य मिरविणारें पंचमुखी लिंगच मला येथें आगंतुक वाटलें. मंदिराच्या आंखीव–रेखीव मूर्ति मांडून ठेवलेल्या होत्या त्याहि मला आगंतुक वाटल्या. त्या मानानें त्या मंदिरासमोरचा मस्त पिळेचा रानवृक्षच मला अधिक अभिजात वाटला. त्या अंगणाच्या खालीं एखादें तळघर असावें आणि या ठिकाणाचे, वेताळ, समंध, जे कोणी अस्सल राखणदार असतील त्यांची वस्ती त्यांत असावी, असा एक विचार मनाला स्पर्श करून गेला. एक दाढीवाला फाटका साधु अंगण झाडीत होता. त्या वेताळगणांपैकींच होता का तो ?

तो असो किंवा नसो, येथें, येथें जीं गोऱ्या कातडीचीं, निष्पाप चेहऱ्याचीं आणि चपळ नजरेचीं पोरें जमली होतीं आणि पलीकडच्या पावठणीवर बसून आमच्या संशोधक महाशयांच्या रेखाटन–क्रियेकडे ज्या देखण्या स्त्रिया चोरट्या नजरेनें पाहत होत्या त्यांचा या वेताळगणाशीं कांहींहि संबंध नव्हता. त्यांचा आटोपशीर आकार आणि सुंदर चेहराच सांगत होता कीं त्यांचा या वेताळगणांशीं तसा कांहीं संबंध असणें शक्य नाहीं. संबंध असलाच तर शंकराच्या भक्तीपुरताच. कारण वेताळगणांप्रमाणेंच शंकराचे जे यक्षकिन्नर अनुयायी त्यांचेच हे वंशज. त्यांचे उभे–लांबट चेहरे पाहून आर्यांना प्रश्न

पडला, हे मानवच का; आणि म्हणून ते त्यांना किन्नर म्हणूं लागले. त्यांचे चेहरे उभे लांबट आहेत. घोड्याच्या चेहऱ्यासारखे म्हणावें हवें तर–कारण, घोड्याच्या चेहऱ्यालाहि त्याचें असें एक सौंदर्य आहे. पण यांचें सौंदर्य–चांगलें मानवी आहे; त्वचा शुभ्र, सुंदर, मुलायम आहे. हिमालयाच्या थंड हवेची ही किमया असेलच, पण पलीकडच्या चिनी वंशाच्या रक्ताचा संस्कारहि याला कारण असेल. पहाडी लोकांत कांहीं वाटोळे चिनी चेहरेहि दिसतात. चिनी सौंदर्याचा साक्षात्कार घडविणारे दोन चेहरे मला दिसले. यक्ष–किन्नरांपैकीं यक्ष ते हे काय ?

पुराणकालीं यक्ष–किन्नरांचा जो काय अधिकार असेल तो असो, आज मात्र हिमालयाच्या खडतर जमिनींत शेती करणें एवढेंच त्यांच्या नशिबीं आलें आहे—आणि तें मुख्यतः पहाडी स्त्रियांच्या. कारण पुरुष हुक्का पीत पडलेले असतात आणि स्त्रिया शेतांत राबत असतात. घागरा, खमीस आणि जाकीट घालून चालणाऱ्या या स्त्रियांच्या नितंबांत जें नर्तन असतें आणि पावलांत जो ठेका असतो तेवढाच त्यांच्या यक्ष–किन्नरत्वाचा पुरावा आज उरला आहे !

आणखी एक पुरावा आहे. त्यांचा प्रामाणिकपणा, पहाडी लोकांत घराला कुलूप लावण्याची पद्धत नाहीं. घर तसेंच टाकून वर्ष वर्ष परगांवीं जाणाऱ्यांना मागची चिंता करावी लागत नाहीं. पहाडी मुलखांत नदीच्या जलचक्क्या आढळतात. नदीचें पाणी पाटानें आणून त्याच्यावर पिठाच्या गिरण्या चालविण्याची ही व्यवस्था असते. ( त्या पाहिल्या म्हणजे मेघदूतांतील ‘ यंत्रधारा ’ विषयक ज्ञानाचें आश्चर्य वाटण्याचें कारण उरत नाहीं. ) या चक्कीवर कोणीहि यावें, आटा दळून न्यावा आणि वाटलें तर तेथें ठेवलेल्या एका भांड्यांत चक्कीचें भाडें म्हणून थोडा आटा टाकावा. पण प्रत्येकाला त्यात आटा टाकावा असें वाटतेंच. ( एका मित्रानें सांगितलें कीं जलचक्कीच्या या झोपड्या म्हणजे प्रेमिकांचीं संकेतस्थानें होत ! छान !— मग मात्र या झोपड्यांचें रूपांतर यंत्रधारागृहांत अक्षरशः होत असेल. ) या लोकात गुन्हेगारी फारशी नाहींच. एका पोलिस अधिकाऱ्यानें सांगितलें कीं महिन्याकांठीं फार तर चारदोन रिपोर्ट करावे लागतात — आणि ते देखील त्या भागांत मोटारचा रस्ता आल्यापासून !

सिलोनला मी झाडांचें शिल्प पाहिलें होतें. जागेश्वरला जातांना मीं डोंगरांच्या चित्राकृति पाहिल्या. भूभागाचें इतके नानाविध नमुने डोंगरांच्या आकारांनीं निर्माण होऊं शकतात हें मला पूर्वी माहीत नव्हतें. पेटशाल ओलांडून गेलो आणि रस्ताबांधणीचा सर्वमान्य सांचा बदलून गेला आहे हें ध्यानांत आलें. डोंगराळ प्रदेशांतली रस्ताबांधणीची सर्वमान्य रीत अगदीं सरळ आहे. एखादी नदी पकडायची आणि तिच्या कांठानें रस्ता न्यायचा. नदीला मिळणारा एखादा ओढा आडवा आला कीं त्याचा कांठ पकडायचा, त्याला शक्य तेथें पूल टाकून पलीकडे जायचें आणि त्यांच्याबरोबर जाऊन पुन्हां नदी पकडायची. जमलें तर मध्येंच एखादी मुसंडी मारायची आणि नदीचें वळण टाळून तिला वर पकडायचें. रस्ताबांधणीची ही सीधी पद्धत मी काठगोदामापासून पाहत होतों. रातीघाटांत डोंगरांचें स्वरूप उग्र झालें. ओढे खोल गेले. कडे कडक बनले. पण रस्त्याचें हें सनातन स्वरूप बदललें नव्हतें. गरम पाण्यापासून तर आम्हीं कोसीची अखंड संगतच धरली. मध्यें अलमोड्याला थोडे आड गेलों, पण कौसानीकडे जातांना आम्ही जणुं कोसीचा उगम शोधीतच निघालों. (बिहारची जगबुडवी कोसी ती ही नव्हे, नाहीं तर या शोधाचें एक स्वतंत्र प्रकरणच बनलें असतें.) पण आतां जागेश्वराकडे जातांना पेटशाल मागें पडलें आणि रस्त्याचें हें सनातन वळण साफ उडालें. त्यानें अशी कांहीं वक्रधारणा सुरू केली, वळणाच्या वेलांट्या अशा कांहीं उमटूं लागल्या, कीं आपण एखाद्या चक्रव्यूहाचा मार्ग तर चालत नाहीं, अशी क्षणभर शंका आली. पण आतां डोंगरांचे आकार आणि पवित्रेच असे होते कीं रस्त्याला कित्ता बदलणें भागच होतें. आतां खोरीं खोरीं उरलीं नव्हतीं. त्यांची आतां ॲम्फीथिएटर्स अगर स्पोर्ट्स स्टेडियम्स झाले होते. एका वर्तुलाकार खोऱ्यांत मधोमध एक छोटीशी टेकडी डोक्यावर एक बंगली धारण करून जपानी कुरूयांच्या आखाड्याच्या थाटांत उभी होती. एका ठिकाणीं दोन टेकड्या पावलें जुळवून फुगड्या खेळण्याच्या पवित्र्यांत उभ्या होत्या, तर एका वाटोळ्या टेकडीवर चिडाचें बन सभोवार असें बनलें होतें कीं हा किन्नरसुंदरीचा गरगर फिरणारा वाटोळा भरदार घागराच ! आणि ते दोन अजस्त्र डोंगर ? — जणुं दोन मस्त रेडे झुंज घेण्याच्या तयारीनें उभे आहेत ! एका डोंगराचा आकार थेट शंकरापुढच्या नंदीसारखा वाटला.

(ओंकारेश्वराप्रमाणें येथें वृषभेश्वर कां नाहीं ?) परत येतांना पेटशालच्या टेकडीवरून मागें पाहिलें तेव्हां नदीवरचा पांढरा सिमिटाचा पूल, नदींत मस्त डुंबत असलेल्या हत्तीच्या कापलेल्या सुळ्याप्रमाणें वाटला !

● ● ●

जागेश्वरला जाण्यासाठीं आरतोळाला उतरून दोन मैल पायीं जावें लागतें. हा प्रवास म्हणजे निसर्गाच्या नंदनवनांतला छोटासा फेरफटका होय. आरतोळाची घाटी उतरतांना आतांपर्यंत न पाहिलेली कोवळ्या नक्षीदार पालवीचीं झुडपें दृष्टीस पडतात. पुढल्या निसर्गशोभेचीं हीं प्रसादचिन्हेंच. कारण आतां दिसणारा निसर्ग हा सिलोन–इंडोचीनमधील जंगलांतल्या निसर्गासारखा भरड–भयानक नाहीं येथल्या रानांतलीं झाडें ओबडधोबड अस्ताव्यस्त नाहींत, आणि अजस्र वेली एका झाडावरून दुसऱ्या झाडाला अजगराप्रमाणें विळखा घालीत नाहींत. अगर येथली झुडपें झिंज्या पसरून अंग खाजवीत उभीं राहून नाहींत. येथला निसर्ग मृदु आहे. कोमल आहे. त्याची कोवळी पालवी चीन–जपानमधील पालवीप्रमाणें नाजुक नक्षीदार आहे. चीन -जपानच्या निसर्गानें नाजुक–नक्षीदार शैलीच्या चित्रकलेला प्रेरणा दिलेली आहे, तशी येथल्या या निसर्गानें कां दिलेली नाहीं हें मला सांगतां येणार नाहीं. कदाचित् जागेश्वरच्या जोगीयाला भेटायला जातांना चित्रकाराच्या प्रेरणासुद्धां भरड बनत असतील !

आरतोळाची घाटी उतरलें कीं एका ओढ्याच्या कांठानें प्रवास सुरू होतो. मोठ्या प्रसन्न वातावरणांत सुरू होतो. ओढ्याचें पाणी झुळू–ळू वाहतें आहे. त्याला एक लय आहे. मधूनमधून खळखळाटानें या लयीला गति आणि धार प्राप्त होत आहे. ओढ्याच्या पाण्याचा गारवा वातावरणांत पसरला आहे आणि पाण्यावर खेळणारे सूर्याचे किरण मोठे लोभस वाटत आहेत. ओढ्याच्या दुतर्फा देवदाराचे डौलदार वृक्ष आपल्या कलासुंदर शाखा पसरून उभे आहेत. आपली नजर त्यांच्या शाखांवर टप्पा घेत घेत त्यांच्या टोकदार शाखांकडे जात आहे. शेंड्याच्या या लुसलुशीत शाखा जपानी स्तूपाच्या नक्षीदार कळसाप्रमाणें दिसत आहेत, पण यांतला सौंदर्याचा रस अगदीं सळसळता आहे. या देवदारांच्या शाखांवर छोटेछोटे सुरंगी पक्षी उडत आहेत चिवचिवत आहेत. आणि त्यांच्या या सुरेल गडबडीनें देवदारांच्या

शाखानांच वाचा फुटल्यासारखें वाटत आहे. मग आपली नजर एका इवलाल्या पक्ष्याचा वेध घेते. त्याच्याबरोबर वागडते. त्याच्याबरोबर उडते — आकाशांत जाते. त्या पक्ष्याचा फडफडता रंग आणि सळसळता आवाज यांमुळें आपली दृष्टि आणि श्रवणशक्ति यांचा गोंधळ उडतो — रंग ऐकूं येतो आणि नाद नजरेस पडतो. आणि मन एकदम तरळतें. गोंधळतें. विसरतें. इकडेतिकडे पाहतें. तोंवर निळ्या आकाशांत वारा ढग पिंजीत असतो मग आपण ढग पाहत चालतों. तोंच एक वळण येतें. आणि आपली दृष्टि डावीकडच्या उभ्या टेकडीवरच्या चिडाच्या बनांत शिरते. चिडाच्या उंच उभ्या कांडाच्या मधून ती विरल विस्तारांत शिरते आणि आकाशांत टेकडीच्या धारेवर ढग गोळा होत असल्याचें दिसतें. एक थेंबदेखील गळतो. आपल्य पावलांची गति वाढते. लवकरच एक मंदिर येतें. वाटतें, हेंच तें जागेश्वर. पण नाहीं. जागेश्वरला मंदिरांची गर्दी असते आणि हें तर एकटेंच आहे. पण मोठें ऐटबाज आहे. शिखर डौलदार आहे आणि तिच्यावरचें शिल्प लक्षवेधक आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारावरची सिंहाची मूर्ति — तिचें शिल्प तर दाणेदार आहे. पण कोणा एका अरसिकानें त्याच्यावर छप्पर टाकून त्याचें सौंदर्य मारून टाकलें आहे. मंदिराच्या भोंवतालीं देवदाराचे वृक्ष नृत्याचें लास्य धारण करून आहेत. पण त्यांची शोभा पाहत बसायला वेळ नाहीं. पावसाचे आणखी चारसहा थेंब खालीं आले आहेत. आपण झपाझप पावलें टाकूं लागतों. जरा वेळानें एक पूल लागतो. तो ओलांडून उजवीकडे वळ तों तों मदिरांचा समूह दिसतो — आणि जागेश्वरचें दर्शन होतें. जागेश्वर ! बारा ज्योतिर्लिंगांतलें एक — नव्हे, आद्य ज्योतिर्लिंग ! प्राचीनांतलें प्राचीन शिवालय ! आपलें अंतःकरण भक्तिभावानें भरून येतें. नास्तिक अंतःकरणहि भक्तीनें भारावतें. कसला तरी नवीनच अनुभव येतो. त्याच्या ओघांत उजवीकडच्या ओढ्यांतली दोन राखी पात्यांचीं विलोचीं झाडें चवऱ्यांप्रमाणें दिसतात. वारा चवऱ्या ढाळीत असतो.

पण मंदिरांत शिरण्यापूर्वीच गण–गणंग तुम्हांला घेरतात. तुम्ही कोठून आलांत, किती राहणार, केव्हां जाणार, वगैरे प्रश्नांचा मारा करतात. तुम्ही मुंबईहून आलां असलांत तर पोयबावडीचा तपशील सांगतात, दिल्लीहून आलां असलांत तर पहारगंजचा पत्ता देतात. तुमची सारी सोय करण्याची जिम्मे-


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............................ दि: ....................
क्रमांक ............................ नों. दि. ....................

दारी पत्करतात. शंकराला अभिषेक करायचा असला तर मंत्र म्हणायला सुरुवात करतात. कौल लावायचा असला तर घुमूं लागतात. थोडक्यांत म्हणजे सारें कांहीं करतात; फक्त तुम्हांला मोकळें सोडीत नाहींत. अशा एका गणंगानें आम्हांला पुरें पछाडलें. आमच्या जेवणाची सोय करण्याची जबाबदारी पत्करली. आम्हीं तें कबूल केलें. त्याबरोबर तो आम्हांला चिकटला आणि बाकीच्यांनीं हळूहळू पाय काढला. फक्त एक कुत्रा उरला. आम्हांला वाटलें, कुत्रा त्याचा. पण नव्हे. कुत्रा सार्वजनिक. तात्पुरता आमच्यावर फिदा ! म्हटलें, छान झालें ! शंकराच्या राज्यांत कुत्रे, सर्प वगैरे प्राणी बरोबर हवेतच. नुसतेच गणंग काय उपयोग ? (आम्हांला सर्प भेटला नाहीं, हें आमचें दुर्दैव – एका अनुभवास मुकलों !) आतां शंकराच्या भेटीला जायची तयारी पूर्ण झाली ! इतक्यांत – चित्र पूर्ण व्हायला हवें ना ? शंकर स्मशानांत राहतो. स्मशानाची त्याला गोडी. जागेश्वर स्मशानांत आहे. आम्ही देवळाच्या प्राकारांत शिरणार तोंच समोरून प्रेत आलें. सारे एकदम स्तब्ध झालों. मनांत म्हटलें, ठीक झालें. आतां कसली कांहीं उणीव नाहीं. आतां दर्शनाला जायला हरकत नाहीं.

प्रथम मृत्युंजयाच्या देवळांत गेलों. आंत शिरल्याबरोबर देवळाच्या गाभ्यांतला तो गंध-उदबत्त्या, कापूर आणि कुबटपणा यांनीं व्यवस्थित रांधलेला वास नाकांत शिरला आणि अभिजात मंदिरांत प्रवेश झाल्याची खात्री पटली. इतक्यांत तेथें एक भटजी हजर झालाच. त्यानें आमच्या हातावर गंधफूल ठेवलें आणि आम्हीं त्याच्या हातावर दक्षिणा ठेवली. त्याबरोबर त्यानें आम्हांला आशीर्वाद दिला. (त्यासाठीं स्वतंत्र दक्षिणा आकारली नाहीं.) त्यानंतर आम्ही जागेश्वरच्या मंदिरांत गेलों. मंदिराच्या सभामंडपांत पाऊल टाकल्याबरोबर एखाद्या गुहेंतच आल्यासारखें वाटलें. म्हटलें, क्रांतिकारकांना कट करायला किती नामी जागा ! अगदीं शंकराचा कौल घेऊन काम करतां येईल. पण यावर अधिक विचार करायला फुरसत नव्हती. एका पुजाऱ्यानें लगेच आंत नेलें. आंत गाभ्यात गेलों. गाभ्यांत एका बाईचा अभिषेक सुरू होता. भटजी मंत्र म्हणत होता. अंधारांत बाई – भटजींतला फरक सांगता येत नव्हता, पण कानांवर मंत्र स्पष्ट पडत होते. बरेच दिवसांनीं संस्कृतचे अस्सल महाराष्ट्रीय उच्चार ऐकून धन्य वाटलें. लहानपणीं अव-

पेणावर उतारा म्हणून केदारलिंगाच्या देवालयांत महारुद्र झाला तेव्हां आम्ही पोरंटोरें तांब्येलोट्या घेऊन देव बुडविण्यासाठीं गेलों होतों तेव्हांची आठवण झाली आणि मन भूतकाळांत रमून गेलें.

पण भटजीच्या हातावर दक्षिणा पडल्यावर आमचें तेथें काम नव्हतें. आम्ही बाहेर आलों आणि बाहेरच्या मंडपांतील मूर्ति न्याहाळूं लागलों. गुप्त-कालीन शिल्पाची साजुक सफाई मिरविणाऱ्या त्या देवदेवतांच्या मूर्तींनीं माझें फारसें लक्ष धरलें नाहीं, पण तेथें एक शेंदरानें माखलेली कांहींशी ओबडधोबड अशी मूर्ति होती तिच्यावर माझी नजर थबकली. ही बौद्ध मूर्ति कीं हिंदु मूर्ति ? पद्मासन घातलेली. हाताच्या पाकळ्या कमलदलाप्रमाणें एकमेकांवर ठेवलेल्या. कानांच्या पाकळ्या खालीं उतरलेल्या. हीं सारीं बौद्ध लक्षणें. पण मग मूर्तीला दाढी कशी ? आणि शेंदुरानें कां माखलेली ? एकानें सांगितलें, मूर्ति गोरखनाथाची. गोरखनाथाचा असा अवतार कधीं पाहिला नव्हता. पण हरकत नाहीं. मूर्तींत व्यक्तित्व होतें आणि तेवढें मला पुरे होतें.

मंदिर पाहिल्यानंतर फोटो काढण्यास निघालों तों आमचा गणंग येथेंहि पुढें ! तो फोटोग्राफीचाहि वस्ताद ! कोठल्या पॉइंटवरून कॅमेरा कोणत्या कोनानें किती कलता ठेवला म्हणजे देखावा छान दिसेल यावरयावर त्याचें उधळें भाष्य सुरू ! हे पॉइंट दाखविण्याच्या भरांत त्यानें कुबेराचें मंदिर दाखविलें हा मात्र फायदा झाला. पण धनाढ्य कुबेर स्मशानांत येऊन कां राहिला याचा उलगडा होईना. त्या ओढ्याचें नांव जटागंगा – ही आणखी एक माहिती समजली. शंकराच्या कोण या जटेंतून ही उपटली तें समजलें नाहीं, पण प्रेतदहनांतलीं जळकीं लाकडें त्या गंगेंत गोळा होऊन त्या नदीचें नांव सार्थ करण्यास मदत करीत होतीं.

आमच्या गणंगाच्या विद्वत्तेची कल्पना हा वेळपावेतों पुरेपूर आलीच होती. त्याच्या रसिकतेची कल्पना त्यानें आम्हांला आपल्या खोलींत नेलें तेव्हां आली. तें त्याचें शयनगृह होतें आणि त्याच्या भिंती देवदेवतांची रासक्रीडा आणि नटनटींचा रोमान्स यांनीं समसमान शृंगारलेल्या होत्या. मधून्मधून रिकाम्या फटी होत्या, त्यांत जनसंघाचीं निवडणूक – वचनें लावलेलीं होतीं ! थोडक्यांत म्हणजे हिंदुत्वांतील रसिकतेचें सडासंमार्जनच या भिंतीवर झालें

होतें. जेवण झाल्यावर निघतांना आम्ही त्याच्या हातावर (तो नको नको म्हणत असतांना) त्याच्या अपेक्षेपेक्षां कमी रक्कम टाकली, तेव्हां त्याची रसिकता एकदम आकसली. उत्साह मावळला. पाऊल जडावलें. आम्हांला पोंचविण्यासाठीं तें उचलूं शकलें नाहीं. त्या मानानें कुत्रा अधिक निष्ठावान्. वेशीपर्यंत बरोबर आला.

● ● ●

प्रत्येक जण राणीखेत आणि नैनिताल यांच्या सौंदर्याची स्तुति करीत होता. अनिल म्हणाले होते, " अल्मोड्याला नका जाऊं, तेथें माश्या असतात. राणीखेतला जा." आम्ही राणीखेतला आलों. मोठ्या मुक्कामास वेळ नव्हता; पण म्हटलें, एखादी उडती नजर टाकूं. पण राणीखेतच्या पहिल्या दर्शनानें धक्काच बसला. बस प्रथम बाजारांत येते — आणि राणीखेतचा बाजार नंबर एकचा बकाल! राणीखेत हें लष्करी ठाणें आहे ना, मग येथल्या बाजारांत सारी बेदरकारी, सारा भडभुंजेपणा आणि सारा उठवळपणा गोळा व्हायलाच पाहिजे! पण बकालपणांत मुंबई कोणाला हार जाणार नाहीं अशी माझी समजूत होती. या सदरबाजारांत पाऊल टाकल्याबरोबर ही समजूत दुरुस्त करून घ्यावी लागली.

आम्हांला हॉटेलची चौकशी करायची होती, पण येथें कांहीं विचारपूस करावी असेंच वाटेना. कोणाला कांहीं विचारावें, कशाला कांहीं स्पर्श करावा, कशाकडे डोळे उघडून पाहावें, असेंच वाटेना. एका हॉटेलमध्यें गेलों. त्याचा थाट काय विचारावा? दारावर रेशमी पडद्याची सळसळ, पण आंत गेल्याबरोबर बुरशीचा भपकारा! मुंबईची मिजास मिरविणाऱ्या एका रेस्टोरॉंमध्यें पावाला लावायला साधें स्वच्छ लोणी मिळेना! आणि चहाबरोबर साखर आली तिच्यावर माश्यांचा थवा! (खिडक्यांना अर्थात् जाळी होती, पण ती गिऱ्हाइकांना पाहण्याकरितां — माश्यांकरितां खास प्रवेशद्वारांची निराळीच सोय असावी!) राणीखेतच्या बाजारांत माणसें आणि माश्या यांची थाप लागलेली असते — आणि माणसें माश्यापुढें माघार घेत असतात! आ. रां.च्या अल्मोड्याच्या माश्या येथें बहुधा हवापालटासाठीं आलेल्या असाव्यात!

पण सारेंच राणीखेत कांहीं असें माश्यांनीं लडबडलेलें नाहीं. वरचें टेकड्यांच्या माथ्यावर पसरलेलें राणीखेत स्वच्छ आहे आणि सुंदर आहे. विशेष म्हणजे त्याच्या सौंदर्याला मानवाच्या प्रयत्नांपेक्षांहि निसर्गाचें अधि·

स्थान आहे. या सौंदर्यानेंच लॉर्ड मेयोला भुरळ घातली आणि त्यानें उन्हाळी राजधानी सिमल्याहून राणीखेतला हलविण्याचा बेत केला. तो फसला, पण राणीखेत एक लष्करी ठाणें बनलें. राजधानीचें सौंदर्यहि त्यानें थोडेंसें डोक्यावर धारण केलें. याचें श्रेय लष्कराला आहे. प्रथम म्हणजे त्यानें एकमेकांशीं लयदार शेजार थाटणाऱ्या आणि आजुबाजूच्या खोऱ्यांचें मस्त दर्शन घडविणाऱ्या शिखरांवर शहर वसविण्याची काळजी घेतली. मग चीडदेवदारांची लागवड केली. मूळच्या रानाची मशागत केली. झकास रस्ते पाडले. टुमदार घरें उभारलीं. रस्त्याच्या कांठानें आणि घराच्या समोर फुलझाडें लावलीं. बागबागायत केली. खेळाचीं मैदानें बांधलीं. बराकी बांधल्या. बराकींत थोडी माणुसकी ओतली. जवानांच्या शरिराच्या आंत मन आहे याची जाणीव दाखविली. कवायतीच्या मैदानावर अधिकाऱ्यांच्या वटारलेल्या दृष्टीबरोबर खालच्या खोऱ्याची मोहरलेली दृष्टीहि नजरेस पडेल अशी व्यवस्था केली, स्वच्छतेचीं साधनें उभारलीं. माणसानें केलेली घाण दूर करण्याची जबाबदारी निदान निसर्गाइतकीच माणसावर आहे याची क्षिति बाळगली. परिणामीं एक सुंदर शहर निर्माण झालें. तेथलें जीवन आकर्षक ठरलें. चीडदेवदारांचीं झाडें आकाशाशीं कानगोष्टी करूं लागलीं. वेलवनश्रीनें टेकड्यांवर अंग पसरलें. वाऱ्यांत वास मिसळला. पाण्यांत जीवन न्हाऊं लागलें. वरच्या बाजारांत माश्यांऐवजीं माणसांचें राज्य आलें आणि बराकीसमोरच्या अंगणांत मातृभूमीचीं मानचित्रें आणि राष्ट्राचा ध्वज फुलांनीं रंगूं लागलीं !

आश्चर्य आहे – लष्कर माणसें मारतें, पण जंगल राखतें ! जीवनावर आग ओततें, पण निसर्गावर प्रेमाचा वर्षाव करतें. जीवनाच्या जबरदस्तींतच या अंतर्विरोधाचा उगम आहे. माणूस जगण्यासाठींच जंगल तोडतो. लष्कर पोटावर चालतें, पण त्याच्या पोटाची काळजी त्याला करावी लागत नाहीं. म्हणून त्याला निसर्गोपासनेचे लाड चालवितां येतात. पण त्यांचा उगम मानवानें पोटासाठीं ( इतरत्र ) चालविलेल्या जंगलतोडींतच आहे.

●●●

राणीखेतच्या सौंदर्याच्या आत्म्याचा अधिक शोध करण्याइतकी फुरसत नव्हती. राणीखेतच्या रस्त्यावर आम्ही बसनेंच हिंडलों आणि नंतर शक्य तितकी लवकरची बस गांठून नैनितालला गेलों. भारतांत जिनीवा निर्माण

करण्याइतकी निसर्गाची देणगी दुसऱ्या स्थळाला नैनितालइतकी क्वचितच लाभली असेल. जिनीवाचा श्रीमंती थाट या गरीब देशाला परवडणार नाहीं असें वाटत असेल तर सिलोनच्या कॅण्डीची आठवण करावं. आशय एवढाच कीं निसर्ग राजी आहे, पण माणूस कमी पडला आहे. म्हणून नैनितालला आज एकच रस्ता आहे, आणि घाण्याच्या बैलासारखा तो तळ्याच्या भोंवतीं भोंवतीं फिरत आहे. त्या रस्त्याच्या बुद्रुक भागानें फिरलें तर तेच तेच चेहरे दिसतात (आणि मग त्यांतला एकेक रंगवून काढावा असें वाटतें! त्यांच्यापैकीं एखाद्याला आपलाहि तसाच रंगवून काढावा असें वाटतें हा त्यांतला न्याय!); आणि खुर्द भागानें गेलें तर घाणीनें डोकें उठतें! आतां घाण अगर गर्दी यांपैकीं दोनहि किंवा एक सहन करण्याची तयारी असेल तर सभोंवतालच्या डोंगरावरचीं झाडें आईला धरून लोंबकळणाऱ्या मुलांसारखीं कशीं दिसतात अगर डोंगराच्या उतरत्या अंगावर युगत लटवून बांधलेली घरें पक्ष्यांच्या घरट्यांसारखीं कशीं दिसतात हें पाहतां येईल. पण एकंदरींत नैनिताल हें शहर असें आहे कीं तेथील प्रत्येक वस्तूवर शक्यतेचा छाप आहे आणि अशक्यतेचें भाष्य आहे. तेव्हां अधिक काय लिहिणार? दीड दिवसाच्या मुक्कामांत माझ्या मनांत दोनचार गोष्टी ठसल्या तेवढ्याच सांगतों. नैनितालच्या तळ्याच्या पाण्याइतकें हिरवें पाणी मीं आयुष्यांत पाहिलें नव्हतें. जणुं नैनितालविषयींच्या लोकांच्या साऱ्या हिरव्या आशा त्यांत विरघळल्या आहेत! नैनितालला आम्हीं बोटिंगहि केलें असें समाधान देणारा नावाडी म्हणाला, हा आजुबाजूच्या हिरव्या झाडीचा परिणाम. पण मला त्या पाण्यांत कांठच्या विलो झाडांच्या राखी छाया आढळल्या नाहींत. खरें कारण अधिक खोल असावें – तळाच्या हिरव्या शेवाळाइतकें खोल असावें. नैनितालची या दिवसांतली एक अजब गोष्ट म्हणजे धुकें. धुकें कीं ढग समजत नाहीं असें धुकें! पण ढगाप्रमाणें याच्या पाठीमागें वारा लागला आहे असें वाटत नाहीं. तें रमतगमत, हसतखेळत, स्वच्छंदानें उडतबागडत, प्रत्येक वस्तूशीं, व्यक्तीशीं शिवाशिवीचा खेळ खेळत मोठें मजेंत येतें नि मजेंत जातें. जातें म्हणजे काय, डोंगराला प्रदक्षिणा घालून लगेच परत येतें! त्याचा उनाशीं आणि उनासाठीं आसुसलेल्या माणसाशीं असा सारखा लपंडाव चालू असतो. कधीं कधीं या दिवसांत पाऊसहि आपली ओली गंमत त्यांत फेकून देतो.

हें धुकें पिऊनच कीं काय, येथल्या दयाळ पक्षाला साक्षात् गंधर्वांचा कंठ फुटलेला आहे. आपली इवलाली काळी-बाळी शेपटी नौकेच्या शिडा-सारखी उभारून दारच्या झाडावर टिवल्याबावल्या करीत उडणारा हा पक्षी गाणाऱ्या गळ्याचाच आहे, पण येथें त्याच्या गळ्यांत अगदीं अमृत ओतलें आहे. त्याची भावगीतें मीं नेहमींच ऐकलेलीं आहेत. त्याची माझी दोस्ती कोकणांत झाली. नंतर तो केरळांत भेटला. त्यानंतर इंडोनेशियांत आढळला. येथें दिल्लींतसुद्धां – ज्या दिल्लींत मंत्री आणि सरकारी अधिकारी यांच्या खुषमस्कऱ्याप्रमाणें कावळ्याचीहि विलक्षण कावकाव चालते त्या दिल्लींत-सुद्धां – एखादा दयाळ पक्षी येतो, माझ्या घरासमोर निलगिरी वृक्षाच्या किड-किडीत फांद्यांवर उड्या मारतो आणि एखाद्या आलापानें आपली ओळख देतो. अल्मोड्याला आठ दिवस तर त्यानें दररोज सकाळीं भूपाळ्या गाऊनच मला उठविलें. पण छे ! नैनितालच्या दयाळ पक्षाची सर यापैकीं एकाला नाहीं. हिमालय हें यक्षगंधर्वांचें माहेरघर ! हिमालयांत आल्यापासून माझी नजर त्यांना धुंडाळीत होती. अखेरीस येथले पहाडी लोक हेच ते यक्षगंधर्व अशी मीं समजूत करून घेतली आणि त्यांच्या कष्टाळू जीवनांत काव्य पाहिलें. पण नाहीं, आपले पुराणोक्त यक्षगंधर्व ते हे नव्हत. येथें नैनितालला समजलें कीं त्या यक्षगंधर्वांनीं देवदाराच्या झाडांवर वस्ती केली आहे; या यक्षगंधर्वांना राहण्यासाठीं त्यांना साजेशीं निवासस्थानें मिळावींत म्हणून या देवदारांनीं कलासुंदर वास्तुशिल्पाचें रूप धारण केलें आहे – आणि या यक्षगंधर्वांच्या गायनानें अंतःकरणांत दाटलेल्या आनंदामुळें त्यांच्या अंगावर नक्षीदार पालवीचा मोहर आला आहे !

●●●

नैनितालहून काठगोदामकडे निघालेली बस एका छोट्याशा खिंडींत आली आणि समोर एक अफाट दृश्य उघडलें – उत्तर हिंदुस्थानच्या अफाट पठाराचें दृश्य ! कक्षा क्षितिजाला मिळालेल्या आहेत, निळ्या धूसर वातावर-णाच्या लाटा एकामागून एक उसळत आहेत, त्यांचा रंग आकाशाच्या रंगांत मिसळत आहे, असें दृश्य ! भारताच्या जीवन सागराचें दृश्य ! ज्याला अंत नाहीं, ज्याचा पुरा थांग लागलेला नाहीं, ज्याची लांबीरुंदी शास्त्रज्ञांच्या मोजपट्टींत सांपडलेली नाहीं असा तो जीवनसागर आपलें सारें विदारक सत्य

घेऊन समोर उभा ! त्याच्यांत अनेक भयंकर जलचर आहेत. तळापासून त्याला ढवळून काढण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. पण याच सागरांत अनेक रत्नें आणि मोत्येंहि आहेत. तीं वेंचण्याचा निर्धार आहे. त्यासाठीं या जलचरांशीं झुंज घेतली जात आहे. आणि अखेरीस, ' संग्रामी तर जीवन जगतें ' असें तत्त्वज्ञान उत्रवून, इहलोकांतून नाहींसें होण्याचा विधि पार पडत आहे. हा संग्राम विसरण्यासाठीं तर हा हिमालयाचा प्रवास (आणि असे अनेक उद्योग ! ) पण आतां हा जीवनसागर पुढें उभा राहिला – आणि त्याच्यांत गडप होण्यासाठीं आमची बस धावत होती !

●●●

सत्यकथा : सप्टेंबर १९५८

# कौ ला लं पु र

इतर कशासाठीं नाहीं तरी एका विलक्षण कारणासाठीं कौलालम्पुर माझ्या कायमचें लक्षांत राहील. गेल्या मार्च महिन्याच्या आठ तारखेस विमानानें कौलालम्पुरला जातांना मी एक निसर्गाचा चमत्कार पाहिला. असा चमत्कार पाहिलेला दुसरा कोणी मला अद्याप भेटलेला नाहीं.

चमत्कार अगदीं सोपा : मी संपूर्ण वर्तुलाकार इंद्रधनुष्य पाहिलें! आपण पाहतों तें इंद्रधनुष्य अर्ध-

वर्तुलाकार असतें. म्हणून तर त्याला धनुष्य म्हणायचें. पण मीं पाहिलेलें तें 'इंद्र-वर्तुळ' होतें — सप्तरंगी परिघाचें वर्तुळ. हें वर्तुळ कुंभाराच्या चाकासारखें आडवें पसरलेलें नव्हतें, तर गाडीच्या चाकासारखें उभें होतें. हा चमत्कार पहायला अंतराळांत गेलें पाहिजे हें तर उघडच आहे. पण मला एअर इंडियाच्या विमानांतून सिंगापूरहून मुंबईला आणणारे कॅप्टन सोमण यांना त्यांनीं कधीं असा चमत्कार पाहिला होता का असें मीं विचारलें तेव्हां ते नाहीं म्हणाले. त्यांच्या कोणी वैमानिक मित्रानें पाहिल्याचेंहि त्यांना माहीत नव्हतें.

हा चमत्कार मीं अगदीं साक्षीदार ठेवून पाहिला — रंगदार साक्षीदार. मी ज्या विमानानें 'के. एल्.' ला चाललों होतों त्याच विमानानें अमेरिकेचा एक निग्रो नृत्यसंघहि चालला होता. (के. एल्. म्हणजे कौलालम्पुर. गांवाचा उल्लेख असा आद्याक्षरानें करण्याची मलायाची खास लकब आहे. 'पी. जे.' म्हणजे पेटॅलिंग जाया. 'के. बी.' म्हणजे कोटा बारू.) त्यांतली एक नर्तिका मिनी मार्शल, माझ्या शेजारीं बसली होती. साहजिकच आमची ओळख झाली आणि आम्ही इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत होतों. इतक्यांत बाहेर अभ्राच्छादित आकाशावर हें 'इंद्रवर्तुळ' उगवलें. तें चकित होऊन पाहात असतांना मीं तिला म्हटलें,

'हा चमत्कार पाहायला मिळाला एवढंच कांहीं माझं भाग्य नाहीं.'

'मग!' मिनी मार्शलनें विचारलें.

'मी तें मोठ्या भाग्यशाली परिस्थितींत पाहात आहें.'

'तें कसं काय!'

'माझ्या एका बाजूला हें इंद्रधनुष्य आहे, अन् दुसऱ्या बाजूला नृत्याचीं इंद्रधनुष्यं निर्माण करणारी नर्तिका आहे.'

ती अर्थात् मनमुराद हसली.

कौलालम्पुरला जातांना निसर्गाच्या चमत्काराचा साक्षात्कार झाला तसा कौलालम्पुरमध्यें मानवाच्या चमत्कारांचा साक्षात्कार झाला. हा चमत्कार म्हणजे गेल्या दोन वर्षांत के. एल्. चा झालेला कायापालट. १९५९ च्या नोव्हेंबरांत मी प्रथम कौलालम्पुरला गेलों तेव्हांच या कायापालटाची चाहूल मला लागली होती. पण तेव्हां हा कायापालट इतका मूलगामी

अर्थाचा असेल आणि त्यांतून मलायन लोकांच्या जीवनदृष्टीची ओळख होण्याचा संभव आहे अशी कांहीं कल्पना आली नव्हती.

१९५७ सालीं मलाया स्वतंत्र होऊन कौलालम्पुर राजधानी झाल्यावर तिच्या स्वरूपांत बदल होणार हें ठरलेलेंच होतें. असा बदल झालेला आणि होत असलेलो गेल्या सातआठ वर्षांत मी मनिला, जकार्ता, सायगांव, रंगून इत्यादि ठिकाणीं पाहिलाच होता. पण के. एल्. च्या कायापालटांत सांस्कृतिक परिवर्तनाची एक फेक असेल याची कल्पना नव्हती.

वस्तुतः १९५९ सालीं मी एका अमेरिकन ठशाच्या कोऱ्या करकरीत हॉटेलांत उतरलों होतों. आणि समोर अनेक आधुनिक संस्कार ल्यालेलें एक सिनेमा थिएटर होतें. या खेपेस उलट मी एका जुन्या ब्रिटिश छाप हॉटेलांत उतरलों होतों. आणि समोर रेल्वे स्टेशनची सुंदर पण जुनाट मूरिश वास्तुशिल्पाची इमारत होती. पण के. एल्. च्या परिवर्तनाचा जसा ठसा आतां उमटला तसा तेव्हां उमटला नव्हता. कदाचित् या खेपेला मीं विशिष्ट दृष्टीनें पाहिलें असेल, पण दोन वर्षांमागें येथें संपूर्ण आधुनिक रूपाची आणि आशयाची विद्यानगरी (campus) नव्हती – आज ती पेटालिंग जायाच्या कांहीं टेकड्यांवर आधुनिक वास्तुशिल्पाचे बाहुटे उभारून फडकावीत असलेली दिसते. दोन वर्षांपूर्वी लेक गार्डन भागांत मंत्र्यांचे आणि सरकारी अधिकाऱ्यांचे कांहीं पुरातन बंगले तेवढेच होते; आतां तेथें पार्लमेंटची नवी इमारत आपलें आधुनिक रूप दाखवीत उभी राहात आहे. दोन वर्षांपूर्वी स्वातंत्र्याचें नांव धारण केलेला मर्डेका स्टेडियम ऐटींत उभा होता. पण आज त्याच्या शेजारींच उभ्या राहात असलेल्या आच्छादित क्रीडागृहांत आधुनिक वास्तुशिल्पाचे चमत्कार जसे अनभिज्ञ व्यक्तीलाहि दिसतात तसे मर्डेकांत दिसले नव्हते. दोन वर्षांपूर्वी एशिया इन्शुरन्सच्या उभार आकाशस्पर्शी इमारतीसारख्या चारदोन मोजक्याच इमारती होत्या. आतां त्या मोहरमांतील ताबुतासारख्या इतक्या संख्येने व इतक्या झटपट मान ताठ करून उभ्या राहात आहेत. दोन वर्षांपूर्वी के. एल्. चे निरुंद रस्ते एकतर्फी वहातुकीमुळें जाण्यायेण्यास मैला दोन मैलांचा फरक सहज पाडून जात; आतां स्थापत्यशास्त्राच्या साऱ्या आधुनिक कळा कोळून प्यालेले ऐसपैस रस्ते आडव्या येणाऱ्या इमारती खाऊन टाकण्याच्या ईर्ष्येनें शहरभर पसरत आहेत. दोन वर्षांमागें रेल्वे

स्टेशन, सेक्रेटरिएट, म्युनिसिपालिटी वगैरे मूरिश वास्तुशास्त्राच्या कंगोरेदार रती तेवढ्याच मिजाशीनें मिरवत; आतां, मलाया हें मुस्लिम राष्ट्र, तेव्हां त्याच्या सार्वजनिक इमारती मूरिश पद्धतीच्या पाहिजेत या बालिश आणि कृत्रिम आग्रहानें ओढलेल्या त्यांच्या वास्तुशिल्पाचें कल्पनादारिद्र्य तेवढेंच नजरेला झोंबतें. (रेल्वेस्टेशनची इमारत याला अपवाद म्हणावी लागेल — तिची कल्पनाशाली प्रमाणबद्धता, नाजुक नितळपणा आणि डोक्यावरच्या घुमट-मिनारांचें अलंकारसौंदर्य ब्रिटिशांच्या वसाहतकालीन वास्तुशिल्पाच्या अंगभूत अत्याचारावर मात करून उभें आहे.)

कौलालम्पुरमध्यें भराभर उगवत असलेल्या (आणि दर दोनतीन महिन्यांनीं वर्तमानपत्रांत 'के. एल्.' चा बदलता मोहरा अशा मथळ्याचीं आकाशयानी चित्रें कौतुकानें प्रसिद्ध करण्यास भाग पाडणाऱ्या) या इमारतींचा मुख्य विशेष म्हणजे त्यांची निर्भेळ आधुनिकता. त्यांनीं परंपरेशीं, जुन्या कल्पनांशीं अगर मलायन राष्ट्राच्या मानीव सांस्कृतिक प्रकृतीशीं तडजोड केलेली नाहीं. त्यांनीं फक्त दोनच गोष्टी मानलेल्या दिसतात. एक म्हणजे के. एल्. च्या सभोवतालचा निसर्ग आणि आधुनिक वास्तुशास्त्राची स्वाभाविक प्रकृति. या इमारतीच्या तकतकीत लाकडाचें, चकचकीत पोलादाचें, झगझगीत अल्युमिनियमचें आणि कलदार काचेचें मलायाच्या हिरव्या निसर्गाशीं छान जमतें. आणि आधुनिक वास्तुशिल्पांत अवकाशाचे जे ऐसपैस प्रयोग आहेत ते के. एल्. च्या आसपासच्या चढत्याउतरत्या टेकड्यांच्या आंदोलनाशीं एकरूप झाले आहेत.

याचा अगदीं अंतःकरणापासून अनुभव घ्यायचा असेल तर केनी हिलवर जा, तेथें मलायाच्या वास्तुशिल्पज्ञांनीं जी एक वसाहत बांधली आहे तिचें स्वरूप न्याहाळा, मग तुमच्या ध्यानांत येईल कीं तेथल्या प्रत्येक इमारतीच्या उभे राहण्यांत जी ऐट आहे ती तेथल्या टेकड्यांशीं जुळवलेल्या कल्पनाशील काटकोनांत आहे; तेथल्या टेकडीवर अलंकाराप्रमाणें शोभणाऱ्या इमारतीचें सौंदर्य तिच्या आगळ्या व्यक्तित्वांत आहे. या व्यक्तित्वाला साध्या सुबक, सलग कलात्मकतेचा सोस आहे. परंपरेच्या खोट्या कल्पनांचा कृत्रिम खेळ त्याला मान्य नाहीं.

कौलालम्पुरच्या नव्या वास्तुशिल्पाचें मला जाणवलेलें हेंच मोठें वशिष्ट्य. याला अपवाद नाहीं असें नाहीं. माणूस आला तेथें अपवाद आलाच. (त्याचा आगळेपणाचा हव्यास स्वस्थ थोडाच बसणार?) लॅंग्वेज इन्स्टिटयूटच्या अगदीं आधुनिक इमारतीच्या डोक्यावर उदाहरणार्थ, मलायन पद्धतीचें एक छप्पर ठेवून दिलेलें आढळतें – आमच्या दिल्लीच्या कृषिभवनावरचे, सार्जे-टच्या टोपीसारखे घुमट जसे हास्यास्पद दिसतात तसें तें मला तरी हास्यास्पद वाटलें. परंपरेच्या नांवानें या छपराची अगदीं भावनानिर्भर स्तुति करणारा एक विद्वान मला भेटलाच. पण मलायन छपरांत खरोखर असणाऱ्या प्रवाही विस्ताराचें आणि नितळ किनारीचें स्वाभाविक पालन आधुनिक वास्तुशिल्प कसें सहजपणें करतें हें केनी हिलवरच्या एका बंगल्यांत दिसत असलेलें या गृहस्थानें पाहिलेलें नव्हतें. आणि पाहिलें असतें तरी त्याच्या परंपराग्रस्त दृष्टीला तें कितपत जाणवलें असतें याची मला शंकाच आहे. परंपरेचें अधिक राजस स्वरूप मलायन सुलतानाच्या 'इस्ताना नेगारा' या राजवाड्यांत आढळलें. तिच्या सुवर्णरंगीत घुमटांत इस्लामी संस्कृतीची एक आल्हादकारक लकेर आहे. पण ही इमारत पाहिल्याबरोबर मला दिल्लीच्या प्रदर्शनांतल्या अमेरिकन पॅव्हिलिअनची आठवण झाली, यावरून तिच्या आधुनिकतेची कल्पना येईल.

मी विचार करूं लागलों. आशियाच्या इतर राजधान्यांत नव्याजुन्या वास्तुशिल्पांचा मिलाफ करण्याचे कांहीं आकर्षक, पण कांहीं अगदीं हास्यास्पद प्रयोग सुरू असतांना या एका कौलालम्पुरामध्यें आधुनिक वास्तुशिल्पाचा हा असा निर्भेळ आग्रह कां? आणि एकदा एका क्षणीं साक्षात्कारासारखें जाणवलें कीं मलायन राष्ट्राच्या नव्या प्रकृतीचें तें निदर्शक आहे. या प्रकृतीनें आधुनिक यंत्राधिष्ठित संस्कृतीचा निःशेष स्वीकार केलेला आहे. त्यांत कांहीं कच्चेपणा नाहीं, कांहीं अर्धवटपणा नाहीं. हा स्वीकार मलायन लोकांच्या वृत्तींत खोल मुरलेला मला आढळला. त्यांच्या कलाकौशल्यांत आढळला तसा जीवनपद्धतींतहि आढळला. त्यांच्या चालण्या-बोलण्यांत आढळला तसा वागण्यावर्तनांतहि आढळला.

या खेपेला मला मलायन चित्रकारांच्या चित्राचें एक प्रदर्शनच पाहा-यला मिळालें, आणि त्यांच्यांतल्या एकदोघांशीं थोडासा परिचयहि झाला.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत



अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों दि: ....................

फ्रँक सलिव्हन नांवाचे एक मूळचे ऑस्ट्रेलियन पण आतां धर्मानें व देशानें मलायन बनलेले गृहस्थ, मलायाचे पंतप्रधान तुंगकू अब्दुर्रहमान यांचे खास चिटणीस आहेत. त्यांना चित्रांचा सोस आहे. मलायन चित्रकारांना त्यांचा मोठा आधार आहे. आपल्या घरीं त्यांनीं त्यांचीं अनेक चित्रें गोळा करून ठेवलीं आहेत. दिवाणखान्यांत टांगलेलीं आहेत त्याच्या अनेक पटींनीं खोल्यांत रचून ठेवलेलीं आहेत. श्री. व सौ. पु. ल. देशपांडे यांच्या सहवासांत मीं तीं पाहिलीं तेव्हा त्यांच्या स्वरूपापेक्षांहि सलिवनच्या उत्साहानें आम्ही अधिक चकित झालों. त्यांनीं त्यांतलें प्रत्येक चित्र आम्हांला आपल्या शेऱ्यासकट दाखविलें. जादूगार एकेक चीज आपल्या अस्तनींतून काढतो आणि मोठ्या खटकेबाज अनुक्रमानें दाखवतो त्याप्रमाणें ते एकेक चित्र खोलींतून आणीत, जादूगाराप्रमाणें त्यावर भाष्य करीत, आणि आम्ही जादूच्या खेळाला जमलेल्या प्रेक्षकांप्रमाणेंच चकित होऊन जाऊं! दुसऱ्या दिवशीं सलिवनच्या घरीं कोणाला तरी, कसलें तरी, चित्र अर्पण करण्याचा छोटासा समारंभ होता, त्याला तेरापासून त्रेचाळीसपर्यंत सर्व वयांचे चित्रकार जमले होते. इतक्या तरुण वयांत इतकें यश मिळविलेले चित्रकार दुसऱ्या कोणत्या देशांत असतील असें वाटत नाहीं. मीं याबद्दल थोडेंसें आश्चर्य व्यक्त केलें तेव्हां सलिवन उद्गारले, " त्यांत काय आश्चर्य? मलाया हें मुळीं तरुण राष्ट्रच आहे. मलायांतले ५७ टक्के लोक एकवीस वर्षांखालचे आहेत!" नव्या जगाचें मुक्त स्वागत तरुणांनीं नाहीं करायचें तर कोणीं करायचें ?

ही नवी दृष्टि या चित्रांतच दिसत होती. मलाया–सिंगापुरांत चाळीस-पंचेचाळीस टक्के लोक चिनी आहेत आणि चिनी चित्रपद्धतीचा मलायाला वारसा मिळालेला आहे. या चित्रपद्धतींत आजचे तरुण मलायन चित्रकार ' पर्स्पेक्टिव्ह ' ओतीत आहेत. त्याचप्रमाणें ते आधुनिक पद्धतीचा, म्हणजे केवलाकार ( abstract ) पद्धतीचा अधिकाधिक स्वीकार करीत आहेत.

जशीं चित्रें तसे चित्रकार. ज्या दोन प्रमुख तरुण चित्रकारांशीं माझी ओळख करून देण्यांत आली त्यांचें दर्शन, त्यांचे पोशाख परस्परांच्या जितके विरुद्ध असूं शकतील तितके होते. पण क्षणभरांत ध्यानांत आलें कीं त्यांत एक आंतरिक नातें होतें. पॅट्रिक इंग कोणाहि दुराराध्य देशभक्ताला

लाजवील असा तंग मलायन पोषाख ( कमरेला आवळलेल्या उपरण्यासह ) करून आले होते. पण ही आजच्या कलावंताची एक स्वैर लहरच ! ( पॅट्रिक इंग हे बरेच लहरी गृहस्थ आहेत असें थामट उकाड्यांतल्या या पोषाखाचें स्पष्टीकरण एका मित्रानें केलें. ) दुसरे जमाल. ( त्यांचें ' जाळें ( Bait ) ' हें चित्र भारताच्या चौथ्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत मीं अगोदरच पाहिलेलें होतें आणि त्यांतला पूर्वीच्या सतीश गुजरालचा जोश पाहून मी क्षणभर स्तब्ध बनलों होतों. ) त्यांचा पोषाख कोणत्याहि मलायन तरुणाच्या पोषाखासारखा पँट–हाफ-शर्टचा साधा पण निर्वेध होता. ( त्यांच्या चित्रानें मला सतीश गुजरालची आठवण झाली तर त्यांना पाहून हुसेनची झाली. ) जमालांच्या घरीं जाऊन त्यांचा स्टुडिओ पाहण्याची आणि चहापान करण्याची संधि मला मिळाली. त्यांच्या घराचें दर्शन त्यांच्या कलेच्या दर्शनाप्रमाणेंच अगदीं आधुनिक आहे.

मलाया चित्रकलेंत जशी आधुनिकतेची रेखा आहे तसा संगीतांत आधुनिकतेचा सूर आहे. जपान, कोरिआ, फिलिपीन्सप्रमाणें मलायानेंहि पाश्चात्य संगीताचा स्वीकार केला आहे. मी के. एल्‌ला होतों तेव्हां येहुदी मेनुहिनचे जावई फाउ-त्सॉंग यांचे पियानो वादनाचे कार्यक्रम तेथें मोठ्या गर्दीनें सुरू होते व त्यांचे ठळक मथळ्यांचे चित्रांकित वृत्तांत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत होते. मलायाचें स्वतःचें असें प्रभावी संगीत नाहींच, पण एक नृत्य आहे. त्याचें नांव रोंगेंग. त्याचें दुसरें नांव योगेत. हेंच मला आवडतें आणि तेंच त्याच्या खऱ्या स्वरूपाला साजेसें आहे. एक स्त्री आणि एक पुरुष यांनीं एकमेकांना किंचितसाहि स्पर्श न करतां परस्परांच्या हाल-चालींना व हावभावांना प्रतिसाद देत नाचायचें हा या नृत्याचा मुख्य विशेष. परस्परांच्या दृष्टीला दृष्टि भिडवीत, परस्परांच्या स्मिताला स्मितानें उत्तर देत, परस्परांच्या अभिनयाला अभिनय जुळवीत, पदक्षेपाला पदक्षेपाची साथ करीत हातवाऱ्यांना हातवाऱ्यांच्या आकृत्या रेखीत, अंतःकरणाला अंतःकरण जोडीत, भावनांना भावनांचें प्रदान करीत, वृत्तीला वृत्ति समर्पीत, आत्म्याच्या ज्योतीनें अंतरात्म्याची ज्योत उजळीत, एकमेकांत एक प्रकारचें अदम्य पण अदृश्य अनुसंधान निर्माण करणें आणि दोन व्यक्तित्वें विजेच्या प्रवाहानें जोडून देणें ही या नृत्याची सांगता आहे. संयम आणि समर्पण हीं त्याचीं साधनें आहेत.

पण आज या नृत्यावर लॅटिन अमेरिकन रुंबासुंबांनीं चेटूक केलें आहे, आणि के. एल्.च्या फेडरल हॉटेलपासच्या करमणूक – केंद्रांत तरी आज हें नृत्य म्हणजे धांगड-धिंग्याचा संभावित प्रकार झाला आहे. यांत अर्थात् जीव फेकून देणारी बेहोषी असती तर हरकत नव्हती ! शरीराच्या, हातापायांच्या, नितंबाच्या, मस्तकाच्या बेहोष लयबद्ध हालचालींतहि एक कलात्मक ताकद असते. या करमणूक – केंद्रांत जा, कर्कश पिपाण्या, जायबंदी व्हायलिनें, दमट पडघम यांच्या बॅंडसमोर ओळीनें बसलेल्या, रंगवलेल्या तोंडाच्या पण करवादलेल्या चेहऱ्याच्या पोरी पाहा. अर्ध्या डॉलरचें तिकीट खरेदून त्यांच्याकडे मोठ्या आशेनें आणि गरम रक्तानें आलेल्या तरुणाला जुलमाची साथ करण्यासाठीं त्या किती कष्टानें उठतात तें पाहा. या सुंदर नृत्याचा कसा बाजार उडाला आहे याची तुम्हांला कल्पना येईल. मग अर्थात तेथें तुम्ही चारपांच मिनिटेंहि ठरत नाहीं. तुम्ही पाश्चात्य नृत्याच्या कॅबेरेमध्यें जातां किंवा सियामी पोरींच्या टारगट नृत्याकडे पाय वळवतां. पण तेथेंहि निराश होऊन – पण त्याचा अर्थ अधिक ध्यानांत घेऊन परत येतां.

आधुनिकता सर्वत्र सर्वस्वी उपकारक ठरते असें नाहीं, एवढाच याचा निष्कर्ष. पण करमणूक केंद्रांत आधुनिक मलायन तरुण-तरुणींचें अंतःकरण कसें उडतें, जीव कसा पाखडतो, वृत्ति कशी बेहोष होते, रात्र कशी रमते याची थोडीशी कल्पना येईल. या तरुण-तरुणींच्या चेष्टागंमतींत सामील व्हा, हसणा-खिदळण्यांत भाग घ्या, खाण्या-पिण्यांत साथ करा, कॅप्टनचें ' कापिटान ' असें सहज रूपांतर करणाऱ्या मले संभाषणाकडे थोडें लक्ष द्या – यांच्या वृत्तींतल्या स्वच्छंद आधुनिकतेची तुम्हांला सहज कल्पना येईल. यांना महिन्याकाठीं चारपांचशे डॉलर्स मिळूं लागले कीं मोटर लागते, घरांत फॅशनेबल फर्निचर, रेडिओ, रेकॉर्डप्लेअर यांची निकड भासते, हॉटेलांतलें जेवण गोड लागतें, रात्रींच्या करमणूक-केंद्रांत झोकून दिल्याखेरीज झोप येत नाहीं – आणि टिनरबराच्या उत्पादनानें समृद्ध बनलेल्या मलायांत ' आज घ्या – उद्यां द्या ' ही अमेरिकन पद्धति सर्रास चालू असल्यामुळें घरांत आधुनिकता घुमते नि दारांत मोटर झुलते !

आत्म्याची आधुनिकता शरीरावर येतेच. निरुंद पट्टीची पॅंट आणि हाफशर्ट तरुण पसंत करतो, आणि फ्रॉकमध्यें न शिरतां लुंगी-कुडत्याचा

उडता-झुलता पोषाख तरुणी पसंत करीत असतील तर त्याचें कारण आपण या पोषाखांत विशेष आकर्षक दिसतों हें त्यांच्या उपजत स्त्रीत्वानें त्यांना सांगितलेलें रहस्य! पण त्यांच्या चेहऱ्यावरच्या रंगरंगोटीकडे पाहा, किंवा त्यांच्या केसांची रचना पाहा, नाहींतर (शरीराच्या दुसऱ्या टोकाकडच्या) पादत्राणाकडे नजर टाका – त्यांच्या आधुनिक ऐटीची थोडी कल्पना तुम्हांला येईल. मलायाच्या मोलकरणीसुद्धां उंच टांचांचीं पादत्राणें वापरतात आणि नियमानें सौंदर्यकेंद्रांत जातात. युनायटेड कमर्शिअल बँकेचे मॅनेजर लालवानी यांनीं श्री. पु. ल. देशपांडे यांना सांगितलेला अनुभव पाहा. ते नुकतेच कौलालम्पुरला आलेले होते. त्यांच्या घरीं सात वाजतां एक पार्टी होती. लालवानींची पत्नी (पार्टीप्रीत्यर्थ) सौंदर्यकेंद्रांत जाईल म्हणून त्यांच्या मोलकरणीनें पांच वाजेपर्यंत वाट पाहिली आणि मग विचारलें. 'तुम्हाला ब्यूटी-सलूनमधें जायचं नाहीं का?'

पत्नी उत्तरली, 'नाहीं.'

'म्हणजे, आज तुमच्या घरीं पार्टी नि तुम्हांला सौंदर्यप्रसाधनाची गरज वाटत नाहीं!'

लालवानींची पत्नी अगदीं आधुनिक बॉबकटवाली असूनहि तिला याची गरज वाटत नव्हती. ती म्हणाली, 'नाहीं.'

'तुम्हांला जायचं नसेल तर नका जाऊं, पण मला जायला हवं,' असें म्हणत ती मोलकरीण आश्चर्य आणि फणकारा यांचें बेमालूम मिश्रण उधळीत निघून गेली.

याला अपवाद नाहींत असें नाहीं. पण ते मुख्यतः भारतीय आणि जुन्या पिढींतले चिनी. तामिळांचा भरणा असलेले भारतीय अद्याप (पुष्कळसे लुंगीवजा) धोतरांत वावरतात, रामस्वामीच्या किंवा मुन्नुस्वामीच्या खानावळींत सांबारभातानें मनगटापर्यंत हात भरवून जेवतात आणि त्यांच्या स्त्रिया, अगदीं अय्यर-आय्यंगार पद्धतीचें एकेका पायाला करकचून वेढणारें लुगडें नेसत नसल्या तरी पातळें बंगलोर कांजीवरमूचींच नेसतात, केस करकचून बांधतात, पायांत जोडवीं घालतात, आणि नाकाच्या दोनहि नाकपुड्यांचा चमक्यांनीं बंदोबस्त करून टाकतात! कौलालम्पुरमध्यें असे भारतीय आहेत म्हणून बाटू

गुहेंतल्या सुब्रमण्यमूची पूजाअर्चा, रोज १८७ पायऱ्या चढून न चुकतां होते आणि ती करणाऱ्या शिग्वाबाज पुजाऱ्यांची चलती चालते !

चिनी देवालयांतल्या पुजाऱ्यांबद्दल तेंच म्हटलें पाहिजे. कौलालम्पुरमध्यें कांहीं सुंदर चिनी देवालयें आहेत – सुंदर म्हणजे वास्तुशिल्पाच्या व कारागिरीच्या दृष्टीनें सुंदर. मला अलंकारप्रचुर वास्तुशिल्प आवडत नाहीं. त्याच्या कोरीव शिल्पाच्या भरताडीनें माझा जीव गुदमरतो. पण या देवळांचा सुबक आकार, त्यांच्या छपरांचे वक्र कोन, खांबावरच्या व दरवाजावरच्या कोरीव आकृति, आंतलीं चित्रें, शिल्प, काचेचीं आणि पितळेचीं (क्वचित् सोन्याचीं) पुष्पपात्रें आणि पूजापात्रें यांच्या सौंदर्यानें माझे डोळे अनेकदा दिपून गेलेले आहेत. पण या देवळांत येणारे भक्त सौंदर्यापेक्षां भाग्यदेवतेची आराधना करण्यास अधिक येतात, हें त्यांच्या पूजेच्या आणि प्रार्थनेच्या घटपटादि विधींकडे पाहिलें कीं लगेच लक्षांत येतें. या विधींत व्यापार असतो, म्हणून प्रत्येक देवळांत पुजाऱ्यांच्या ताफा दरोबस्त उभा असतो, आणि त्यांच्या कार्याचें नियोजनहि चोख असतें. आम्ही कौलालम्पुरच्या एका देवळांत गेलों. तेथल्या पुजाऱ्यानें भाग्य जाणून घेण्याचा क्लृप्तिबाज विधि आम्हांला साक्षर इंग्रजींत समजावून सांगितला, आणि अखेरीस बोलतांबोलतां इंग्लंडला जाऊन वकिलीचा अभ्यास करण्याची आपली इच्छा सांगून टाकली ! पण हा मलायन आधुनिकतेपेक्षां चिनी महत्त्वाकांक्षेचाच पुरावा !

मलायानें आधुनिकतेचा इतका निःशेष निःसंकोच स्वीकार कां केला ? कोणत्याहि सांस्कृतिक प्रश्नाप्रमाणें या प्रश्नाचें उत्तरहि संकीर्ण आहे, पण समजायला सोपें आहे. मलायाला भारत किंवा इंडोनेशियाप्रमाणें प्राचीन परंपरेचा भरभक्कम आधार नाहीं. मलायाच्या परंपरेला अनेक शतकांची पार्श्वभूमि नाहीं आणि ती तशी एकसंधहि नाहीं. (अर्थात् तुलनात्मक दृष्टीनें एकसंध,) मलायांत चिनी, मले आणि भारतीय संस्कृती एकमेकांशीं अस्थिर तोल साधून वावरत असतात. या तिघींच्या समन्वयांतून जी मले संस्कृति निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे तिला प्राचीन परंपरेची विशाल बैठक नाहीं. आधुनिकता हाच हिचा खरा आधार ठरण्याचा संभव आहे. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मलायाचें आर्थिक जीवन या आधुनिकतेचें प्रवर्तक आहे. ज्या राष्ट्राचें जीवन शेतींत रुतलेलें असतें त्याची संस्कृति पर-

परेंत मुरलेली असते. पण मलायाच्या आर्थिक जीवनाचा पाया रबर आणि कथील हा आहे. हे दोन अतिशय आ निक पदार्थ. त्यांचें उत्पादन अलीकडचें आणि विनियोग अद्ययावत् उद्योगधंद्यासाठीं. मलायाच्या आर्थिक जीवनाच्या या दोन रक्तवाहिन्या मलायाचें जीवन थेट आधुनिक राष्ट्रांच्या औद्योगिक जीवनाशीं जोडतात आणि अर्थात् मलायाचें जीवन आधुनिक संस्कारांनीं उडूं लागतें – आधुनिकतेचीं सुखस्वप्नें पाहूं लागतें. पण हे दारिद्र्याचे मनोरथ नव्हत. मलायाचें जीवनमान उभ्या आशियांत अत्युच्च आहे.

• • •

कि र्लो स्क र : ऑ ग स्ट १ ९ ६ २

प्रा. ग्रं. संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १४२६३
(स्थळ प्रत)

# बँ कॉ क

सकाळची झुंजुमुंजू वेळ. संधिप्रकाशाचें निळसर राखी वस्त्र वस्तुमात्रावर पसरलेलें आहे. हिरवीं झाडें, पिवळ्या भिंती, करडीं दारें, काळट रस्ता. सारें कांहीं या राखी प्रकाशांत मिसळून गेलें आहे, पण बँकॉकच्या रस्त्यावरून चाललेलें एक केशरी वस्त्र मात्र उठून दिसतें आहे. हें केशरी वस्त्र पिवळसर तजेल देहाभोवतीं लपेटलेलें आहे. देहाचीं नागवीं पावलें रस्त्याच्या कडेनें पडत

आहेत. पेंगुळलेली नजर पावलावर लागलेली आहे. निश्चल हातांनीं पोटापाशीं वाडगा धरला आहे. इतक्यांत रस्त्यालगतचें एक दार किलकिलतें व एक मध्यमवयस्क स्त्री बाहेर येते. चुरगळलेलें वस्त्र, सैल ब्लाउज, विस्कटलेले केस पण पाऊल चपळ आणि नजर चलाख. ती हातांतलें चिनी मातीचें भांडें सरसावते आणि झटकन् त्या केशरी मूर्तीसमोर जाते. मूर्तीची नजर एकवार — एकवारच तिच्या नजरेला भिडते आणि हातांतला वाडगा पुढें जातो. त्याबरोबर चिनी मातीच्या भांड्यावरचें झाकण दूर होतें, आणि भांडें वाड-ग्यांत रिकामें होतें. त्याचबरोबर केशरी वस्त्राचा शेव वाडग्यावर झाकणासारखा पसरतो आणि मूर्तीचें पाऊल उचलतें. आणि त्या स्त्रीच्या पुण्यसंचयांत महत्त्वाची भर पडते.

बौद्ध भिक्षूंना असें सुप्रभातींच अन्नदान करून पुण्यसंचय करण्यासाठीं थायलंडच्या स्त्रिया टपलेल्या असतात, आणि त्यांच्या पुण्यसंचयाच्या कार्याल असा हातभार लावण्याचें कृत्य प्रत्येक थाय पुरुष आयुष्यांत एकदा तरी करीत असतो. भिक्षूव्रताचीं काषायवस्त्रें आयुष्यांत एकदा तरी थाय पुरु-षाच्या देहावर चढतातच. राजापासून रंकापर्यंत प्रत्येक पुरुष भिक्षूवृत्तीची दीक्षा केव्हां ना केव्हां घेतोच. ही दीक्षा जन्मभर टिकली पाहिजे असा मुळींच आग्रह नसतो. तीन महिन्यांनीं संसारांत परत येतां येतें. हॉलीवूडच्या यूल ब्रायनरनें विख्यात करून सोडलेल्या मोंग्कूट राजानें सत्तावीस वर्षें परिव्राजकाचें जीवन कंठल्यानंतर फिरून राज्यस्वीकार केला, आणि पस्तीस स्त्रियांशीं लग्न करून इतकी प्रजा निर्माण केली कीं, आज बँकॉकच्या रस्त्यावर मोंग्कूटच्या रक्ताला आपला केव्हां व कसा धक्का लागेल, कांहीं नेम नाहीं ! असा त्रिदंडी संन्यास घेण्याची सोय असल्यामुळें थायलँडमधलीं बुद्धमंदिरें बारा महिने तेरा काळ काषायवस्त्रांनीं फडफडत असतात. संसाराचें ओझें असें कांहीं काल काषायवस्त्रांत गुंडाळून ठेवण्याची सोय असल्यामुळें थाय संसारांतलीं किती त्रांगडीं सुरळित सुटत असतील याची तर गणनाच नाहीं !

आणखी एका दृष्टीनें रस्त्यावरच्या केशरी मूर्तींचें हें रंगदार दृश्य बँकॉकचें अर्थपूर्ण प्रतीक आहे. बँकॉक हें एक अतिशय रंगदार शहर आहे.

डॉन मुआंग विमानतळाच्या बाहेर आल्याबरोबर याची प्रतीति येऊं लागते. विमानतळासमोरच्या देवळाचें छप्पर आतां विटलेलें आहे, पण

एकदा सुर्यांचे किरण त्याच्यावर रंगपंचमीचा खेळ खेळत असावेत एवढी तें पाहून खात्री पटते. बसमधून गांवांत जातांना सभोवारच्या भातशेतींत वारा हिरव्या लाटा उठवीत जातांना दिसतो आणि गहिऱ्या हिरव्या रंगाचा पूर्वी कधीं आला नव्हता असा प्रत्यय येतो. रस्त्याकांठच्या ओहळां-तलें आकाशाचें नुसतें प्रतिबिंब पाहून जाणवतें कीं, या आकाशाचा निळेपणा कांहीं अजब आहे. सूर्यास्ताच्या अगर सूर्योदयाच्या वेळीं तर बँकॉकच्या आकाशांत रंगाची अशी कांहीं दंगल माजते कीं, एखादा तरी कवि अगर चित्रकार त्याच्याकडे वेड्यासारखा पाहात असलेला दिसतो.

या रंगदार आकाशावर रंगदार इमारतीची रेखा टेकते आणि एक विलक्षण आकाररेषा जन्माला येते. हिचें सळसळतं स्वरूप पाहायचें असेल तर चाओ फ्या नदीवर जा, एखाद्या नावेंत बसा आणि दृष्टि वर वळवा – क्षणार्धांत स्वतःला विसराल ! एका बाजूनें राजवाड्यांचीं सालंकृत छपरें तुम्हांला वेध लावतील, तर दुसऱ्या बाजूनें वाट अरुणचे विशाल मनोरे तुम्हांला स्तिमित करतील. सकाळच्या वेळीं या मनोऱ्यावरील चकचकीत भरतकामावर सूर्यकिरणांचें प्रकाशमय नर्तन सुरू असेल आणि तुमची दृष्टि सहस्र ज्योतींनीं भरून जाईल. संध्याकाळीं राजवाड्याच्या झगझगीत रंगीन कौलांवर हिरव्या, लाल, नारिंगी ज्वाळांचें नर्तन सुरू असेल आणि तुमची दृष्टि प्रथम रंगमय व नंतर निर्बोध बनेल.

बँकॉकचा एकेक राजवाडा आणि एकेक मंदिर म्हणजे रंगदारीचा विलास आहे. असे राजवाडे आणि अशीं मंदिरें असंख्य आहेत – आणि त्यांतलें प्रत्येक मंदिर थायलँडच्या वास्तुशास्त्रीय वैभवानें भारावलेलें आहे. प्रत्येकाच्या डोक्यावर रंगीन अलंकारजडित छप्पर मुकुटाप्रमाणें शोभत असतें. प्रत्येकाचे स्तंभ कोरीव कामानें भरलेले असतात. प्रवेशद्वाराच्या आणि खिडक्यांच्या कोनदार कमानी नक्षीकामानें नटलेल्या असतात. बाहे-रच्या प्रवेशद्वाराशीं द्वारपालांची भव्य भयानक आणि आंतल्या प्रवेशद्वारा-पाशीं सांकेतिक सिंहांची राजस-साजस जोडी उभी असते आणि मंदिरांतील बुद्धमूर्तींपुढें दीपदानांतील ज्योतींची, पुष्पपात्रांतील फुलांची आणि सुवर्ण पात्रांतील अलंकारांची आरास मांडून ठेवलेली असते.

तरी प्रत्येक मंदिराचें कांहीं एक वैशिष्ट्य आहेच. वाट फ्राकेओमधली बुद्धाची मूर्ति हिरवी जेडची आहे, पण ती पाचूची आहे असा अभिमान मिरविण्यांत थाय बौद्धभक्तांना आनंद वाटतो. या मंदिराच्या भिंतीवर चित्रांकित रामायण आहे, त्यांतला हनुमानाचा मस्त बहुपत्नीक संसार पाहून आपण चकित होतों – पण लगेच रामायणाच्या या संक्रमणांत थाय लोकांच्या जीवनासक्त वृत्तीचें प्रतिबिंब आहे याची जाणीव होते. वाट पोच्या आवारांत कलासुंदर चिनी मूर्ति आहेत. त्यांतली ती घोड्यावरची राजकन्या, मॅण्डोलिन-मध्यें चूर झालेला सरदार, हास्यांत लुप्त झालेला नोकर तुमच्या नजरेला जितकी भुरळ घालतो तितकेंच आपल्या येथल्या आगमनाच्या हकीगतीनें तुम्हांला चकित करून सोडतो. चीनला माल घेऊन गेलेल्या जहाजांनीं येतांना आपलें बूड वजनदार करण्यासाठीं भरताड म्हणून या मूर्ति आणल्या ! वाट पोच्या आवारांत दगडी मूर्तींचा आणखी एक विलक्षण प्रकार आहे. या मूर्ति म्हणजे रोगग्रस्त व्यक्तींनीं रोगमुक्तिसाठीं करावयाच्या बौद्धप्रणीत तपस्येच्या प्रतिमा. वाट फ्राकेओमधला हनुमान जें सांगतो तेंच या तपस्वी मूर्तींच्या पार्श्वभूमीवर त्या चिनी मूर्ती सागतात – एवढेंच कीं, तपस्येपेक्षां हास्य आणि आनंद हीं प्रकृतीचीं अमोघ साधनें आहेत; जीवनासक्ति हीच जीवनाची खरी साधना आहे !

वाट राजबोपित ( संगमरवरी देवालय ) मला स्वतःला वारंवार आठवतें नि पुनः पुन्हा पाहावेंसें वाटतें. त्याचा, किंचित् काळीं, किंचित् हिरवीनिळी झाक मारणारा स्वच्छ संगमरवर अगर त्याचें मुकुटाप्रमाणें शोभणारें सोनेरी कडांचें आणि लाल लाल कौलांचें कोरें करकरीत छप्पर, हीं याचीं कारणें नव्हत. सगमरवरी ताजप्रमाणेंच या संगमरवरी मंदिरांत कलेचा शुभ्रसफेत आत्मा, कांहीं प्रमाणांत, मूर्तरूप झाला आहे म्हणून मला हें मंदिर आवडतें. ताजशीं त्याची मला बरोबरी करायची नाहीं. ताजची विशाल पार्श्वभूमि अगर ताजच्या कलेची स्वैर फेक येथें नाहीं, पण ताजची आकारशुद्धता येथें आहे. दिल्ली येथील सुप्रीम कोर्टाच्या इमारतीनें ल्युटेन्सच्या सेक्रेटरीएटची नक्कल करतांना वास्तुसौंदर्याचें हें रहस्य विसरून ज्याप्रमाणें स्वतःची फजिती करून घेतली आहे त्याचप्रमाणें या इमारतीच्या अनेक प्रतिकृतींनी करून घेतलेली आहे.

मराठा ग्रंथ स ्ग्रह, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... ................. दि: ....................
क्रमांक ........................ नों दि ..............

या राजवाड्यांच्या अगर मंदिरांच्या दर्शनानें तुमचें अंतरंगांत पुरेसें रंगदार बनलें नाहीं तर तुम्ही राजनौकांवरून नजर फिरवा नाहीं तर थाय नृत्याचा कार्यक्रम पाहा – रंगविलास हेंच त्यांचें मुख्य लक्षण आहे. राजनौकांचें लांबट अंग सोनेरी वर्खानें मढवलेलें असतें, सर्पराक्षसाच्या तोंडाच्या आकारासारख्या लाल लाल तोंडांतून भडक ज्वाळा बाहेर पडत असल्यासारख्या वाटतात, आणि मधलें राजसिंहासन आणि मुकुटासारखें त्याचें छप्पर सुवर्णतेजानें झगझगतें. एका काळीं राजेसाहेबांची ऐश्वर्यशाली मूर्ति या सिंहासनावर विराजमान होऊन आणि सभोवताली अशा पांचपन्नास राजनौकांचा लवाजमा घेऊन चाओ फयाच्या प्रवाहावरून मिरवणुकीनें निघे तेव्हां राजदरबाराचें सालंकृत वैभवच तरंगत निघाल्यासारखें वाटे.

आतां अशी मिरवणूक निघत नाहीं, पण थाय नृत्याची रंगलूट करण्याची सोय सांस्कृतिक खात्यानें केलेली आहे. अंगावर भर्जरी रत्नजडित पोशाख आणि डोक्यावर सुवर्णमुकुट चढवून थाय नर्तक-नर्तिका वैभवशाली रंगमंचकावर अवतरल्या म्हणजे आपलें मन मनोज्ञ कलेंत जितकें गुंग होतें त्यापेक्षां आपले नेत्र त्या थाटामाटानें अधिक विस्फारतात.

राजवाडे आणि मंदिरें यांच्या अशा वैभवामुळें बँकॉकला ‘ पूर्वेकडचें रोम ’ अगर ‘ पूर्वेकडचें व्हिएन्ना ’ अशी कीर्ति सहज प्राप्त झाली असती. पण आपल्या राजधानीला ‘ पूर्वेकडचें व्हेनिस ’ अशी संज्ञा प्राप्त व्हावी अशी इच्छा राजे चुलालॉंगकॉर्न यांना झाली, आणि तिला कालव्यांनीं नागरून काढण्यासाठीं त्यांनीं एका फ्रेंच इंजीनिअराची योजना केली. त्यानें आपलें काम चोख बजावलें. म्हणजे शहरांतून अनेक आडवेउभे कालवे खोदले आणि चाओ फयाला जोडून दिले. चाओ फया जेव्हां खोल वाहत होती (म्हणजे आज ती थोडीशी होरली आहे तशी होरली नव्हती ), आणि बँकॉक शहर आजच्या इतकें माणसांनीं आणि त्यांच्या दैनंदिन व्यवहारांनीं गजबजलें नव्हतें तेव्हां व्हेनिसची ऐट थोडीबहुत शोभली असेल. पण हा खटाटोप मुळांतच अट्टाहासाचा होता. व्हेनिस ही निसर्गाचीच योजना होती. शेजारीं शेजारीं शंभर बेटें निर्माण करून कालव्यांचें शहर निर्माण करण्याचें आवाहन निसर्गानेंच मानवाला केलें होतें. पण बँकॉकच्या कालव्यांत निसर्गाचें नुसतें निमित्त आहे आणि मानवाची लहर प्रधान आहे. मेनाम (माता) चाओ

फ्या व्हेनिसमधील 'कॅनॉल ग्रांडे' च्या मस्त स्वाबानें वाहते किंबहुना चाओ फ्याच्या पाण्याचा वेग अधिक आहे. कॅनॉल ग्रांडेवरून एखाद्या शहराचा व्याप वाहत असेल तर चाओ फ्यावरून सबंध देशाचा वाहतो – नौकांतून वाहतो, पडावांतून वाहतो, तराफ्यावरून, लॅंचेसवरून, मोठ्यामोठ्या बोटीं-वरूनहि वाहतो. कॅनॉल ग्रांडेप्रमाणें चाओ फ्याच्या काठीं राजवाडे आहेत, मंदिरें आहेत, मोठमोठे कारखाने आहेत. हें सारें मानवनिर्मित वैभव आहे. पण समुद्राची शक्ति नदीला कशी येणार ? समुद्राचा सपाटा नैसर्गिक कालव्यांत शिरतो तसा नदीचा कृत्रिम कालव्यांत कसा शिरणार ? नदी मुलखाची घाण गोळा करून काठावर फेकते आणि उरलीसुरली समुद्राला अर्पण करते. समुद्र ती सारी पोटांत घेतो. समुद्र हा विष प्राशन करणाऱ्या शंकरासारखा आहे, तर नदी मलिन वल्कलें धारण करणाऱ्या भिल्लिणीसारखी आहे.

चाओ फ्यानें आणलेली घाण बँकॉकच्या कालव्यांत शिरते, आणि यांत कांहीं कमतरता आलीच तर ते कालव्याच्या काठीं राहणारे लोक ती इमानें इतबारें भरून काढतात. अर्थात् हे कालवे (त्यांतले बहुतेक) केरकचरा, घाण आणि शेवाळ यांचीं डबकीं बनले आहेत. रस्त्याच्या कडेनें हीं डबकीं वाहतात – वाहतात म्हणजे डचमळतात ! या डबक्यांत आपले पुढले लाकडी पाय रोवून बँकॉकचीं चौकटीचीं घरें उभीं असतात, आणि बँकॉकची अस्सल वस्ती या घरांतून वावरते. घरांत माणसें वावरतात आणि बाहेर (डबक्यांत) डास वावरतात आणि रात्रीं त्यांची मोठी प्रेमाची गाठ पडते ! घरांत माणसें वावरतात तशीं कुत्रीं, मांजरें आणि कोंबड्या–डुकरेंहि वावरतात – आणि या साऱ्या मंडळींनीं हीं घरें अगदीं गजबजून निघतात. बोलबोल म्हणतां एखादें पोर अगर डुकर कालव्यांत उतरतें आणि कालव्याच्या गदारोळांत थोडीशी प्रवाही धुगधूग कायम असल्याचें सिद्ध करतें. पट्‌दिशीं एखादी आंब्याची साल अगर उसाचा चोथा कालव्याच्या पृष्ठभागावर पडतो आणि ही प्रवाही शक्ति पुनः गोठली असें दाखवून देतो.

कांहीं कांहीं कालव्यांत होड्याच होड्या एकमेकांना थाप चिकटून असतात. या खरोखर पाण्यावर चालणाऱ्या होड्या आहेत कीं होड्यांच्या आकाराचीं घरें आहेत हें सांगणें कठीण. त्यांत गाडग्गीं, मडकीं, नारळ, भोपळे, कौलें, धान्याचीं पोतीं, मालाचे गठ्ठे, असे जंगम जिन्नस दिसतात

त्याप्रमाणें पेटलेल्या शेगड्या, पसरलेले बिछाने, वाळत घातलेले कपडे, मुलांना पाजणाऱ्या आया आणि भांडणारीं जोडपीं असे स्थावर संसारहि दिसतात. ते स्थावर असोत वा जंगम असोत, त्यांवर त्यांचेंच असें एक खास वातावरण नांदतांना दिसतें, आणि राजवाड्यांच्या रंगदार आणि बौद्धमंदिरांच्या कापाय वातावरणाइतकाच बँकॉकचा या वातावरणावर हक्क आहे.

पण बँकॉकच्या आधुनिक राज्यकर्त्यांना मात्र या वातावरणाची तितकीशी पर्वा दिसत नाहीं. राजे चुलालाँगकॉर्नना आपल्या राजधानीचें व्हेनिस बनवायचें होतें; यांना तिचें बॉस्टन किंवा फिलाडेल्फिया बनविण्याची घाई लागलेली दिसते. आणि आज बँकॉकमध्यें अक्षरशः हजारो मोटारी, मोटर-सायकली, टॅक्स्या, ऑटोरिक्षा यांची झुंबड माजून ठिकठिकाणीं वाहतूक मोडून पडण्याचे आणि कित्येक ठिकाणीं उतारू व वाहनें मोडून पडण्याचे जे प्रकार दिसतात त्यांवरून ही त्यांची अद्ययावत् महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याचा क्षण समीप आला आहे असें वाटतें! बँकॉकचें बॉस्टन करण्यासाठीं असो वा इतर कांहीं करण्यासाठीं असो, कालव्यांच्या प्रवाही वैभवापेक्षां मोटारींच्या उडत्या वैभवाची हौस आजच्या बँकॉकला आली आहे एवढें खरें, आणि त्यासाठीं कालवे बुजवून रस्ते रुंद करण्याचा सपाटा सुरू आहे. यामुळें मोटार ही नुसतीच देखाव्यासाठीं नसून जलद प्रवासासाठीं असते हें कांहीं रस्त्यांवर तरी सिद्ध होऊन शिवाय बँकॉकला डासांपेक्षां माणसांची अधिक कदर आहे हेंहि सिद्ध होईल. पण त्यासाठीं कालव्या-रस्त्यांच्या दरम्यान वाढलेल्या शानदार झाडांची तोडातोड करण्याची काय गरज आहे तें मात्र समजत नाहीं. बँकॉकच्या रस्त्यांना अमेरिकन कळा आणण्याऐवजीं थोडीशी पॅरिशिअन कळा आणली आणि या छायादार वृक्षांनीं दुतर्फा डोलणारे तिपदरी बुलेव्हार्ड्स तयार केले तर बँकॉकची 'अप्टुडेट' शान कांहीं कमी होईल काय? पण अर्थात् यामुळें भर रस्त्यांत मोटारींची शर्यत लावण्याची खुमखुमी आवरावी लागेल आणि आजच्या गतीच्या युगांत हा एक मागासलेपणा ठरेल! बँकॉककरांच्या मनांत काय आहे माहीत नाहीं, पण कालच्या मस्त वृक्षांचीं मेलेलीं कांडें रस्त्याकाठीं पडलेलीं पाहून माझें भारतीय अंतःकरण चरकलें एवढें खरें. पण थोड्याशा विचारानें ध्यानांत

आलें कीं, आग्नेय आशियाचे आणि आपले संकेतच निराळे आहेत. आपले हिशेब तिकडे उलटे होतात. कारण आपली सुवर्णभूमि खरोखर दरिद्रभूमि आहे आणि आग्नेय आशियाची भूमि निसर्गवैभवानें हालत डोलत आहे. आपल्याला वनमहोत्सवाची गरज असते तर त्यांना वनविच्छेदनाची निकड भासते. आपले भुकेकंगाल चारदोन शितांसाठीं रस्त्याकाठीं फेकलेल्या उष्ट्या पत्रावळी चिवडीत असतात, तर तिकडे रस्त्याकाठीं उरलेलें अन्न परातींनीं फेकून दिलेलें आढळतें. यामुळेंच बहुधा आपण विरक्तीची आराधना करतों, ते आसक्तीवर लोभ करतात; आपण त्याग श्रेष्ठ मानतों, ते भोग चाहतात; आपल्या चेहऱ्यावर चिंतेच्या सुरकुत्या असतात, त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची सळसळ असते; आपण जीवन ओढीत असतों, ते जीवन जगत असतात. आग्नेय आशिया ही भारताची वसाहत, पण त्याचें जग आणि त्याचें तर्कशास्त्र आज अगदीं वेगळें बनलें आहे. बँकॉकच्या जीवनाच्या धमन्या कशा उडतात हें पाहायचें असेल तर एकवार न्यू रोडवरून हिंडा, राजदमन अॅव्हेन्यूवरून फेरफटका करा, बँकॉकच्या बाजारांत शिरा, हिंमत असेल तर नाइटक्लबची पायरी चढा, मुष्टियुद्धाची दंगल अनुभवा – आणि ' माइ पेन राय ' चा मंत्र शिकतां आला तर शिकण्याचा यत्न करा.

न्यू रोड हा बँकॉकचा नंबर एकचा रस्ता, पण तुळशीबागेच्या बोळाइतका रुंद आहे. बँकॉकमध्यें रस्ते रुंदावण्याची इतकी मोहीम सुरू असूनहि हा ' बँकॉकचा ब्रॉडवे ' रुंद होण्याचा संभव नाहीं, कारण त्याच्या काठच्या मातबर इमारती पाडण्याची कोणाची हिंमत नाहीं. रस्ता अरुंद असला तरी सारी वाहनें तिकडेच धावतात, कारण बँकॉकचीं बरीचशीं हॉटेलें, पेय-गृहें, नाइट क्लब्ज्, कचेऱ्या, कंपन्या आणि दुकानें याच रस्त्यावर आहेत. बँकॉक दूरदूरच्या प्रवाशांना बोलवतें आणि या ना त्या निमित्तानें याच रस्त्यावर हिंडवतें ( म्हणजे रखडवितें ! ) अर्थात् लॉरी ट्रॅमवर आदळते, ऑटोरिक्षा मोटारींत घुसते, सायकल बसखालीं जाते – आणि यांच्या दरम्यान पायानें चालणारे लोक धडपडतात आणि हें सारें " काळा चष्मा–खाकी वेशवाला " पोलिस डोळ्याची पापणी न फडफडवितां पाहत असतो. कारण त्याला माहीत असतें कीं, न्यू रोडवरची वाहतूक कितीहि ' गांठली ' तरी वाहनाचा चक्काचूर होणार नाहीं, हातपाय मोडणार नाहींत अगर प्राण गायब होणार नाहींत.

कसे होतील ?– चारपांच मैलांहून अधिक वेगानें येथून कांहीं हलूंच शकत नाहीं. येथें गतीपेक्षां स्थिति अधिक प्रभावी ठरते आणि पंधरापंधरा मिनिटें वाहतूक साफ स्थगित होते.

हा रस्ता लक्षांत राहण्याचें एवढें एकच कारण नाहीं. या रस्त्यावर एक भारतीय उपहारगृह आहे, पण त्यांतल्या पदार्थांची प्रकृति राष्ट्रातीत असते! येथल्या नाइटक्लबमध्यें थाय नृत्याचे कार्यक्रम होतात, पण ते पाहण्यासाठीं इतक्या लवकर जाऊन खुर्ची पकडावी लागते कीं, थाय नृत्याची पाळी येईपर्यंत थाय अन्न, थाय बिअर आणि चा-चा नृत्याच्या तंगड्या यांनीं आपली बुद्धि बेजार झालेली असते. या रस्त्यावरच्या जनरल पोस्ट ऑफिस-मध्यें पत्रें टाकण्यासाठीं आशिया, यूरोप, अमेरिका अशा निरनिराळ्या खंडांसाठीं निरनिराळ्या पेट्या आहेत, पण त्यांतलीं पत्रें एकाच पिशवींत गोळा केलीं जातात असें ऐकलें! न्यू रोडच्या नाक्यावर रात्रीं नुसतें उभें राहिलें तरी आजुबाजूला अनेक नाजुक नाट्यें चालू असल्याचें अनुभवास येतें. अमेरिकन प्रवासी, थाय टॅक्सी–डायव्हर्स आणि रात्रीच्या विश्रांतल्या कांहीं तारका, हीं या नाटकांतलीं मुख्य पात्रें -- यांतलें केव्हां कोणतें येऊन तुमचा हात धरील याचा नेम नसतो! दुपारीं या रस्त्यावर उष्म्याचा कहर उडतो; रात्रीं त्याचे गरम उसासे बनतात!

न्यू रोडवर बँकॉकच्या व्यापारी जगाची नाडी उडते, तर राजदमन ॲव्हेन्यूवर बँकॉकच्या सार्वजनिक इभ्रतीचा रुबाब मिरवतो. या रस्त्याच्या दोन टोंकांना दोन राजवाडे आहेत, पण एकांतहि राजाचा वास नसतो. एका राजवाड्यांत कधीं कधीं दरबारी समारंभ साजरे होतात तर दुसऱ्यांत, नॅशनल असेंब्लीच्या मुसक्या आवळलेल्या नसतील तेव्हां तिचीं अधिवेशनें भरतात. या रस्त्यावरची एकाफेची कचेरी थायलँडच्या आंतरराष्ट्रीय आदरातिथ्याची ग्वाही देते, तर सार्वजनिक कचेऱ्यांच्या इमारती थाय-लँडच्या वास्तुशिल्पांत नव्या–जुन्यांचा संगम घडविण्याची शक्ति आहे याची खात्री पटवितात. (रंगदार छपरें, प्रवेशद्वाराच्या तिकोनी सालंकृत कमानी, उंच उंच कोरीव स्तंभ, आधुनिक भिंती आणि काचेच्या लांबरुंद खिडक्या यांचें हें मिश्रण 'बँकॉक वास्तुशिल्प' या संज्ञेनें प्रसिद्ध आहे.) हा ॲव्हन्यू कालवा ओलांडून वळण घेतो तेथें सिनेमाचें अद्ययावत् थिएटर,

पुराण्या किल्ल्याची भिंत आणि प्राचीन स्तूपाचा मनोरा यांचें एकत्र दर्शन होतें आणि बँकॉकसारख्या दोनशें वर्षांआंतील शहरांतसुद्धां परवांचें, कालचें आणि आजचें अशीं तीन जगें एकत्र वावरत असतात, आणि एकमेकांकडे टवकारून पाहत असतात याची प्रतीति येते. येथून रस्त्याला एक निराळाच ढंग प्राप्त होतो. विशाल विस्तृत चौपदरी रस्ता, दुतर्फा रक्तकांचनाचीं झाडें, कडेनें एकजात युरोपियन थाटाच्या इमारती आणि रस्त्यावर उडत्या मोटारींचा अखंड आवाज – बँकॉकला पॅरिशिअन कळा आणण्याची बुद्धि केव्हां तरी एकदा बँकॉकच्या राज्यकर्त्यांना झाली होती याची तत्काळ खात्री पटते. या रस्त्यावर दोन सरकारी हॉटेलें आहेत आणि त्यांत खानदानी रुबाब आणि सावळागोंधळ यांचें सुस्वभावी मिश्रण अनुभवास येतें. याच रस्त्यावर एक तडफदार थाय दैनिक आणि बेंगरूळ अमेरिकन दैनिक यांच्या कचेऱ्या समोरासमोर उभ्या आहेत. वृत्तपत्रीय सामर्थ्य आणि स्वातंत्र्य अस्सल स्वदेशीपणांतूनच जन्माला येतें असें त्या सकाळ संध्याकाळ सांगत असतात. पण या रस्त्यावरची खास गोष्ट म्हणजे 'लोकशाहीचें स्मारक'! असला वास्तुशास्त्रीय अत्याचार औदार्यावर आणि सहनशीलतेवर आधारलेल्या लोकशाहीलाच शोभतो! एकदा एकानें या स्मारकावर चक्क काळें फडकें टांगलें आणि लोकशाहीचें विडंबन आणि वास्तुशास्त्राचें विडंबन यांवर एकाच दगडानें नेम धरण्याचा प्रयत्न केला!

राजदमन ॲव्हेन्यूवरचा फेरफटका जरा जादा संभावित आहे. येथें काळ्या बंडीपायजाम्यांत वावरणाऱ्या चिनीबाईला धक्का लागत नाहीं आणि उघडींवागडीं चिनी पोरें पायांत लडबडत नाहींत. त्यासाठीं चायना टाऊनमध्यें गेलें पाहिजे. तेथें चिनी बाईचा आपल्याला धक्का लागला अगर आपला तिला लागला तरी कांहींच झालें नाहीं अशा आविर्भावानें ती निघून जाते, आणि लाजण्यासंकोचण्याचें कार्य फक्त आपल्याकडे उरतें. तसेंच आपल्या पायांत लडबडलेलीं पोरें सपशेल उताणीं पडलीं तरी लगेच उठून हसून धावूं लागतात आणि आपल्या अंगांतल्या चिनी रक्ताचा पुरावा देतात. येथलीं दुकानें कबुतराचीं खुराडीं वाटतात – पण आंतलीं माणसें वारुळांतल्या मुंग्यांप्रमाणें सारखीं उद्योगांत गढलेलीं दिसतात. येथें रात्रीं दहा वाजतां आलांत तरी हीं खुराडीं गजबजलेलींच दिसतील – मांडलेला माल बाजूला

करून कोणी तेथें खाट मांडीत असेल नाहीं तर कोणी तेथें मोटार किंवा मोटरसायकल ढकलीत असेल. जें दिवसा दुकान होतें तें रात्रीं घर-व-गराज बनतें – त्याला दिवसा उसंत नाहीं आणि रात्रींहि नाहीं !

पण आपल्याला पंजाबी अगर सिंधी व्यापारी भेटला नाहीं तर चुकचुकल्यासारखें वाटेल. म्हणून आपण सोन्याचांदीच्या आणि कापडठाणांच्या बाजारांत जाऊं या. तेथें आपल्याला पाहिल्यावरोबर हिंदी व्यापाऱ्याच्या डोळ्यांत ओळखीचें पाणी चमकेल. तो तुम्हांला लगेच हिंदी भाषेंत आणि विश्वासाच्या स्वरांत सांगेल कीं, न चाहेल तर तुम्ही माझ्याकडचा माल खरेदी करूं नका, पण चिन्याकडचा मात्र मुळींच घेऊं नका – तो तुमचा या कानापासून त्या कानापर्यंत गळा कापील. खरें म्हणजे या दोहोंत फरक एवढाच कीं, तो आडवा कापतो नि हा उभा कापतो. (शिवाय ओळखीच्या चोराकडून फसवून घेतल्याचें दुःख पदरांत पडतें तें निराळेंच !) तेव्हां आपण त्याला (मनांतल्या मनांत) एवढेंच सांगतों कीं, काय गळा कापायचा असेल तो झटकन काप नि आम्हांला तुझ्या या बाजारांतल्या गर्दीतून, गटारघाणींतून आणि घामट गरमींतून शक्य तितकें लवकर बाहेर पडूं दे.

आपण आतां दमलेले असतों. आपल्याला कांहीं खरेदीहि करायचें नसतें. तेव्हां संध्याकाळची हवा खाण्याचें निमित्त करून आपण नुसतेच भटकतों, आणि एका विलक्षण ठिकाणीं येतों. हा मासळी बाजार नव्हे. (येथें मासळी खरेदी करायची नाहीं, खायची !) पण मासळी-बाजाराचें वातावरण येथें आहे. एक लांबरुंद मंडप. मंडपांत अनेक खण. एकेका खणात एकेक उचलें उपाहारगृह. उपाहारगृहाचा मालक एक मोडकेंतोडकें कपाट, एक शेगडी आणि एक बाकडें टाकून असतो. या कपाटावर दहाबारा पेलेबश्या; कपाटाला ठोकलेल्या उभ्या काठ्यांना आडव्या बांधलेल्या दोरांना मासे, बेडूक, ससे टांगलेले; शेगडी तवा अगर कढई; आणि बाकड्यावर दोनचार ओरबाडलेलीं गिऱ्हाइकें – कीं सजलें हें उपाहारगृह ! यांतला एखादा फॅशनेबल खानावळवाला बाकड्याएवजीं खुर्च्या-टेबल ठेवतो, टेबलावर मळकट प्लॅस्टिक कापड टाकतो आणि वर कागदी फुलांचें फ्लॉवर-पॉट ठेवतो. याच्या उलट एखादी बाई जमिनीवर चटई पसरून फतकल घालते, आणि सभोवार तयार पदार्थांचें वाडगें ठेवून देतें. पण सर्वत्र उद्योग एकच तोंडाचा

सपाटा ! खाण्याच्या क्रियेबरोबर घासाघीस, बोलाचाली, गप्पाष्टकें. क्वचित् दारू झोकलेलीं गप्पाष्टकें. क्वचित् थाय भाषेच्या हेलकाव्यानें आंदोलित झालेलीं गप्पाष्टकें; क्वचित् चिनी हेलांची फोडणी दिलेलीं गप्पाष्टकें ! आपल्याला त्यांतलें कांहीं कळत नाहीं. आपण नुसतेच डोळे विस्फारून पाहत राहतों. पाहतां पाहतां बॅंकॉकच्या जीवनाचा एक आगळाच बोध होतो. न्यू रोडवरच्या उपाहारगृहांतला एखादा वेटर येथें बेडूक चघळीत असेल. नाइट क्लबमधल्या मुलीचें घर संभाळणारी मोलकरीण येथें मित्राबरोबर जेवायला आलेली असेल आणि दिवसभर मोलमजुरी करून पोटाची खळगी भरणारा चिनी मजूर आतां माशाचा तुकडा चावतांना रात्रीच्या अफिणीच्या विश्वांतल्या बेशुद्धीचीं स्वप्नें पाहत असेल !

बॅंकॉकमध्यें आणखी एक बाजार आहे. त्याला आपण भेट दिलीच पाहिजे, कारण त्याला आंतरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त झालेली आहे, आणि या बाजाराला भेट दिल्याशिवाय आपण बॅंकॉक सोडलें तर आपली बॅंकॉकची सफर फुकट गेली असें आपल्या अनेक मित्रांना वाटण्याचा संभव आहे. हा बाजार म्हणजे कालव्यांत ‘ तरंगणारा ’ बाजार. भाजीपाला, मांस, फळफळावळ, बीअर, हारे-टोपल्या, सुपाऱ्या असल्या घरगुती मालाचा बाजार. येथें मालाचें महत्त्व नाहीं, ज्या वृत्तीनें माल येतो–जातो त्याचें महत्त्व. मालाच्या होड्या येतात, हलतात, हेलावतात. गिऱ्हाइकांच्या होड्या येतात, हलतात, हेलावतात. एकमेकांना भेटतात, मालाची देवघेव करतात, निघून जातात. बोलाचाली नाहीं, बाचाबाची नाहीं. कालव्यांत बांबूचे पाय रोवून उभीं असलेलीं काठचीं घरेंहि तशींच – तरंगतीं, तरंगणाऱ्या दृष्टीनें पाहणारीं, पाहण्यांत एक आत्मसंतुष्ट बेफिकिरी साठवून बसलेलीं. चमत्कारिक चेहऱ्याच्या अमेरिकन बाया नुसत्याच येतात, राजाच्या राण्या शोभतील अशा थाय स्त्रिया येतात आणि खरेदी करतात, उभ्या जगाची नाडी ओळखणारे व्यापारी येतात नि आपल्या इरसाल क्लृप्त्या लढवितात – पण या घरांना त्याचें कांहीं नाहीं. तीं स्वतांतच गर्क असतात : एखाद्या पडवींत एक बाई येते नि पाण्यांत पचकन् थुंकते; दुसरी येते, कमरेचें वस्त्र वर स्तनावर आवळते व पाण्यांत शिरते; एखादें मूल येतें अन् टूथपेस्टनें भरलेलें तोंड पाण्यांत रिकामें करतें व तो फेस पाण्यांत कसा विरघळतो तो तें (पाहत) बसतें; एखादा मुलगा येतो

व पाण्यांत भलतेंच कांहीं करतो. या तरंगत्या जगाला आणि त्या तरंगत्या बाजाराला एकमेकांची ओळख असते, पण दखल नसते. बँकॉकच्या हवेंतल्या घामेजल्या उष्म्याप्रमाणें तीं एकमेकांना गृहीत धरून चालतात !

आणि तरी हें सारें अर्थपूर्ण आहे, त्यांत खरी थाय प्रकृति आहे, आणि तिची खरी ओळख बँकॉकच्या बाजारांतच होते. येथेंहि घासाघीस होते, बोलाचाली होते, सौदे होतात, पण बाचाबाची होत नाहीं. एखादा तिकल (चवन्नी) कमीअधिक गेला तर पितर स्वर्गांतून घसरले असें कोणास वाटत नाहीं. जग दुःखानें भरलेलें आहे असें बौद्ध भिक्षू त्यांच्या कानींकपाळीं ओरडत असतात, पण अति झालें नि हसूं आलें असें त्यांचें झालें असावें ! जग दुःखमय आहे अन् त्याचें पर्यवसान दुःखांतच व्हायचें तर त्याची फार पर्वा तरी कशाला करा असें त्यांना वाटत असावें. थाय लोकांच्या बुद्धाची मी जेव्हां जेव्हां कल्पना करतों तेव्हां तेव्हां ती हसणाऱ्या बुद्धाची थुलथुलीत मूर्ति माझ्या नजरेसमोर उभी राहते. माणूस रडत जन्माला आला आणि रडत मरणार असला तरी त्याला हसत हसत जगायला काय हरकत आहे अशी त्यांची घट्ट समजूत दिसते.

आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या राष्ट्राला स्मितमुखी राष्ट्र अशी कीर्ति प्राप्त करून दिली आहे. हें स्मित चेहऱ्यावर आहे तसेंच अंतःकरणांत आहे. म्हणूनच थाय पुरुष सदैव रंगेल आनंदी वाटतो, आणि थाय स्त्री आकर्षकतेची पुतळी वाटते. फिलिपिनो स्त्रियांचें त्यांच्याशीं फार साम्य आहे. दोघांच्याहि अंगांत चिनी व पोलेनिशिअन रक्तांचें मिश्रण वाहत आहे. दोघांचेहि डोळे बदामी आहेत, त्वचा रेशमी आहे आणि तारुण्य वयावर मात करीत आहे. दोघांनींहि पाश्चात्य पोशाखाचा स्वीकार केला आहे, आणि तो करून एका विचित्र सत्याचा प्रत्यय आणून दिला आहे. तो प्रत्यय एवढाच कीं, पाश्चात्य पोशाख पाश्चात्य स्त्रियांना शोभत नाहीं. त्या पोशाखाचें सौंदर्य खुलायला जें बांधेसूद आटोपशीर शरीर लागतें तें पाश्चात्य स्त्रियांपाशीं नाहीं. थाय व फिलिपिनो स्त्रियांपाशीं तें आहे. असें असूनहि थाय स्त्रियांचें आकर्षकत्व फिलिपिनो स्त्रियांत दिसत नाहीं, कारण त्यांच्या अंतरंगांत थाय

स्त्रियांचें तेंस्मित नाहीं. उलट तेथें रोमन कॅथॉलिक धर्मानें प्रतिपादिलेल्या आद्य पापाची जाणीव रुतून बसली आहे!

पण या आनंदी खेळकर स्त्रिया भाबड्या आहेत असें मात्र समजूं नका. (कोणत्याच स्त्रियांबद्दल असा गैरसमज कधीं करून घेऊं नका.) थाय स्त्रियांच्या उपजत चातुर्याचा तुम्हांला प्रत्यय हवा असेल तर बँकॉकच्या कचेऱ्यांत सेक्रेटरीचें काम करणाऱ्या एखाद्या राजकन्येशीं तुम्ही एखादा शब्द कमीअधिक बोला—ती तुमचा अपराध इतक्या गोडपणें तुमच्या पदरांत घालून देईल! किंवा बँकॉकमध्यें एखादें घर भाड्यानें घेण्यासाठीं एखाद्या घरमालकिणीला भेटा (बँकॉकमध्यें घरमालकापेक्षां मालकिणीच अधिक) आणि भाडें चढतें ठेवण्यासाठीं ती कसा घोळ घालते तो पाहा. पण अगदीं लक्षांत राहण्यासारखा अनुभव एखाद्या नाइट क्लबमध्यें येईल. इतर कोणत्याहि देशांतल्या नाइट क्लबपेक्षां येथल्या मुली तुम्हांला अधिक भोळ्या, अधिक निष्पाप वाटतील, पण त्या तुमचें हृदय अधिक कुरतडतील आणि खिसा अधिक कापतील. त्यांच्या नजरेंत भोळा भाव नाचेल, पण मधल्याच एका कटाक्षाची सळई तुमच्या अंतःकरणांत जाऊन रुतेल आणि कायमची सलेल. आणि मग जॅक रेनल्ड्‌स्‌च्या 'वूमन ऑफ बँकॉक' या कादंबरीतल्या वेलालीनें एका पाद्र्याच्या पोराला जसें दरवेशाचें अस्वल बनविलें तशी ती तुम्हांला बनवील. 'सफेत चित्तीण' अगर 'काळी वाघीण' म्हणून तिनें मिळविलेली कीर्ति उगीच नाहीं. ('सौंदर्यराणी' हा किताब मिळविण्यासाठीं बँकॉकच्या इभ्रतदार मुली जशा आसुसतात तशा हा 'सफेत चित्तीण' अगर 'काळी वाघीण' किताब मिळविण्यासाठीं बँकॉकच्या नाइट क्लबमधल्या मुली आसुसतात.) एक दिवस एका नाइट क्लबमध्यें एका अमेरिकन मित्राबरोबर जाऊन सुद्धां अशा एखाद्या बनेल वा होतकरू चित्तिणीच्या पंजाचा ओरखडाहि न उठतां मी परत आलों याचें कारण त्या दिवशीं आम्हांला त्या विलास मंदिरांत महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानावर चर्चा करण्याची बुद्धि झाली! (आम्हांला पेय ओतून देणारी मुलगी जर त्या चर्चेंत भाग घेऊं शकली असती तर माझा निकाल लागला असता!) तें कांहीहि असो, बँकॉकच्या नाइट क्लबांना आज आंतरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त झालेली आहे. अनेक देशांच्या अनेक प्रवाशांनीं त्यांच्याबद्दल रंगून (आणि कांहींनीं

-विऱ्हळून ) लिहिलें आहे. पण हें कांहींच नाहीं. आजच्या कांहीं आंतरराष्ट्रीय बँकॉकमध्यें ( त्याच्या भयंकर हवेला न जुमानतां ) आहेत याचें बरेचसें श्रेय या नाइट क्लबांना आहे. मध्यंतरीं एकाफेची कचेरी बंगलोरला हलविण्याचा बूट निघाला तेव्हां बँकॉकचा नाइट क्लब बंगलोरला नाहीं हा युक्तिवाद बिनतोड ठरला म्हणतात !

थाय लोकांच्या अंतकरणांत आनंद नाचतो आणि चेहऱ्यावर स्मित खेळतें, कारण जीवनानंदाची कला त्यांनीं साध्य करून घेतलेली आहे. जीवनाचा आस्वाद त्या त्या क्षणीं ते करून घेतात, आणि दुसऱ्या क्षणीं दुसरा आस्वाद घेण्यास ते सज्ज असतात. सारें जीवन एका क्षणीं एका घोटांत फस्त करण्याची आणि दुसऱ्या एखाद्या क्षणीं टिचकीनें उडवून टाकण्याची त्यांची तयारी असते. ही वृत्ति त्यांनीं 'माइ पेन राय' (जाना दो) या उद्गारांत गोळीबंद करून टाकली आहे. थाय लोकांचें संभाषण या एका उद्गारानें अनेकदां गाठतें, अनेकदां सुटतें. (तुटत मात्र सहसा नाहीं !) बस रस्त्यांत मध्येंच मोडून पडली तर थाय उतारू संतापून ओरडूं लागत नाहींत अगर करवादून कुढत नाहींत तर हसतखेळत ड्रायव्हरला म्हणतात, "माइ पेन राय !" मुष्टियुद्धाच्या रंगणांत चीत झालेला योद्धा हॉस्पिटलांत नेला जात असतांना रक्तबंबाळ तोंडानें म्हणतो, "माइ पेन राय !" माझें अजून लग्न झालेलें नाहीं, असें सांगून आज कामास राहिलेली मोलकरीण उद्या वर्षा–दीड–वर्षाचें मूल घेऊन आली तर तिच्या डोळ्यांत जें पाणी खेळतें त्याचा अर्थ असतो, "माइ पेन राय !" लष्करानें राज्यक्रांति केल्यानंतर सरहद्दी पलीकडे पळणारा प्रधानमंत्रीहि एक लांबलचक जांभई देऊन म्हणतो, "माइ पेन राय !" या वृत्तीमुळेंच क्षणांत नोकरी धरतां येते, सोडतां येते; विवाहबंधन तोडतां येतें, जोडतां येतें; पगार आणि लाच यांतला फरक विसरतां येतो, आणि मुख्य म्हणजे आनंद आणि बेफिकिरी यांचें समीकरण मांडतां येतें. एखाद वेळेस एखादें प्रकरण उलटलेंच तर काषाय-वस्त्रें परिधान करून 'धम्मं सरणं गच्छामि' म्हणतां येतें आणि वर 'माइ पेन राय' ची चुटकी वाजवितां येते !  ● ● ●

मौज : दिवाळी १९६१

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... वि: ......................
क्रमांक .......................... नों. दि. ..................

# हाँ ग काँ ग

हाँगकाँगच्या सौंदर्याची खरी जाणीव मला प्रथम १९५९ च्या नोव्हेम्बरांत झाली. त्यापूर्वी हाँग-काँगला मी तीन–चारदां गेलों होतों. पण प्रत्येक वेळीं उन्हाळ्यांत अगर पावसाळ्यांत; म्हणजे जेव्हां हाँगकाँगचे डोंगर धुक्यानें अगर ढगांनीं वेढलेले असतात तेव्हां. समुद्राच्या अथांग पाण्यां-तून वर आलेला हा डोंगराळ बेटाचा समूह सौंदर्याचें वेगळें प्रकरण आहे हें प्रत्येक वेळीं

-विन्इलून ) लिहिलें आहे. पण हें कांहींच नाहीं. आजच्या कांहीं आंतरराष्ट्रीय बँकॉकमध्यें ( त्याच्या भयंकर हवेचा न जुमानतां ) आहेत याचें बरेचसें श्रेय या नाइट क्लबांना आहे. मध्यंतरीं एकाफेची कचेरी बंगलोरला हलविण्याचा बूट निघाला तेव्हां बँकॉकचा नाइट क्लब बंगलोरला नाहीं हा युक्तिवाद बिनतोड ठरला म्हणतात !

थाय लोकांच्या अंतकरणांत आनंद नाचतो आणि चेहऱ्यावर स्मित खेळतें, कारण जीवनानंदाची कला त्यांनीं साध्य करून घेतलेली आहे. जीवनाचा आस्वाद त्या त्या क्षणीं ते कसून घेतात, आणि दुसऱ्या क्षणीं दुसरा आस्वाद घेण्यास ते सज्ज असतात. सारें जीवन एका क्षणीं एका घोटांत फस्त करण्याची आणि दुसऱ्या एखाद्या क्षणीं टिचकीनें उडवून टाकण्याची त्यांची तयारी असते. ही वृत्ति त्यांनीं ' माइ पेन राय ' (जाना दो) या उद्गारांत गोळीबंद करून टाकली आहे. थाय लोकांचें संभाषण या एका उद्गारानें अनेकदां गाठतें, अनेकदां सुटतें. (तुटत मात्र सहसा नाहीं !) बस रस्त्यांत मध्येंच मोडून पडली तर थाय उतारू संतापून ओरडूं लागत नाहींत अगर करवादून कुढत नाहींत तर हसतखेळत ड्रायव्हरला म्हणतात, " माइ पेन राय !" मुष्टियुद्धाच्या रंगणांत चीत झालेला योद्धा हॉस्पिटलांत नेला जात असतांना रक्तबंबाळ तोंडानें म्हणतो, " माइ पेन राय ! " माझें अजून लग्न झालेलें नाहीं, असें सांगून आज कामास राहिलेली मोलकरीण उद्या वर्षा–दीड–वर्षाचें मूल घेऊन आली तर तिच्या डोळ्यांत जें पाणी खेळतें त्याचा अर्थ असतो, " माइ पेन राय ! " लष्करानें राज्यक्रांति केल्यानंतर सरहद्दी पलीकडे पळणारा प्रधानमंत्रीहि एक लांबलचक जांभई देऊन म्हणतो, " माइ पेन राय ! " या वृत्तीमुळेंच क्षणांत नोकरी धरतां येते, सोडतां येते; विवाहबंधन तोडतां येतें, जोडतां येतें; पगार आणि लाच यांतला फरक विसरतां येतो, आणि मुख्य म्हणजे आनंद आणि बेफिकिरी यांचें समीकरण मांडतां येतें. एखाद वेळेस एखादें प्रकरण उलटलेंच तर काषाय-वस्त्रें परिधान करून ' धम्मं सरणं गच्छामि ' म्हणतां येतें आणि वर ' माइ पेन राय ' ची चुटकी वाजवितां येते !

● ● ●

मौज : दिवाळी १९६१

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि ....................

# हाँ ग काँ ग

हाँगकाँगच्या सौंदर्याची खरी जाणीव मला प्रथम १९५९ च्या नोव्हेम्बरांत झाली. त्यापूर्वी हाँग-काँगला मी तीन – चारदां गेलों होतों. पण प्रत्येक वेळीं उन्हाळ्यांत अगर पावसाळ्यांत; म्हणजे जेव्हां हाँगकाँगचे डोंगर धुक्यानें अगर ढगांनीं वेढलेले असतात तेव्हां. समुद्राच्या अथांग पाण्यांतून वर आलेला हा डोंगराळ बेटाचा समूह सौंदर्याचें वेगळें प्रकरण आहे हें प्रत्येक वेळीं

ध्यानांत आलें होतें, पण या सौंदर्याची नीटशी ओळख केव्हांच झाली नव्हती. पण नोव्हेम्बरांत हॉंगकॉंगचें आकाश निरभ्र असतें. सूर्यप्रकाश स्वच्छ शुद्ध असतो. आणि निळ्या आकाशावर टेकलेली डोंगरांची रेषा निरवळ दिसत असते. यावेळीं मनिलाहून येतांना हॉंगकॉंगच्या आसपासचीं टुमदार खडकाळ बेटें विमानांतून दृष्टीस पडलीं तेव्हांच ही रेषांची शुद्धता ध्यानांत आली. विमानतळावरून कावलूनच्या डोंगराची आकाशरेषा पाहिली, त्यांचे उंचवणारे, उतरणारे, एकमेकांत मिसळणारे, मध्येंच खोऱ्याची कलाटणी घेणारे, मध्येंच शिल्पकृतीची एकात्मता धारण करणारे आकार पाहिले. त्यांच्या कणदार, करड्या पिवळसर दगडाचे, सपक सफेत मातीचे, अंगाबरोबर वाढलेल्या धुरकट – हिरव्या गवताचे, आणि मध्येंच चट्टयाप्रमाणें पसरलेल्या काळट – हिरव्या झाडींचे रंग टिपले; त्यांच्या एकमेकांत मिसळणाऱ्या छटा निरखल्या; हॉंगकॉंग – कावलूनच्या डोंगरांनीं समुद्राच्या पाण्यांतून एकमेकांशीं केलेले काटकोन पाहिले, नि ध्यानांत आलें कीं, हें सौंदर्य स्वैर केवलाकार चित्रकृतीचें सौंदर्य आहे, आणि त्यांत प्रयोगशाळेंत ठेवलेल्या डोंगराळ भूमार्गाच्या आटोपशीर प्रतिकृतींच्या सौंदर्याची झांक आहे.

हें जाणवलें तरी आपल्या जाणिवेंत कसली तरी सुप्त अबोध उणीव आहे असें सारखें वाटत होतें. पण मध्यंतरीं रिओला गेलों. रिओच्या प्रमाथी डोंगरांचें दर्शन घेतलें, रिओच्या रहिवाशांचा व्यवहार आणि वर्तन पाहिलें आणि या साऱ्याच्या सुप्त संस्कारांनीं रांधलेल्या दृष्टीनें यंदा हॉंगकॉंग पाहिलें आणि प्रकाशाची तळपणारी तिरीप डोळ्यांत शिरावी तसा हॉंगकॉंगच्या सौंदर्याचा आणि प्रकृतीचा बोध झाला, आणि ध्यानांत आलें कीं हॉंगकॉंग म्हणजे रिओचीच एक पलटलेली आवृत्ति !

पलटलेली आवृत्ति! हॉंगकॉंग आणि रिओ यांच्या निसर्गांत एक विलक्षण साम्य आहे, पण तें विरोधभावाचें साम्य आहे. दोघांचेंहि सौंदर्य, जमीन, पाणी आणि आकाश यांच्या युतींतून निर्माण झालें आहे. दोघांचेहि डोंगर आस्यापास्यांच्या कोंड्या पकडल्यागत उभे आहेत. दोनहि ठिकाणच्या समुद्राचें दर्शन नजर चकित करणारें आहे. पण दोघांच्या प्रकृतींत मूलभूत फरक आहे. रिओचा निसर्ग मस्तमादक आहे, तर हॉंगकॉंगच्या खडकांत काळ्या पहाडाची रग नाहीं. येथल्या मातींत लाल रंगाची तकतक नाहीं.

येथल्या पाण्यांत तो रंगदार झपाटा नाहीं. येथें तशी शुभ्र वाळू नाहीं, तसा अफाट किनारा नाहीं; तशी गर्द झाडी नाही, तसा करडा रुबाब नाहीं.

हाँगकाँगचा निसर्ग आटपशीर तसा मनुष्यहि आटपशीर. रिओच्या रहिवाशांच्या अंगांत लॅटिन वा निग्रो रक्त वाहात आहे — क्वचित् त्यांचें गरम मिश्रण आहे. रिओचा कारिओका जीवनाचा स्वच्छंद आस्वाद घेण्यांत रमलेला आहे. त्याच्या वागण्यांत बेभान बेहिशेबी उत्साह आहे. त्याच्या नजरेवर कलेची झांपड आहे. उलट, हाँगकाँगच्या वाहिन्यांत इंग्रजाचें किंवा चिन्यांचें धिमें व्यवहारी रक्त वाहात आहे. (क्वचित् या दोहोंचें मिश्रण आढळलेंच तर त्याचा अभिमान नाहीं.) तें व्यापारी हिशेबांत रमलेलें आहे. अबाकसच्या गोट्यांच्या गद्य गणिताचा त्याला नाद आहे. हाँगकाँगच्या जीवनांत तिरीप तिरमिरी नाहीं. चिकाटीनें घट्ट बनलेला सावधपणा आहे. कारिओका डोंगरच्या डोंगर एक प्रकारच्या कैफांत जमीनदोस्त करतो, आणि माती समुद्रांत ढकलून देतो. हाँगकाँगमध्यें असे अनेक डोंगर भुईसपाट झाले, पण प्रत्येक वेळीं किती इंच जमीन मोकळी होईल आणि किती पौंड माती निर्माण होईल याचा ताळेबंद हिशेब मांडून. रिओच्या कोपाकबानावर पोहण्याच्या निमित्तानें जीवनाचा स्वच्छंद विलास चालतो; हाँगकाँगच्या रिपल्स बेवर पोहणाऱ्यांची गर्दी होते, ती तेथल्या घेरलेल्या जीवनांत दुसरें कांहीं अधिक चांगलें करायला नसतें म्हणून. विहार-नौका हें रिओच्या समुद्राचें वैभव आहे, तर 'तीन फळ्या' हा अर्थ सफळ करणारें सम्पान हें हाँगकाँगच्या समुद्राचें साधन आहे. रिओच्या रस्त्यांत स्वैर धांदल आढळते ती गतिच्या आवडीची, तर हाँगकाँगच्या रस्त्यातली धांदल आहे वेळेच्या बचतीची. रिओच्या रस्त्यातून संध्याकाळीं रमतगमत जाणें म्हणजे एक मौज आहे, तर हाँगकाँगच्या रस्त्यावर मौज नांवाची चीजच नाहीं. रिओच्या रस्त्यांतला रोमान्स हा जीवनावरचा मधुमधुर फेस आहे, तर हाँगकाँगमध्यें रोमान्ससुद्धां तोळ्या-माशांच्या हिशेबानें विक्रीस निघतो. रिओच्या रस्त्यांतले चौक हे विश्रांतीचे उत्सव आहेत, तर हाँगकाँगच्या रस्त्यांत रहदारी रोखणारे नुसते तिकोनी अगर वाटोळे तुकडे आहेत. रिओच्या दुकानांत प्रसाधनाची ऐट आढळते, तर हाँगकाँगच्या दुकानांत विक्रीची फिकीर आणि फिकीर तेवढी दिसते. रिओंत डोंगराच्या माथ्यांना आणि कडांना लटकलेल्या फावे-

लांतसुद्धां उंच ठिकाणची मिजास जाणवते; कावलून डोंगरावर जखमांप्रमाणें चिघळलेल्या झोपड्यांत दारिद्याची अगतिकता जाणवते. रिओच्या सार्वजनिक इमारतींत कलेचा मुक्त विलास आढळतो; हॉंगकॉंगमध्यें सार्वजनिक इमारतींच्या नांवानें शुद्ध खडखडाट आहे! रिओच्या इमारतींत शिल्प आणि वास्तु यांचा मिलाफ साधण्याचा प्रयत्न आहे; तर हॉंगकॉंगच्या इमारतींत शिल्पहि नाहीं आणि वास्तुहि नाहीं. नुसती अवकाशाची ओढाताण आहे आणि मुळांतच अवकाशाचा तुटवडा असल्यानें ती केविलवाणी झालेली आहे.

एका बाबतींत मात्र हॉंगकॉंगनें रिओवर निर्विवाद मात केलेली आहे. व्यापार अगर व्यवहार यांच्या दृष्टीनें नाहीं म्हणत मी — याबाबतींत हॉंगकॉंग आणि रिओ यांची तुलनाच होऊं शकत नाहीं; तीं दोन स्वतंत्रच जगें आहेत. पण नैसर्गिक सौंदर्याच्या आणि मानवी प्रकृतीच्या दृष्टीनेंसुद्धां हॉंगकॉंगनें एका बाबतींत रिओला साफ चीत केलें आहे. हॉंगकॉंग – कावलूनचें सौंदर्य हें समुद्रानें तोडलेल्या भूभागाचें सौंदर्य आहे, आणि या दोहोंमधलें दळणवळण आणि रहदारी हें हॉंगकॉंगचें क्षणाक्षणाला अनुभवाची नवी झळक देणारें आकर्षण आहे. हॉंगकॉंग – कावलूनच्या दरम्यान केलेला फेरी–बोटीचा प्रवास हा विलक्षण अनुभव आहे. पांचच मिनिटांनीं दुसरी बोट सुटणार हें माहित असूनसुद्धां धक्क्यावरची सुटूं पाहणारी बोट पकडण्यासाठीं केलेली धांवपळ, हं धांवपळ करतां करतांच समोरच्च उंच टांचावरून पळणाऱ्या पोटऱ्यांच्या स्नायूंची हालचाल पाहण्याचा मोह, बोटीवर पाय पडल्याबरोबर सुरेखशी जागा पकडण्यासाठीं झालेली दृष्टीची धांदल, जागेवर बसल्याबरोबर धांवपळीची हुश्शहुश्श घालविण्यासाठीं हातांतल्या वर्तमानपत्राच्या घडीचा केलेला पंख्यासारखा उपयोग, इतक्यांत समोरच्या चिनी सुंदरीच्या मुलायम सौंदर्याकडे गेलेलें लक्ष, पण परस्त्रीकडे असें निरखून पाहणें शिष्टसंमत नाहीं याची झालेली त्रासदायक जाणीव (आणि त्यांतच त्या चिनी सुंदरीच्या बेफिकीर दुर्लक्षामुळें दाटलेली खंत), त्यांतून सुटण्यासाठीं वर्तमानपत्र वाचण्याचा केलेला निष्फळ प्रयत्न व नंतर बाहेर समुद्राकडे लावलेली नजर. या नजरेला पलीकडे उभ्या असलेल्या ब्रिटिश बोटींनीं, चिनी सम्पानानी आणि अमेरिकन नाविक नावांनीं लावलेला खरा खुरा वेध पण इतक्यांत फेरी बोट धक्याकडे आली ही जाणीव, ही बोट

आपली गति एकदम आवरती कशी घेते, धक्क्यावरचा खलाशी बोटीवरच्या खलाशानें फेकलेला दोर कसा अचूक पकडतो, आणि बोटीचा धक्क्याशी संयोग अचूक साधून त्या दोघांना सांधणारी फळी चपखल कशी पडते, हें पाहण्यासाठीं आणि या फळीवर आपलें पाऊल पहिलें पडण्यासाठीं केलेली धांवपळ आणि या अकारण धांवपळीच्या ओघांत डोक्यांत वरील सार्‍या अनुभवांचा माजलेला गोड गुंता हें सारें अपूर्व असतें, अकल्पित असतें आणि दरेक खेपेस तें तितकेंच मजेदार वाटतें. आपला आंतरराष्ट्रीय विमानतळ एका बेटावर बांधण्याची कल्पनाशीलता दाखवूनहि हा मजेदार अनुभव निर्माण करण्याची युक्ति रिओला साधलेली नाहीं.

कारिओकाची सौंदर्यदृष्टि ब्रिटिशापाशीं नाहीं, पण परमेश्वरानें टाकलेल्या बेटाचा अगर भूशिराचा अगर खडकाचा स्वीकार करून त्यांतून एकादें उत्कृष्ट व्यापारी बंदर अगर लष्करी ठाणें निर्माण करण्याची किमया ब्रिटिशांना जशी साधली आहे तशी कारिओकाला काय, इतर कोणालाच फारशी साधलेली नाहीं, आणि हॉंगकॉंग हें सिंगापूर, एडन, जिब्राल्टर यांच्याप्रमाणेंच याचें बिनतोड उदाहरण आहे. १९४१ च्या अफूयुद्धांत चीनचा पराभव करून ब्रिटिशांनीं हॉंगकॉंगचा कबजा घेतला, तेव्हां लण्डन टाइम्ससारख्यांनीं या ओसाड खडकावर अक्कल गहाण ठेवण्याबद्दल त्यांचीं तारीफ केली. पण या ओसाड खडकांतच ब्रिटिशांच्या हिशेबी बुद्धीला मोठें भवितव्य आढळलें, आणि विसाव्या शतकांत हॉंगकॉंग हें पूर्वेकडचें एक अतिशय समृद्ध आणि निमग्न असें बंदर ठरलें. आणि आजकाल तर हॉंगकॉंग उद्योगानें एखाद्या मोहळासारखें घुमत आहे.

हॉंगकॉंगचा पहिला ठसा मनावर उमटतो तो उद्योगाचा – अखंड उद्योगाचा; पहिला परिणाम होतो तो बांधकामाचा – अखंड बांधकामाचा ! गेलीं कित्येक वर्षें कायताक विमानतळाभोंवतीं नवे रस्ते आणि नव्या इमारती यांची अव्याहत उभारणी होत आहे. समुद्रांत नऊशें फूट घुसलेला कायताक विमानतळाचा धांवमार्ग हें हॉंगकॉंगच्या प्रकृतीचें उत्कृष्ट प्रतीक आहे. पण त्याच्यावर विमान थडदिशीं टेकल्याबरोबर माझ्या मनांत पहिला विचार येतो तो असा कीं, हें सारें ब्रिटिश कां व कोणासाठीं करीत आहेत ! लाल चीननें मनांत आणलें तर टेलिफोनवरून दिलेल्या एका शब्दसरशीं

तें हाँगकाँग काबीज करूं शकेल. ब्रिटिशांचें येथें एक मोठें नाविक दल आहे, वैमानिक दल आहे, त्यांचे पंचेचाळीस हजार सैनिक कावळून डोंगरांत कवायत करीत आहेत – पण ही सारी तयारी हाँगकाँग लढविण्यासाठीं नाहींच, तर लाल चीनला अवचित हल्ला करतां येऊं नये म्हणून. आज लष्करी तळ म्हणून हाँगकाँगची किंमत जवळजवळ शून्य आहे. एक लांबच्या पल्ल्याची दुर्बीण म्हणूनच हाँगकाँगचें महत्त्व आहे, हें ब्रिटिश ओळखून आहेत. आणि त्यांची ही सारी सांचेबंद तयारी ही नुसती दबकावणी आहे. या दबकावणीला भीक घालायची नाहीं, असें चीननें ठरविलें तर काय करायचें, हे ब्रिटिशांना मुळीं माहितच नाहीं. चीनला तशी दुर्बुद्धि होणार नाहीं अशी स्वतःची खात्री पटविण्यासाठीं चीनला हाँगकाँगच्या आज होत असलेल्या आर्थिक उपयोगाबद्दल मोठमोठे आंकडेबाज अंदाज लढविणें किंवा कांहीं थोडीशी दिवास्वप्नें रंगविणें किंवा मधुनमधून आकाशाकडे नजर लावून परमेश्वराची प्रार्थना करणें, एवढेंच ब्रिटिशांच्या हातांत आहे. आज हाँगकाँगच्या द्वारें लाल चीनला बरेंचसें परकीय चलन अगर आपल्या आर्थिक विकासाला आवश्यक असलेला माल मिळवितां येतो. पण लाल चीनची दृष्टि नेहमींच रुपये–आणे–पैची राहील अशी फार्दिगाच्या फायद्यांत मुरलेल्या ब्रिटिशांची सुद्धां खात्री नाहीं. मग ही अखंड बांधणी कशासाठी? क्षणभर ब्रिटिशांच्या परार्थ बुद्धीचें कौतुक वाटतें; पण लगेच ध्यानांत येतें कीं, या बांधकामांत ब्रिटिशांचा भाग थोडाच आणि वर्तमान-कालीन गरजेला आवश्यक तेवढाच आहे. बहुतेक बांधकाम चिन्यांचेंच आहे. आज हे लाल चीनकडे पाठ फिरवून हाँगकाँगच्या आश्रयार्थ आलेले असतील, पण त्यांची अंतर्यामीची निष्ठा चीनलाच अर्पण केलेली आहे. उद्यां लाल चीनने धडक घेतली तर त्यांच्या वैयक्तिक इस्टेटी संपुष्टांत येतील; पण त्या चीनच्याच ताब्यांत जातील म्हणजे अखेरीस त्यांच्या राष्ट्रालाच मिळतील, ज्या चिनी वंशाला त्यांची अखेरची निष्ठा वाहिलेली आहे त्याच्या ताब्यांतच राहतील.

शिवाय, उद्योगशीलता हा चिन्यांचा स्वभावच आहे. आणि हाँगकाँग-मध्यें ती त्याची मानसिक आणि शारीरिक गरजच बनलेली आहे. उद्योग केला नाहीं तर अन्न मिळणार नाहीं, आणि यदाकदाचीत् मिळालेंच तरी

हाँगकाँगमधील निर्वासित जीवनाच्या काळजीनें खंगलेल्या त्यांच्या मनाला या विश्रांतीनें शांति लाभणार नाहीं. म्हणून हाँगकाँग मधला प्रत्येक चिनी स्वतःच्या परीनें आणि स्वतःच्या पायरीवरून सदोदित उद्योगांत गर्क असतो. हाँगकाँगचा चिनी समाज ही एक अखंड धडपडणारी मोटार आहे, आणि प्रत्येक चिनी माणूस हा या मोटारीचा कसला न् कसला भाग आहे. एअर-कण्डिशण्ड कचेरींत झगझगित टेबलामागें बसून टेलिफोनवरून खरेदी–विक्रीचा व्याप मांडणारा कारखानदार, अबाकसच्या गोट्यांनीं आपल्या नशिबाचा हिशेब मांडणारा दुकानदार, एकाद्या काळोख्या खोलींत चंदनाच्या लाकडा-वर कोरीव लेण्याचा साज चढविणारा सुतार, डोक्यावरच्या वाटोळ्या शिरस्त्रा-णाला काळ्या कापडाची लोंबती कडा लावून सूर्यकिरणांचा ताप टाळूं पाहणारी शेतकरीण, सम्पानच्या वल्ह्याबरोबर आपलें सारें शरीर घुसळणारी कोळीण, पाठीच्या पन्हळावरून मालाच्या गोणी वाहाणारा हमाल, तोंडाचा कर्णा करून धांवणारा रिक्शावाला, आपल्या महिन्याच्या पगाराइतक्या किंमतीचे पदार्थ एकदम टेबलावर मांडणारा उपहारगृहांतला पोऱ्या, नाइट–क्लबमधल्या खुशालचेंडूच्या वाकड्या पावलाबरोबर आपलें सराईत पाऊल जुळविणारी धंदेवाईक पोरगी, कॅण्टोनी हेलांत साऱ्या जगाची बातमी पुकारणारा वर्तमान-पत्र-विक्या, जिन्याच्या आडोशाला धुगधुगत्या शेगडीवर दोन-चार माशांच्या तुकड्यांत चिनी पाकशास्त्राची किमया ओतणारी आमा, सिग्रेटपासून चिकी-पर्यंत हातांत येईल त्याचा रस्त्यावरच्या कोपऱ्यावर पसारा मांडणारी बोबडी पोर, आणि याचीच वाढविलेली आवृत्ति काढणारी अनुभवी फेरीवाली – या साऱ्यांनीं या मोटारींत शक्ति भरलेली आहे.

ही मोटार अस्सल चिनी बनावटीची आहे, कारण हाँगकाँग नव्वद टक्के चिनी आहे. ब्रिटिशांनीं या ओसाड खडकाचा शोध लावला व त्यावर आपली व्यापारी बुद्धि पेरली, पण बहुतेक सारी मेहनत चिन्यांनींच केली. या मेहनतीच्या मोबदल्यांत भाताचा पेला मिळेल आणि तो पोलिसांच्या अव्वल संरक्षणाखालीं मिळेल, एवढी हमी ब्रिटिशांनीं दिली. या भाताच्या पेल्याच्या ओढीनेंच शेंकडों हजारों चिनी हाँगकाँगला आले नि आजतागायत हा भाताचा पेला हीच हाँगकाँगची खरी प्रेरणा आहे. लाल चीनच्या प्रस्था-पनेनंतर असंख्य उद्योगपति हाँगकाँगला आले आणि त्यांनीं अमेरिकन

राहणीचा थाट उडविला. कित्येक सैन्याधिकारी आले आणि त्यांनीं काव-लूनच्या शेतांत कोंबड्या–बदकांचें सैन्य हांकण्यास सुरवात केली. अनेक लेखक – प्राध्यापक आले आणि त्यांनीं कम्युनिस्ट राजवटीचा पाडावा करण्याच्या कागदी युक्त्यांचें आपापसांत युद्ध सुरू केलें. राजकारणी आले आणि त्यांनीं अफवांचे फुगे उडविण्यास सुरवात केली. या साऱ्यांनीं हॉंगकॉंगच्या जीवनांत थोडीबहुत खळबळ माजवली, पण हॉंगकॉंगची मूळ प्रकृति ढळली नाहीं–ती कायमच राहिली.

या चिनी प्रकृतीच्या खूणा सर्वत्र दिसतात. मात्र आग्नेय आशियांत त्या नजरेवर येतात, तशा त्या या चीनच्या अस्सल भूमीवर येत नाहींत. प्रथम त्या रस्त्याकाठच्या इमारतीवर लडबडलेल्या चिनी चित्रलिपींत दिसतील. नंतर त्या अनेक दुकानांतल्या उपाहारगृहांतल्या आणि नाईट क्लबमधल्या अंतर्गत सजावटींत भरून राहिलेल्या सर्पराक्षसाच्या विळख्यांत दिसतील. फटाक्यांच्या सातमजली माळांत आणि या जळत जाणाऱ्या माळांच्या दरेक फेराबरोबर उजळणाऱ्या रंगीत चमत्कारांत दिसतील. माओच्या आणि चँगच्या अनुयायांनीं परस्परांविरुद्ध उभारलेल्या रंगीत ध्वजांत दिसतील –त्यांच्या अधूनमधून उडणाऱ्या चकमकींत आढळतील. पण चिनी वाता-वरणाचा अगदीं अर्क अनुभवायचा असेल, तर सम्पानच्या एखाद्या वसाहतींत जावें. शेंकडों सम्पान एखाद्या खाडीचा आडोसा पाहतात आणि तेथें आपलें बिऱ्हाड टाकतात. कांहींचा मुक्काम जंगम असतो तर कांहींचा स्थिर असतो पण प्रत्येकावर कायमचा संसार थाटलेला असतो. या संसारांत सासूसासरे, लेकीसुना, मुलेंबाळें, कुत्रींमांजरें आणि कोंबड्या-कबुतरें यांचा भरणा असतो. या सम्पानांच्या आधारानें हां हां म्हणतां एक बाजार भरतो – माशांनीं, चिजवस्तूंनीं, घाणीनें आणि डोकें उठविणाऱ्या वासांनीं आणि आवाजांनीं लगेच भरून जातो. ॲबरडीनला याचें अस्सल उदाहरण आहे. येथेंच एक तरतें उपाहारगृह आहे. येथें तुमचें पाऊल जमिनी वर टेंकण्यापूर्वीच सम्पान वल्हविणाऱ्या मुली तुम्हाला झोंबतात आणि त्या उपाहारगृहाकडे आपल्या सम्पान मधून नेण्यासाठीं तुम्हांला खेंचतात. या मुली स्वच्छ नसतात त्यांच्या अंगाला माशाची घाण येत असते. पण त्यांच्या चेहऱ्यावर असें कांहीं हंसू असतें कीं, तुमची इच्छा नसली तरी त्या तरत्या

उपाहारगृहाला तुम्ही भेट देतां, आणि पाण्यांत निरागसपणें विहरणाऱ्या माशाला तळून खाण्याची कल्पना तुमच्या अहिंसक मनाला कशीचीच वाटली तरी तुम्ही एक तळपता मासा निवडतांच, आणि तो खाण्याची ताकद यावी म्हणून बिअरच्या बाटल्या झोंकतां! हाँगकाँगमध्यें तरतें उपहारगृह आहे, तसा तरता गुत्ता :आहे आणि तरता कुंटणखानाहि आहे. असें एका माहितगारनें सांगितलें. पण त्यांत प्रवेश होण्यासाठीं चिनी वातावरणांत फार खोल शिरावें लागतें; पण माझ्यासारख्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्यच नसतें!

पण हाँगकाँगच्या चिनी वातावरणाची सर्वांत मोठी कारिका आणि दर्शिका चिनी स्त्री आहे. काळया तुकतुकित रंगाची पायजमा–बंडी आणि मागें तिच्यावर सोडलेला काळयाभोर विपुल केंसांचा सडसडित शेपटा, एवढ्या माफक सरंजामांत आपला माफक देह सजवून चाललेली चिनी स्त्री म्हणजे उद्योगशीलतेची मूर्तीच वाटते. ती वांकलेली दिसत नाहीं. खंगलेली दिसत नाही. उत्साहानें उठून जाण्यासारखें तिच्यापाशीं कांहीं असत नाहीं. संथ, शांत एकाग्रतेनें ती उद्योगांत गढून गेलेली असते. चाँगसामच्या मिजाशींत वावरणाऱ्या तिच्या सुखवस्तू भगिनीइतकी ती भाग्यवान नसते. बंद गळ्याच्या या तंग झग्यांत मान ताठ करून आणि उंच टांचांच्या बुटांनीं पोटऱ्या ताणून ही भाग्यवान स्त्री चालू लागली कीं ती सौंदर्याची राणी शोभते. तंग झग्यांतून हिच्या अंगप्रत्यंगाची हालचाल सळसळली आणि बाजूला मांडीपर्यंत दुभागणाऱ्या फटींतून तिच्या मुलायम मांड्यांचें निसटतें दर्शन झालें कीं पुरुषांच्या सुप्त इच्छा खडबडून जाग्या होतात; पण या उफाळलेल्या इच्छांकडे एक उडता तुच्छ कटाक्ष टाकून आणि त्या कटाक्षानें त्याला शरमिंदा करून, आपल्या मार्गानें जाण्याची विद्या त्यांना पाठ झालेली आहे. त्या जातात, त्या दुकानांत शिरतात–आणि दुकानांतला बराचसा माल उस्कटून टाकून त्या घरीं जातात. त्यांचे यजमान दिवसां कचेऱ्यांत पैशांच्या पिशव्या उपसत असतात तेव्हां त्या दुकानांतून घिरट्या घालतात, आणि ते नाईट–क्लबमध्यें अगर खेलीच्या घरीं चंगीभंगी करीत असतात, तेव्हां त्या बिछान्यांत स्वच्छ घोरत असतात. नवऱ्याच्या बाहेरख्यालीपणानें त्यांचें चित्त बिघडत नाहीं, आणि त्यांची झोंप दुःखस्वप्नांनीं भंग पावत नाहीं.

कारण, तिला माहित असतें कीं नवरा रखेली घरीं घेऊन आला तरी संसारांतल्या तिच्या स्थानाला धोका नाहीं. तिच्या येण्यानें ती चळत नाहीं, ओरडत नाहीं, तमाशा मांडीत नाहीं. तिचें स्थान तिला खुपीनें देतें. फक्त ती आपलें स्थान घेणार नाहीं, एवढी काळजी घेतें. एक दिवस दुसरीच्या उरावर तिसरी येतें, आणि पहिलीला सूडाचें समाधान मिळतें, पण यासाठीं तिला फार दक्षतेनें वागावें लागतें. स्वतःच्या विकार-भावना, राग-लोभ ताब्यांत ठेवावे लागतात, आणि येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी लागते. असे प्रसंग वारंवार येतातच; कारण पुरुषांच्या लहरीनें चालणाऱ्या संसारांत कोणता प्रश्न, कोणता प्रसंग, केव्हां निर्माण होईल याचा नेम नाहीं.

चिनी स्त्रीच्या या समयसूचक चातुर्याचा बाजारच नाईट-क्लबमध्यें मांडलेला असतो. तेथें कोणतें गिऱ्हाईक कसें वागेल याचा नेम नसतो. प्रत्येकाला त्याच्या दिमतीला दिलेल्या मुलीशीं शक्य तितकी घसट करण्याची इच्छा असते, आणि या घसटीला आळा घालीत असतांनाच आपल्याला ती अतिशय आवडत आहे असा तिला बहाणा करावा लागतो. थापांच्या कलेंत नाचणाच्या कलेइतकेंच तिला पारंगत असावें लागतें. गिऱ्हाईक पाहून थापेची तऱ्हा बदलावी लागते – आणि नसलेल्या नवऱ्याचा क्षयरोग, काल्पनिक संसाराच्या जोखिमदाऱ्या, कम्युनिस्ट राजवटीचा कधीं न देखलेला छळवाद, यांच्या करुण कथा रंगवाव्या लागतात. अशाच एका मुलीनें आपण दिवसा एका शाळेंत शिकवतो आणि रात्रीं फक्त सभ्य गिऱ्हाइकांबरोबर नृत्य करतों अशी थाप मला लगावली. पण एका सुसंस्कृत गर्ती स्त्रीनें नाईट क्लबमध्येंच आपल्या प्रत्युत्पन्न बुद्धीची जी चमक दाखविली तिला तोड असेलसें वाटत नाहीं. आम्ही कांहीं मित्र या क्लबांत गेलों होतों. आमच्याबरोबरही, एका मित्राची बायको होती. हॉंगकॉंगच्या नाइट-क्लबांत दारू प्यायला बंदी असते. पाणी अगर फळांचा रस यांच्या जोरावरच तेथल्या जीवनाचा कैफ निर्माण करावा लागतो. पण आमच्या एका मित्राला ही निव्वळ कुचेष्टा वाटली. "नाइटक्लबमध्यें नुसते पाणी अगर रस झोकणें म्हणज भिक्षूच्या वेशांत तमाशाला जाणें होय" असें तो म्हणाला आणि जाऊन एक व्हिस्कीची बाटली घेऊन आला. रीतसर बाटलीतली व्हिस्की ग्लासांत आली आणि तेथून तोंडांत जाऊं लागली. क्लबच्या एका पोऱ्याच्या

हें ध्यानांत आलें आणि त्यानें येथें दारू प्यायला बंदी आहे, असें आम्हांला बजावलें. आमच्या मित्रानें त्याला धुडकावून लावलें. तेव्हां तो भडकला आणि मॅनेजरला जाऊन सांगतो असा दम देऊन गेला. त्याबरोबर आमच्या मित्राच्या त्या बायकोनें ती बाटली उचलली आणि सरळ झग्याच्या आंत आपल्या विशाल वक्षस्थळांत लपविली – आणि म्हटलें, " आतां ये म्हणावें, त्या मॅनेजरला ! "

हाँगकाँगचें वातावरण चिनी आहे, पण वास्तुशास्त्र ब्रिटिश बाजारी आहे. खरें बोलायचें म्हणजे वास्तुशास्त्र नाहींच. ब्रिटिशांना आपल्या वसाहतींत वास्तुशास्त्राची कधीं गरजच भासली नाहीं. त्यांच्या वसाहती म्हणजे व्यापार आणि साम्राज्य यांचीं ठाणीं. साम्राज्याला सोजीर लागतात आणि व्यापाराला हमाल व कारकून लागतात. सोजिरांना जशा बराकी तशा हमाल–कारकुनांना चाळी. ब्रिटिशांच्या इतर वसाहतींत राजकीय केंद्रें होतीं, तेव्हां तेथें लंडनमधील सार्वजनिक इमारतींच्या प्रतिकृति उठविण्याची ऊर्मि त्यांना आली. हाँगकाँग हें नुसतें व्यापारी केंद्र. गुदामें आणि दुकानें यांचीच तेथें मुख्य गरज. त्यांची हाँगकाँगमध्यें लयलूट आहे. अर्थात् बँका आणि इन्स्यूरन्स कंपन्या यांना टोलेजंग इमारती उभाराव्याशा वाटतात. त्यांत त्यांच्या वैभवाचें प्रदर्शन होतें आणि भांडवलहि व्यवस्थित गुंतलें जातें. तशा दोनचार हाँगकाँगमध्यें आहेत. त्यांच्या व्यापारी स्पर्धेला इमारतींच्या स्पर्धेचें रूप येतें, तसें थोडेसें हाँगकाँगमध्येंहि आलें आहे. 'शांघाय–हाँगकाँग बँकिंग कॉर्पोरेशन 'च्या टोलेजंग इमारतीपेक्षां आपली इमारत वरचढ असली पाहिजे, अशा ईर्षेनें ' बँक ऑफ चायना 'नें आपली इमारत वीस फूट अधिक उंच उभारली, आणि ब्रिटिश साम्राज्याच्या बारगिरांना साम्राज्यच हादरलें असें वाटलें. ( एका विशेष राजनिष्ठ बाईला, सरकार याला मनाई कां करीत नाहीं असा प्रश्न पडला ! ) मध्यंतरी ' बँक ऑफ चायना 'ची मालकी राष्ट्रीय सरकारकडून लाल सरकारकडे गेली, तेव्हां तर तिच्या इमारतीला दुश्चिन्हाचें रूप आलें. उलट, लाल चीनचें इमारतीच्या नुसत्या उंचीनें समाधान होईनासें झालें. आपली इमारत उठली, प्रतिस्पर्ध्याच्या इमारतीला पाहून पाहूं लागली हे सारें खरें; पण आपल्या इमारतीच्या प्रवेशद्वाराचे सिंह शांघाय् हाँगकाँगच्या सिंहापुढें मेषपात्र दिसतात, असें गांव बोलतें त्यांचें

`काय ? ही टीका त्यांच्या अंतःकरणाला घरें पाडूं लागली. त्यानें दुसरें रुबाबदार सिंह बनविण्याचे हुकूम सोडले; पण हेहि सिंह बनावट दिसूं लागले. त्यांचे दांतओंठ दगडी विटासारखे दिसूं लागले. जिभ कॅन्व्हासच्या तुकड्याप्रमाणें लोंबते आहे असें भासूं लागलें. त्याला चीनचा इलाज नव्हता. चीनला सिंहाची माहितीच नाहीं. सिंह म्हणजे कुत्र्याची उदात्त आवृत्ति असेंच त्यांच्या परंपरेनें कल्पिलें होतें. लाल चीनला सुद्धां आपल्या राष्ट्राच्या या ठरीव कल्पकतेपलीकडे उडी मारणें अशक्य झालें. याच्या उलट, ब्रिटिशांना सिंहांची चांगली माहिती. सिंह मुळीं त्यांच्या राजमुद्रेंत जाऊन बसलेला. म्हणून त्यांच्या अंतरंगांत ठसलेला. म्हणून शांघाय – हाँगकाँगच्या साध्या निसर्गानुकारी सिंहांत जो रुबाब, जी शान उतरली तिचा शतांश 'बँक ऑफ चायना'च्या सिंहांत आढळेना. तिनें आपल्या सिंहांची उंची वाढविली, पण त्यांत सिंहपणाच आला नाहीं. आणि अर्थात् ब्रिटिश साम्राज्याची अब्रू बचावली ! 'बँक ऑफ चायना'च्या उंचीनें फिरलेले डोळे पुनः ताळ्यावर आले. शांघाय-हाँगकाँगच्या सिंहावरून ते पुनः आपुलकीनें फिरूं लागले. या सिंहांना पुनः नव्या भाविकतेनें स्पर्श होऊं लागला–आणि लाल चीनच्या सिंहांनीं कितीहि आव आणला तरी ब्रिटिश सिंहाच्या रुबाबाला धोका नाहीं, अशी साम्राज्यनिष्ठांची खात्री झाली ! एकंदरींत सारें छान झालें. पण या सिंहाच्या शिल्पी-स्पर्धेत ते अखेरीस एका वास्तूचे भाग आहेत, याची जाणीव कोणालाच झाली नाहीं. हाँगकाँगमध्यें वास्तुशास्त्रांची पर्वा कोणाला नव्हतीच. इमारत म्हणजे थंडी-वारा-पाऊस यांच्यापासून माणसाला बचावण्याची जागा. एवढ्याच रोखठोक दृष्टीनें हाँगकाँगच्या इमारती बांधल्या गेल्या. व्हिक्टोरिया पार्कवर ब्रिटिशांचे जे मातब्बर बंगले दिमाखानें उभे आहेत त्यांत देखील ही रोखठोक दृष्टीच आहे. त्यांचा दिमाख आहे तो मालकांच्या संपत्तीचा आहे,स्वतःच्या सौंदर्याचा नव्हे. या दृष्टीनें या मातब्बर इमारती आणि कावळून डोंगरांना लटकलेल्या दरिद्री झोंपड्या या दोहींत एकसारखें नातें आहे. दोनहि निव्वळ उपयुक्ततावादी दृष्टीनें बांधलेल्या आहेत. उलट, युद्धोत्तर कालांत शांघायहून पळून आलेल्या श्रीमंतांनीं जे नवे आधुनिक साच्याचे चमकदार बंगले बांधले आहेत ते हॉंगकॉंगच्या रूपाला अधिक शोभेसे आहेत. ते व्हिक्टोरिआ पार्कवरच्या

दगडी इमारतीइतके भरभक्कम नाहींत. भविष्यकालाविषयींच्या ज्या विश्वासानें त्या इमारती उभारल्या गेल्या तो विश्वास त्यांच्यापाशीं असूं शकत नाहीं. पण हॉंगकॉंगच्या भौगोलिक पार्श्वभूमीवर ते चांगले शोभतात, त्यांच्या मालकांनीं असा मोठा कलात्मक दृष्टीनें विचार करून ते बांधलें असेंहि नव्हे; आजकालच्या फॅशनचेंच अंध अनुकरण त्यांनीं केलें, पण ही नवी फॅशन हॉंगकॉंगला शोभते. रिओच्या भक्कम आकाशगामी इमारती रिओच्या काळ्या पहाडांना जशा शोभतात, तसे हे साधे सलग रेषांचे झकपक बंगले हॉंगकॉंगच्या नवचित्राची अगर नवशिल्पाची आठवण करून देणाऱ्या साध्या सलग टेकड्यांना शोभतात.

पण हॉंगकॉंगमध्यें अशा इमारती थोड्याच आहेत. बहुतेक साऱ्या जुन्या–जुनाट आहेत – आणि त्यांना बराकीची अगर गुदामाची कळा आहे. आणि हॉंगकॉंगमध्यें माजलेल्या मालाच्या आणि माणसांच्या गर्दीमुळें त्यांच्याकडे स्वस्थ चित्तानें पाहणें अशक्य झालें आहे. रस्त्याकांठच्या इमारतींत दुकानांची गर्दी आणि दुकानांत मालाची गर्दी. रस्त्याआडच्या चाळींत खोल्यांची गर्दी आणि खोल्यांत माणसांची गर्दी. या गर्दीमुळें चाळींतल्या खोल्यांचे कप्पे पाडले आणि गॅलऱ्यांत अडगळ खचली त्याप्रमाणें दुकानांचेहि कप्पे पाडले आणि मालाच्या गठ्ठ्यांवर गठ्ठे रचले. जादूगाराच्या पेटाऱ्यांत कोणती गोष्ट आढळेल व कोणती आढळणार नाहीं, याचा जसा नेम नसतो त्याप्रमाणें हॉंगकॉंगच्या कोणत्या दुकानांत कोणती वस्तु आढळेल याचा नेम नसतो. तेथें एक प्रकारचा सबगोलंकारच असतो, कारण हॉंगकॉंगमधल्या दुकानाचा भाडेकरू आपल्या दुकानाचे जितके कप्पे आणि कोपरे पोटभाड्यानें देतां येतील तितके देण्याची कोशीस करतो. असा एखादा कोपरा भाड्यानें द्यावयाचा आहे अशी बातमी पसरली (आणि ती वणव्याच्या वेगानें पसरतेच) कीं, त्या दुकानावर त्याच्या रास्त गिऱ्हाइकापेक्षां पोटभाडेकरूंचीच गर्दी उसळते – आणि हां हां म्हणतां या गर्दीला गोंधळाचें आणि क्वचित् मारामारीचें स्वरूप येतें. हा गोंधळ अर्थात् खास चिनी आणि मारामारीहि खास चिनी; पण लगेच पोलिसांचें जें आगमन होतें तें मात्र चिनी नाही. पोलिसांचे चेहरे चिनी असतात, पण त्यांची शिस्त ब्रिटिश असते, आणि न्यायविषयक कल्पनाहि ब्रिटिश

असतात. चिनी न्याय म्हणजे अनेक परस्परविरोधी हितसंबंधांचा समझौता. उलट ब्रिटिश न्याय हा जें काय कोर्टात सिद्ध होईल त्याचा पक्षपाती. पोलिस देखील गुन्ह्याची दखल घेतो; गुन्हेगाराच्या हितसंबंधाकडे पाहात नाहीं – आणि तो हें सारें इतकें झटपट आणि चोख बजावतो कीं, हाँगकाँगमध्यें उजवा हात चोरींत गुंतलेला असतांना डाव्या हाताला बेडी पडते ! म्हणूनच हाँगकाँगमध्यें नाविक–वैमानिक अगर सैनिक दलाची नाहीं अशी पोलिस-दलाची शान आहे. लष्करी दलांपासून लोकांची जी अपेक्षा असते ती हाँगकाँगच्या लष्करी दलांकडून कोणींच करीत नाहीं. उद्यां लालचीनकडून हल्ला झाला तर हीं लष्करीं दलें हाँगकाँगचा बचाव करतील असें कोणीच मानीत नाहीं. हाँगकाँगच्या भवितव्याबद्दल अशी खात्री नाहीं म्हणूनच त्याबद्दल फारसा कोणी विचार करीत नाहीं. पण जीव आणि जिंदगी यांच्या रक्षणाचा विचार मात्र प्रत्येकाच्या डोक्यांत असतो. कावलूनमधल्या कित्येक इमारतींवर कांटेरी तारांचें जें जाळें दिसतें, तें या काळजीचें प्रतीक मानावें लागेल; पण याची खरोखर कांहीं गरज नाहीं, असेंच प्रत्येकाला अंतर्यामी वाटत असतें. म्हणूनच दुकान उघडें टाकून झोंपी जायला अगर मोटर रस्त्यावर उघडी टाकून घरांत जाऊन बसायला कोणाला विकृत वाटत नाहीं. पोलिसांच्या दक्षतेमुळेंच हें शक्य होतें याची प्रत्येकाला जाणीव असते, आणि अर्थात् हाँगकाँग पोलिसांना विलक्षण भाव आहे इतका कीं, त्यांच्या वार्षिकोत्सवाला एकाद्या राष्ट्रीय सणाचें महत्त्व येतें. हाँगकाँगच्या पोलिसखात्याला अलीकडे स्त्री-पोलिसांची झालर लावण्यांत आली आहे. हे स्त्री--पोलिस खाकी गणवेश आणि काळी पोलिसी टोपी धारण करून नाक्यावर उभे राहिले कीं मोटरचा वेग आपोआप मंदावतो. ज्या नजरेनें वस्तुतः अंतःकरणें जखमी व्हायचीं तिनें बोल बोल म्हणतां जरब निर्माण होते.

हाँगकाँग पोलिसांचा गणवेश ब्रिटिशांच्या कल्पनांना साजेसा खाकी आहे. त्यांच्या मातबर बंगल्यांचा रंग तसा त्यांच्या पोलिसांच्या पोशाखाचा. पण तो थोडासा रंगदार असता तर हाँगकाँगला त्याची गरज होती. हाँगकाँगचे नैसर्गिक दर्शन तसें थोडेसें रंगहीन आहे. हाँगकाँगचा निसर्ग अर्थात् लज्जतदार आहे, पण तो तितकासा रंगदार नाहीं. हाँगकाँगचे खडक काळे

कुळकुळीत नाहींत, फिकट पिवळसर आहेत. हाँगकाँगचा झाडाझुडपांचा रंग रसरशित हिरवा नाहीं, राखी शेवाळी आहे. हाँगकाँगच्या समुद्राचें पाणी निळें नाहीं, मातट हिरवें आहे. हाँगकाँगच्या मळकट–सपक इमारतींवर चिनी चित्र–लिपींतल्या पाट्या आहेत, पण त्या इतक्या आहेत कीं त्यांचे रंगीत संस्कार डोळ्यांवर होतच नाहींत. जें या पाट्यांचें तेंच दुकानांतल्या मालाचें. माल अर्थात् रंगदार आहे, पण तो इतका खचून भरलेला आहे, त्याची इतकी गिचमिड गर्दी आहे कीं त्याचेहि रंगीत संस्कार होत नाहींत. पण यामुळेंच हाँगकाँगमधल्या रंगदार गोष्टी विशेष रंगदार वाटतात. प्रथम म्हणजे ट्रॅमा आणि बसेस् – हाँगकाँगच्या हिरव्या ट्रॅमा आणि लाल लाल बसेस आपले वरचे मजले उडवीत रस्त्यावरून पळूं लागल्या म्हणजे एकादा हिरवा अगर लाल रंगाचा झपाटाच हाँगकाँगच्या रस्त्यांतून सर्पराक्षसाच्या गतीनें गेल्यासारखा वाटतो. हाँगकाँगच्या रिक्शाँत अशी शक्ति अर्थात्च नाहीं, पण त्यांच्या अंगाचा लाल रंग अधिक प्रज्वळतो आणि टपाचा हिरवा रंग अधिक तेजाळतो. या रंगदार टुमदार रिक्शाँ मळकट पोशाखाच्या आणि फाटक्या शरीराच्या दरिद्री हमालांनीं ओढाव्या हा एक दैवदुर्विलास आहे. पण झकपक चाँगसाम घालून चिनी सुंदरी या रिक्शावर आरूढ झाल्या ( आणि हाँगकाँगमध्यें चाँगसामधारी चिनी सुंदरीच रिक्शाँना अधिक आश्रय देतात ) कीं त्यांच्या ( म्हणजे रिक्शाँच्या आणि या सुंदरीच्याहि ) देहाचें सार्थक झाल्यासारखें वाटतें. हाँगकाँगची फेरी बोट स्वतः फार रंगदार आहे असें नाहीं; पण तिच्यावरून जातांना आजूबाजूला सूर्यप्रकाशांत खुललेल्या पाण्याचें आणि पाण्यावर डोलत उभ्या असलेल्या बोटींचें, वाफारांचें आणि सम्पानांचें तरळतें दर्शन होतें आणि फेरी बोटीवर प्रवासाच्या चवदार अनुभवांत रंगीत भर पडते. मला वाटते, हाँगकाँगच्या इमारतीचें दर्शन इतकें सपक नसतें, त्यांनीं डोळ्यांच्या बाहुल्यावर निस्तेजपणाचा इतका मारा केला नसता तर ( सिंगा-पूरच्या टायगरबाम गार्डनपेक्षांहि भयंकर असणाऱ्या ) येथल्या टायगरबाम गार्डनकडे धडधाकट प्रकृतीचे फारसे कोणी फिरकले नसते. त्याच्या अंगच्या विकृत आकर्षणांत त्याच्या रंगदार दर्शनाची मोठी भर पडलेली आहे, आणि तशीच थोडीशी चिनी प्रेतयात्रेच्या मिरवणुकींतहि आहे.

पण हॉंगकॉंगमध्येंच रंगांची अगदीं स्वप्नपुरीच उमललेली पाह्यची असेल तर रात्रीं कावलूनच्या डोंगरावरच्या कॉर्ल्टन हॉटेलच्या गच्चींत जा आणि खालीं पाहा – समोर त्याला हिरव्या, निळ्या, पिवळ्या, जांभळ्या रंगांचा भरजरी पटच उघडलेला दिसेल! व्यापारी इमारतींवरच्या निऑन् लाईट्सचें नक्षीदार स्फुरण, धक्क्यावरच्या निळ्या दिव्यांची झगझगती माळ, समुद्रावरच्या बोटींच्या जहाजांच्या पिवळसर रंगांची फडफड, त्यांच्या पाण्यावरच्या प्रतिबिंबांचा लहरता नाच, पलीकडच्या डोंगरावरच्या दिव्यांची शेंकडों डोळ्यांची उघडमिट, कावलूनच्या रस्त्यावरच्या मोटरींच्या पळत्या दिव्यांची रांग – रंगदार रेशमी फितींनीं गुंडाळलेला एकादा वस्त्रालंकाराचा नजराणा दिसावा, तसें हॉंगकॉंग रात्रीं दिसतें. पाहतां पाहतां तुमची दृष्टि बांधली जाते, वृत्ति चूर होते, जाणीव विसरते. इतक्यांत एकाद्या बोटीचा भोंगा वाजतो आणि तुम्ही खाडदिशी वास्तवाच्या भूमीवर उतरतां, आणि सत्य जाणवतें कीं, या स्वप्नसृष्टीच्या मुळाशीं हॉंगकॉंगचा बाजार आहे—बाजार! शेंकडों, हजारों दुकानांचा बाजार! मालानें खच्चून भरलेल्या दुकानांचा बाजार! आणि मग, हॉंगकॉंगमधून फिरतांना जो एक प्रश्न तुमच्या डोक्यांत वारंवार उठतो तो येथेंहि उठतो – कीं “ हा इतका अमाप माल घेतें तरी कोण! ”

●●●

पण हँागकाँगमध्येंच रंगांची अगदीं स्वप्नपुरीच उमललेली पाह्यची असेल तर रात्रीं कावलूनच्या डोंगरावरच्या कॉर्ल्टन हॉटेलच्या गच्चींत जा आणि खालीं पाहा – समोर त्याला हिरव्या, निळ्या, पिवळ्या, जांभळ्या रंगांचा भरजरी पटच उघडलेला दिसेल! व्यापारी इमारतींवरच्या निऑन् लाईट्सचें नक्षीदार स्फुरण, धक्क्यावरच्या निळ्या दिव्यांची झगझगती माळ, समुद्रावरच्या बोटींच्या जहाजांच्या पिवळसर रंगांची फडफड, त्यांच्या पाण्यावरच्या प्रतिबिंबांचा लहरता नाच, पलीकडच्या डोंगरावरच्या दिव्यांची शेंकडों डोळ्यांची उघडमिट, कावलूनच्या रस्त्यावरच्या मोटरींच्या पळत्या दिव्यांची रांग – रंगदार रेशमी फितींनीं गुंडाळलेला एकादा वस्त्रालंकाराचा नजराणा दिसावा, तसें हँागकाँग रात्रीं दिसतें. पाहतां पाहतां तुमची दृष्टि बांधली जाते, वृत्ति चूर होते, जाणीव विसरते. इतक्यांत एकाद्या बोटीचा भोंगा वाजतो आणि तुम्ही खाडदिशी वास्तवाच्या भूमीवर उतरतां, आणि सत्य जाणवतें कीं, या स्वप्नसृष्टीच्या मुळाशीं हँागकाँगचा बाजार आहे—बाजार! शेंकडों, हजारों दुकानांचा बाजार! मालानें खच्चून भरलेल्या दुकानांचा बाजार! आणि मग, हँागकाँगमधून फिरतांना जो एक प्रश्न तुमच्या डोक्यांत वारंवार उठतो तो येथेंहि उठतो – कीं “ हा इतका अमाप माल घेतें तरी कोण! ”

● ● ●

# स उ ल

मेट्रो हॉटेलच्या माणसानें दाखविलेल्या खोलींत शिरलों, सामान-सुमान ठेवलें नि बाथरूमचा दरवाजा उघडला – त्याबरोबर आगीचा भपकारा आला. लगेच लक्षांत आलें. पुनः मला बॉयलर-पासची खोली मिळाली होती. दहा दिवसांपूर्वी जपानांत नेमकें असेंच झालें होतें. हा बॉयलर पाठीस कां लागला होता ?

पण दुसऱ्या दिवशीं खोली बदलून मिळाली नि

सारें कांहीं ठीक झालें – इतकें ठीक कीं, सउलमधल्या माझ्या वास्तव्याच्या स्मृति माधुर्यानें भरलेल्या आहेत.

त्यांतल्या एका स्मृतीचा सउलशीं तसा संबंध नाहीं, पण ती गोष्ट सउलमध्यें घडली आणि ती मी विसरणें शक्य नाहीं. स्वतःवर केलेल्या एका यशस्वी प्रयोगाची ती हकीगत आहे.

त्याचें असें झालें. एक दिवस मीं बाथरूममध्यें आंघोळ करीत असतां टेलिफोन वाजला. प्रथम दुर्लक्ष केलें, तरी वाजत राहिला. तेव्हां तसाच ओलेत्यानें धावलों. पण टेलिफोनपाशीं जातों तोंच बंद झाला. थंडीचे दिवस. हवेंत विलक्षण गारठा. हुडहुडी भरली, म्हणून धावत आलों. तसाच धावत परतलों. अंग ओलें होतें. पावलें ओलीं होतीं. खोलीच्या गुळगुळीत फरशीवरून पाय सटकन् सरकला आणि—

पडतां पडतां त्या अर्धपाव सेकंदांत मीं स्वतःला बजावलें कीं, तूं पडतो आहेस, डोकें आपटूं देऊं नकोस, तें वर उचलून धर आणि सरळ पाठीवर पडूं नको, एका कुशीवर घे; आणि काय आश्चर्य! त्या अरिष्टाच्या क्षणींसुद्धा जीवनशक्तीनें दिलेल्या सूचना मीं तंतोतंत पाळल्या. डोकें वर धरलें नि डाव्या कुशीवर पडलों, पण उठतांक्षणींच ध्यानांत आलें कीं, आपल्या कपाळाच्या उजव्या कोपऱ्यांत कळ उठली आहे आणि डोळ्यांपुढें थोडी अंधारी आली आहे. तरी तसाच गेलों नि टबमध्यें शिरलों. विचार केला कीं, गरमगरम पाण्यांत शरीर बुडवून ठेवलें कीं, डोक्यांतली चक्कर कमी होईल. खूप गरम गरम पाणी सोडलें नि स्वस्थ पडून राहिलों. चक्कर थोडी कमी झाली, पण डोकें दुखतच राहिलें; तेव्हा उठलों, आरशासमोर उभा राहिलों आणि स्वतःला सांगितलें, "तुला कांहींहि झालेलं नाहीं, थोडा शॉक बसला आहे. तुला कांहींहि झालेलं नाहीं, थोडा शॉक बसला आहे. तुला कांहींहि झालेलं नाहीं, थोडा शॉक बसला आहे." असें स्वतःला सांगत चार-पांच मिनिटें उभा राहिलों नि डोकें उतरलें – थोड्याच वेळांत न्याहारीसाठीं भोजन-गृहांत गेलों. तेथें मला फोन करणारा गृहस्थ भेटला, त्याला या फोनच्या उपद्-व्यापामुळें माझी कशी भरली होती हें सांगून मनमुराद हसण्याइतकें उतरलें!

सउलच्या इतर आठवणीहि गोड आहेत. याचें मुख्य श्रेय सउलच्या लोकांना आहे. कोरीअन लोक सरळ, उमदे, स्पष्टवक्ते आहेत. जपान्यांच्या

अगदी उलट. जपानी लोकांचा चेहरा – म्हणजे मुखवटा – अंतरंग लपविण्यासाठीं आव्याहत बसवलेला. उलट कोरिअन लोकांचें अंतरंग 'फॅशन-शो' मधल्या स्त्रियांप्रमाणें आपल्या अंगप्रत्यंगाचें प्रदर्शन करीत असतें !

या भारतीयाच्या दर्शनानें तें अगदीं ओलेच झालें. कोरीआशीं आपले राजनैतिक संबंध नाहींत. व्यापारहि तितकासा नाहीं. यामुळें भारतीय त्यांना फारसे भेटत नाहींत. [मध्यंतरीं कोरीअन कमिशनच्या निमित्तानें बरेचसे भारतीय भेटले, पण त्यांची गोष्ट निराळी.] त्यामुळें माझ्या भेटीनें त्यांना फार आनंद झाला आणि आपल्या प्रेमाचा व अगत्याचा मनसोक्त वर्षाव त्यांनीं माझ्यावर केला – आणि त्याचे पडसाद वृत्तपत्रांत निघाले. पहिल्याच दिवशीच्या वार्तापरिषदेंत माझ्याबरोबर जागतिक कीर्तीच्या एकदोन महान् व्यक्ति होत्या, पण पत्रकारांच्या कांहीं खास प्रश्नांचा मारा माझ्यावरच झाला. वर्तमानपत्रांत माझे फोटो, मुलाखती व लेख प्रसिद्ध झाले – आणि गेशा हाऊसमधल्या एका मुलीनें माझा एक लेख वाचलेला होता ! एका प्रेमळ दांपत्यानें चहासाठीं मला घरीं नेलें, संध्याकाळीं चिनी भोजनालयांत जेवण दिलें आणि एका उमरावी उपाहारगृहांत भोजनोत्तर कॉफीचा फर्मास बेत खमंग गप्पांत पार पाडला. इतकेंच नव्हे तर त्या जोडप्यांतल्या बाईनें मला स्पष्ट सांगितलें कीं, तुम्ही भारतीय म्हणून आम्हांला तुमच्याबद्दल ओढा वाटतो, आणि दुसऱ्या दिवशीं पंधरा-वीस मैल लांब असलेल्या विमानतळावर येऊन मला निरोप दिला. इतके झाल्यानंतर माझ्या स्मृति मधुर नसतील तर काय असतील ?

●●●

पण या स्मृतींना करुणेची कडा आहे. कोरिआ दरिद्री आहे, मागस आहे. कोरिअन लोकांचें जीवन खडतर आहे. याची झळक, सउलला उतरण्यापूर्वीच मिळाली. कोरिआ हा जपानसारखाच डोंगराळ प्रदेश, पण जपानचा समुद्र ओलांडून आमचें विमान कोरिआवर आलें आणि 'ट्रॅन्स्फरसीन' चा अनुभव आला. जपानचे डोंगर वनश्रीनें भरलेले तर कोरिआचे उघडे, ओके, बोडके ! झाडें तोडलेलीं, होतीं तीं खुजीं, खुरटलेलीं आणि या हंगामांत पर्णहीन बनलेलीं. जमीन

ओसाड, धुपून निघालेली. एकंदर दर्शन उजाड – मन खिन्न करून सोडणारें.

सउलनें हें पहिलें मत पक्कें केलें. कोरिआच्या दारिद्र्याचीं, मागासपणाचीं लक्षणें सउलमध्यें ठिकठिकाणीं पेरलेलीं दिसलीं. हीं लक्षणें भिकाऱ्यांच्या वेशांत होतीं, नजरेंत होतीं; कामगारांच्या कष्टांत होतीं; हमाल पाठीवर इंग्रजी A च्या आकाराचा जो साचा घेऊन हिंडतो त्यांत होतीं; रस्त्याकांठच्या केरकचऱ्याच्या ढिगाऱ्यांत होतीं; शहरापासच्या झोंपड्यांत होतीं; झोंपड्यापासच्या उकिरड्यांत होतीं; भरमसाट किंमतींत होतीं आणि मूठभर श्रीमंतांच्या चैनींत – आणि आळसांत होतीं. या लोकांना पैशाचा तोटा नव्हता. रिकामटेकडेपणाचा कंटाळा नव्हता. आमच्या हॉटेलच्या लॉबींत बाहेरचे अनेक लोक नुसतेच येत, बसत, वर्तमानपत्रें वाचत, जांभया देत आणि निघून जात.

सउलमध्यें सकाळपासून संध्याकाळपर्यंत एक आवाज सारखा ऐकूं आला : ‘ इल्बो ’, अमकें ‘ इल्बो ’, तमकें ‘ इल्बो. ’ वर्तमानपत्राच्या या पुकारांत विलापिकेचा सूर होता. या शहरांत वृत्तपत्रें असंख्य आणि तीं विकणारीं पोरें असंख्याच्या अनेकपट ! या कागदी लंगोट्या विकणें हा चार ‘ व्हान ’ मिळविण्याचा उत्तम मार्ग ! बेकार आणि बेकाम माणसें वर्तमानपत्रें अधिक वाचत असल्यामुळें पत्रें विकणाऱ्या पोऱ्यांची इतकी झुंबड माजूनसुद्धा त्यांचा धंदा चालत होता.

दुसरा चलता धंदा बूटपॉलिशवाल्यांचा. निरुद्योगी पायांतल्या बुटांना पॉलिशची गरज फार भासते. अर्थात् ब्रश-डबी घेतलेल्या पोऱ्यांची रांग कोपऱ्या कोपऱ्यावर बसे. एका मित्राबरोबर कॉफीगृहांत शिरतांना मीं म्हटलें, “ मला पॉलिश करून घ्यायचं आहे. ” तो म्हणाला, “ येथें नको, कॉफी पितां पितां करून घेऊं. ” कॉफीगृहांतल्या टेबलापाशीं लोकांच्या तोंडाला कॉफीचा कप आणि पायांतल्या बुटावर पॉलिशवाल्यांचा ब्रश असें दृश्य माझ्या डोळ्यांसमोर झर्कन् सरकलें, पण या शानदार कॉफीगृहांत असें कसें चालेल ? येथें कॉफीपानाबरोबर इतर अनेक गोडधोड, नाजुकसाजुक गोष्टी होत असल्या तरी त्यांत बूटपॉलिशचा समावेश खात्रीनें नसेल ! कॉफीगृहांत शिरतांना मित्रानें एका पॉलिशवाल्याला कांहींसें सांगितलें. जरा वेळानें तो

काफीगृहांत आमच्या टेबलापाशीं आला. मी माझे बूट त्याला देऊं लागलों, तेव्हां मित्र म्हणाला, "नको नको, दोनहि एकदम नका देऊं. मी माझा एक देतों, तुम्ही तुमचा एक द्या. ते आणलेन् कीं दुसरे देऊं. जोडीच्या जोडी दिली न् तो पळून गेला तर काय घ्या ?" आंत आम्ही उंची कॉफी पीत होतों नि बाहेर दारिद्र्य नीतीचीं लक्तरें लोळवीत होतें ! आंतहि तीं लोंबत असतील. माझ्या तीं ध्यानांत आलीं नाहींत.

पण या दारिद्र्याची आणि मागसपणाची दोन गोष्टीशीं सांगड मला घालतां आलीं नाहीं. एक म्हणजे सउल शहरांतले खटारे ओढणारे बैल इतके मस्त बैल मीं दुसरीकडे पाहिले नव्हते. याचें माणसांपेक्षां निसर्गालाच श्रेय असावें. निसर्गानें त्यांची चणच तशी बांधली असावी ! पण त्यांच्या उग्र लालसर डोळ्यांत एक चमत्कारिक कणव जाणवली ! तें अर्थात् भोवतालच्या दारिद्र्याचें प्रतिबिंब असावें. दुसरी गोष्ट म्हणजे कोरअन् युनिव्हर्सिटींत प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातांत एक कातडी बॅग आढळली – प्रत्येकाच्या ! सउलमधल्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या आणि विद्यार्थिनीच्या अंगावर गणवेश होता. (जपानी विद्यार्थी–विद्यार्थिनीच्या अंगावरच्या गणवेशाची आठवण करून देणारा.) अमेरिकन लोकांनीं कोरिआंत ओतलेल्या मदतीचा हा परिणाम कीं काय ? पण तो परिणाम असा दिसला असता, तर रिकामटेकड्या श्रीमंतांच्या चैनींत दिसला नसता !

● ● ●

संस्कृतीचा उगम द्रव्याच्या खातेऱ्यांत असतो असें एका वक्रमति माणसानें म्हटलेलें आहे, पण उगम, वावर नव्हे. कोरिअनांच्या जीवनांत दुःख, दैन्य, दारिद्र्य असलें, तरी त्यांत एक सांस्कृतिक प्रतिष्ठा आहे. कोरिअन् संस्कृति अडीच-तीन हजार वर्षांची आहे आणि तिचा कोरिअनांना अभिमान आहे. (आपला पूर्वज 'तानगुन', चार हजार दोनशें चौऱ्याणव वर्षांपूर्वी स्वर्गांतून पृथ्वीवर उतरला असें ते सांगतात.) ही सांस्कृतिक प्रतिष्ठा, अंतर्मुखता, शालीनता त्यांच्या चालण्या-बोलण्या-वागण्यांत व्यक्त होते. आम्हांला मार्गदर्शक म्हणून एक तरुण दिलेला होता. २८ वर्षांचा. नामांकित गायक म्हणून प्रसिद्ध. गेशांच्या आखाड्यांत त्यानें आपल्या गाण्यानें

तमा केली, पण त्यांच्या एकंदर वर्तणुकींतला संयम आणि शिष्टाचार नमुनेदार होता. एका कमिटीच्या बैठकींत दोन गट होते. त्यांच्यांत मतभेद होते. ते त्यांनीं आवर्जून मांडले. पण कोरिअन भाषेचें ज्ञान नसणाऱ्या आम्हांला त्यांतलें कांहीं समजलें नाहीं. नव्यानें निवडलेल्या कार्यकारिणींत एक नामांकित व्यक्ति दिसली नाहीं. म्हणून चवकशी करूं लागलों तेव्हां आम्हांला याचा पत्ता लागला.

जेथें जेथें अमेरिकन जातात तेथें आधुनिकता उड्या मारीत येते. १९५० च्या युद्धापासून कोरिआ हा अमेरिकनांचा एक तळच बनलेला आहे. असंख्य कोरिअन अमेरिकेंत फेरफटका करून; शिक्षण वगैरे घेऊन येत आहेत. याचा प्रभाव सउलच्या जीवनावर पडलेला आहे. पाश्चात्य हॉटेलांतली राहणी, उपाहारगृहांतलें खाणेंपिणें, नाइट क्लबमधलें गाणें–नाचणें यांवर अमेरिकन आधुनिकता उडत – बागडत असते. पुरुषाचा पोशाख आधुनिक पाश्चात्यच असतो, पण स्त्रियांचा ? कोरिअन स्त्रियांच्या पायघोळ पोशाखांत एक खानदानी असते. पायघोळ चुणीदार झग्यावर एक लांब हाताचा पण जेमतेम वक्षःस्थळ झांकण्याइतका ब्लाउज हा कोरिअन स्त्रीचा पोशाख. ब्लाउजला बटणें नसतात, तर बाराबंदीसारखी बांधायची एक फीत असते आणि या रंगदार रेशमी फितीची गाठ मोठी कलापूर्ण दिसते. पण माझ्या एका अमेरिकन मित्राला ब्लाउजच्या आंतून उतरणाऱ्या झग्याच्या चुण्याच (विशेषतः पाठीवरच्या चुण्या) मोहक दिसायच्या आणि तो आपला कोरिअन स्त्रियांच्या पाठी न्याहाळीत बसायचा ! ( कोरिअन स्त्रियांचें चंद्रमुखी सौंदर्य त्यानें आमच्यासारख्या मित्रांसाठीं साफ मोकळें सोडलें होतें ! ) हा पायघोळ सैल पोशाख घरगुती काम उरकण्यास फार सोईचा पडतो असें एका तंग पाश्चात्य पोशाखांत चुणचुणीत दिसणाऱ्या एका मुलीनें मला सांगितलें. आधुनिक मुलींना हा बेतशीर, आटपशीर पाश्चात्य पोशाखच आवडतो, पण पाश्चात्य पोशाखानें झाकलेल्या अंतःकरणांत पौर्वात्य मर्यादशीलता आणि शालीनताच वावरत असते.

पाश्चात्य पोशाखांतली पौर्वात्य शालीनता मला मेट्रो हॉटेलाच्या टूरीस्ट–ऑफिसमध्यें भेटली. एकदां या ऑफिसमध्यें शिरलों, तेव्हां तेथें तीन–चार तरुण मुली बसलेल्या होत्या. रिसेप्शनिस्टनें त्यांची माझी ओळख करून दिली.

कॉलेजमधल्या त्या मुली; बोलायचालायला मोकळ्या. लगेच आम्ही गप्पांत रंगून गेलों. इतक्यांत एक मित्र आला आणि मला म्हणाला, "आपल्याला राजांचीं थडगीं पाहायला जायचं आहे ना ? मग चला गाडी तयार आहे." मीं विचारलें, "आणखी कोण कोण येत आहे ?" तो म्हणाला, "कोणीच नाहीं. प्रत्येकाला कांहीं ना कांहीं काम निघालं आहे. तुम्ही, मी व आपले अध्यक्ष एवढे तिघेच." राजांचीं थडगीं हे शब्द ऐकल्याबरोबर एका मुलीचे डोळे लकाकले होते. कोरिआंत 'राजांचें थडगें' हें मोठें प्रेक्षणीय प्रकरण असतें. पण तें शहरांपासून दूर असतें. सउल शहराच्या हद्दींत प्रेतें पुरण्याची परवानगी नाहीं. जितका माणूस श्रेष्ठ तितकें त्याचें थडगें शहरापासून दूर. राजाचें तर फारच दूर. तेव्हां तें पाहण्याची संधि म्हणजे एक पर्वणीच. निदान तशी ती या मुलीला वाटत होती, हें तिच्या चेहऱ्यावरून स्पष्ट झालें. म्हणून मीं म्हटलें, "तुम्हांला यायचं आहे का ? संकोच करूं नका. गाडींत भरपूर जागा आहे." साऱ्यांचे चेहरे उत्सुकतेनें भरून गेले. पण एकहि मुलगी होय म्हणेना. त्यांच्या मनांतली चुळबुळ दिसत होती, पण बाहेर येईना. इतक्यांत माझा टेलिफोन आला. तो घेऊन आलों तों दोन मुली यायला तयार! काय जादू झाली होती मला कळलं नाहीं. त्या येत आहेत याच्या आनंदांत ती जाणून घेण्याची उत्सुकताहि विसरलों. जातांना मुलींशीं गप्पा मारूं लागलों. इतक्यांत त्यांतली एक म्हणाली, "मघाशीं आम्ही यायला कांकूं कां करीत होतों माहीत आहे ?" मीं विचारलें, "कां ?" "परकीयांबरोबर कोरिअन मुलींनीं फिरणं बरं दिसत नाहीं. आमच्या समाजाला हें चालत नाहीं. पण तुम्ही टेलिफोन घ्यायला गेलांत तेव्हां समजलं कीं, हे तुमचे कोरिअन मित्रहि येत आहेत. म्हणून आलों." पुढें थडग्याच्या तिथें फोटो काढण्याचा बूट निघाला, पण त्या मुली फोटोला बसत ना! (मुली अन् फोटोला माघार!) अखेर त्यांतली एक मोठ्या मिनतवारीनें कबूल झाली. "कारण मी जरा पुढारलेली आहें. माझा प्रियकर अमेरिकेंत राहून आलेला आहे आणि मी लवकरच नोकरीसाठीं टोकिओला जाणार आहें". पुरुषाबरोबर फोटो काढून घेणें कोरिअन संस्कृतींत बसत नाहीं!

या संस्कृतीचें मनोज्ञ कलात्मक दर्शन मला म्युझियममध्यें झालें, निरनिराळ्या राजवाड्यांमध्यें झालें, उद्यानांत झालें, संगीत–समारंभांत झालें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.



अनुक्रम ... .................. विः ....................

आणि कोरिआ–हाउसमधल्या एका भोजन-प्रसंगीं झालें. डोक्सू आणि चांगडोक राजवाड्यांत मीं जे जडजवाहिराचे आणि कुंभकलेचे नमुने पाहिले, त्यांनीं कोरिअन कलेंतल्या एका चमत्कारिक अंतर्विरोधाची मला जाणीव झाली. कोरिआचें परंपरागत वास्तुशिल्प मला आवडलें नाहीं. विमानतळा-वरून शहरांत येतांना जीं सर्वसाधारण घरें मला दिसलीं तीं मला आवडलीं होतीं. छपरांच्या कडांना जो एक नाजुक बांक होता, भिंतींत जो एक साधेपणा होता, लाकूड-कामांत जो एक सलगपणा भासला तो आवडला होता, पण कोरिआच्या परंपरागत कीर्तीच्या इमारती पाहिल्या, चांगडोक राजवाड्यांत हिंडलों, क्यॉगबॉक राजवाड्याच्या आवारांत फिरलों नि माझी निराशा झाली. या इमारतींवर जें नक्षीकाम दिसलें, जी कलाकुसर आढळली ती अतिरिक्त वाटली. छपरांच्या रेषांतली वक्रता ओबडधोबड वाटली, रंगकाम विटकें वाटलें आणि एकंदर वास्तूंत सफाई दिसली नाहीं कीं रोचक प्रमाणशीलता जाणवली नाहीं. या इमारतींतली (चिन्यांकडून घेतलेली) अलंकारजडता तर मला कधींच आवडली नव्हती आणि सफाई व प्रमाणशीलता आधींच जपानमध्यें मुबलक पाहिलेली असल्यामुळें तिचा अभाव फारच खटकला. पण या इमारतींतलें जडवहाहिर, चित्रें आणि कुंभकलेचे नमुने पाहिले नि सुखद आश्चर्याचा अनपेक्षित मारा झाला. इमारतीची जी नक्षी व कलाकुसर माझ्या डोळ्यांना खुपली होती तिचें अत्यंत आकर्षक रूप मला या जडजवाहिरांत आणि दागदागिन्यांत दिसलें. त्यांत रेशमी धाग्याचा नाजुकपणा होता आणि निसर्गाची कल्पनाशीलता होती. त्या इमारतींवर जे रंग विटके वाटले होते त्यांचें अत्यंत रसदार रूप जुन्या चित्रांत आढळत होतें आणि कुंभकलेंत व मातीच्या वस्तूंत आकार, प्रमाणशीलता आणि सफाई यांचा तर उत्कर्ष उसळलेला दिसला. यांत अर्थात आश्चर्य नव्हतें. कोरिआला कुंभकलेचा वारसा चीनकडून मिळालेला होता आणि आज कुंभकलेंत अद्वितीय ठरलेल्या जपाननें कोरिअन् कुंभकले-पासून स्फूर्ति घेतलेली आहे. तेव्हां कुंभकलेच्या उत्कृष्ट नमुन्यांची मी अपेक्षा केलीच होती, पण प्रत्यक्ष दर्शनानें जो साक्षात्कार झाला तो अनपेक्षित होता. सुरया, खुजे, पुष्पपात्रें, इतर अनेक पात्रें यांना निरनिराळे कल्पनाशील आकार देण्यांत, त्यांच्यावर कोरीव काम करण्यांत, त्यांच्यावर नक्षी काढण्यात

कोरिअन कलावन्तांनीं खरोखर कमाल केलेली आहे. तरी त्यांत चिनी कुंभकलेच्या नक्षीची गिचमीड नाहीं, भारतीय कुंभकलेच्या आकाराचा ठराविकपणा नाहीं आणि आधुनिक यांत्रिक कुंभकलेचा खोटा चकचकितपणा नाहीं. कोरिअन वास्तुशिल्पांत जें नेमकें खुपलें तेंच कोरिअन हस्तकलेंत आकर्षक वाटलें.

पण कोरिअन वास्तुकलेला अन्याय होऊं नये म्हणून एका गोष्टीचा उल्लेख केलाच पाहिजे. कोरिआ हाउसमध्यें जेवायला गेलों, तेथल्या रीती-प्रमाणें जमिनीवर बसलों नि जमीन गरम लागली – त्या थंडींत सुखद लागली. चवकशी केली तेव्हां समजलें कीं, या खोलीची जमीन ऑंडोल पद्धतीची आहे – म्हणजे ती माती लिंपलेल्या दगडांची असून खालीं मुद्दाम केलेल्या बोगद्यांत गरम हवा खेळविलेली आहे. यूरोपमध्यें आजकाल गरम पाण्याचे नळ फिरवून घरांत उष्णता निर्माण करतात, पण गरम हवेचे बोगदे फिरवि-ण्याची ही युक्ति प्राचीन आहे आणि ती गरम पाण्याच्या आधुनिक नळांप्रमाणें डोळ्यांवर अत्याचार करीत नाहीं. इतकी सुंदर युक्ति परंपरेनें अवगत अस-तांना चांगडोक राजवाड्याच्या दरबारीं खोलींत गरम पाण्याचे नळ सिंहासनी खुर्च्यांच्या मागें त्यांच्या शोभेचें विडंबन करीत उभे असलेले दिसले, तेव्हां मला काय वाटलें तें सांगत नाहीं.

पण या चांगडोक राजवाड्यांत जें एक दृश्य मीं पाहिलें किंवा ज्या एका दृश्यानें मला भारलें तें मी कधीं विसरणार नाहीं. हा राजवाड्यांतला फेरफटका म्हणजे एकावर एक उंचावत जाणाऱ्या अलग अलग दालनांतला फेरफटका. एकदा एका उंच दालनाच्या दरवाजांत उभा राहिलों नि मागें वळून पाहिलें नि तें विलक्षण दृश्य दिसलें ! या दरवाजांतून दुसऱ्या दालनाचा रंगदार, नक्षीदार दरवाजा; त्यांतून तिसरा आणखी रंगदार, नक्षीदार दरवाजा; त्यांतून चौथा आणि चवथ्यातून राजवाड्याच्या बागेचें हिरवें–पिवळें–जांभळें दृश्य ! स्वप्नांत स्वप्न पाहावें तसें वाटलें.

आमच्यासाठीं दरबारी संगीताचा कार्यक्रम एका आकर्षक उद्यानांत आखण्यांत आणि त्याची एका मनोरम नृत्याशीं जोड घालून देण्यांत चाल-कांनीं चातुर्य दाखविलें यांत शंकाच नाहीं. हें संगीत श्रवणीयापेक्षां प्रेक्षणीयच अधिक होतें. गायकांचा लाल–लव्हेण्डर गणवेश आणि त्याच्या मुख्याचा

आणि कोरिआ–हाउसमधल्या एका भोजन-प्रसंगीं झालें. डोक्सू आणि चांगडोक राजवाड्यांत मीं जे जडजवाहिराचे आणि कुंभकलेचे नमुने पाहिले, त्यांनीं कोरिअन कलेंतल्या एका चमत्कारिक अंतर्विरोधाची मला जाणीव झाली. कोरिआचें परंपरागत वास्तुशिल्प मला आवडलें नाहीं. विमानतळा-वरून शहरांत येतांना जीं सर्वसाधारण घरें मला दिसलीं तीं मला आवडलीं होतीं. छपरांच्या कडांना जो एक नाजुक बांक होता, भिंतींत जो एक साधेपणा होता, लाकूड-कामांत जो एक सलगपणा भासला तो आवडला होता, पण कोरिआच्या परंपरागत कीर्तीच्या इमारती पाहिल्या, चांगडोक राजवाड्यांत हिंडलों, क्यॉगब्रॉक राजवाड्याच्या आवारांत फिरलों नि माझी निराशा झाली. या इमारतींवर जें नक्षीकाम दिसलें, जी कलाकुसर आढळली ती अतिरिक्त वाटली. छपरांच्या रेषांतली वक्रता ओबडधोबड वाटली, रंगकाम विटकें वाटलें आणि एकंदर वास्तूंत सफाई दिसली नाहीं कीं रोचक प्रमाणशीलता जाणवली नाहीं. या इमारतींतली (चिन्यांकडून घेतलेली) अलंकारजडता तर मला कधींच आवडली नव्हती आणि सफाई व प्रमाणशीलता आधींच जपानमध्यें मुबलक पाहिलेली असल्यामुळें तिचा अभाव फारच खटकला. पण या इमारतींतलें जडवहाहिर, चित्रें आणि कुंभकलेचे नमुने पाहिले नि सुखद आश्चर्यांचा अनपेक्षित मारा झाला. इमारतीची जी नक्षी व कलाकुसर माझ्या डोळ्यांना खुपली होती तिचें अत्यंत आकर्षक रूप मला या जडजवाहिरांत आणि दागदागिन्यांत दिसलें. त्यांत रेशमी धाग्याचा नाजुकपणा होता आणि निसर्गाची कल्पनाशीलता होती. त्या इमारतींवर जे रंग विटके वाटले होते त्यांचें अत्यंत रसदार रूप जुन्या चित्रांत आढळत होतें आणि कुंभकलेंत व मातीच्या वस्तूंत आकार, प्रमाणशीलता आणि सफाई यांचा तर उत्कर्ष उसळलेला दिसला. यांत अर्थात आश्चर्य नव्हतें. कोरिआला कुंभकलेचा वारसा चीनकडून मिळालेला होता आणि आज कुंभकलेंत अद्वितीय ठरलेल्या जपाननें कोरिअन् कुंभकले-पासून स्फूर्ति घेतलेली आहे. तेव्हां कुंभकलेच्या उत्कृष्ट नमुन्यांची मी अपेक्षा केलीच होती, पण प्रत्यक्ष दर्शनानें जो साक्षात्कार झाला तो अनपेक्षित होता. सुरया, खुजे, पुष्पपात्रें, इतर अनेक पात्रें यांना निरनिराळे कल्पनाशील आकार देण्यांत, त्यांच्यावर कोरीव काम करण्यांत, त्यांच्यावर नक्षी काढण्यांत

कोरिअन कलावन्तांनीं खरोखर कमाल केलेली आहे. तरी त्यांत चिनी कुंभकलेच्या नक्षीची गिचमीड नाहीं, भारतीय कुंभकलेच्या आकाराचा ठराविकपणा नाहीं आणि आधुनिक यांत्रिक कुंभकलेचा खोटा चकचकितपणा नाहीं. कोरिअन वास्तुशिल्पांत जें नेमकें खुपलें तेंच कोरिअन हस्तकलेंत आकर्षक वाटलें.

पण कोरिअन वास्तुकलेला अन्याय होऊं नये म्हणून एका गोष्टीचा उल्लेख केलाच पाहिजे. कोरिआ हाउसमध्यें जेवायला गेलों, तेथल्या रीती-प्रमाणें जमिनीवर बसलों नि जमीन गरम लागली – त्या थंडींत सुखद लागली. चवकशी केली तेव्हां समजलें कीं, या खोलीची जमीन ओंडोल पद्धतीची आहे – म्हणजे ती माती लिंपलेल्या दगडांची असून खालीं मुद्दाम केलेल्या बोगद्यांत गरम हवा खेळविलेली आहे. यूरोपमध्यें आजकाल गरम पाण्याचे नळ फिरवून घरांत उष्णता निर्माण करतात, पण गरम हवेचे बोगदे फिरवि-ण्याची ही युक्ति प्राचीन आहे आणि ती गरम पाण्याच्या आधुनिक नळांप्रमाणें डोळ्यांवर अत्याचार करीत नाहीं. इतकी सुंदर युक्ति परंपरेनें अवगत अस-तांना चांगडोक राजवाड्याच्या दरबारीं खोलींत गरम पाण्याचे नळ सिंहासनी खुर्च्यांच्या मागें त्यांच्या शोभेचें विडंबन करीत उभे असलेले दिसले, तेव्हां मला काय वाटलें तें सांगत नाहीं.

पण या चांगडोक राजवाड्यांत जें एक दृश्य मीं पाहिलें किंवा ज्या एका दृश्यानें मला भारलें तें मी कधीं विसरणार नाहीं. हा राजवाड्यांतला फेरफटका म्हणजे एकावर एक उंचावत जाणाऱ्या अलग अलग दालनांतला फेरफटका. एकदा एका उंच दालनाच्या दरवाजांत उभा राहिलों नि मागें वळून पाहिलें नि तें विलक्षण दृश्य दिसलें ! या दरवाजांतून दुसऱ्या दालनाचा रंगदार, नक्षीदार दरवाजा; त्यांतून तिसरा आणखी रंगदार, नक्षीदार दरवाजा; त्यांतून चौथा आणि चवथ्यांतून राजवाड्याच्या बागेचें हिरवें–पिवळें–जांभळें दृश्य ! स्वप्नांत स्वप्न पाहावें तसें वाटलें.

आमच्यासाठीं दरबारी संगीताचा कार्यक्रम एका आकर्षक उद्यानांत आखण्यांत आणि त्याची एका मनोरम नृत्याशीं जोड घालून देण्यांत चाल-कांनीं चातुर्य दाखविलें यांत शंकाच नाहीं. हें संगीत श्रवणीयापेक्षां प्रेक्षणीयच अधिक होतें. गायकांचा लाल–लव्हेण्डर गणवेश आणि त्याच्या मुख्याचा

हिरवाजर्द पोशाख; त्याचप्रमाणें वाद्यांचे आकार, त्यांचे प्रकार आपलें सारें लक्ष कानांकडून डोळ्यांकडे आणून ठेवीत असल्यामुळेंच हें संगीत सह्य होतें असा माझा कयास अाहे. ऐकणाराच्या प्रकृतीप्रमाणें या संगीताच्या सुरांत शोकाविष्ट स्त्रियांचा विलाप, बुडणाऱ्याच्या किंकाळ्या, पोरांचें वेडावणें, वेड्याचें ओरडणें आणि दरबारी वैभवाची प्रतिष्ठा ऐकूं येईल. मला फक्त आज कोरिआंत पाश्चात्य संगीताची चलती कां या प्रश्नाचें उत्तर मिळालें, पण लगेच एवढ्या संगीतवेड्या राष्ट्राला अशा संगीताचें बाळकडू मिळालें तरी कसें असा नवीन प्रश्न पडला. सकाळपासून संध्याकाळपर्यंत 'इल्बो' 'इल्बो' असें ओरडणाऱ्या वर्तमानविक्यांच्या कंठशोषांतसुद्धां संगीताचा स्वर ऐकूं येण्याइतकें संगीत या राष्ट्राच्या प्रकृतींत मुरलेलें आहे. आदल्या रात्रीं मी मिस् ली नांवाच्या एका गायिकेच्या पाश्चात्य संगीताच्या कार्यक्रमाला गेलों होतों. सारें थिएटर दहा वर्षांच्या मुलांमुलींपासून साठ–सत्तर वर्षांच्या म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंतच्या सर्व थरांच्या आणि सर्व वयांच्या प्रेक्षकांनीं गच्च भरलें होतें आणि मिस् लीनें रंगभूमीवर प्रवेश केला तेव्हां त्यांनीं टाळ्यांच्या गजरानें अवधें थिएटर डोक्यावर घेतलें. जणूं मिस् ली म्हणजे कोणी संगीतदेवताच अवतीर्ण झाली! वस्तुतः लीपेक्षां सरस गायिका सउलमध्यें आहेत आणि त्यांतल्या एकीचें भरदार मखमली गायन ऐकण्याचा योग मला आला. मिस् ली नुकतीच अमेरिकेहून आली होती. एवढेंच तिचें आताचें खास आकर्षण होतें आणि तेवढें या संगीतवेडया झुंडीला पुरेसें होतें. या राष्ट्राच्या अभिजात संगीताची अशी अधोगति ओढवावी हें त्याच्या प्रकृतींतच आहे. कारण स्वरांचें माधुर्य पिपाणीच्या किंकाळींत आणि आवाजाची धार घशाच्या खरवडींत आहे अशी या संगीताची धारणा दिसते. हें संगीत ऐकून अंतःकरणांत समाधानाचे पूर वाहले असें चेहऱ्यावर नाटक नाचवतांना मला फार कष्ट पडले, एवढें प्रामाणिकपणें कबूल केलें पाहिजे. या संगीताला मंदिरनृत्याची ('सुंग्मू' नृत्याची) जोड देण्यांत आली नसती, तर 'त्या' समाधानाचा कसा स्फोट झाला असता कांहीं सांगवत नाहीं. त्या नर्तिकेच्या नुसत्या दर्शनानेंच नजर निवली. चंद्रखळ्यानें चंद्राचें सौंदर्य जसें वाढतें तसें बुद्धभिक्षूची सफेत कफनी आणि सफेत टोप यांनीं या सुंदरीचें सौंदर्य वाढलें

होतें. एक प्रकारचा आत्मिक हर्ष व आत्मिक सौंदर्य हे कोरिअन नृत्याचे प्रमुख विशेष आहेत आणि लयदार हावभावापेक्षां यांना अधिक महत्त्व असतें. म्हणून कोरिअन नृत्यांत पदक्षेप आणि अंगविक्षेप यांच्यापेक्षां आत्म्याच्या प्रेरणेला (आंतून स्फुरलेल्या अभिनयाला) अधिक महत्त्व असतें. या नृत्यांत तर त्यालाच महत्त्व आहे. बुद्धधर्मांतलें जीवनाचें दुःख, त्यावर विजय मिळविण्यासाठीं स्वीकारलेली त्यागवृत्ति आणि त्यांनीं प्राप्त झालेला आत्मिक आनंद या नृत्यांत व्यक्त करण्यांत येतो. तो व्यक्त करतांना या नर्तिकेनें जो स्थितप्रज्ञाचा संयम व्यक्त केला, त्यानेंच या नृत्याला अपार गांभीर्य आणि अपार सौंदर्य प्राप्त झालें. या नृत्यांत अंगविक्षेपाबरोबर हाता-बाहेर आलेल्या लांब बाह्यांचाहि विक्षेप असतो – या विक्षेपांतून बुद्धभक्ताची साधना व्यक्त होते. ती करीत असतांनाच साधकाला निर्वाणाचा साक्षात्कार होतो आणि तो तेथें उभ्या असलेल्या ढोलावर हात मारून तो व्यक्त करतो. ढोलावरच्या थापेची लय ही या नृत्याची खास लय आहे. या लयीनें मन भारावलें.

●●●

या नृत्यानें भारावलेल्या वृत्तीनें आम्ही त्या उद्यानांत हिंडलों. त्या उद्यानाचें 'गुप्त उद्यान' हें नांवहि या वृत्तीची लहर वाढवीत होतें. पूर्वी राजघराण्यांतील व्यक्तींनाच या उद्यानांत फेरफटका करतां येत असे, म्हणून या उद्यानाला 'गुप्त उद्यान' हें नांव पडलें. या गद्य स्पष्टीकरणानें या वृत्तीची तार उतरली नाहीं इतका त्या नृत्याचा परिणाम झाला होता आणि वातावरणच तसें होतें; वसंताची कोवळी हवा, थंडीच्या शिरशिरींत सुख भरणारें सूर्याचें कोवळें ऊन, वसंताच्या झुळुकीमुळें वृक्षांच्या शहारलेल्या फांद्या, उंचसखल जागेवर वाढलेल्या शेलाटी वृक्षांचें विलग व्यक्तित्व दर्शविणारें त्याचें आकारशिल्प या बागेतून हिंडतांना वायलसारख्या विरळ चांदण्यांतून हिंडल्यासारखें वाटत होतें आणि वृत्तीवर नाजुक नाजुक भावनांचा शिडकावा होत होता. मला आपलेसें करून घेतलेल्या त्या दांपत्यांतल्या मिसेस् किम, दोन वर्षांपूर्वी आपण याच बागेंत कसें प्रणयाराधन केलें हें मला सांगत होत्या आणि त्या

प्रणयाराधनाची तरंगती स्मृति त्यांच्या नजरेंत तरळत होती. याच बागेंत मला नुकतेंच उमललेलें एक चेरीचें झाड आढळलें आणि चेरीच्या मोहराची जादू म्हणून जी काय म्हणतात त्याचा साक्षात्कार झाला. कोरीआंतली चेरी अधिक सुंदर आहे असा निर्णय मीं देऊन टाकला. विशिष्ट मनःस्थितींत हें झाड पाहिल्यामुळें असें वाटलें असें जपानी चेरीचे अभिमानी म्हणतील, पण दुसऱ्या दिवशीं कोरिअन विद्यापीठाच्या आवारांत एका मोहरलेल्या चेरीखालीं उभा राहिलों आणि त्याच्या मोहराकडे टक लावली तेव्हांहि असाच साक्षात्कार झाला.

या उद्यानाला 'गुप्त उद्यान' हें नांव कोरिअनांनीं ह्व्या त्या कारणानें दिलेलें असो, मला त्या नांवाची एक निराळीच प्रतीति आली. विमानांतून येतांना कोरिआचें जें उजाड, ओसाड दर्शन झालें होतें तें मनांत ठसल्यामुळें अशा एखाद्या नंदनवनाची अपेक्षा मीं केली नव्हती आणि आतां तर मी या नंदनवनांत प्रत्यक्ष हिंडत होतों. राजांच्या थडग्यांच्या तेथें मला असेंच वाटलें. आधींच राजाचें थडगें म्हणजे एक प्रेक्षणीय स्थळ, एक आकारशील टेकडी, त्यावर अर्धगोलाकार थडगें, थडग्याभोंवतीं शोभिवंत कठडा, समोर व बाजूला सेनानींच्या, सरदारांच्या, निरनिराळ्या प्राण्यांच्या प्रतिमा आणि टेकडोसमोर कोरिअन वास्तुशिल्पाचे अलंकार ल्यालेली एक छोटीशी इमारत अशीं अनेक थडगीं, त्यांच्या टेकड्यांच्या दरम्यान अनेक शलाटी झाडें, त्यांच्या अंगावर वसंताचे स्फुट-अस्फुट शहारे, कांहींच्या फांद्यांवर कोवळीं कोवळीं पानें, तीं सूर्याच्या प्रकाशांत खुलून निघालीं आहेत, झाडांच्या पायथ्यांशीं ओहळ वाहत आहेत, त्यांच्या खळाळत्या पाण्यावर ऊन नाचत आहे, सारी झाडें वाऱ्यांत मंद मंद डुलत आहेत, वातावरणांत वनश्रीचा हा नव्हाळीचा आनंद आणि मृत्यूच्या स्मृतीचें गांभीर्य यांचें एक शांत-निभ्रांत मिश्रण दाटलें आहे. मला वाटलें राजाच्या आत्म्याला स्वर्गांत सुख मिळवण्यासाठीं हा सारा खटाटोप, पण त्यांना खरोखर येथेंच चिरशांति लाभत आहे.

●●●

सकाळीं उठलों, खोलीचा पडदा सरकवला आणि समोरच्या डोंगराचीं धुक्यानें वेढलेलीं व ढगांनीं भरलेलीं शिखरें पाहिलीं. सकाळीं

उठून खिडकीबाहेर नजर टाकली नि हीं शिखरें दृष्टीस पडलीं कीं, आपण कोठें आहोंत याची तत्काळ जाणीव होई. सउलमध्यें कोणत्याहि इमारतीच्या कोणत्याहि बाजूच्या खिडकींतून पाहा, हीं शिखरें दृष्टीला पडतील. सउल शहर डोंगराच्या रांगांनीं वेढलेलें आहे. सउल बसविणाऱ्यांनीं आपलें नगर-रचनाकौशल्य शहराची आखणी करण्यांतच, आडव्या-उभ्या समांतर रस्त्यांनीं तें रांधून टाकण्यांतच व्यक्त केलें असें नव्हे, त्यांचें खरें चातुर्य सउल बसविण्यासाठीं हें ठिकाण निवडण्यांत आहे. आज शेंकडों वर्षें डोंगरांच्या या रांगा सउलच्या जीवनाचे साक्षीदार व आधार म्हणून उभ्या आहेत. त्यांनीं सउलचें जीवन घडविलेलें आहे, त्याची प्रकृति बांधलेली आहे. अनेकांनीं अनेक कारणांसाठीं या डोंगरांचा आधार घेतलेला आहे. सुखवस्तु लोक या डोंगरांत वनविहारासाठीं जातात; तत्त्ववेत्ते चिंतनासाठीं जातात; कवि स्फूर्तीसाठीं तिकडे वळतात; क्रांतिकारक आश्रयासाठीं आणि चोर लफंगे लपण्यासाठीं. या डोंगरांनीं सर्वांना आश्रय, आधार दिलेला आहे. प्रत्येकाच्या डोळ्यांत त्यांचें प्रतिबिंब पडलेलें आहे आणि प्रत्येकाला त्याच्या दर्शनांत आपली ओळख पटलेली आहे. या डोंगराच्या उजाड राकट स्वरूपांत कोरिआची प्रकृति दिसते, त्यांच्या भव्यतेंत त्यांची संस्कृति आढळते, त्यांच्या अभंग अस्तित्वांत या संस्कृतीच्या सातत्याची जाणीव होते आणि मनाला आधार मिळतो.

आज जपानला परतायचें. सकाळीं उठलों, डोंगराच्या शिखरांचें दर्शन घेतलें नि आवरण्याच्या उद्योगास लागलों. तयार झालों. अद्याप गाडी येण्यास अर्धा तास होता. खिडकींत आलों नि त्या डोंगरांच्या रांगांकडे पाहात राहिलों. डोंगर धुक्यानें वेढलेला होता. धुकें विरत होतें, वाऱ्यावर वावरत होतें. सूर्याचे किरण त्यांतून येत होते, लपत होते.

मी असा पाहात राहिलों नि वाटलें, आतां या शिखरांचा निरोप घेतला म्हणजे पुरे – इतर कोणाचा घ्यायला नको !

●●●

# बर्लिन

बर्लिन हॉटेलच्या आसपासचा भाग मोकळा आहे, उजाड आहे. त्यावर बर्लिन हॉटेलची इमारत एकाकीपणें उभी आहे. इमारत आधुनिक आहे. सिमेंट, कांच, पोलाद यांचा मोठा अव्ययावत् उपयोग करून बांधलेली आहे. वास्तुशास्त्रज्ञाच्या ज्ञानाच्या खुणा तिच्यावर दिसत आहेत. पण सौंदर्यापेक्षां उपयुक्ततेची दृष्टि अधिक आहे. त्यामुळें ती डोळ्यांत भरली

तरी मनांत ठसत नाहीं. आणि युद्धापूर्वीच्या बर्लिन हॉटेलची वर्णनें आणि या वर्णनांतून जाणवणारा झोंकनोक माहीत असल्यामुळें ती निराशाजनक वाटते आणि भोंवतालचा भाग अधिकच उजाड वाटतो.

त्या दिवशीं दुपारीं हॉटेल बर्लिनकडून हॉटेल हिल्टनकडे चाललों होतों. जूनचा सूर्य डोळे वटारून पाहात होता. आणि हा भाग रखरखीत भासत होता. क्षणभर युद्धांतली बेचिराखी सभोंवार साक्षात् पसरल्यासारखें वाटलें. प्लेगची साथ येऊन गेल्यावर कुटुंबांतली एकाद दुसरी व्यक्ति मागें राहाते त्याप्रमाणें त्या उजाड भागावर चारदोन इमारती उभ्या होत्या. आतां या इमारती किती ओसाड दिसल्या ! ओसाड आणि कुरूपहि ! पूर्वीं त्या डावी उजवी-कडे इतर इमारतींना भिडून होत्या. त्यांच्या बाजूचा भाग दिसत नव्हता. फक्त पुढचा मागचा दर्शनी भाग दिसे, तो अर्थात् सुंदर असे. आतां तेवढ्या भागाचा जीर्णोद्धार केलेला होता. पण तिकडे लक्ष जात नाहीं. बाजूच्या सलग सपाट भिंतीकडे तेवढें जातें – आणि त्या किती उघडया ओक्या भेसूर दिसतात ! आणि त्या इमारतींचा एकंदर आकार तरी किती बेढब ! चिंचोळा आणि लंबाडा ! आपल्या मुंबईच्या चाळींप्रमाणें. इतर इमारतींच्या गटाचा एक भाग म्हणून त्या ठीक होत्या – आतां माळावरच्या एकाद्या बेवारशी घराप्रमाणें दिसतात !

त्यांच्या आसपास बर्लिनकरांचा हातहि फारसा फिरला नव्हता. महा-युद्धानें एकट्या बर्लिनमध्यें चार कोटि घनफूट ढिगारा गोळा केला, त्यांतला येथें किती पडला होता नकळे ! बर्लिनच्या पुनरुद्धारात गर्क असलेल्या हातांनीं हा ढिगारा काढून नेला होता, पण बरीचशी धूळ मागें राहिली होती. हिंदुस्थानांतल्या धुळीला सरावलेला माझा पायहि या धुळीला बिचकत होता. या धुळींत दडलेल्या अर्थाला अडत होता. ही धूळ दर पावलागणिक सांगत होती कीं इतिहास म्हणजे काय, अखेरीस धूळच ! हिटलर इतिहास निर्माण करायला गेला आणि प्रत्यक्षांत त्यानें ही धूळ निर्माण केली ! त्या बायबली वचनांतली धूळ ती हीच !

हिटलरच्या इतिहासाची धूळ उडवीत मी चाललों होतों, आणि माझा पाय एकदम कसल्यातरी टणक भागावर आपटला. मी खालीं पाहिलें. जमीन थोडीशी उकरली होती, आणि एक गुळगुळीत फरशी दिसत होती.

कोणत्यातरी घराच्या अंगणाची फरशी ! आतां तें घर नव्हतें. अंगणहि उडालें होतें. पण अनेक स्मृति या फरशीनें धारण केलेल्या असतील. या अंगणांतच गोजिरवाणीं मुलें खेळलीं होतीं. या अंगणांतच केसाळ कुत्री पसरलीं होतीं. आणि तिचीं गुबगुबित पिलें तिच्या अंगावर चढून लुचत होतीं. त्या दिवशीं कातरवेळीं ॲनचें पहिलें चुम्बन प्रियकरानें येथेंच घेतलें आणि युद्धावर निघालेल्या कार्लला आईनें आंसवांचा निरोप येथेंच दिला. कार्ल परत आलाच नाहीं, आणि आईचा देह येथल्या ढिगाऱ्यांत मिळून गेला !

● ● ●

आमची परिषद स्प्री नदीवरच्या कॉंग्रेस हॉलमध्यें भरत असे. मी बहुधा तिकडे चालतच जाई. बर्लिन हॉटेलकडून कॉंग्रेस हॉलकडे जाणारा रस्ता एका प्रचंड स्तंभाकडून जातो. या उंच, भव्य, वर्तुलाकार स्तंभावर एक उभार पंखांची मूर्ति आहे. सूर्यप्रकाशांत उजळणारी ही सोनेरी मूर्ति लगेच नजरेंत भरते. १८७१ सालीं मिळविलेल्या विजयाचें हें स्मारक आहे. महायुद्धांतल्या माऱ्यांत एकतीस टक्के बर्लिन जमीनदोस्त झालें. बहुतेक साऱ्या सार्वजनिक इमारती उध्वस्त झाल्या. पण या विजयस्तंभाला काडीमात्र इजा पोचली नाहीं ! आज ती उजळणारी मूर्ति म्हणजे इतिहासाचें मिस्किल हास्य वाटतें ! हा विजयस्तंभ भुईसपाट झाला असता तर कलेच्या दृष्टीला तरी वाईट वाटलें नसतें. या विजय-स्तंभाच्या सभोंवार जर्मन सेनानींचे दोन–तीन पुतळे आहेत. या सेनानींची मला कांहीं माहिती नाहीं, ती करून घेण्याचीहि गरज वाटली नाहीं. पण येथून जातांना नजर आवर्जून या पुतळ्यांकडे जाई आणि त्यांच्यांत कलेची जी एक स्वैर फेंक आहे त्यात चूर होई. इतिहासाचा मिस्किलपणा या पुतळ्यांत कधीं व्यक्त झाला नाहीं. कला असल्या अगर कसल्याहि मिस्किल-पणाच्या पलीकडे जाते ती अशी !

● ● ●

या विजयस्तंभाच्या वर्तुळांतून एक रस्ता सरळ ब्रॅण्डेनबुर्गर टॉरला जातो. रेनॉसॉं वास्तुशिल्पावर बॅरोक लेणीं मिरविणारा हा दरवाजा

पूर्व–पश्चिम बर्लिनच्या सीमेवर उभा आहे. एका काळीं हा दरवाजा म्हणजे बर्लिनचें वैभव होतें. त्याच्या शिखरावरच्या चार अश्वारूढ मूर्ती युद्धांत नष्ट झाल्या होत्या, त्या पश्चिम बर्लिननें पुनः बसविल्या आणि पूर्व बर्लिननें त्या पूर्ववत् दरवाजावर बसविण्यास अनुज्ञा दिली. यावरून या दरवाजाला समग्र बर्लिनवासियांच्या अंतःकरणांत आजहि कोणतें स्थान आहे याची कल्पना येते. या दरवाजाच्या दर्शनानें पश्चिम बर्लिनकरांची अंतःकरणें भरून येतात, पण लगेच अवस्थ होतात. या दरवाजांतून पलीकडे उध्वस्त बेचिराख दृश्यें दिसतात, अनेक दिसत नाहींत. आणि मग कसली तरी अस्पष्ट, अबोध, गूढ भीति दाटते. ●●●

विजयस्तंभाच्या एका बाजूला टीर–गार्डन आहे. बर्लिनचें हें एक प्रसिद्ध उद्यान. पश्चिम बर्लिनच्या १८५ चौरस मैलांच्या विस्तारांत अशीं अनेक उद्यानें, अनेक मैदानें आहेत. त्यांची निगा राखण्याची दक्षता बर्लिन-करांनीं बाळगलेली आहे. त्यांचा सौंदर्यसाधक हात यांच्यावर फिरलेला आहे. चढउतारावर पसरलेल्या या बागा आणि हीं मैदानें डोळ्यांसमोर एखाद्या गालिच्याप्रमाणें उघडत जातात, आणि त्यांच्यावरची वृक्षांची, फुलझाडांची नक्षी नजरेला वेध लावते. गेल्या आठ–दहा वर्षांत लावलेल्या रोपांच्या रांगा विशेष नजरेंत भरतात. त्यांच्या वाढत्या वयांचें तेज या जून महिन्यांत पानांच्या रेषारेषांतून ओसंडत होतें. त्यांच्या रंगदार चैतन्याची सळसळ डोळ्यांना येऊन भिडत होती. जिकडे तिकडे रोपेंच रोपें दिसत होते. त्या मानानें वाढलेलीं झाडें कमी. जीं होतीं त्यांच्यापैकीं असंख्यांचे ढेरे मोडलेले आणि शेंडे तुटलेले. वैमानिक माऱ्यानें त्यांच्यावरही आग पाखडली होती आणि त्यांचे थोटे आणि भुंडे अवतार केविलवाणे दिसत होते. बर्लिनची उजाड कळा या उद्यानांवर व मैदानावरहि पसरलेली होती आणि ग्रीष्माचें तेज प्यालेलीं शेंकडों हजारों रोपें तीं दूर करण्यास असमर्थ होतें.

●●●

एकदां कॉंग्रेस हॉलकडे जातांना हॉलच्या कचेरींत काम करणारा एक गृहस्थ बससाठीं उभा असलेला दिसला. मी म्हटलें, आपण बरोबरीनें


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ................ वि: ..................
क्रमांक .................. नों दि ..............

चालतच जाऊं या. त्याच्या चेहऱ्यावर एक काळजीची छटा पिळवटून गेली. पण लगेच तो म्हणाला, ‘ चला. ’ तो चालूं लागला नि अद्यापपर्यंत ध्यानांत न आलेली गोष्ट लक्षांत आली कीं तो पायानें अधु आहे; बहुधा, जन्मापासून नव्हे, गेल्या महायुद्धापासून. मला तोंडांत मारून घेतल्यासारखें झालें. आतां त्याला नको म्हणणें म्हणजे त्याच्या अंतःकरणांत जखम करण्यासारखें होतें आणि त्याच्याबरोबर चालणें म्हणजे त्याच्या शारीरिक व्यंगावर घाव घालण्यासारखें होतें; पण माझा इलाज नव्हता. त्याच्याबरोबर अडत–अडखळत मी चालूं लागलों. पण त्याच्या गप्पांनीं या अडण्या–अडखळण्याला रमण्या–गमण्याचें स्वरूप येत होतें. बर्लिनकरांच्या कोणत्याहि गप्पांप्रमाणें याहि गप्पांचा ओघ राजकारणाकडे वळला आणि त्याच्या गप्पा पुनः पुन्हां एकाच पालुपदावर येऊं लागल्या. We are proud of our burgomaster! मेयर विली ब्रॅण्ट यांनीं बर्लिनकरांच्या अंतःकरणांत आदराचें, आपुलकीचें, भक्तीचें स्थान मिळविलें आहे. आमच्या नेहरूंनींहि आम्हा भारतीयांच्या अंतःकरणांत असेंच स्थान मिळविलें आहे. आमच्या राजकीय गप्पांचाहि ओघ अचूकपणें नेहरूंकडे वळतो. पण म्हणून आम्ही सारखे We are proud of our Prime Minister असें परकीयांपाशींहि म्हणत नाहीं. पण बर्लिनकरांना त्याची गरज वाटते – कारण ती ब्रॅण्डेनबुर्गर टॉरपलीकडची गूढ भीति! तिची आर्त आंच त्यांच्या अंतःकरणांत सलत असते. आणि तिला तोंड देण्याचा निर्धारहि दाटत असतो. विली ब्रॅण्ट हे या निर्धाराचे प्रतीक आहेत.

●●●

ब्रॅण्डेनबुर्गर टॉरपलीकडच्या त्या गूढ भीतीनें माझीहि बुद्धि आणि दृष्टि गोंधळविली असावी. नाहींतर एक वास्तुकलात्मक आश्चर्य म्हणून नांवाजलेल्या काँग्रेसहॉलचें सौंदर्य मला कां जाणवलें नसतें? ब्रॅण्डेनबुर्गर टॉर पलीकडेच जरा अंतरावर आहे – म्हणून का त्या हॉलचा असामान्य आकार मला आवडला नाहीं? स्प्री नदीवरून जाणाऱ्या मालवाहू होड्या पलीकडे जाऊन अडत असतील; आणि किती दिवस या होडया अशा निःशंकपणें फिरतील, या शंकेमुळें कां नदीच्या कांठावरील कोवळ्या उन्हांत बसून केलेलें

जेवण मला इतके मजेदार वाटलें नाहीं ! त्या हॉलकडे असें साशंक कधीं मी पाहिलेलें नसतें तर त्या हॉलच्या फॉयेरमधले प्रचंड स्तम्भ पाहून मला ब्रॅबची आठवण कां झाली असती ! त्या हॉलच्या मुख्य सभागृहातच काय तें माझें मन स्वच्छ झालें. त्याच्या सौंदर्यानें मला जिंकलें. या सभागृहाच्या भिंतींना उभ्या लाकडी वाशांचें पोतदार खापदार आच्छादन देऊन शास्त्रशुद्ध ध्वनिप्रसरणाबरोबर सौंदर्य साधण्याची युक्ति मला फार आवडली. व्यासपीठा-वरील वक्त्यांचीं भाषणें ऐकतांना आणि त्यांच्या हावभावांचें निरीक्षण करतांना माझी दृष्टि मध्येंच या लाकडी वाशांकडे जाई आणि त्यांच्या पोताला स्पर्श करून परत येई. पण या सभागृहाच्या बाहेर आलें म्हणजे त्या हॉलच्या वास्तूकलेचें चैतन्य कसें केव्हां कोळपून जाई पत्ताच लागत नसे. ●●●

हिल्टन हॉटेलपलीकडच्या बर्लिनच्या नव्या वास्तुकलेचीहि अवस्था थोडीशी अशीच झाली. ब्रासीलियाची कल्पनारम्यता बर्लिनच्या नव्या इमारतींत नाहीं – तसा त्यांच्या निर्मात्यांचा हेतुच नव्हता. पण निखळ रेषा, नितळ पृष्ठभाग, सरल–गोल भूमितिप्रणीत आकार, शक्तिशाली स्तंभ, सिमेंटचा रंगदार पोत, काचेच्या काळ्या, निळ्या, हिरव्या, किंचित् लालट छटा, पोलादाच्या वा ॲल्यूमिनियमच्या चकचकीत चवकटी, जिनेव्हराण्डे बनवितांना केलेले अवकाशाचे प्रयोग, चौकोनी चतुष्कोणी खिडक्यांनीं परस्परांशीं प्रमाणें आणि अंतरें राखून निर्माण केलेला दर्शनी पट, निरनिराळ्या इमारतींच्या बंदिशींतला सूक्ष्म भेद, इमारतींच्या परस्पर प्रमाणभेदांतून निर्माण केलेली लक्ष्यवेधक आकाशरेषा, इत्यादि गोष्टींनीं बर्लिनच्या नव्या वास्तूशास्त्रानें आकृतीचे, रेखांचे, नितळ सौंदर्याचें, तरल चैतन्याचे अनेक नमुने निर्माण केले आहेत. हान्सा इस्टेट म्हणजे अशा प्रयोगांचें एक प्रदर्शनच आहे. अमेरिकेचे ( पूर्वी जर्मनीचे ) वॉल्टर ग्रोपीयस, फ्रान्सचे लोपेझ् आणि बॉँदू, स्वीडनचे यानेक आणि सेम्युएलसॉन, ब्राझीलचे ऑस्कर निमेये, हॉलंडचे ब्राकेमा आणि व्हान डेन ब्रोएक, स्वित्झर्लंडचे सेन, इंग्लंडचे यार्क, डेन्मार्कचे फिस्कर आणि याकोबसेन, फिनलंडचे आल्वर आऽल्टो, इटलीचे बाल्डेसारी, पॅरिसचे पिएर व्हागो – आणि जर्मनीचे अनेक, मिळून एकंदर पन्नास विख्यात वास्तूशास्त्रज्ञ एकत्र आले, प्रत्येकानें आपल्या कल्पना, आपली

दृष्टि, आपली रीति एकत्र आणली, आणि त्या सबंध इस्टेटींत कांहीं एक संगति, कांहीं एक एकात्मता, कांहीं एक संकलित रूप निर्माण करण्याच्या मर्यादेंत एकेक इमारत बांधायला घेतली, आणि सिमेंट, कांच, पोलादाच्या एकाच सामुग्रींतून एकेक वैशिष्ट्यपूर्ण वास्तू निर्माण केला. मग आजूबाजूला पटांगणें आंखलीं, त्यावर आधुनिक शिल्पकृतीचे नमुने उभारले, दोन लक्ष्य-वेधक चर्चेस् बांधलीं आणि या साऱ्यांतून रंग, रूप, आकार, अवकाश यांचा एक चित्रविचित्र पण एकात्म पट निर्माण केला. जें हान्सा इस्टेटमध्यें या पन्नास वास्तुशास्त्रज्ञांनीं केलें तें हाइस्बर्गर ड्रायेकमध्यें ले कॉर्बुसिएनीं एकाच प्रचंड इमारतींत एकांडेपणानें केलें, पॉल जी. आर. बॉमगार्टेननीं संगीत शाळेच्या इमारतींत केलें, ब्रूनो ग्रिमेकनीं अमेरिका हौसमध्यें केलें, ग्रॅास–फॉकरनीं शिलर थिएटरमध्यें केलें, सोब्रोत्का म्यूलरनीं दाह्लेमच्या फ्री युनिव्हर्सिटींत केलें, रॉय–श्यूबर्टनीं सिनेटच्या इमारतींत केलें, बोर्नमन-प्रभृतींनीं अमेरिका मेमोरिअल लायब्ररीच्या इमारतींत केलें आणि शॉश्झबर्गरनी झू–विभागांतल्या कचेऱ्यांच्या इमारतींत केलें – म्हणजे या सर्वांनीं बर्लिनमध्यें आधुनिक वास्तूशास्त्राचे अस्सल, अव्वल नमुने निर्मिले.

या साऱ्या इमारतीच्या रूपानें बर्लिनची उद्योगशीलता, बर्लिनची विजिगीषा, बर्लिनचा उन्मेष, बर्लिनचा उत्कर्ष, बर्लिनचा अभिमान आणि निर्धार या साऱ्यांचें समूर्त दर्शन झालें. पण कॉंग्रेसहॉलनें माझ्या अंतःकरणां-तली अस्वस्थता चाळवली तशीच या जोरकस आव्हानवजा इमारतींनीं चाळविली. त्यांचा हा जोर किती दिवस चालेल ? ब्रॅण्डेनबुर्गर टॉरपलीकडचें भूत याची मुंडी केव्हां मुरगळील ? पण मुंडी मुरगळण्याचेंहि कारण नाहीं – येऊन त्यांच्या मानेवर बसलें म्हणजे भागलें ! मग त्याचा नक्षा उतरण्यास किती उशीर ! आज जे अद्ययावत् वास्तूशास्त्राचे नमुने म्हणून मिरवितात ते मग जुनाट, ओशट, कुजट संस्कृतीचीं लक्षणें ठरतील. याहून दुसरी मानहानि कोणती ?

● ● ●

त्या दिवशीं दुपारीं मीं कुर्फ्युर्स्टेनडाम (कुण्डाम) रस्त्यावरून एक चक्कर घातली तेव्हा मात्र ही अस्वस्थता कोठच्या कोठें उडून गेली. बर्लिनचें

उभें ऐश्वर्य या रस्त्यावर हजर आहे. बर्लिनच्या उत्तमोत्तम आधुनिक इमारती येथें आहेत. त्यांत एकाहून एक संपन्न समृद्ध अशीं दुकानें आहेत. त्याच्या शृंगारलेल्या खिडक्यांत एकाहून एक आकर्षक अशी दृश्यें आहेत. या एकेका दृश्यानें मी ओढला गेलों. भारला गेलों. आधुनिक जीवन किती संपन्न आहे, किती विविध आहे, किती आनंदमय आहे, मानवाचें आयुष्य अर्थपूर्ण करण्यासाठीं किती नवनवीं साधनें निर्माण झालीं आहेत, त्याचें नुसतें धावतें दर्शन घेण्यानें मनाचा, आत्म्याचा विकास होतो असें वाटतें, आधुनिक जीवनांत किती कला आहे, किती संस्कार आहे, किती विज्ञान आहे, किती अर्थपूर्णता आहे याची प्रतीति आली – आणि जीवनावरचा विश्वास वाढला, वृत्ति आशेनें भरून गेल्या आणि हें जीवन, ही संस्कृति, हें विज्ञान यांच्या चिंतनांत निमग्न होऊन गेलों.

पण जरा वेळानें पश्चिम बर्लिन आणि पूर्व बर्लिन यांची अपरिहार्य तुलना सुरू झाली. पूर्व बर्लिन आणि पश्चिम बर्लिन म्हणजे परस्पर विरोधाचें एक समर्पक प्रदर्शन आहे. पश्चिम बर्लिनच्या वास्तुशास्त्रानें आपण चकित होतों तर पूर्व बर्लिनमधल्या बेढब, अवाढव्य, एकसुरी वास्तुदर्शनाचा आपल्याला उबग येतो. कुण्डामवरच्या दुकानांतलें वैभव आणि स्टालीन-ॲलेवरच्या दुकानांतला भिकारडेपणा, पश्चिम बर्लिनच्या रस्त्यावरची उत्सुक गर्दी आणि पूर्व बर्लिनमधल्या रस्त्यावरचा भयाण ओसपणा, पश्चिम बर्लिनमधला आनंद उत्साह तर तिकडची भकास मरगळ – हा विरोध अंतःकरणाला भिडतो. पण या विरोधामागें भीतीहि शिरते! ब्रॅण्डेनबुर्गर टॉरपलीकडल्या भुताला हा विरोध किती दिवस सहन होईल! पुन्हा अस्वस्थता वाढली. पश्चिम बर्लिनच्या दर्शनावर असुरक्षिततेचीं, अनिश्चितपणाचीं पुटें बसलीं.

●●●

पण माझें कैझरचर्चच्या पडक्या मनोऱ्याकडे लक्ष गेलें आणि मन पुनः स्वस्थ झालें. या पडक्या दृश्यानें ब्रॅण्डेनबुर्गर टॉरपलीकडच्या अनेक पडक्या झडक्या इमारतींची आठवण होऊनहि स्वस्थ झालें. या चर्चचा हा प्रचंड कलापूर्ण मनोरा अखंड उभा होता तेव्हां त्याच्यांत जी आत्मिक शक्ति नव्हती ती आज त्याच्या या पडक्या रूपांत आहे. हें

उध्वस्त रूप कोठूनहि नजरेस पडेल अशी इमारतींची आणि रस्त्यांची रचना बर्लिनकरांनीं केली आहे. नव्या आधुनिक उन्नत इमारतींच्या झगमगाटांत हा पडका मनोरा केविलवाणा वाटत नाहीं, उलट प्रतिष्ठेनें शोभतो, कारण केवळ वास्तूचा एक अवशेष म्हणून तो उभा नाहीं. बर्लिनकरांनीं त्याला एक अर्थ, आशय प्राप्त करून दिला आहे. युद्धाच्या विनाशक शक्तीचें संस्मरण म्हणून हा मनोरा तशाच पडक्या अवस्थेंत शिल्लक राखण्यांत आला आहे. त्याच्या भोंवतालच्या इमारतींची अवहेलना करण्यास आलेल्या पूर्व बर्लिनच्या भुताचाहि हृदयपालट त्याच्या दर्शनानें होईल.

●●●

पण पश्चिम बर्लिनमधल्या कांहीं दृश्यांना असा कांहीं आधारहि लागला नाहीं. कुण्डामवर फूटपाथच्या एका कोपऱ्यास एक घडा आहे. साधाच आहे. पण त्याच्या आकारानें माझें लक्ष वेधलें आणि क्षणभर सभोंवतालच्या जगाचा विसर पाडला. संगीत शाळेच्या नव्या इमारतींत असाच अनुभव आला. त्याच्या सभागृहाच्या रचनेनें वास्तुशास्त्रज्ञांत वाद निर्माण केला आहे. त्यांतलें मला कांहीं कळलें नाहीं, पण या इमारतीच्या व्हरांड्यांत संगीत – श्रवणानें अंतःकरणांत भावनांच्या ज्या आंदोलित रेषा निर्माण होतात त्यांचीं जीं केवलाकार चित्रें आहेत अगर भावनांच्या आंदोलनांना मूर्तरूप देणारें जें केवलाकार शिल्प आहे त्याच्या दर्शनानें माझें भान उडालें. पण याहूनहि अधिक ती, त्या प्रचंड इमारतीच्या खांबाशीं बसून फुलें विकणारी मुलगी ! सोनेरी केंसांची भुंग्यासारख्या डोळ्यांची आणि नीटस नितळ अवयवांची. त्या इमारतींतल्या एका उपाहारगृहांत मी जेवायला जात असें तेव्हां ती पाहायची आणि अशी गोड हसायची. ती अशी हसली कीं तिच्या पुढ्यांतले कार्नेशन्सचे गुच्छ टवटवीत वाटायचे आणि माझ्या आंत कसली तरी लहर उठायची ! मी एकदां फुलें विकत घ्यायला गेलें नि तिला इंग्रजी येत नाहीं असें समजलें तेव्हां आंतल्या धाग्यांची गुंतागुंत थोडी ओढली गेली – पण तें पलीकडचें भूत कांहीं जागें झालें नाहीं.

●●●

निर्भेळ, निःशंक आनंद देणारीं आणखी कांहीं ठिकाणें आणि आणखी कांहीं वेळा बर्लिनमध्यें आहेत. कुण्डाम रस्त्यावर रात्रीं जा, प्रकाशाचें सिंचन करणाऱ्या दिव्यांचा कमळकलीसारखा आकार पाहा, पावसाची सर येऊन गेल्यानंतरच्या ओल्या रस्त्यावरचीं निऑन लाईट्सच्या रंगाकृतींचीं तरल कलदार प्रतिबिंबें टिपा, या रंगाकृतींनीं दुतर्फा फुललेल्या इमारतींच्या रांगा पाहा, या प्रकाशांनीं उजळलेले लोकांचे डोळे पाहा, त्यांतला उत्साह, आनंद निरखा, मुलींच्या टोंकदार – टांचदार पावलांची नखरेल लकब पाहा, त्यांच्या खांद्यावरच्या पुरुषाच्या हातांची नाजुक हालचाल पाहा, कॉफीच्या दुकानांत त्या टेबलाभोंवतालच्या नजरा एकमेकांत कशा ओथंबून पाहात आहेत पाहा, तेथल्या गप्पांना हास्याचे बिलोरी कंगोरे कसे पडत आहेत त्याचा वेध घ्या – दुपारच्या वैभवनगरीचें आतां एकाद्या स्वप्नपुरींत रूपांतर झाल्यासारखें वाटेल. आपल्या जन्मभर दरिद्री भकास दृश्यांवर पोसलेल्या दृष्टीला तर हें स्वप्नांत स्वप्न उमललें असें वाटेल.

अथवा रविवारीं दुपारीं टेगेल किंवा वान्सी सरोवरावर जा, तेथल्या पाण्यांत स्वतःला झोंकून देण्याच्या पवित्र्यांत असलेल्या स्त्रीपुरुषांना पाहा, वाऱ्याच्या कणाकणाबरोबर आपला सारा जीव पाखडणाऱ्या मुलांच्या उड्या पाहा, होडी वल्हविण्याच्या उल्हासानें किंवा नुसत्याच अपेक्षेनें फुगलेले उघड्या दंडांचे स्नायू पाहा, एखाद्या लॉंचमधून किंवा नावेंतून भटकून येणाऱ्यांचा पोशाखी उत्साह पाहा, हिरवें–निळें–काळें पाणी कापीत जातांना फेंसाचा फवारा सोडून देणाऱ्या लॉंचनें हिसळलेलें पाणी सूर्याच्या प्रकाशांत कसें खुलतें तें पाहा, लॉंचमधून जातांना वाऱ्याचा झोत चेहऱ्यावर गार शिडकावा कसा करतो त्याचा अनुभव घ्या, लॉंच जसजशी अंतर कापते तसातसा काठचा निसर्ग नवनवीं रूपें कसा दाखवितो तें पाहा, हिरव्या झाडीवर सूर्यानें पसरलेल्या सोनेरी मायेला सौम्य – गडद छटा कशा प्राप्त होतात तें पाहा, झाडींत लपलेल्या घरांच्या धुराड्यांतून बाहेर आलेला धूर अनंत आकार धारण करून वातावरणांत कसा विलीन होतो तें पाहा, दूरच्या चर्चच्या मनोऱ्यांतून आलेला घंटानाद आसमंतांत लहरत जातो, त्याचा वेध घ्या. दूर पाण्याच्या विस्तारावर डोलणाऱ्या नावेच्या वाऱ्यानें फुगलेल्या शिडाची ऐट पाहा, अशा दहा पंधरा–वीस शिडांनीं निर्माण

केलेल्या काळ्या–निळ्या विस्तारावरचा पांढरा पट पाहा, अशा एखाद्या नावेशेजारून तुमची लॉंच जोरानें फुरफुरत जाते तेव्हां नावेंतल्या लोकांनीं हात हालवून घेतलेला तुमचा समाचार पाहा, त्या नावेंत सपशेल पसरलेली आणि उघड्या अंगानें ऊन खात असलेली काळा चष्मावाली तरुणी पाहा, ती तुम्ही पाहातां आहांत तोंच ही रबरी तराफ्यावरची बाई तुम्हांला मिस्किलपणें खुणावते आहे आणि खुणावतां खुणावतां आपल्या तराफ्याला लॉंचची गति देण्याचा प्रयत्न करीत आहे ती ध्यानांत घ्या. इतक्यांत किनाऱ्यावर पोहणाऱ्यांच्या उड्या एकमेकांवर पडत आहेत आणि त्यानें लॉंचच्या आवाजावरहि कडी होत आहे तीहि ध्यानांत घ्या. हा बेभान उत्साह, आनंद, उत्सव, तुम्हांला काळपुरुषाची काळजी वाटत असली तरी ती दूर करील !

● ● ●

या अनुभवाच्या तंद्रींत परत आलों, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं टेंपलहॉफ् विमानतळावर आलों. आवारांत प्रवेश केला आणि एड्युअर्ड लुड्विगचें एअर–लिफ्ट मेमोरिअल नजरेस पडलें. क्षणभर त्याच्या साध्या आकारानें, निखळ रेषेनें आणि विलक्षण जोमानें दृष्टि गुंग झाली. तळावरून विमान उडतांना जो एक वेग भूमींतून कारंजासारखा उठतो त्या काल्पनिक वेगाचें हें मूर्तस्वरूप आहे. १९४८ सालीं स्टालिननें पश्चिम बर्लिनची कोंडी केली आणि बर्लिनकरांच्या नाड्या आंवळून त्यांना शरण आणण्याचा घाट घातला, तेव्हां जीवनाला लागणाऱ्या यःकश्चित् वस्तुसुद्धां विमानानें आणून हा घाट उताणा पाडला गेला, त्याचें हें स्मारक आहे. हें स्मारक पाहिलें, आणि बर्लिनच्या मुक्कामांत वारंवार ग्रासणारी ती अस्थिरता, ती अस्वस्थता पुनः उपटली. ● ● ●

फ्रॅंकफूर्टच्या विमानांत बसलों आणि त्या दिवसाचा तो अनुभव नजरेपुढें आकारला.........त्या दिवशीं सकाळीं एका इंजीनिअर मित्रानें मला पूर्व जर्मनी आणि पश्चिम बर्लिन यांच्या सीमेवर नेलें होतें. एका रस्त्यावरून, मधोमधून, या सीमेची रेखा गेली होती. रस्त्याच्या कडेला कांटेरी तारांचें कुंपण होतें. रस्त्याच्या कुंपणाकडच्या अर्ध्या भागावर खड्डे पडले

होतें, गवत माजलें होतें. अलीकडच्या अर्ध्यावर रहदारीच्या खुणा होत्या. आमच्या ड्रायव्हरनें मोटार उभी केली आणि तारेपलीकडच्या एका आवारांत काम करीत असलेल्या एका वयस्क गृहस्थाकडे बोट दाखवून म्हटलें, ' हा माझा चुलता. तो कम्युनिस्ट नाहीं, पण पूर्व जर्मनींत राहाणं त्याच्या नशिबीं आलं आहे. त्याचे आमचे मोठे जिव्हाळ्याचे संबंध आहेत, पण मी आतां त्याच्याशीं बोलूं शकणार नाहीं. बोललों तर लगेच एकादा सैनिक बंदूक सरसावून येईल.' आमचा ड्रायव्हर हें बोलत असतांनाच त्याच्या चुलत्यानें आमच्याकडे एक ओळखीची नजर टाकली, आणि लगेच खालीं बघून तो आपलें काम करूं लागला.

हा प्रसंग माझ्या नजरेसमोर आकारला – धुरकटला, अंतर्धान पावला; पुन्हां आकारला, पुन्हां धुरकटला, आणि अखेरीस तें तारांचें कुंपण, त्या कांटेरी तारा तेवढ्याच डोळ्यांसमोर शिल्लक राहिल्या.

—युगायुगींच्या जुलमांचें, अत्याचारांचें प्रतीक अशा त्या तारा!

रहस्यरंजन एप्रिल १९६१

●●●

# व्हे नी स

प्रिय —

मिलानच्या विमानतळावरुन हें पत्र मी लिहीत आहें. व्हेनीस सोडून दोन तास झाले, आणि दीड दोन तासांत पॅरिसला जायला निघेन. पॅरिसला जायला मला नेहमींच आनंद वाटतो. पण आतां मात्र व्हेनीसचेच विचार डोक्यांत घोळत आहेत.

पण ते निर्भेळ आनंदाचे अगर उत्साहाचे नाहींत.

संमिश्र आहेत. व्हेनीसच्या प्रथम दर्शनानें माझी थोडीशी निराशाच झाली. व्हेनीसवर खूप असलेले माझे कांहीं मित्र, हा माझ्या अरसिकत्वाचा बिनतोड पुरावा मानतील याची मला जाणीव आहे. माधव आचवल तर अधिकार-वाणीनें उखडतील. पण माझा याला इलाज नाहीं. वास्तुशास्त्रावर बोलण्याचा अर्थात् माझा अधिकार नाहीं, पण जें मला वाटलें नि जाणवलें तें तसेंच व्यक्त करणें हेंच योग्य नाहीं काय ?

कदाचित् व्हेनीसबद्दल माझ्या अपेक्षाच चुकल्या; चुकीच्या कल्पना डोक्यांत भरून व्हेनीसला गेलों, 'थ्री कॉइन्स इन अ फौंटन' हा बोलपट आपण पाहिला होता, तो आठवतो ? त्यांत व्हेनीसचीं कांहीं दृश्यें होतीं — रंगदार दृश्यें. प्रेमाच्या नजरेला सारें कांहीं सुंदर दिसतें तसेंच रंगीत दृश्यांतहि दिसतें. आणि तसें म्हटलें तर व्हेनीस रंगदार आहेच. पाण्याचे रंग, पाण्यावरच्या परावर्तित प्रकाशाचे रंग, इमारतीचे रंग, गोंडोला–लॉंचेस्चे रंग, व्हेनीसमध्यें लोटलेल्या प्रवाशाच्या पोशाखांचे रंग, अशीं रंगाचीं अनेक रूपें व्हेनीसमध्यें आढळतात आणि माझ्या मुक्कामांत हवामानानें कृपा केल्यामुळें सूर्याच्या मुक्त प्रकाशांत मला तीं सारीं उजळून दिसलीं. पण रंगदार चित्रपटांतलीं दृश्यें स्वतंत्रपणें मोहक वाटलीं म्हणून एकंदर बोलपट रसदार वाटेल असें नाहीं, तसेंच शहराचें असतें. व्हेनीसचें संकलित स्वरूप मला फारसें आवडलें नाहीं.

मात्र व्हेनीसच्या कांहीं रंगदार दृश्यांनीं दृष्टि खरेंच स्तिमित होते. (यांतच तितिआन प्रभृतींच्या चित्रांची गणना केली पाहिजे). कालव्यांतून जातांना विविध रंगीन दृश्यांचे संस्कार दृष्टीवर एकसारखे होत जातात. यांत इतिहासाचीं पुटें बसलेल्या इमारतींचे रंग सर्वांत महत्त्वाचे, पण इमारतींवरील रंगांपेक्षां त्यांच्या रचनेनेंच बुद्धि अधिक गुंग होते. या कालव्यांचे धक्के आणि कांठच्या इमारतींचे चौथरे एकच आहेत. या चौथऱ्यांचा पाया खालीं चिखलांत रोवलेल्या लाकडी खांबावर ठेवलेला आहे हें समजलें म्हणजे तर बुद्धि चकितच होते. पुष्कळदा प्राचीन वास्तुशास्त्राच्या रूपापेक्षां त्याच्या बांधणींतील क्लृप्त्याच आपली मति गुंग करतात. तुला आठवतें, १९४४ सालीं आपण इंदूर–बढवायाला एक कारंजें पाहिलें होतें. तें कसें चालतें हें पाहण्यासाठीं ब्रिटिश इंजीनिअरांनीं तें खोललें आणि तेव्हां तें राजापुरच्या

गंगेप्रमाणें जें लुप्त झालें तें, या इंजीनिअरांनीं प्रयत्नांची शिकस्त केली तरी, पुनः चाललें नाहीं. या असल्या चमत्कारांनीं पुराणांतील चमत्कारांची आठवण होते. सारें व्हेनीस शहर दहाव्या शतकापासून हें असें शेषाच्या मस्तकावरील पृथ्वीप्रमाणें उभें आहे. फरक एवढाच कीं शेषाच्या कथेचा उगम कवीच्या प्रतिभेंत होता तर या वास्तविक चमत्काराचा उगम त्या वेळच्या गुलामगिरींत होता. ईजिप्तचे पिरॅमिड्स गुलामांनीं भूमीवर उभारले तर व्हेनीसचे हे खांब गुलामांनीं पाण्यांत रोवले. कमळाप्रमाणें संस्कृतीहि पुष्कळदां चिखलांत उगवते. कोणीतरी म्हटलें होतें, Culture has its roots in the deep dung of cash. या वचनांत थोडी भर टाकली कीं झालें !

पण व्हेनीसचा खरा चमत्कार नैसर्गिक आहे. व्हेनीस म्हणजे काय ? इटलीच्या भूमीचे दोन निमुळते तुकडे दोन बाजूंनीं समुद्रांत घुसले, मध्यभागीं डोक्याला डोकीं भिडवून एका रेषेंत आडव्या पडलेल्या तशा दोन निमुळत्या बेटांना जवळजवळ भिडले, आणि आंत समुद्राच्या पाण्यावर पोसलेला पण समुद्रापासून अलग भासणारा जलविस्तार तयार झाला. या सरोवरसदृश जलाशयांत शंभर बेटें आणि त्यांतलें एक व्हेनीस ! निसर्गाच्या या चमत्काराला जगांत इतरत्र तोड नसेल. पण मानवानें या चमत्काराची योग्य कदर केली काय ? व्हेनीसच्या जलाशयांतला हा शंभर बेटांचा पुंजका म्हणजे घर, बाग आणि पाणी यांचा कलासुंदर पट निर्माण करण्याची अपूर्व संधि. सिंगापूरच्या समुद्रांत अशी असंख्य बेटें आहेत. निसर्गानेंच तीं वनश्रीनें नटवलीं आहेत. पण तीं अशीं शेजारीं शेजारीं नाहींत आणि त्यांनीं मानवाला अशी दुर्मिळ संधि दिलेलीहि नाहीं. व्हेनीसला मानवापुढें ही अप्रतिम संधि आली, आणि ती त्यानें आपल्या जन्मजात हावरेपणानें फुकट घालविली. या बेटांना पुलांनीं एकमेकाशीं जखडून त्यांवर इमल्यावर इमले आणि मजल्यावर मजले उभारण्याचा सोस त्याला लागला. परिणामीं एकाद्या अजस्र पुरानें गांवेंच्या गांवें पोटांत घालावीं त्याचप्रमाणें या इमारतींनीं हीं सारीं बेटेंच्या बेटें आपल्या अंगाखालीं घातलीं आणि आज या इमारती एकमेकांत घुसून आणि एकमेकांना खेटून दाटीवाटीनें थाप उभ्या आहेत – आणि त्यांच्या-मधून वाहणाऱ्या छोट्या कालव्यांची अवस्था गटाराप्रमाणें झाली आहे !

प्रत्येक नव्या पिढीनें नवी भूमि अंगाखालीं घातली, नवीं घरें नव्या इर्षेनें बांधलीं आणि अर्थात् वास्तूवर वास्तू, शैलीवर शैली, अशी सारी गर्दी आणि गिचमिड झाली. एकाची रीत दुसऱ्यानें पुसली नाहीं. परिणामीं गॉथिक खिडक्यांना रोमानस्क खिडक्या भिडल्या, मूरीश कमानीवर बॅरोक गच्च्यांचें कठडे चढले, बायझन्टाईन घुमटांना रेनासाँ स्तंभांचे टेकू चिकटले आणि संगमरवरी नक्षीदार गडद रंगांचे लेप बसले. अर्थात् व्हेनीसमधल्या अनेक इमारतींची मूळची प्रकृति अद्याप अबाधित आहे. त्यांचें वैशिष्टय अद्याप कायम आहे. त्यांची शान, त्यांचा रुबाब, त्यांचा दर्जेदार डौल, आज तीनचार शतकांनंतरहि, जसाच्या तसा आहे. ग्रॅंड कॅनॉलमधून मी मोटार–लॉंचनें सफर केली तेव्हां असे कितीतरी वाडे मला पाहायला मिळाले. पण हें सौंदर्य, हें वैशिष्टय, हें आकर्षण वैयक्तिक आहे; निरनिराळ्या इमारतींचें स्वतंत्र आहे; त्याला एकंदर शहराच्या संकलित सौंदर्याची कळा नाहीं.

माझ्या मतें, व्हेनीसमध्यें मानवानें अवकाशावर अत्याचार केला आहे. वास्तुशास्त्र हें अवकाशाचें शास्त्र आहे. त्यांत घरांतलीं जागा अभिप्रेत आहे तशी बाहेरचीहि आहे. पण व्हेनीसमध्यें घराभोंवतालीं जागाच नाहीं. आणि म्हणून त्यांच्याकडे आपण विस्तृत दृष्टिकोनानें पाहूंच शकत नाहीं, त्याचा समर्पक वेध घेऊंच शकत नाहीं. कोणीतरी म्हणेल, कालव्यालाच तुम्हीं अवकाश मानून कां चालत नाहीं? पण हे कालवेदेखील इतके अरुंद आहेत, कीं कांठच्या इमारती सुंदर असल्या तरी त्यांची शोभा अंतःकरणावर ठसूं शकत नाहीं. अनेकदां तर असें वाटतें कीं आपण या इमारतींना पाहाण्यापेक्षां त्याच माना उंचावून आपल्याला पाहात आहेत. जबलपूर नजिकच्या भेडाघाटला नर्मदेंतून जातांना कांठच्या संगमरवरी खडकांनीं माझ्याकडे असेंच पाहिलें होतें. तेव्हां अंतःकरण थोडेंसें थरकलें होतें आणि आतां गुदमरलें होतें, एवढाच फरक. व्हेनीसचा ग्रॅंड कॅनॉल-देखील कांठच्या इमारतीकडे विस्तृत नजरेनें पाहूं देत नाहीं. अर्थात् चर्चेसची गोष्ट निराळी. त्यांच्यासमोर मोकळीं पटांगणें आहेत. म्हणजे अवकाश आहे. त्यांच्या निर्मात्यांनीं त्यांच्या विशाल वास्तूची थोडी कदर केली आहे. ग्रॅंड कॅनॉलच्या तोंडाशींच असलेल्या 'सॅल्यूट' चर्चची रेनासाँ

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



अनुक्रम.......................... वि: ......................
क्रमांक .......................... कों वि ......................

वास्तुकला, समोर मोठेंसें पटांगण नसूनहि नजरेंत भरते, कारण तेथें पाण्याचा विस्तार मोठा आहे. पाण्याला अवकाश मानायचें ठरविलें तरी त्याचा विस्तार विचारांत घ्यावा लागतो. व्हेनीसमधले कालवे बहुतेक सारे अरुंद आहेत.

आतां व्हेनीसच्या कालव्यांतून जातांना आपलें मन एका विशिष्ट वातावरणानें भरून जातें यांत शंकाच नाहीं. गोंडाच्या नालेबरोबर, या वातावरणामुळें आपलें मनहि हालतें, हेलावतें. मधूनच आपल्या डोक्यावर कललेल्या एखाद्या खिडकींतून एकादी नेरिसा आपल्याकडे दृष्टि रोखून पाहात तर नाहीं ना असा भास होतो. एखाद्या वाड्याच्या कमानदार प्रवेश-द्वाराच्या पायऱ्यांवर पाणी चुबकतांना दिसतें, आणि पूर्वी आपल्या मातबर प्रियकराला भेटण्यासाठीं व्हेनीसची एकादी रमणी येथें मध्यरात्रीं कशी येत असेल आणि कंदिलाच्या मंद प्रकाशांत एका हातानें झगा आवरीत वाड्याच्या ओलसर पावठणींवर हळूच पाऊल कसें टाकीत असेल याचें चित्र नजरेसमोर उमलतें. एकादा प्रासाद आपलें पुराण नक्षीदार रूप पाण्यांत न्याहाळीत उभा असलेला दिसला कीं याच वाड्यांत तर पोर्शियानें आपल्या सहा प्रियकरांच्या गुणावगुणांची चिकित्सा नेरिसापाशीं केली नाहीं ना अशी शंका येते. आणि पलीकडेच एखाद्या गुदामवजा वाड्यासमोर पडाव बांधलेला पाहिला म्हणजे व्हेनीसनें, आपल्या व्यापारी उत्कर्षाच्या काळांत, भूमध्य समुद्रावर उभारलेला मालाच्या गठ्ठयांचा सेतुबंध नजरेसमोर उभा राहतो. आपलें मन असें प्राचीन वातावरणानें भरून जातें, आणि मग एखाद्या नक्षीदार जाळींतून डेस्डिमोनाची निष्पाप नजर दृष्टीस पडते, तर दुसऱ्या एखाद्या अर्धवट उघडलेल्या खिडकींतून शामलॉयच्या भुकेल्या चेहऱ्याच्या कांटेरी नजरेचें दर्शन होतें. जरा वेळानें आपण रिॲल्टो पुलाखालून जातों, आणि जाणवतें कीं हा पूल बांधला जात असतांनाच शेक्सपिअरचें ‘ मर्चंट ऑफ व्हेनीस ’ लिहिलें जात होतें. मात्र या साऱ्या जाणिवा ऐतिहासिक असतात, वाङ्मयीन असतात – वास्तुकलेच्या साक्षात्काराच्या नसतात. व्हेनीसच्या दर्शनानें आपलें मन भूतकालांत शिरतें, शेक्सपिअरच्या नाट्यसृष्टींत रमतें, पण वास्तुकलेच्या प्रभावानें भारून जात नाहीं – निदान माझें गेलें नाहीं.

कारण, व्हेनीसमध्यें मानवाला निसर्गाच्या आत्म्याची ओळख झाली नाहीं. निसर्गानें व्हेनीसच्या त्या सरोवरसदृश जलविस्तारावर तीं शंभर बेटें अशीं कांहीं खुबीनें पसरून दिलीं कीं वास्तुकलेला वनश्री आणि जलश्री यांची जोड देतांना मानवी प्रतिभेला काय करूं नि काय नको असें व्हावें. पण व्हेनीसच्या लोकांना तें समजलेंच नाहीं आणि त्यांनीं निसर्गाशीं चक्क प्रतारणा केली. कदाचित् निसर्गावर मात करण्याच्या आधुनिक कार्बुशिए-प्रणीत वास्तुशास्त्रीय दृष्टीनें तो तेव्हांच भारला गेला असावा. मला वाटतें, निसर्गाशीं आपुलकीनें, स्नेहानें, जिव्हाळ्यानें वागण्याची कला पाश्चात्य माणूस कधीं शिकलाच नाहीं. निसर्गाला जिंकण्याच्याच इच्छेनें त्याला नेहमीं ग्रासलेलें आहे. अर्थात् यांत एक तार्किक सुसंगति आहे. (म्हणूनच पाश्चात्य राष्ट्रांत विज्ञानशास्त्राचा इतका विकास झाला.) मानव मुळीं निसर्गाला जिंकूनच जगतो. मानवानें (अगर त्याच्या पूर्वजानें) झाडाचें पहिलें फळ तोडलें तेव्हां निसर्गावर मात करण्याच्याच सुप्त – असुप्त इच्छेनें तो प्रेरित झाला होता. (बायबलांत अदामनें तोडलेल्या सफरचंदाला ज्ञानवृक्षाचें फळ म्हणण्यांत केवढी समर्पकता आहे) निसर्ग म्हणजे कांहीं सुंदर वनश्री नव्हे, शीतल जलाशय नव्हे, नयनमनोहर आकाश नव्हे. वाघ – सिंह – सर्पांचाहि निसर्गांतच समावेश होतो. यांच्याशीं स्नेह कसा जोडणार! मी हें लिहीत असतांना माझें विमान अल्प्सवरून उड्डाण करीत आहे. खालची काळीकभिन्न, अणकुचीदार शिखरें पाहिलीं म्हणजे पोटांत धडकी भरते. यांच्याशीं स्नेह कसा जोडणार! पण तीं दिसत असतांनाच त्यांच्यावरचें धवल शुभ्र हिमहि मला दिसत आहे आणि त्या क्रूर विक्राळ शिखरांना जिंकण्याचा विचार माझ्या मनांत असतांनाच या हिमाची शोभा मला जिंकत आहे. यांतला अंतर्विरोध स्पष्ट आहे. गति आणि स्तब्ध शांति, शरीर आणि चेतना, क्षुधा आणि तृप्ति असल्या जीवनाच्या अंतर्विरोधापैकींच तो एक. हे अंतर्विरोध कसे सोडवायचे तें मला माहीत नाहीं. ते कधीं सुटायचेहि नाहींत. या अंतर्विरोधाचा प्रांजळ स्वीकार करूनच चाललें पाहिजे. त्याचा एकतर्फी निकाल लावण्याची इच्छा फुकट आहे. निसर्गावर मात करूं पहाणारें वास्तुशास्त्र असें एकतर्फी आहे.

आपल्या वास्तुशास्त्रांत निसर्गाची कदर करण्याची दृष्टि व्हेनीस-करांपाशीं असती तर निदान येथल्या पाण्याची पर्वा त्यांनीं अधिक बाळगली असती. व्हेनीसचा समुद्र आणि व्हेनीसचे कालवे हें त्याचें खरें वैभव आहे. शहराला वेढून राहिलेलें पाणी हें त्याचें खरें अवकाश आहे. तें विस्तृत आहे, विशाल आहे. तसेंच रंगदार आहे. येथल्या स्वच्छ हवेंत तें जसें खुलतें तसें दुसरें कुठलें पाणी खुलत नसेल. तेथल्या वाऱ्याच्या लहरींनीं तें जसें आंदोळतें तसें कुठें आंदोळत नसेल, आणि रात्रीं दिव्याच्या मंदमधुर प्रतिबिंबांनीं तें जसें तरळतें तसें कोठें तरळत नसेल. ( हाँगकाँगच्या पाण्यावर रात्रीं निऑनची नखरेल शोभा पसरते तशी येथें पसरत नाहीं – पण तें प्रमदेचें प्रसाधन आधुनिक हाँगकाँगला शोभतें तसें तें व्हेनीसला शोभणार नाहीं. ) शांत मुग्ध रात्रीं व्हेनीसच्या पाण्यावर प्रतिबिंबाचीं फुलें उमललीं आणि आपण त्यावरून चाललों म्हणजे खरोखर आपण स्वप्नांनीं उजळलेल्या अवकाशांतून जात आहोंत असें वाटतें. पण या पाण्याचा पुरेसा अभिमान अगर पुरेसें कौतुक व्हेनीसकरांना वाटतच नाहीं कीं काय नकळे, नाहीं तर आपले पडाव – गोंडोले बांधण्यासाटीं त्यांनीं या पाण्यात ठिकठिकाणीं जसे कुरूप अभद्र खांब पुरले आहेत तसे पुरले नसते.

व्हेनीसच्या वास्तुशास्त्राकडून मी कांहींतरी अशक्य अपेक्षा करीत आहे असें तूं समजूं नकोस. मानवाला तेथें काय करतां आलें असतें याची थोडीशी कल्पना सॉं जॉर्जिओ बेटावरून येते. येथें मानवानें अवकाशाची करावी तशी कदर केली आहे. स्कामोत्सीची साधी साहजिक वास्तुकला लाभलेला चर्च ही या बेटावरची मुख्य इमारत आहे आणि तिच्यापुढें चांगलें विस्तृत पटांगण आहे. अर्थात् या पटांगणांत एकादा डेरेदार वृक्ष असता आणि या पटांगणाला धक्का नसता, त्याचें समुद्राशीं नैसर्गिक मीलन झालें असतें तर मला तें अधिक आवडलें असतें. पण याचा विसर पाडण्याची शक्ति त्या चर्चच्या दर्शनांत आहे. चर्चचें आंतलें वातावरण तर अधिक प्रभावशाली आहे. बॅरोक चित्रांची त्याला कलाकुसर आहे. तिंतेरेत्तोच्या ' द लास्ट सपर ' नें मला मिलानला पाहिलेल्या मायकेलांजेलोच्या चित्राची आठवण झाली. पण या दोन अप्रातिम कृतींची तुलना करणें माझ्या शक्ती-

बाहेरचें होतें. मी माझ्या मिलानवरील लेखांत मायकेलांजिलोच्या खोडकर स्वभावाची या संदर्भात एक गोष्ट सांगितली होती, ती तुला येथें आठवत असेल. तिची स्मृति माझ्या डोक्यांत रेंगाळत असतांच मी चर्चला लागून असलेल्या मठशाळेंत शिरलों. या मठांतच 'चिनी फौंडेशन'ची कचेरी आहे. या मठाची विद्याभ्यासाची आणि संस्कृतिप्रसाराची परंपरा हें फौंडेशन पुढें चालवीत असतें. टॉलस्टॉयवरचा परिसंवाद याच इमारतींत चालला. निदान व्हेनीसमध्यें तरी या परिसंवादाला पूर्ण समर्पक असें ठिकाण दुसरें सांपडलें नसतें. तो येथें चालल्यामुळें टॉलस्टॉयच्या आत्म्यालाहि नितांत समाधान झालें असेल, आणि जॉर्ज केनन, आयसाया बर्लिन, अर्नेस्ट सिमॉन्स, जॉर्ज स्टॉयनेर इत्यादींच्या उद्गारांचा अंदाज घेत तो आत्मा इमारतीच्या मधल्या चौकाच्या बागेंत खात्रीनें हिंडला असेल, आंतल्या परिसंवादानें टॉलस्टॉयच्या आत्म्याला जितका आनंद झाला असेल, तितकाच या बागेंत हिंडल्यानें झाला असेल. या बागेंत शांति आणि सद्वृत्ति निर्माण करण्याची स्वाभाविक शक्ति आहे. तेथल्या एकंदर वातावरणांतच सदभिरुचीचे आणि पावित्र्याचे जे संस्कार जाणवतात त्यांनीं हा आत्मा अगदीं मोहून गेला असेल

त्या परिसंवादांतील चर्चेचे जे संस्कार माझ्यावर झाले त्याहून जॉर्ज केननच्या सान्निध्यानें जे संस्कार लाभले त्याचा ठसा माझ्यावर अधिक उमटला आहे. त्या परिसंवादांतले प्रबंध हा मुख्य महत्त्वाचा भाग होता. पण हे प्रबंध मला इतरत्रहि वाचायला मिळाले असते, आणि वस्तुतः मीं ते हॉटेलमध्यें बसूनच वाचले. पण जॉर्ज केनन यांचें सान्निध्य मला या परिसंवादामुळेंच लाभलें. ते प्रथम मला या इमारतींतच भेटले आणि आम्ही हॉटेलांतून एकाच लॉंचनें सॉं जॉर्जियोला जात असल्यानें रोज नियमानें त्यांचा सहवासहि लाभला. त्यापूर्वी केननना मी दुरून पाहिलें होतें, आणि मिलान आणि बर्लिन येथें सांस्कृतिक स्वातंत्र्यसभेच्या परिसंवादांत दुरून ऐकलें होतें. मिलानला त्यांच्या अर्थगौरवानें मीं भारला गेलों होतों आणि बर्लिनला त्यांच्या इंग्रजीच्या अभिजात कसाची ओळख पटली होती. त्यांच्या आवाजाला एक नैतिक झार आहे, आणि त्यांनीं बर्लिनला – एकदां अमेरिकन कॉंग्रेसची बैठक चालू असतां जलप्रलयाचें वादळ होऊन दिवे गेले आणि बैठक तहकूब करण्याची सूचना आली तेव्हां अध्यक्षांनीं,

'हा जगाचा अंतकाल असेल तरी किंवा नसेल तरी, असला तर बैठक तहकूब करून उपयोग नाहीं, नसला तर करण्याचें कारण नाहीं' असे उद्‌गार काढले त्यांची गोष्ट सांगितली, तेव्हां आपण बायबलांतलीच गोष्ट एखाद्या प्रेषिताच्या तोंडून ऐकतों आहोंत असा भास झाला होता. 'शीतयुद्ध' या संज्ञेचे जनक म्हणून केनन प्रसिद्ध आहेत. पण येथें, या मठाच्या इमारतींत, त्यांच्या सांस्कृतिक व्यक्तित्वाची ओळख मला झाली. त्यांच्या बरोबर त्यांचे उद्‌गार ऐकत हिंडणें हा एक अनुभव होता. बॅरोक चित्रांतील आकृत्यांच्या डोळ्यांचा कोन त्यांच्या नजरेंत भरत होता. चौकासभोवारच्या माडीच्या इमारतींच्या रेषांत त्याना संस्कार-शीलता दिसत होती. आणि चर्चच्या वास्तुकलेची आत्मिक भव्यता त्यांना जाणवत होती. आणि हें सारें त्यांना जाणवत असतांना त्यांच्या विशाल व्यक्तित्वाची ओळख मला होत होती. व्हेनीसवर ते फार खूष होते, आणि याचें कारण व्हेनीसमध्यें वाहनें नाहींत, आणि मोटारी तर तेथें येऊंच शकत नाहींत. आधुनिक सुधारणेविषयींच्या त्यांच्या शंका–आकंशा बर्लिनच्या परिसंवादांत मी ऐकल्या होत्या, त्यांचें हें उदाहरण मिळालें. आमचें हॉटेल लिडो बेटावर होतें. मानवाच्या अति-रेकी वास्तुशास्त्रानें लिडो लडबडलेलें नाहीं, पण वाहनांच्या अभावामुळें व्हेनीसमध्यें जें एक शांततुष्ट वातावरण नांदतें त्याचा पुरा उच्छेद लिडोंत मोटरींनीं केलेला आहे. किंबहुना लिडोची प्रकृति व्हेनीसच्या वातावरणाशीं संपूर्णपणें विसंगत आहे. खरें म्हणजे तें एक आधुनिक करमणूक-केंद्र आहे आणि आधुनिक करमणुकीचा सारा बाजारीपणा तेथें आहे. तेथलें वास्तु-शास्त्र हें समुद्रकिनाऱ्यावरील न्हाणीघरांचें आहे ! आणि तेथली संस्कृति पोहण्याच्या पोशाखाची संस्कृति आहे. केननना या संस्कृतीचा तिटकारा आहे.

व्हेनीसमध्यें माझी वास्तुशास्त्रीय निराशा झाली म्हणून माझा तेथला मुक्काम अपेशी झाला असें मात्र समजूं नकोस. ज्या शहरांत सेंट मार्क स्क्वेअर आहे, तेथला संचार अपेशी ठरण्याचा मुळीच संभव नाहीं. हा सेंट मार्क स्क्वेअर म्हणजे नगररचनेचा एक अपूर्व नमुना आहे आणि त्यानें अनेक नगररचनाशास्त्रज्ञांना स्फूर्ति दिलेली आहे. या चौकांतला फेरफटका म्हणजे एक विलक्षण अनुभव आहे. या चौकांत शिरणें म्हणजे थोडेंसें

इतिहासांतच शिरणें होय. प्राचीन कालापासून हा चौक हें एक राजकीय घडामोडींचें केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे, आणि अर्थातच या चौकाला आकार देणाऱ्या इमारती इतिहासाचीं चिन्हें मिरवीत एक प्रकारच्या आत्मगौरवानें उभ्या आहेत. त्यांचा एकेकींचा वेध घेणें म्हणजे इतिहासांतील एकेक प्रकरणाचें पारायणच करणें होय. या चौकांत उभें राहिलें, सभोंवार नजर टाकली, सेंट मार्क चर्चवरील मनोऱ्यावरून दृष्टि फिरविली, घड्याळाच्या मनोऱ्याकडे टक लावली, चर्चसमोरच्या मनोऱ्याचा कळस न्याहाळला आणि डावी–उजवीकडच्या इमारतींच्या विविध धर्तींच्या खिडक्यांचा वेध घेतला, म्हणजे अमकी इमारत अमक्यानें अमक्या शतकांत बांधली, अमक्यानें तिच्यावर नवा मजला चढविला, अमक्या शतकांत चर्चची सुरुवात अमक्या साधूचें प्रेत अमक्यानें पळवून आणल्यामुळें झाली, अमक्या शतकांत त्याचा घुमट शोभूं लागला आहे, पुढें अमक्यानें त्याच्यावर अमके संस्कार केले, अमकीं चित्रें रेखाटलीं, अमक्या अलंकाराची जडण–भरण केली, अमक्या ऐतिहासिक पुरुषानें अमका मजला उभारला आणि तमका जिना बांधला अशीं गाईड–बुकांतलीं वर्णनें डोक्यांत घोळूं लागतात, आणि या चौकांत इतिहास आणि वास्तुशास्त्र यांच्या खरोखर आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या-मुळें डोक्यांत गोंधळ उडतो. या गोंधळाचें थोडेंसें निरसन करावें म्हणून मी गाईड-बुक उघडलें, आणि त्यामुळें विसरलेल्या तपशीलालाहि जाग आल्यामुळें गोंधळाचा गुणाकारच झाला. मी तसाच सारा तपशील विसरण्याचा प्रयत्न करीत हिंडूं लागलों – पण इतिहासांतून वर्त-मानांत उतरणेंच अशक्य झालें. कारण या चौकांत उभें राहिलें, या इमारतीकडे निश्चल नजरेनें पाहात राहिलों कीं हळूहळूं त्यांच्या रूपानें इति-हासाचेच पडदे सभोंवतालीं पटापट उभारले जातात, आणि आपली स्थिति नक्कल विसरलेल्या नटासारखी होते.

पण लवकरच आपण इतिहासांतून वर्तमानकालांत येतों – म्हणजे आपल्या आजूबाजूला चाललेल्या प्रकारांनीं खेचले जातों. कारण या प्रकारांची या चौकाच्या ऐतिहासिक परंपरेशीं अभद्र ओढाताण सुरू असते. केव्हांहि या, या चौकांत गोळा झालेल्या प्रवाशांच्या झुंडी या इतिहासाबद्दल संपूर्ण तुच्छता दर्शविणाऱ्या उद्योगांत निमग्न असतात. काय ते एकेकांचे उद्योग,

एकेकाची धडपड ! या चौकांत जमा झालेल्या इतिहासाशीं, वास्तुशास्त्रीय कलात्मकतेशीं अगर धर्मपरायणतेशीं त्यांचें क्षणाचें साहचर्य घडेल तर शपथ ! सिंझानोची जाहिरात मिरवीत बसलेल्या हिरव्या, पिवळ्या वा जांभळ्या खुर्चीवर बसून घेतलेले बीअरचे घुटके, प्रेयसीला कवटाळून मारलेल्या बीभत्स मिठ्या, दुकानांतल्या मालाची केलेली अधाशी पाहणी, आणि कबुतराला हातावर घेऊन फोटो काढण्यासाठीं चाललेली केंविलवाणी धडपड – हेंच यांच्या उद्योगाचें सार्थक ! याला आळा घालण्याचें सामर्थ्य त्या अर्थपूर्ण इतिहासांत दिसलें नाहीं कीं त्या चिवट धर्मपरायणतेंत दिसलें नाहीं. उलट, 'या चर्चमध्यें सभ्य पोशाख केलेल्यांनाच प्रवेश मिळेल' ही पाटी लावून आपल्या केंविलवाण्या अगतिकतेचाच पुरावा त्या चर्चनें दिला ! इतिहासाला अगर वास्तुशास्त्राला तेवढीहि वाचा फुटली नाहीं.

गर्दी आली कीं गर्दीचे संकेतहि आलेच. कॅमेरेवाले येतात, कॅमेरे सरसावतात. चित्रकार येतात, फलक–ब्रशांचा पसारा मांडतात. धान्य–विक्रेते येतात, आणि कबुतरांना घालण्यासाठीं धान्यांचे पुडे गिऱ्हाइकांच्या हातांत कोंबतात. आणि मुख्य म्हणजे रेस्टोरॉंवाले आपले बँड लावून इतिहासांतल्या साऱ्या रणभेरी आणि सारीं रणगीतें यांच्याबरोबर चौकांतल्या साऱ्या वातावरणाचा फज्जा उडवितात. नशीब एवढेंच कीं, फेरीवाल्यांचा संचार या चौकांत दिसत नाहीं. त्यांना बंदी असावी. नाहींतर तोंडांतल्या नळीनें साबणाचे फुगे उडवीत नाचणारा खेळविक्या, 'व्हेनीस–व्ह्यूज' असें किंचाळत चित्रांचा उघडता पट गिऱ्हाइकांच्या तोंडावर उडविणारा कार्डविक्या आणि कांचमण्याचे सर गुलजार पोरींच्या गळ्यांत बांधणारा मणिविक्या यांनीं त्या चौकातल्या प्रकारास पूर्णता आणली असती. पण मला या साऱ्या मंडळीपेक्षां त्या कबुतरांचीच अधिक चीड आली. या चौकांत तीं कबुतरें किती प्राचीन आहेत याचें गौरवपूर्ण वर्णन गाइड–बुकांत आढळतें. हा प्राणी मोठा प्रेमिक म्हणून प्रसिद्ध आहे. आजकाल शांततेचें प्रतीक म्हणूनहि याचें महात्म्य आहे. या पक्ष्यांनीं फुललेल्या चौकाची छायाचित्रें फार पक्कड दिसतात. पण गिऱ्हाइकांनीं टाकलेल्या दोनचार दाण्यासाठीं चाललेली त्यांची भुकेकंगाल धडपड पाहून मला संताप आला. दरेक दाण्यामागें लागलेली त्यांची फेंगडी धांवपळ पाहून मला दुष्काळांत जमीन फुंकत जाणाऱ्या जनावराची आठवण झाली.

आणि तरीहि या चौकाचें विलक्षण आकर्षण मला वाटलें. जरा वेळ मिळाला कीं मी या चौकांत जाऊन उभा राही किंवा हिंडे. आणि असें हिंडतां हिंडतांच या आकर्षणाचें रहस्य मला सापडलें. तें तेथें जमणाऱ्या लोकांच्या वृत्तींत, खरें म्हणजे, त्यांच्या वृत्तींतून ओसंडणाऱ्या आनंदांत आहे. या प्रवासी लोकांचीं मनें इतकीं उंडारलेलीं कां, त्यांची मुद्रा इतकी स्वैर, स्वच्छंद कां, आणि कुचकामी वस्तूंना जबऱ्या किंमती देतांना ते इतके खूष कां – या साऱ्यांचें उत्तर त्यांच्या या आनंदांत आहे. हा आनंद नुसता पहात रहाण्यांत सार्थक आहे. तो पहाता पहातां पहाणाऱ्यांत आनंद उत्पन्न होतो, दिव्यानें दिवा लागतो तसा या आनंदानें आनंद उद्भवतो आणि फैलावतो.

हे लोक सेंट मार्क स्क्वेअरमध्यें नसतात तेव्हां गोंडोलांत असतात किंवा मोटार-लॅंचेसमध्यें असतात. सेंट मार्कचा चौक हें व्हेनीसचें केंद्र आहे तर ग्रँड कॅनॉल हें वैभव आहे. या वैभवावर विहरण्यास येणारे प्रवासी सेंट मार्क स्क्वेअरमध्यें मिळविलेला आनंद बरोबर घेऊन येतात आणि या गोंडोल्याना, लॅंचेसना, बोटींना, मचव्यांना अर्पण करतात. नाहींतर हीं वाहनें इतकीं बेहोषीनें कां चालावीं ! एकेक वाहनाची तऱ्हा वेगळी, पण बेहोषी तीच. लॅंचेस् अंगांत आल्याप्रमाणें फेंस उसळीत चालतात; आगबोटी गरोदर स्त्रीप्रमाणें एक प्रकारच्या कृतकृत्य तंद्रींत चालतात; मचवे शिडें पसरून हलतडुलत चालतात पण गोंडोलाची मिजास कोणालाच नाहीं. हे गोंडोले जणुं व्हेनिसच्या आनंदाचेच बनविलेले आहेत. ते सारखे पाण्यावर हालत-डुलत असतात आणि आंत गिऱ्हाईक असलें म्हणजे, एखादा पोहणारा हात मारीत पाणी कापतो तसे आपल्या खालींवर होणाऱ्या नाळेनें पाणी कापीत जातात. गोंडोलाचा खलाशी म्हणजे व्हेनिसच्या सफरीचा जणूं मानकरीच – त्याचा झोंक निराळा, रुबाब निराळा ! गोंडोलाच्या रूपानें व्हेनीसच्या उभ्या कीर्तीची आपण मिरवणूक काढीत आहोंत अशा थाटांत तो वल्हें मारतो. पण गोंडोलाच्या उत्साहाचा महोत्सव होतो तो एखादी अमेरिकन प्रवाशांची पार्टी आपल्या व्हेनीसच्या सफरीची सांगता करण्यासाठीं येते तेव्हां. दोन गोंडोले शेजारीं शेजारीं बांधले जातात. त्यावर किनखापी मंडप उभारला जातो. त्याला तोरणें लटकतात. फुलांच्या माळा चढतात. दिव्यांच्या माळा चढतात. गाद्यागिरद्या पसरतात. खलाशांच्या हातांत मँडोलिन येतें. जिभेला गाणें फुटतें आणि अमेरिकन प्रवा-

शांच्या स्वैर हास्याला, गप्पांना, गाण्यांना या सराईत गाण्याची, वादनाची आणि वल्ह्यांच्या हातांची साथ मिळून कालव्यांतून मिरवणूक सुरू होते, आणि आजूबाजूला नाद, रंग, आनंद यांचा उत्सव सुरू होतो.

व्हेनीसला प्रवासी मंडळीच्या वृत्तीचा आणि वर्तनाचा वेध घेण्यांत जसा एक आनंद असतो, तसा स्थानिक मंडळीच्या वृत्तीचा आणि वर्तनाचा घेण्यांतहि असतो. त्यांनीं नुसतें पाऊल टाकलें अगर शब्द उच्चारला तरी त्यांचें वेगळेपण, त्यांचें स्थानिकत्व ध्यानांत येतें. त्यांच्या वागण्यांत काहीं एक रीत, एक शिस्त असते. त्यांना उंडारून जायचें अगर उन्मनस्क व्हायचें कांहीं कारण नसतें. दैनंदिन संसाराचे सूक्ष्म वेध त्यांना लागलेले असतात; तरीपण त्यांच्या वागण्या-बोलण्यांत एक गति, एक चैतन्य असतें. तुला आठवत असेल, 'नवें जग, नवीं क्षितिजें'मध्यें मी म्हटलें होतें कीं, इटालियन लोक नुसत्या तोंडानें बोलत नाहींत, तर साऱ्या अवयवांनीं बोलतात – आणि वागतात. त्याचा पुन्हां एकदां प्रत्यय आला. विशेषतः स्त्रिया ! इटालियन स्त्रियांचें आकर्षण कांहीं विलक्षण आहे. त्यांच्या रूपानें जीवनशक्तीच साकार झाली आहे असें मी म्हटलें होतें. या खेपेस या अलंकारांत अर्थ शोधण्याचा प्रयत्न मी केला. त्यांच्या सौंदर्याचा शोध घेण्याचा, हें सौंदर्य कशांत आहे याचा तलाश लावण्याचा प्रयत्न केला. लिडो आणि सेंट मार्क यांच्या दरम्यान बोटीवरून जातां-येतांना त्यांच्या चेहऱ्याचें विश्लेषणात्मक निरीक्षण केलें आणि हें सारें केल्यावर माझें असें मत झालें आहे कीं इटालियन स्त्रियांच्या सौंदर्याचें रहस्य त्यांच्या चेहऱ्याच्या सौष्ठवांत आणि चैतन्यांत आहे. इटालियन स्त्रियांचा चेहरा अतिशय सुबक, अतिशय गोंडस असतो. त्यांचें नाक सरळ असतें. तीव्र असतें. त्याच्या हनुवटीला एक टवटवीत आकार असतो. गाल गुबगुबीत असतात. डोळ्यांत पाणी नाचतें. पण मुख्य म्हणजे त्यांची आकारशील जिवणी आणि रसरसीत ओठ – रसदार आणि लज्जतदार ओठ ! आणि यांची अंगकांति. ती आंग्ल स्त्रियाच्या सारखी अकारण लालबुंद नसते आणि सेमिटिक स्त्रियांच्या सारखी फिकट पांढुरकीहि नसते. यांतले बहुतेक गुण मला अॅथेन्सला ग्रीक स्त्रियांतहि आढळले. पण त्यांच्यांत ती जादुगारी, तें चैतन्य नसतें आणि म्हणून त्या निव्वळ पुतळ्या वाटतात. इटालियन स्त्रियांचें

चैतन्य असें विलक्षण आहे कीं त्या अगदीं स्वस्थ बसल्या तरी ती स्वस्थताच बोलकी वाटते !

माझ्या व्हेनीसच्या सुखकारक स्मृतींचें आणखी एक कारण आहे – माझ्या अंगावर आतां जो सूट आहे तो ज्यानें शिवला तो शिंपी –! लॉरेन्झी हा शिंपी नव्हे, कपड्याचा कलावंत आहे. शिवण्याची कला त्याच्या रूपानें आपल्या समोर येते, उभी रहाते, बोलते. तिचें प्रथम दर्शन फारसें आकर्षक नसतें. लॉरेन्झी दिसायला खप्पड आहे; त्याचा चेहरा ओढलेला, आक्रसलेला आहे. त्याच्या आवाजांत खरखर आहे. तो आपल्याशीं बोलूं शकत नाहीं, कारण त्याला इंग्रजी येत नाहीं, आणि तरी त्याच्या वागण्यांत, हावभावांत, खांद्यावरची टेप ऐटीनें हातांत घेण्यांत अशी कांहीं जादू आहे कीं त्यानें कापडाचें ठाण हातांत घेतल्याबरोबर वाटतें कीं हें कापड अप्रतिम आहे. आणि त्यानें माप घेतल्याबरोबर आश्वासन मिळतें कीं सूट झकास होणार. पण भाषा येत नसली तरी किंवा येत नसल्यामुळेंच आपला आशय पुरेपूर व्यक्त केल्याखेरीज लॉरेन्झीचें समाधान होत नाहीं. तो कापडाचें ठाण घेतो, त्याची घडी मोडतो, ती चुरगाळतो, चुरगळा खुर्चीवर ठेवतो, त्याच्यावर बसतो, आणि मग आपल्या पुढें कापड धरतो नि आपली खात्री पटते कीं, या कापडाच्या सुटाला एकदां इस्त्री केली कीं पुनः जन्मांत तिच्यावर इस्त्री फिरवायला नको. तो आपल्याला कोणत्या फॅशनचा सूट हवा हें विचारीत नाहीं, पण आपल्या अंगावरच्या सुटाचीं टोकें अशीं कांहीं तुच्छतेनें ओढतो कीं असला गलथान सूट आपण घातला याची जन्माची शरम वाटूं लागते. आपण ट्रायलला गेलों कीं, सूट छान बसतो आहे हें आपल्याला सांगावेंच लागत नाहीं, तोच 'कॅपिटा' 'कॅपिटा', 'परफेक्टो' 'परफेक्टो' असें दहादां ओरडतो आणि सुटाचा सुन्दरपणा जाहीर करतो. पण आपल्याला कॉण्टिनेण्टल धर्तीचा कमरेंतला आवळ आकार आवडत नाहीं, आपण आपल्या कोटाचा आकार दाखवितो आणि तो दुर्मुखलेल्या आवजांत म्हणतो, 'अमेरिकाना !' अमेरिकाना हा शब्द तो असा कांहीं उच्चारतों कीं आपण गप्पच बसतों. आणि तरी तो आपला कोट आपल्याला हवा तसा करतो, आणि खुणेनें सांगतो कीं झाला हा कोट पुढून इतालिअनच आहे. मग आपण एकादें जादा बटण दे


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......... ................ वि: ..................

असें म्हणतो, आणि तो मनमुराद हसतो आणि ड्रॉवर उघडून त्यांतून एक कापडाचा तुकडा आणि त्याला शिवलेली दोन बटणें आपल्यापुढें ठेवतो आणि मग त्याच्या हसण्याचा अर्थ आपल्या ध्यानांत येतो कीं – लॉरेन्झीनें साऱ्या साऱ्या गोष्टींचा केव्हांच विचार करून ठेवला आहे. आपण खूष होतों, फार खूष होतों; पूर्वी कधीं नव्हे अशा खुषीनें खिशांतून पैसे काढतो व त्याच्या पुढें ठेवतो आणि तो, ते मोजून तर पाहात नाहींच पण, धड त्यांना शिवतहि नाहीं! सुटाशीं त्याचा संबंध संपलेला असतो. तो आता निराळ्याच गोष्टी सांगतो, वर्तमानपत्राचीं कात्रणें दाखवितो, आणि भिंतीची एक तसबीर काढून आपल्या समोर धरतो. त्या तसबिरींत काय असतें? तर लॉरेन्झीवर कविता! कोणातरी कवीनें त्याला अर्पण केलेली! ती आपल्याला कळत नाहीं, पण – त्याच्यांत 'सार्टोरिआ' 'म्युझिका' असे शब्द असतात – आणि त्या कात्रणांकडे आपलें लक्ष जातें. आपण एक कात्रण पाहतों. कोणत्या तरी संगीतज्ञाच्या सत्काराचें त्यांत वृत्त असतें, आणि छायाचित्रहि असतें. त्या छाया चित्रांत लॉरेन्झी दिसतो. आपण आश्चर्यानें लॉरेन्झीकडे पाहातो, त्याबरोबर तो तें कात्रण आपल्या हातांतून हिसकावतो आणि हातांतल्या रंगीत खडूनें त्याच्यावर खूण करून तें आपल्यासमोर धरतो आणि त्या सत्कार–समारंभाला जमलेल्या पाहुण्यांच्या यादींत समीक्षक लॉरेन्झींचेंहि नांव दिसतें. एकंदरींत आपला शिंपी हा एक विख्यात संगीततज्ञ आहे! आपण चकित दृष्टीनें त्याच्याकडे पाहतों. आतां त्याला त्या कात्रणाचें महत्त्व नसतें. तो तें उचलतो आणि बेफिकिरीनें ड्रावरमध्यें कोंबतो. आपलें अंतःकरण आदरानें भरून गेलेलें असतें. पण तो व्यक्त कसा करावा हें कळत नाहीं. आपण त्याचा हात धरतों, प्रेमानें दाबतो, आणि जोरजोरानें शेक–हॅण्ड करून त्याचा निरोप घेतों

असा हा लॉरेन्झी – कपड्यांचा कलावन्त! संगीताचा समीक्षक! आणि उत्साहाचा मूर्तावतार! त्यानें शिवलेला सूट माझ्या अंगावर आहे, त्याची गुबगुबीत, सुखसुखीत ऊब माझ्या अंगाला लागत आहे.

तुझा—

रहस्यरंजन मार्च, १९६१

●●●

# का रि ओ का

रिओ द जानेरो येथें भरलेल्या एकतिसाव्या आंतरराष्ट्रीय पेन–परिषदेची एक संचालिका मारिआ सेसिलिया (इतरांप्रमाणेंच) माझ्या-कडे आली नि म्हणाली, "या परिषदेविषयींचें तुमचें मत मला लिहून द्याल का? मला या परिषदेवर एक कादंबरी लिहायची आहे."

क्षणभर मी तिच्याकडे चकित नजरेनें पाहातच राहिलों. पेन-परिषदेवर कादंबरी! एकादा लेख

अगर निबंध नव्हे, तर संपूर्ण कादंबरी !

पण मग ध्यानांत आलें कीं, ती ब्राझिलिअन आहे. या परिषदेवर एकादा दरिद्री लेख खरडण्याचा विचार तिच्या मनांत थोडाच येणार !

ब्राझिलिअन हे हाडाचे कवि आहेत. एका खंडप्राय देशाचे सुपुत्र आहेत आणि लॅटिन वंशाचें गरम रक्त त्यांच्या धमन्यांत सळसळत आहे. भिकार दरिद्री विचार त्यांच्या डोक्यांत येत नाहींत. तुटपुंज्या कल्पनांचें दैन्य त्यांना बाधत नाहीं. उच्च उदात्त विचारांत ते रमत असतात. विशाल कल्पनांच्या पंखांवर ते हेलावत असतात. उंच अंतराळांत भराऱ्या मारून जीवनाचीं भव्य दर्शनें घेण्याची त्यांना आवड आहे. एकाद्या किरडाप्रमाणें कांट्याकुट्यांत सरपटत राहण्याची आणि सांदीकोपऱ्यांतलीं बिळें शोधण्याची त्यांना संवय नाहीं. आपल्या अफाट ध्येयांना वस्तुस्थितीचा आधार आहे किंवा नाहीं याचीहि फिकीर ते करीत नाहींत. व्यवहार आणि वस्तुस्थिति यांची पूर्ण उपेक्षा करून जीवनाच्या स्वैर आवेगांत उडी टाकण्याची त्यांची आदत आहे.

निदान रिओच्या नागरिकांची – कारिओकांची – आहे. आणि कां असूं नये ? रेड इंडियन्सच्या परंपरेचें प्रतीक असलेल्या ‘ इल्मांजा ’ देवतेचे ते भक्त नव्हत काय ? दक्षिण अमेरिकेच्या इतिहासपूर्व प्रवृत्तींवर कॅथॉलिक धर्माचे संस्कार करून काढलेल्या माकुंवा या नवसाळ धर्माचे ते पाईक नव्हत का ? व्यवहारानें वेढलेल्या व्यक्तीप्रमाणें ते कां म्हणून वागतील ? शिवाय रिओच्या निसर्गावर एकादा ओझरता दृष्टिक्षेप केला तरी हे कारिओका अधांतरीं कां चालतात आणि वाऱ्यावरच्या वारूवर कां स्वार होतात याची कल्पना येईल. रिओचा निसर्ग हा एक चमत्कार आहे. निसर्गदेवतेला आलेल्या प्रतिभेच्या एकाद्या असाधारण झटक्यांत हा निसर्ग निर्माण झाला असला पाहिजे. नाहीं तर उभार डोंगर आणि आक्रमक समुद्र, अक्षय खडक आणि प्रक्षुब्ध लाटा, राठ कातळ आणि मृदु वनश्री, शुभ्रसफेत वाळू आणि लालीलाल माती या चित्रविचित्र सामग्रीचा असा विलक्षण पट निर्माण करण्याचें तिला सुचलेंच नसतें. रिओचे कारिओकासुद्धां असे जहांबाज कीं त्यांनीं निसर्गाचें हें आव्हान हसत हसत स्वीकारलें आणि रिओच्या अजस्र पटावर जीवनाच्या आडव्या–उभ्या, तिरकस–तिरप्या आणि रुंद–निरुंद रेघोट्या मोठ्या लीलेनें ओढल्या.

मारिआ सेसिलिया ही या कारिओकांची कन्या. तिच्या धमन्यांत त्यांचेंच उच्छृंखळ रक्त वहातें. ती काय पेन-परिषदेवर एकादा दरिद्री लेख खरडणार ? एकादी सुरसरम्य कादंबरीच लिहिण्याच्या स्वप्नाशीं शिवाशिवीचा खेळ खेळत बसणार !

तिच्या या उच्च आकांक्षेचा आदर करणें क्रमप्राप्तच होतें म्हणून मीं तिची विनंती एकदम मान्य केली.

—आणि मला रंगूनच्या विमानतळावरचा तो अनुभव आठवला.

रंगूनचा विमानतळ हा जगांतला एक लक्षवेधक विमानतळ आहे. त्याची वास्तुकला साधीच, पण नजर वेधणारी आहे. कांचपोलादाचे आधुनिक संस्कार तिच्यावर झालेले आहेत. अंतरंग अधिक आकर्षक आहे. उ बा चींच्या भित्तिचित्रांमुळें त्याला सौंदर्याचें वरदान लाभलें आहे. गतीच्या कल्पनेवर मानवी प्रतिभेनें केलेल्या नाजुकसाजुक संस्कारांचा सारा इतिहासच त्यांनीं चारदोन चित्रांत रसरंगून ठेवला आहे. मानवाच्या पूर्वकालांतील परीकथांपासून आजच्या यंत्रयुगांतील आकाशयानापर्यंतच्या गतिविषयक स्थित्यंतराचें रंगरेखन त्यांनीं केलें आहे. विमानतळावरील व्यवस्थेच्या दृष्टीनें तर अंतरंगाची मांडणी नमुनेदार आहे. विशेष म्हणजे सारी इमारत एअर कंडिशंड आहे.

एकदां बँकॉकला जातांना आमचें विमान या विमानतळावर थांबलें. सकाळची वेळ, आम्ही कित्येक जण पायखान्याकडे गेलों. पायखान्यांचें दर्शनहि झकपक होतें. पण जरा वेळानें एका पायखान्यांतून आवाज आला—क्रांत, संतप्त आवाज : " टॉयलेट पेपर कुठाय्, टॉयलेट पेपर ? "

असे आम्ही आशियन लोक ! आम्ही मोठा दर्जेदार विमानतळ बांधूं. त्याच्यांत सर्वत्र थंडाई खेळवूं, पण संडासांत पाणी अगर कागद ठेवण्याचें तेवढें विसरूं !

आमचीं ध्येयें भव्य ! स्वप्नें विशाल ! फक्त तपशीलाकडे लक्ष पुरविण्याचें भान राहात नाहीं !

● ● ●

रिओच्या पेन-परिषदेंत रंगूनच्या विमानतळावरचा हा अनुभव वारंवार आला. परिषदेचा बेत मोठा भव्य होता. कार्यक्रम भरदार होता आणि तो

पार पडावा म्हणून पसा आणि प्रतिष्ठा यांची मनःपूत आराधना करण्यांत आलेली होती. फक्त तपशीलाकडे पुरेसें लक्ष पुरविलेलें नव्हतें.

याचा पूर्वी नव्हता इतका आणि असा अनुभव शहरदर्शनाच्या आणि प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्याच्या दिवशीं आला. शहरदर्शन म्हणजे रिओचें दर्शन आणि रिओचें दर्शन म्हणजे निसर्गाच्या जादूगिरीचें दर्शन. या जादूगिरीला साजेसाच कार्यक्रम आंखण्यांत आलेला होता. म्हणजे तिजुका डोंगराच्या शिखरावरून रिओवर दृष्टिक्षेप; तिजुका जंगलांत एका धबधब्याच्या परिसरांत दुपारचें भोजन; आणि कोर्कोवाडो डोंगराच्या पायथ्यापासच्या सरोवरांत उगवलेल्या एका बेटावर परतवेळचा चहाफराळ! आम्ही मोठ्या अधीर औत्सुक्यानें 'तिजुका' अशी पाटी झळकविणाऱ्या बसमध्यें जाऊन बसलों. थोड्या (म्हणजे अर्थात् बऱ्याच) उशिरानें कां होईना, बसेस सुरू झाल्या तेव्हां आमचा अंतरात्मा आंतल्या आंत उड्या मारूं लागला. पण सुमारें पंधरा मिनिटांनीं साऱ्या बसेस एकदम थांबल्या. बऱ्याच वेळानें, आंत गप्पा मारण्याचा कंटाळा आला म्हणून आम्ही बाहेर गप्पा मारण्यासाठीं उतरलों, तेव्हां समजलें कीं, या बसेस सकारण थांबल्या आहेत! समोरच्या इमारतीच्या पंचविसाव्या मजल्यावर ब्राझील पेनचे संस्थापक राहतात. आतां ते वृद्ध अपंग झाले आहेत. त्यांना प्रत्येक प्रतिनिधीनें भेट द्यावी अशी अपेक्षा आहे. किती उदात्त कल्पना! लगेच मी त्या इमारतींत शिरलों. पण लिफ्टपाशीं गेल्यावर समजलें कीं, लिफ्टमध्यें एका वेळीं फक्त पांचच माणसें मावतात! म्हणजे आम्हा दोनशें प्रतिनिधींना अडीच तीन तास लागणार! बहुतेक प्रतिनिधींनीं या उदात्त कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केलें म्हणून नाहीं तर आमचा 'तिजुका' या लिफ्टमध्येंच झाला असता! पण लिफ्टमध्यें पांचच माणसें मावतात हा कांहीं चालकांचा दोष नव्हे. तो एक क्षुद्र तपशील! तिजुकाच्या माथ्यावरील विरळ वातावरणांत विहरणाऱ्यांनीं या खालच्या किरकोळ तपशीलाची फिकीर कां करावी? आणि अखेरीस तपशिलाचे प्रश्न कसे तरी सुटतातच ना?

• • •

पण कारिओकांच्या नजरेवर विशाल स्वप्नें तरळत असतात त्याचप्रमाणें आपण अमेरिकन आहों हीहि जाणीव त्यांच्या अंतःकरणांत उसळ्या मारीत असते. युनायटेड स्टेटस्‌चे लोक 'अमेरिकन' या शिक्क्यावर एकट्यानें

डल्ला मारून असतात ही गोष्ट त्यांना भारी खुपते, आणि अमेरिकनांची खाशी खोड मोडण्यासाठीं त्यांनीं एक बेमालूम युक्ति योजली आहे. ती म्हणजे स्वतःच अमेरिकन बनण्याची, अमेरिकेची सहीसही नक्कल करण्याची ! म्हणून त्यांनीं आपल्या जीवनांत अमेरिकेचा थाट उठविला आहे !

पेन-परिषद् भरविनांना, परिषद भरवावयाची तर थेट अमेरिकन थाटाची असा निश्चय करूनच ते उद्योगास लागले. (आतां त्यासाठीं मदतनीस म्हणून एकाद्या अमेरिकनासच पाचारण करण्याऐवजीं त्यांनीं एका ऑस्ट्रेलिअनास कां बोलावलें याचें मला गूढ आहे. पण अस्सल अमेरिकनाकडून अमेरिकेची उसनवारी शिकण्यांत त्यांना कमीपणा वाटत असेल किंवा आपल्याप्रमाणेंच अमेरिकेच्या अनुकरणांत धन्यता मानणाऱ्या ऑस्ट्रेलिअनाबद्दल त्यांना अधिक आपुलकी वाटत असेल !) प्रथम म्हणजे त्यांनीं श्रमविभागणीचें तत्त्व पक्कें आत्मसात् केलें. कामाचीं अनेक खातीं पाडलीं. कार्यकर्त्यांचे आणि पाहुण्यांचेहि निरनिराळे वर्ग पाडले. परिषदेच्या ठिकाणीं खास बँक, पोस्ट-ऑफिस, काफे, प्रवासव्यवस्थेची शाखा उघडली; हसतमुख स्वयंसेविकांचा ताफा उभा केला; परिषदेच्या कामकाजाचें एकदम तीन भाषांत भाषांतर करण्याची व्यवस्था केली; लाउडस्पीकर, टेपरेकॉर्डर वगैरे यंत्रसामग्री खडी केली. सारें कांहीं अमेरिकन सांच्याचें केलें ! फक्त एवढें सारें पेलेल कीं नाहीं याचा विचार केला नाहीं.

आम्हीं आमचें प्रतिनिधित्व नोंदविण्यासाठीं पेन-परिषदच्या कचेरींत पहिलें पाऊल टाकलें तेव्हांच आम्हांला या अमेरिकन थाटाची कल्पना आली. एकेक प्रतिनिधि नोंदण्यासाठीं पांच स्वयंसेविका हारीनें बसल्या होत्या. अमेरिकन श्रमविभागणीचा आदर्शच त्यांच्या रूपानें हजर झाला होता. पहिलीनें प्रतिनिधीचें नांव–गांव पाह्यचें, दुसरीनें त्याच्या प्रतिनिधित्वाची प्रत तपासायची, तिसरीनें साधारण प्रतिनिधीकडून दहा डॉलर्सची फी वसूल करायची आणि खास प्रतिनिधीकडे आदरानें पाहून ‘तुम्ही फी देण्याचें कारण नाहीं’ अशा अर्थाचा चेहरा करायचा, चौथीनें प्रतिनिधीच्या रांकेप्रमाणें त्याला योग्य त्या रंगाचा बिल्ला द्यायचा आणि पांचवीनें ब्राझील देश, ब्राझील पेन वगैरेविषयींचें सचित्र रंगदार वाङ्मय भेट देऊन त्याला खूष करून सोडायचें, अशी आंखणी होती. अशी जय्यत तयारी असल्यावर नोंदणीचें काम हां हां म्हणतां उरकायला हरकत

नव्हती, पण प्रत्यक्षांत क्यूंत उभ्या असलेल्या आम्हा प्रतिनिधींचे पाय जमिनींत रुजूं लागले. अखेरीस गोगलगाईच्या पावलानें माझी फी वसूल करणाऱ्या स्वयंसविकेकडे कौल लावला आणि माझ्याकडून दहा डॉलर्स वसूल करायचे नाहींत अशी खातरजमा करून घेतली. हा अनुभव गोड नव्हता, आणि नंतरच्या स्वयंसेविकेनें बरेंचसें रंगीबेरंगी वाङ्मय हातांत ठेवलें तरी त्याची आठवण विरली नाहीं. पण इतक्यांत एक गोड चेहऱ्याची आणि आकर्षक बांध्याची स्वयंसेविका पुढें सरसावली, तिनें माझ्या हातांतला बिल्ला घेतला नि माझ्या कोटाच्या कॉलरला लावायला सुरवात केली – तेव्हां तिच्या सुरंगी बोटांची जी हालचाल झाली आणि तिच्या सुरंगी ओंठांना जी मुरड पडली तिनें ती दहा डॉलर्सची अप्रिय आठवण कोठच्या कोठें उडून गेली !

नोंदविण्याच्या विधीचें जें झालें तेंच इतर अमेरिकन व्यवस्थेचें झालें. म्हणजे वक्त्यांसमोर मायक्रोफोन धरण्याची व्यवस्था होती पण तें बहुधा अर्धें भाषण झाल्यावरच समोर येत. तीन भाषांत एकदम भाषांतर होत होतें, पण तें फारसें ऐकू येत नव्हतें. काफेंत कॉफी मिळत होती, पण फराळाचे पदार्थ गैरहजर होते. पोस्ट ऑफिसांतून आलेलें एकाचें पत्र दुसऱ्याला मिळू शकत होतें. क्यामेरेवाले हजार कोनांतून हजार फोटो घेत असत, त्यांचे नमुने फळ्यावर लावीत असत, आणि प्रतिनिधीहि नवीन झालेल्या मित्रमैत्रिणींच्या उत्साहांत अनेक फोटोंची मागणी करीत असत, पण पैसे भरल्याची रसीट घेऊन गेले तरी फोटो मिळतील अशी खात्री नसे. पुष्कळदां फळ्यावरचे नमुनेहि गायब होत. (अर्थात् यामुळें उत्साहाच्या अतिरेकांत अकारण मागविलेले फोटो आले नाहींत आणि पैसे वांचले तो भाग निराळा !)

हें सारें होत होतें. पण त्याची खंत कोणाला वाटत नव्हती. कारण त्याच्यावर चालकांच्या मधुर आस्थेचा वर्षाव होत होता; स्वयंसेविकांच्या सुंदर स्मिताच्या पाकळ्यांचें सिंचन होत होतें; आणि परिषदेंत कांहीं झालें अथवा न झालें तरी त्याची 'जाऊं दे हो' असें म्हणून गोड उपेक्षा करण्याची कारिओकांची (पूर्वी मला थाय लोकांत आढळलेली) वृत्ति अतिशय आकर्षक वाटत होती. पाश्चात्य प्रतिनिधींना काय वाटलें न कळे, (पण

रिओच्या स्वैर उन्मादक सौंदर्याचा आस्वाद घेण्यांत रमलेल्या त्यांच्या मनाला या गोष्टी फारशा खुपल्या नसाव्यात असा माझा अंदाज आहे), पण माझ्या आशियन मनाला कारिओकांच्या या वृत्तीचें एक सुप्त आकर्षणच वाटलें. त्यांच्या अंतःकरणांत गजराचें घड्याळ बसविलेलें नाहीं, उलट तेथें शांत अनंतता नांदत आहे; त्यांची बुद्धि यंत्राला जखडलेली नाहीं, उलट ती मंत्र-मुग्ध होऊन अंतराळांतल्या अदृश्य उद्यानांतलीं फुलें वेंचण्यांत दंग आहे; त्यांची नजर वेळापत्रकावर खिळलेली नाहीं, उलट ती काळवेळाच्या पलीकडे असलेल्या स्थिरतत्त्वाचा शोध घेण्यांत गुंतलेली आहे किंवा इहलोकींच्या जीवनाच्या पुरांत सारीं कालमापनें फेकून देण्याची त्यांची तयारी आहे! या एकाच गोष्टीसाठीं मी माझ्या साऱ्या बुद्धीचा चुरा करून तो रिओच्या समुद्रांत फेकण्यास तयार होतों.

● ● ●

आतां एवढें खरें कीं कारिओकांचा अमेरिकन बनण्याचा सोस त्यांच्या भव्य स्वप्नस्थ वृत्तीशीं पुरेसा जुळत नाहीं. त्यामुळें त्यांच्या जीवनांत अनेक अंतर्विरोध निर्माण झाले आहेत. त्यांच्या उंच उंच इमारती आणि अरुंद-निरुंद रस्ते हा यांतला एक लगेच डोळ्यांत भरणारा (आणि शरीराला धक्के देणारा) मोठा ठसठशीत अंतर्विरोध.

पण कारिओकांना याची पर्वा नाहीं. त्यांची नजर नेहमीं आकाशांतलीं स्वप्नें शोधीत असते – निदान रिओंत तुम्ही केव्हांहि कसेहि वळलांत तरी तुमच्या नजरेंत भरणारे श्यूगरलोफ आणि कोर्कोवाडो यांच्या विलक्षण शिख-रांनीं ती भारलेली असते. त्यांच्या इमारती जमिनीवर आडव्या पसरणार नाहींत. मजल्यावर मजला चढून त्या आकाशाचाच वेध घेतील. कारिओकाला उंच उंच इमारतींत वरच्या वरच्या मजल्यावर राहण्याची हौस आहे. तो जितका सुखवस्तू तितका त्याचा मजला वरचा. पण सुखवस्तूंचेंच कशाला, फावेलांत (म्हणजे बांबू, हातऱ्या, गोणपाटें आणि टिनच्या पत्र्याचे तुकडे इत्यादींनीं बांधलेल्या झोपड्यांत) राहणाऱ्या कंगालांना आणि कलंदरांनाहि उंचीची ओढ आहे. या फावेला खालीं सपाट जमिनीवर आढळणार नाहींत. त्या डोंगरमाथ्यांना आणि डोंगरकडांना लटकलेल्या आढळतील. चिंध्या

पांघरून रकस्यावर आराम करणाऱ्या आणि शिळा पाव खाऊन ढेकर देणाऱ्या गरीब कारिओकांनासुद्धां एकदां डोंगरमाथ्यावरून ग्वानाबाराच्या अगर कोपाकबानाच्या लाटांकडे डोळे भरून पाहिलें अगर कोकोंवाडोच्या खिस्त पुतळ्याचें डोळे भरून दर्शन घेतलें कीं स्वर्गाचा फेरफटका करून आल्या-सारखें वाटतें. आतां, या उंच इमारतींच्या पायथ्याचे रस्ते अरुंद आहेत, एवढें खरें. त्यामुळें रिओ ब्रँकोसारखा रिओचा नंबर एक किंवा दोनचा रस्ता 'वन-वे' करावा लागतो आणि कचेऱ्या भरण्याच्या सुमारास इमारतींतल्या लिफ्टपुढचा क्यू रस्त्यावर येऊन तिंबूनानांच्या बाहीप्रमाणें त्याची अवस्था होते! पण रस्त्याचें माहात्म्य काय त्याच्या लांबीरुंदींत असतें? तें त्याच्यावर जें जीवन उसळतें त्यांत असतें – आणि ॲव्हेनिडा रिओ ब्रँकोवर जें जीवन उसळतें, अगर तेथें जीवनाचें जें थैमान चालतें त्याला जगांत कुठें तोड असेल असें वाटत नाहीं. या रस्त्यावरून धावणारी लोटाशान (बस) तुमच्या शेजारून रानडुकराची मुसंडी मारून गेली म्हणजे झाडांच्या मुंड्या मुरगळणारें आणि घरांचीं शिखरें गुंडाळणारें एखादें तुफान तुमच्या शेजारून गेल्या-सारखें वाटतें. एकादवेळेस या लोटाशान्सची टक्कर होऊन शेजारच्या इमारतीचे पंचवीसच्या पंचवीस मजले हादरतात, पण कारिओकाच्या धमनींतील रक्ताचें उष्णतामान एका डिग्रीनें हलत नाहीं! त्याचे मित्राशीं, पण खास करून मैत्रिणीशीं, चाललेले वार्तालाप कणभर देखील बिघडत नाहींत, किंवा पलीकडेच सभोंवतालीं श्रोत्यांचें रिंगण गोळा करून आपल्या हातांतल्या इसब-मलमावर प्रस्फूर्त व्याख्यान देणाऱ्या माल-विक्याच्या शब्दाची तार तुटत नाहीं! याच रस्त्याच्या एका टोकावरील उपाहारगृहांत संध्याकाळीं सात-साडेसात वाजतां चाळीस-पन्नास रातभवान्या जमून आज कोण्या पुरुषाचें कोणतें चित्त आणि वित्त उधळायचें याचा विचार कोंबडीच्या तंगडीबरोबर चघळत असतात, तर दुसऱ्या टोंकाला एकाद्या सिनेमागृहासमोरच्या रांगेंत सभ्य स्त्रिया सभ्य पुरुषांच्या खांद्यावर रेलून त्यांच्या चित्ताला आराम देत असतात. याच रस्त्याच्या एका फूटपाथवर गळ्यांत गळा घातलेला दिसतो, तर दुसऱ्या फूटपाथवर नरड्याला नरडें भिडलेलें दिसतें. एकाच दुकानाच्या एका टोंकाला नारिं-गाच्या सात्त्विक रसाचा पेला कोणाचा अंतरात्मा शांत करीत असतो, तर

दुसऱ्या टोंकाला मद्याचा लाल लाल अर्क एखाद्याच्या आंतली आग भडकवीत असतो. या रस्त्याच्या एका कोपऱ्यांत एक गोरी गोरी लठ्ठ भिकारीण एका काळ्या हाडकुळ्या पोराला घेऊन मातृत्वाचें उघडें प्रदर्शन करीत बसते, तर दुसऱ्या कोपऱ्यांत खालीं वर्तमानपत्राची रद्दी पसरून सुस्त झोंपलेला वर्तमानपत्रविक्या आपल्या पुरुषार्थाला सकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणाचें अर्घ्यप्रदान करीत असतो. याच रस्त्याच्या एका कडेला एक चित्रकार आपल्या चित्रांचें विकाऊ प्रदर्शन मांडतो, तर दुसऱ्या कडेला एक संगीतकार एका लाकडी चौकटीला अडकविलेल्या पाण्याच्या बाटल्यांवर काठी ठोकून जलतरंगाचें आरोहावरोह उभे करतो. हा रस्ता अरुंद असेल, पण या रस्त्यावर कारिओकाच्या जीवनाची सारी गंमत, सारी कळा, सारी मस्ती उसळलेली दिसेल.

पण रिओंतच जगांतला सर्वांत रुंद रस्ता – ॲव्हेनिडा प्रेसिडेंट व्हॅगास– आहे. तो असायलाच हवा. रिओचे नागरिक – ब्राझीलच्या प्रचंड विस्तारांत दंग असलेले नागरिक – त्यांना असल्या प्रचंड रस्त्याची गरजच आहे. आतां हा रस्ता ओलांडणें अशक्यप्राय आहे, अगर या रस्त्यावरचा फेरफटका म्हणजे जिवावरची जोखीम आहे, पण आपल्या प्रचंडपणाच्या स्वप्नांत मश्गुल असलेल्या कारिओकांना त्याची पर्वा नाहीं. या रस्त्यावर प्रचंड मोटारी आणि प्रचंड लोटाशान्स प्रचंड वेगानें कशा धावतात तें न्याहाळण्यांतच ते गढून गेलेले असतात. कारण जीवनाचा बेफाम, बेपर्वा आस्वाद त्यांच्या वृत्तींत भिनून गेलेला आहे. जीवनाचा अंगचोर आस्वाद त्यांना मान्य नाहीं. जीवन जगायचें तें भरघोस ! जीवनाचे झोके घ्यायचे ते आभाळापर्यंत ! आणि जीवनाचीं स्वप्नें पाहायचीं तीं अंतराळांतून – असा त्यांचा निश्चय आहे. म्हणूनच एखाद्या काळोख्या कोपऱ्यांत बसून पोलिसांची नजर चुकवीत पत्त्यांचा जुगार कारिओका खेळत नाहींत. उलट कोपाकबानाच्या सफेत मुलायम वाळूंतून आपलीं भरदार पावलें रोवीत जाऊन समुद्राच्या मस्त लाटांशीं निळी धडक ते घेतात.

मात्र कारिओकांच्या जीवनाची ही बेभान धडक पाहण्यासाठीं कोपाकबानाच्या वाळूंतच उतरलें पाहिजे असें नाहीं. अव्हेनिडा रिओ ब्रँकोवर वर्तमानपत्रविक्या पोऱ्याचा एक झकास पुतळा आहे, त्याच्या वासलेल्या

तोंडांतहि तुम्हांला ती दिसेल, आणि फूटबॉलच्या माराकाऱ्या मैदानावर जमलेल्या अडीच लाख तोंडांच्या आरोळ्यांत ती दिसेलच दिसेल ! खरें म्हणजे ती सर्वत्र दिसेल – कॉफीगृहांत कॉफीचे कपावर कप ढोसणाऱ्या तोंडांत ती दिसेल, त्याप्रमाणें नाक्यावर कणसें विकत बसलेल्या निग्रो बाईच्या शुभ्र सफेत हास्यांत ती दिसेल. गालावरच्या खोट्या तिळावर टिचकी मारण्याच्या आविर्भावांत ती दिसेल, त्याप्रमाणें संध्याकाळच्या किरमिजी काळोखांत प्रियेला पूर्ण वेढून टाकणाऱ्या आलिंगनांत ती दिसेल. कारिओकांच्या जीवनाची रीतच तशी आहे – ती काळ्या कातळांत काव्य शोधते आणि पेन-परिषदेंत कादंबरी धुंडाळते !

मौज : नोव्हेम्बर, १९६०

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि. ..................

# रि ओ

रिओच्या निसर्गाचें आव्हान कारिओकानें हंसत हंसत स्वीकारलें असें मीं म्हटलें. रिओच्या कोर्कोवाडो या अत्युच्च शिखरावर जा, तेथल्या खिस्ताच्या पुतळ्यावरची नजर काढून जरा सभो-वार फिरवा, म्हणजे तुम्हांला रिओंत निसर्गानें मानवाला दिलेलें आव्हान किती विलक्षण होतें याची कल्पना येईल.

हें आव्हान पौरुषाला होतें त्याचप्रमाणें कौश-

त्याला होतें. सामर्थ्याला होतें तसेंच सौंदर्यबुद्धीला होतें.

कारण रिओंत निसर्गानें एक जादूचा करंडाच उघडला आणि त्यांतून पंचमहाभूतें बाहेर सोडून दिलीं. सोडून देतांना म्हटलें, "लावा, काय दिवे लावायचे असतील ते आतां लावा. येथें तुम्हांला पूर्ण मुभा आहे. आतां कच खाल्लीत तर तुम्हीच कर्मदरिद्री!"

कच खाणें हा पंचमहाभूतांचा स्वभाव नव्हे.

तीं बाहेर आलीं तींच उडत उंडारत! पृथ्वीनें स्वतःभोवतीं एक गिरकी घेतली – एवढी जोराची कीं तिच्या देहाचे डोंगर झाले आणि अनंत आकार धारण करून आस्यापास्यांतल्या कोंड्या धरल्यागत पसरले. आदिमानवाच्या लिंगाप्रमाणें कांहीं लंबगोल बनले तर कांहींना येशू ख्रिस्ताच्या मस्तकावरील काटेरी मुकुटाचें रूप आलें. रंग, रेषा आणि त्यांच्या नुसत्या अस्तित्वाला ऐट आली. त्यांच्या कभिन्न कातळाचीं मुळें पृथ्वीच्या तळाला भिडलीं, आणि त्यांच्या लाल तकतकीत मातींत पृथ्वीचें अंतरंग उघडें झालें. झाडा-झुडपांना तर पिसेंच लागलें!

पृथ्वीला अशी पिसाळलेली पाहून पाणीहि बिथरलें. तें डोंगराच्या पाय-थ्याशीं धडक घेऊं लागलें, आणि कडेकपारांत शिरून फेस गाळूं लागलें. किनाऱ्यावर सुसाट धाऊं लागलें, आणि एकंदरींत इतकें बिथरलें, इतकें बिथरलें कीं आजतागायत तें तसेंच पिळवटत आहे.

मग वायूलाहि चेव आला. तो डोंगरांना झोंबूं लागला, लाटांशीं झुंजूं लागला, आणि झाडाझुडपांना झोपवूं लागला. तेजाला इतके कष्ट पडण्याचें कारण नव्हतें. उष्ण कटिबंधांतला सूर्य तयारच होता. त्यानें नुसते नेत्र उघडले. त्याबरोबर कातळ तकाकूं लागलें, पाणी हिरवेंनिळें झालें आणि पानांचे पाचू बनले. आकाशाला कांहींच करावें लागलें नाहीं. त्यानें फक्त आपलीं कवाडें उघडलीं, आणि चारी दिशा मोकळ्या झाल्या.

आणि मग समुद्राचें पाणी एका गोलाकार भूशिरावर आदळलें आणि दुभंगून दोनहि बाजूंना अर्धवर्तुलाकार पसरलें. नंतर कांहीं वेळानें किनाऱ्या-वर शुभसफेत वाळू पसरून परत फिरलें. तेव्हांपासून तें नियमानें येतें, निळ्या धुंदीनें नाचतें आणि वाळूची सफेत बेशुद्धि पिऊन परत जातें. डोंगर मात्र आपलीं शिखरें उंचावून तसेच उभे आहेत. कधीं कधीं ते आपली उन्नत

प्रतिष्ठा विसरतात आणि पायथ्याच्या तळ्यांतलें आपलें काळेंसावळें रूप निरखून घेतात. कधीं ते आपल्या खडकाळ अंगाचा राकटपणा पाहून रुष्ट होतात, तर कधीं आपल्या वनश्रीचें रंगदार रूप पाहून अभिमानानें स्फुरूं लागतात. रिओंत निसर्ग आला तो स्वस्थ बसण्यासाठीं आलाच नाहीं. आपल्या रूपाचें क्षणोक्षणीं नवनवें चैतन्यशाली दर्शन घडविण्याच्या ईर्षेनेंच तो येऊन दाखल झाला.

● ● ●

ग्वानाबाराच्या उपसागरांत डोलणाऱ्या गलबतांतून पोर्च्युगीझांनीं निसर्गाच्या या रूपदर्शनावर दृष्टिक्षेप केला आणि ते प्रथम स्तिमित झाले व नंतर विनम्र बनले. सातासमुद्राचा पल्ला मारून आल्याचा त्यांचा अभिमान आंतल्या आंतच जिरला. त्यांनीं रिओच्या भूमीवर पाऊल ठेवलें, पण तिला आपल्या राष्ट्राचें, राजाचें अगर कर्णधाराचें नाव देण्याचा आगाऊपणा न करतां नुसतें रिओ द जानेरो ( म्हणजे जानेवारींत सापडलेली नदी ) असें शुद्ध वर्णनात्मक नांव दिलें. त्यांचीं गलबतें जेथें लागलीं तेथल्या टेकडीवर कोटकिल्ला अगर तसेंच कांहीं तरी बांधण्याचें धाडस न करतां सेंट बेनेडिक्टचें चर्च बांधलें, मठशाळा उभारली आणि युरोपांतून आणलेल्या समृद्ध कोरीव कलेचा आणि रंगीन चित्रेचा त्यांच्यावर अंतर्बाह्य वर्षाव करून परमेश्वराची करुणा भाकली. त्याचप्रमाणें रिओच्या सर्वोच्च कोर्कोवाडो शिखरावर राजवाडा अगर प्रासाद उभारण्याच्या फंदांत न पडतां ख्रिस्ताचा पुतळा उभारला – आणि पुतळा कसा, तर त्या डोंगराच्या आणि ख्रिस्ताच्या माहात्म्याला शोभेल असा प्रचंड. ख्रिस्ताच्या साध्या सात्त्विक जीवनाला शोभेल असा बालबोध. त्यांत कलेची मिजास नाहीं, वैभवाचा दिमाख नाहीं. फक्त भक्तीचा भोळा भाव आहे. म्हणूनच कला म्हणून त्या पुतळ्याची किंमत शून्य आहे याची कोणाला खंत वाटत नाहीं. उद्धारक ( Redeemer ) म्हणूनच त्याची सार्थता आहे.

रिओच्या दर्शनानें पोर्च्युगीझ प्रवर्तक व्याकुळ झाले, विनम्र बनले. ही विनम्रताच त्यांच्या पहिल्या घरांत, पहिल्या बांधकामांत दिसते. आजहि हीं घरें कुठें कुठें दिसतात. बिचारीं आधुनिक आकाशगामी इमारतींच्या गर्दींत अंग चोरून आणि मान मोडून उभीं असतात. पण त्याची म्हणून एक प्रतिष्ठा

असते आणि जाणवते. त्यांच्या भोवतीं एक शांत संतोषकारक वातावरण नांद-तांना दिसतें. या जुन्यापुराण्या घरांना घेरण्याचा, पाडून पाहण्याचा प्रयत्न आजच्या उफाडलेल्या इमारती करीत असतात; पण उनाड पोरींच्या घोळक्यांत टोपपदरी गरती बाई प्रतिष्ठेनें शोभते तशीं कांहींशीं हीं घरें शोभत असतात. त्याचें दर्शन घेण्यासाठीं अगदीं जुन्या वस्तींतच गेलें पाहिजे असें नाहीं. कोपाकबानाचें मंदिर वातावरण आकंठ पिऊन भर शहराकडे परत फिरतांना उजवीकडे, डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या बैठ्या घरांच्या एकाद्या रांगेवर तुमची नजर पडली तर याची तत्काळ प्रचीति येईल. त्या रांगेवरून फिरणारी तुमची नजर मध्येंच एकाद्या खिडकींत शिरून आंतलें शिसवी सालंकृत लाकूड-सामान न्याहाळील. क्वचित् एकाद्या दारांत कुतूहलानें तरळणाऱ्या दोन डोळ्यांना भेटेल, नंतर गल्लींत खेळणाऱ्या मुलांकडे कौतुकानें पाहील अगर धांवत जाणाऱ्या मांजराबरोबर धावेल, आणि धांवतां धांवतां पलीकडच्या डोंगरावर सरसर चढेल. पण त्या डोंगराच्या कडेला लटकलेल्या झोपड्यांच्या लक्तरांना पाहून लगेच मागें वळेल – मागें वळेल आणि त्या दारांतल्या डोळ्यांवर खिळेल. पण क्षणभरच. कारण ते डोळे तसेच न्याहाळीत तुम्ही फार काल उभे राहूं शकत नाहीं. त्यांतली निरागस प्रतिष्ठा तुम्हांला तसें करूं देत नाहीं, आणि तुम्ही चालूं लागतां. जरा वेळानें एक झुंबरांचें दुकान लागतें आणि त्यांतलीं झुलतीं झुंबरें तुमचें लक्ष खेचतात. तुम्हीं पाहत उभे राहतां, आणि पाहतां पाहतां त्या झुलत्या मिजाशींत मानवाच्या घमेंडीची जाणीव तुम्हांला होऊं लागते आणि तिचा प्रत्यय तुम्हांला समोरच्या उभार इमारतींत येतो.

● ● ●

मधांच्या त्या सात्त्विक इमारती, त्या लक्तरें लोंबलेल्या झोपड्या, नंतरचीं तीं ऐटबाज झुंबरें आणि या उभार इमारती – मानवाच्या एका विकासक्रमाचा तुम्हांला साक्षात्कार होतो, आणि ध्यानांत येतें कीं या समोरच्या इमारतींची ऐट आजच्या वैज्ञानिक विकासामुळें शक्य झाली आहे, आणि आजच्या विज्ञानाची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टि निराळी आहे. हें विज्ञान निसर्गाकडे पूर्वीच्या आदरानें अगर स्नेहभावानें पाहत नाहीं. निसर्गाचा अनुनय करण्याची अगर त्याचा स्नेह संपादण्याची गरज त्याला वाटत नाहीं.

निसर्गावर मात करण्याच्या, त्याला सर्वस्वीं कह्यांत आणण्याच्या ईर्षेनें तें प्रेरित झालें आहे. या विज्ञानाची उपासना करणारा कारिओका रिओच्या भूमीवर पहिलें पाऊल टाकणाऱ्या पोर्च्युगीझ मुशाफिरांप्रमाणें दबून जात नाहीं. निसर्गानें रिओंत इतस्ततः फेकलेल्या मस्त राकट डोंगरांना पाहून त्याचा भक्तिभाव जागृत होत नाहीं. या रगेल डोंगराशीं सामना करण्याची इच्छा त्याच्या अंतःकरणांत थैमान घालूं लागते. असा सामना करणाऱ्या इमारती बांधण्याचा विडा तो उचलतो. या इमारतीच्या कारिओकाच्या या वैज्ञानिक अभिमानानें फुरफुरत असतात. पूर्वींच्या घरांत शालीन सौंदर्याचें अगर विनम्र वातावरणाचें माहात्म्य त्यांना वाटत नाहीं. आपल्या सामर्थ्यावर, आपल्या आधुनिक दिमाखावर त्या खूष आहेत. रिओच्या शक्तिशाली डोंगरांना, कभिन्न कातळांना आणि उभार कड्यांना आव्हान देण्याची ताकद त्यांच्यांत आहे. या ताकदीनेंच त्या शोभतात. या ताकदीचा प्रभाव त्या कड्यावर पाडतात आणि त्यांच्याशीं एक प्रकारची तेजस्वी संगति साधतात.

रिओचें आधुनिक वास्तुशास्त्र त्या शहराला शोभून दिसतें तें या संगतीमुळें. पण रिओच्या इमारतींत संगीत जाणवते त्याहून अधिक जीवनाचा प्रचंड उत्साह, जगण्याची एक विलक्षण तिरिमिरी जाणवते. रिओंत कोठेंहि जा, कांहींहि पाहा, ही तिरिमिरी तुम्हांला प्रथम जाणवेल. ती लेमे टेकडीच्या बोगद्यांत जाणवेल तशी त्या बोगद्यांतून जाणाऱ्या लोटाशान्सच्या धडधडींत जाणवेल. त्या बोगद्यांत प्रज्वळणाऱ्या दिव्यांत तिचा प्रत्यय येईल त्याचप्रमाणें बोगद्याच्या भिंतीचा दगड घासूनघासून चकचकीत करण्याच्या संगमरवरी आग्रहांत येईल. समुद्रांत घुसलेलें एक भूशिर सपाट करून त्यावर विमानतळ उभारण्याची कल्पना या तिरिमिरीच्या पोटींच जन्माला आली. श्यूगरलोफच्या पायथ्याशीं डोलणाऱ्या विहारनौकांच्या धक्क्यावरील इमारतींचें वास्तुशिल्प त्या गोल गुळगुळीत डोंगराशीं जुळणारें हवें हा आग्रह या तिरिमिरींतूनच उगवला. या स्वयंसिद्ध पाषाणराजाच्या मस्तकावर टांगत्या रेल्वेचें ठाणें ठोकण्याचें औद्धत्य या तिरिमिरीनेंच निर्माण केलें. पण या तिरिमिरीचा, जीवनाच्या या बेलगाम उत्साहाचा अतिरेक पाह्यचा असेल तर बिरामार ॲव्हेन्यूवर उतरून समुद्राच्या दिशेनें पावलें टाका. पावलें कच्च्या जमिनीवर पडतील, आणि धुळीनें माखून निघतील. कारण ही जमीन येथें नुकतीच आली आहे. पूर्वी येथें समुद्र

होता. समुद्र मागें हटवून रिओचें क्षेत्र वाढविण्याचा उद्योग सुरू आहे. अर्थशास्त्रज्ञांना या उद्योगांत अर्थ दिसणार नाहीं, आणि व्यवहारी बुद्धीला त्याचा हिशेब लागणार नाहीं. कारण त्यांत व्यवहार नाहींच. नुसती तिरिमिरी आहे. आक्रमक तिरिमिरी. या तिरिमिरींमुळें पंचक्रोशींतले खडक फुटतात. अवजड फत्तर किनाऱ्यावर येतात. आणि क्रेनच्या साह्यानें पाण्यांत लोटले जातात. अर्थात् पाणी हटतें आणि रिओचें क्षेत्र वाढतें. कां वाढतें, कशासाठीं वाढतें, हजारों मैलांची निर्जन भूमि रानोमाळ उधळून देणाऱ्या देशाला जमीन–पाण्याच्या नैसर्गिक विभागणीशीं असें भांडत बसण्याची गरज काय असा प्रश्न कोणी विचारीत नाहीं. विचारण्याचें कोणाच्या मनांतहि येत नाहीं. ठराविक वेळीं इंजिनिअर्स येतात, वाढत्या क्षेत्रावरून नजर फिरवितात आणि कृतार्थ होतात. नगरपिते येतात, मानवाच्या या पराक्रमानें डोळे विस्फारतात आणि एकमेकांचें अभिनंदन करून निघून जातात. बघ्ये हजर असतातच पाण्यांत एक फत्तर पडला तर पाणी त्याला गिळतें, अनेक पडले तर तें पळ काढतें असा निष्कर्ष ते काढतात आणि स्वतःशींच चूर होतात. कांहीं हौशी जीवहि असतात. ते नव्या दगडावर बसून मासे पकडतात, नाहीं तर एकमेकांना सुखविणारे नुसते रुमाल फडफडवितात. एक गोष्ट तेथें होत नाहीं. पळणाऱ्या पाण्याची कोणी कींव करीत नाहीं. किंवा हें पाणी रागावलें तर कोठें तरी जाऊन हजारों एकर जमीन घशांत टाकील याची कोणी फिकीर करीत नाहीं, फिकीरीची बात जीवनाच्या तिरिमिरीशीं जुळत नाहीं !

● ● ●

जीवनाची तिरिमिरी अगर तिरिमिरीचें जीवन हीच येथें मुख्य गोष्ट आहे. याची एक कळा कोपाकबानावर दिसेल. किनारा कोपाकबाना हें जगांत गाजलेलें नांव आहे. निर्दोष अर्धवर्तुळी आकार आणि मऊमऊ पांढरीशुभ्र वाळू यांखेरीज या किनाऱ्यांत खरोखर कांहीं नाहीं. पण कारिओकाला याची जाणीव नाहीं. एक अद्‌भुत किनारा अशी त्याची जाहिरात तो करीत असतो, आणि तुलनेसाठीं तो मागें युरोपांत नेपल्सच्या मरीन ड्रायव्हकडे पाहतो. रिओ ब्रँकोवरच्या एका उपाहारगृहानें या दोन किनाऱ्यांचीं दृश्यें आपल्या एका भित्तिचित्रांत मोठ्या अभिमानानें जोडून दिलीं

आहेत. वास्तविक नेपल्सच्या मरीन ड्राइव्हची खरी तुलना आपल्या मुंबईच्या मरीन ड्राइव्हशीं होते. पण कारिओकाला त्याची माहिती नाहीं, आणि पर्वाहि नाहीं. कारण मुंबईच्या मरीन ड्राइव्हचे जगांत नगारे वाजलेले नाहींत. आणि वाजणारहि नाहींत. आणि कोपाकबानाचें वातावरण मुंबईला कोठें आहे ? कोपाकबानाची कीर्ति आहे ती या वातावरणामुळें आहे, आणि या वातावरणांत कारिओका मश्गुल आहे. त्याचीच त्याला महति आहे, कारण त्याच्या विशिष्ट तिरिमिरिनें तें भरलेलें आहे.

ही तिरिमिरी प्रथम व्यक्त होते ती पोहण्यांत – धुंद पोहण्यांत. कोपाकबानाच्या पोहण्यांत एक जादू आहे. कोपाकबानाच्या पाण्यांत अंगप्रत्यंगांची जी युति घडते ती रोदॉंने पाहिली असती तर त्याच्या शिल्पांत एक नवीनच वीज शिरली असती. पण लाटांवर हिंदळणें अगर पाण्यांत रोमांच फुलविणें, अंगावर वाळू थापून पसरणें अगर उन्हाच्या तिरिपीनें अंग भाजून काढणें यांत कोपाकबानाची परमावधि नाहीं. पाण्याऐवजीं पतंग उडविणें अगर वाळूंत लोळण्याऐवजीं वाळूंत लेणीं कोरणें यांतहि नाहीं. हें सारें चालतेंच आणि कोपाकबानाच्या फूटपाथवर फेऱ्या घालणारे प्राणी त्या साऱ्याकडे ओल्या नजरेनें पाहतातच. पण यांत कोपाकबानाची कृतार्थता नाहीं. ती एक वेगळेंच विश्व तो निर्माण करतो आणि त्यांत खुशालतो यांत आहे. या विश्वांत अचानक एखादा निब्बर चेहऱ्याचा आणि राठ कातडीचा हबशी हजर होतो आणि बोलबोल म्हणतां एखाद्या गोऱ्या फटाकडीला बगलेंत मारून निघून जातो. कारिओकाला याचें कांहीं वाटत नाहीं, कारण जीवनाच्या ओसंडून चाललेल्या उत्साहांत काळा–गोरा असला आगंतुक भेद करीत बसण्यास त्याला फुरसत नाहीं. या व्यवहाराचे म्हणून जे कांहीं संकेत आहेत तेहि पाळण्याचें त्याला सुचत नाहीं. म्हणून भल्या सकाळींच एखादी मुलगी कोपाकबानावर हजर होते, तेथें ऊन खात बसलेल्या एखाद्या तरुणाकडे जाते, आणि केसांची झुलपें आणि झग्याची झालर उडवीत म्हणते, "तूं मला आवडत आहेस, तूं माझ्याबरोबर येतोस ?" हेंहि एकादीला सपक वाटतें. ती आपल्या उद्योगांत थोडी क्रांतीची पावडर मिसळते आणि आपण कॅस्ट्रो अगर लुम्मुम्बा यांना मदत करण्याच्या मोहिमेवर आहोंत असें सांगून एखाद्या साहसप्रिय अमेरिकनाला दिवसाढवळ्या आपल्या खोलीवर घेऊन जाते.

पण आधुनिकतेचे डोझ प्यालेली रिओची तिरिमिरी खरी उसळते आणि उधळते ती ॲव्हेनिडा रिओ ब्रँकोवर. पंचवीस–पंचवीस मजल्यांच्या इमारती आधुनिक वास्तुशास्त्राचीं वस्त्रें मिरवीत या रस्त्यावर दुतर्फा उभ्या आहेत. आपल्या काचेची किमया, पोलादाची ताकद आणि सिमेंटचे संस्कार यांतच त्यांचें अवघें चित्त गुंतून गेलेलें आहे. आपला अजस्र अवतार तोलून धरणाऱ्या स्तंभांचा त्यांना अभिमान आहे. त्यांच्या रंगेल ताकदीचें आणि ओबडधोबड अंगांचें कौतुक करीत त्या कित्येक ठिकाणीं अक्षरशः ढेंगा वासून उभ्या आहेत. त्यांना जुन्या उमरावी अलंकारांचा सोस नाहीं. कातीव खांबांचें कौतुक नाहीं. शिल्पाचें आकर्षण नाहीं. खिडक्यांच्या चौकडी दर्शनावर त्या खूष आहेत. खिडक्यांच्या काचांचे कवडसे त्यांच्या चकचकीत कडांवर तरळतात त्यांतच त्यांना काव्य आढळतें. आपल्या भूमितिप्रणीत आकृत्यांतच त्या अलंकार शोधतात. आपल्या साऱ्या खिडक्या सताड उघडून आंत जीवनाच्या कारखान्यांचीं जीं चक्रें फिरतात त्यांचें दर्शन घडविण्यांत त्यांना कृतार्थता वाटते. आपण उंच असलों तरी आकुंचित आहोंत, आपलें प्रवेशद्वारं .भव्यभक्कम असलें तरी त्याच्या आंतली जागा नसल्यासारखीच आहे आणि आपल्या पुढचा रस्ता गल्लीबोळासारखा आहे याची त्यांना खंत नाहीं. आपल्या अंतरंगांत विज्ञानाची सळसळ आहे, आपल्या लिफ्टची सरसर सारखी सुरू आहे, आणि आपले व्यवहार यंत्रतंत्राच्या तालावर सुरू आहेत याचीच त्यांना मिजास वाटते. विशेष म्हणजे आपल्या भोंवतीं आधुनिक जीवनाची सुसाट हवा संचरत आहे याचाच त्यांना अभिमान आहे. या हवेंत आधुनिक जीवनाचे अनेक वास आणि आवाज दाटलेले आहेत. पुष्कळदा त्यांच्यामुळे नाक आणि कान दाबून घ्यावेसे वाटतात. पण डोळ्यांचें पारणें फिटतें. रिओचें सारें वैभव, सारा थाट, सारी आरास या इमारतींच्या पारदर्शक खिडक्यांतून डोळ्यांना भुरळ घालीत असते. स्त्रियांच्या प्रत्येक फॅशनपासून पुरुषाच्या दरेक छंदापर्यंत साऱ्यांचे चोचले पुरविणाऱ्या चिजा तेथें झळकत आहेत. त्या नुसत्या निरखण्यांत कारिओकाचा जीव हरपतो. पण त्या निर्भरपणें पाहत असण्याचें स्वातंत्र्य मात्र त्याला नाहीं. येथल्या जीवनाच्या झपाट्यांत त्याचें पाऊल फार काल स्थिरावूं शकतच नाहीं. तें सारखें फिरत असतें, फिरत असतें – जीवनाच्या जखडबंद पट्ट्याबरोबर गरगरत असतें ! कारिओका त्यांत

जीवनाचा उत्साह ओततो. जगण्याची सारी तिरिमिरी त्यांत भरतो. पण अखेरीस तें दमतेंच.

• • •

असाच एक दमला-भागलेला कारिओका याच रस्त्यावरच्या एका चौकांत थांबतो, तेथल्याच एका बाकावर टेकतो, आणि खिशांतल्या रुमालानें चेहऱ्यावरचा घाम पुसूं लागतो. चेहरा आतां ओढलेला असतो. वैतागलेला असतो. नजर त्रासलेली असते. या उंच उंच इमारतींचा, त्यांतल्या त्या ओढगस्त जीवनाचा त्यांच्या भोवतालच्या साऱ्या वातावरणाचा त्याला एकदम वीट येतो. या इमारती – एका अमेरिकन मासिकांत निवडुंगांच्या रानाचें चित्र त्यानें पाहिलेलें होतें त्याच्यासारख्या वाटतात. आतां त्याला काटेरी रानांतल्या जीवनाचा त्याला अर्थ कळेनासा होतो.

इतक्यांत वाऱ्याची एक झुळूक येते. त्याच्या चेहऱ्यावर विसावते, त्याला सुखावते, आणि तो धुळीनें माखलेले बूट साफ करून घ्यायला लागतो. जरा वेळानें त्याचा जीव आणखी थोडा स्वस्थ होतो, आणि तो आजूबाजूचीं दृश्यें पाहूं लागतो. आतां त्यांच्या दृष्टींत एक मोकळेपणा असतो. समोरच्या नॅशनल लायब्ररीच्या इमारतीचे रोमन स्तंभ त्याची नजर वेधतात. त्यांचा कलदार डौल त्याच्या मनांत भरतो. मग त्याची नजर पलीकडच्या म्युझियमच्या इमारतीवर जाते. त्या इमारतीच्या शिखरावरून जाते, आणि इंडियन एम्बसीच्या एका वार्तापटांत पाहिलेल्या उत्तर भारतीय देवालयाच्या शिखराची त्याला आठवण होते. मग त्याची नजर डावीकडच्या म्युनिसिपल थिएटरकडे वळते, त्याच्या पायऱ्यांची मालिका सरसर चढते आणि त्या शिल्पशाली इमारतीच्या वर्तुळाकार कळसावर क्षणभर स्थिरावून खालच्या पोर्चमध्यें उतरते आणि आळीपाळीनें सभोवारच्या या युरोपीय संस्कार मिरविणाऱ्या इमारतींवर फिरतां फिरतां भारावते – आणि मग त्याच्या आंत कोठें तरी जाणीव तरळते कीं या अवघ्या दोनतीन मजल्यांच्या इमारतींत जो खानदानी रुबाब आहे तो आजकालच्या भुंड्या इमारतींत नाहीं. हे आजचे सिमिटाचे रुक्ष डोलारे या शानदार इमारतींना खेटून मान वर काढून उभे राहावेत हें त्याला एक विडंबन वाटतें. एकदम या आधुनिक इमारती त्याला अर्थशून्य वाटतात. व्यक्तित्वहीन

वाटतात. आणि त्याची नजर शुष्क बनते. या शुष्क निर्बोध नजरेला पाया-खालच्या सर्पाकृति पट्ट्यांच्या मळकट फूटपाथवरचा कचरा खुपूं लागतो.

काहीं काल आपला हा कारिओका तसाच बसून राहतो. कांहीं तरी करावें म्हणून शेजारच्या बारमधून मद्य मागवतो आणि आळसटपणें पेला तोंडाला लावतो. प्रथम त्या पेयाची रुचीच त्याला जाणवत नाहीं, पण हळूहळू तें जिभे-वर विरघळूं लागतें. मग तें शरीरांत पसरतें, अंगांत, पायांत चैतन्य आणतें. तो उठतो. चालूं लागतो. एक प्रकारच्या निर्भर वृत्तीनें चालतो. पावलें कांहींशीं अधांतरीं पडतात. हलकींफुलकीं वाटतात. दृष्टीला कसलें तरी नवे धुमारे फुटता-हेतसें वाटतें. चालतांचालतां तो एकदम थांबतो आणि पाहतो. समोर एक उंचच उंच इमारत. आधुनिक. तिची उंचउंच सलग भिंत. ओकी, भकास. नजर एकदम उखडते. आणि शेंड्यापासून तळापर्यंत येते. आल्याबरोबर तेथेंच खिळते. तळाशीं एक छोटेंसें विरळ फांद्यांचें पण सुरेख आकाराचें झाड, आणि दोनतीन छोटींछोटीं रोपें . अगदीं भिंतीसरशीं वाढलेलीं. आपल्या पातींनीं आणि कातरलेल्या पानांनीं भिंतीवर एक चित्राकृति रेखणारीं. त्याची नजर क्षणांत शेंड्यापर्यंत जाऊन येते – आतां भिंतीचा भकासपणा जाणवत नाहीं. उलट ही सौंदर्याची पखरण जाणवते. भिंतीचा सताडपणा नष्ट करण्यासाठीं एखादें निर्गुण निराकार शिल्प तिला लटकुन देण्याची आधुनिक युक्ति यानें पाहिली होती. पण ही सचेतन सौंदर्यसाधना पूर्वी पाहिलेली असली तर मनांत ठसलेली नव्हती. पर्णाकृतींचा हा साजशृंगार दिवाणखान्यांतून बाहेर रस्त्यावरून येऊन सफल झालेला पाहून त्याला फार समाधान वाटतें. त्या समाधानांतच तो पावलें टाकूं लागतो. एक प्रकारच्या सुखावलेल्या तंद्रींत चालत राहतो, आणि चालतां-चालतां एज्युकेशन मिनिस्ट्रीच्या इमारतीसमोर येऊन उभा राहतो. पोर्चच्या भिंतीवरच्या पोर्सेलेनच्या तुकड्यांचें 'मोझाईक' पाहतो. तें त्याला मुळींच आवडत नाहीं. फिकट निळ्या रंगाच्या शिंपल्यामाशांच्या आकृत्या त्याला निर्जीव वाटतात. पण या इमारतीचा पल्लेदार विस्तार त्याला पसंत पडतो. विशेषतः तकतकीत काचांच्या खिडक्यांची चमकदार चौकड त्यांच्या मनाची पकड घेते. निरनिराळ्या कोनांतून पाहत पाहत तो इकडे तिकडे हिंडतो आणि एका पुतळ्यासमोर येऊन उभा राहतो. पुतळा म्हणजे युवक–युवतींच्या दोन मूर्ति. एकमेकांशीं संगति साधून उभ्या असलेल्या मूर्ति. त्याची नजर या

आकृतींच्या अंगावरून फिरते, त्यांच्या नितळ रेषेवर ब्रोट फिरवल्यासारखी फिरते, आणि फिरतांना पुतळ्याच्या दगडाचे दाणे टिपते. ब्रुनो जिऑर्जीच्या या दोन मूर्तींचे स्वाभाविक हावभाव आणि त्यांतली सात्त्विक निरागसता त्याला विशेष जाणवते – आणि नेमियेच्या आधुनिक वास्तुशास्त्रानें या असल्या अभिजात शिल्पाशीं संगति साधली याचा त्याला आनंद होतो. रिओच्या आधुनिक वास्तुशिल्पालाहि कलेची कोमल दृष्टि आहे याचें त्याला समाधान वाटतें, व त्या समाधानाच्या भरांत तो चालूं लागतो तो नकळ-तच ब्रिरामारवर येतो. ब्रिरामारवचें सैनिक-स्मारक त्याची नजर खेचतें. तें कोरें करकरीत स्मारक आतां सूर्याच्या मावळत्या किरणांनीं सोनाळलेलें असतें. त्या लालट उजेडांत उजवीकडची सैनिक-नाविक-वैमानिक ही त्रिमूर्ति अधिकच लखलखीत दिसते. तिच्या आकारांत जिऑर्जीच्या मधाच्या पुत-ळ्याची सचोटी प्रत्ययास येते, पण त्यावर त्याचें चित्त थरत नाहीं, कारण सूर्याच्या प्रकाशांत तळपणारें मधलें शुद्ध केवलाकार शिल्प त्याची दृष्टि दिप-वितें. क्षणभर ती तशीच घोटाळतें आणि अखेरीस डावीकडच्या द्विस्तंभीय मनोऱ्यावर फिरते. तत्काल त्याला सामर्थ्याचा साक्षात्कार होतो.

त्या साक्षात्कारानें त्यांच्या अंतरंगांत एक उत्साह शिरतो. उत्साहानें तो चालूं लागतो. त्याचें पाऊल शहराच्या दिशेकडे वळतें. पाऊल जोमानें पडूं लागतें. इतक्यांत तें थबकतें. दृष्टिहि थबकते. समोर एक लांबच लांब रांग असते. बससाठीं उभ्या असलेल्यांची रांग. थकलेली, शिणलेली, सारा त्राण गळून गेलेली. या रांगेतल्या लोकांचे चेहरे सुके भकास दिसताहेत. त्यांची नजर रिती, रिकामी दिसतें आहे. त्यांत कांहीं ओढ नाहीं, कांहीं अपेक्षा नाहीं, कांहीं ओलावा नाहीं. रिओच्या आनिक इमारतींतल्या फॅक्टऱ्यांतली सारी अर्थशून्य घरघर त्याच्या चेहऱ्यावर रेघोट्या ओढीत असते. या फॅक्टऱ्यांतली अर्थशून्य सक्ति त्यांच्या नजरेंत शून्याचीं वर्तुळें कोरीत असते. दिवसरभार जीवनाच्या पट्ट्याबरोबर फिरफिर फिरणारें त्यांचें शरीर येथें उभें असूनहि गोळा झाल्या-सारखें दिसतें.

क्षणभरांत तो शीण, ती अर्थशून्यता, ती अपंगता आपल्या करिओकाच्या च्या अंगांत शिरते. क्षणापूर्वीचा त्याचा जोम पिकल्या पानाप्रमाणें गळून पडतो. त्याची नजर राखटते. उगीचच इकडेतिकडे फिरते. इतक्यांत त्याला

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत. 

अनुक्रम ................ दि: ....................
क्रमांक .................. नों दि: ................

कोकोंवाडोवरचा खिस्ताचा प्रकाशलेला पुतळा दिसतो – आणि त्याला कांहीं तरी निराळेंच वाटतें. आपलें सारें चित्त बाहेरून आंत शिरत आहे, अंतर्मुख होत आहे, असें कांहीं तरी त्याला वाटतें. तो क्षणभर निर्भर निर्बोध नजरेनें त्या पुतळ्याकडे तसाच पाहत राहतो. पाहतां पाहतां त्याच्या जाणिवेचे पापुद्रे स्फुरण पावूं लागतात. लहानपणीं एकदां आईनें आपल्याला कोकोंवाडोवर नेऊन या पुतळ्याच्या पायावर कसें घातलें होतें, आपल्या आजारीपणांत आई या पुतळ्याला नवस कशी बोलली होती, या पुतळ्याचें लॉकेट आपण गळ्यांत कित्येक वर्षें कसें वापरलें होतें, या पुतळ्याकडे आपलें मन अनेकदा कसें धांवलें होतें याची अंधुक अस्पष्ट, अदृष्ट जाणीव त्याला होते. मग ती गुरफटते. जाणिवांत जाणिवा मिसळतात. विचारांत विचार गुंततात – आणि आपण जाणिवेच्या पलीकडेच जात आहोंत असें कांहीं तरी त्याला वाटतें. जरा वेळानें त्याला कांहींच वाटेनासें होतें. त्याची नजर कोठेंच पाहीनाशी होते. त्याला कशाचाच बोध होत नाहीं. त्याचें पाऊल अभावितपणें उचलतें, त्रिरामारवरच्या झाडांच्या राईकडे वळतें, आणि थोड्या वेळानें त्या राईतल्या अर्धअंधारांत तो दिसेनांसा होतो.

आपला कारिओका त्या अर्धअंधारांत असा अनेकदा नाहींसा झाला आहे. अस्थिर, अगतिक भ्रमणामंतर घरीं गेलेला आहे. एक प्रकारच्या भ्रांतींत वावरलेला आहे. आणि दुसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें सकाळीं उठून न्याहारी घेऊन ॲव्हेनिडा रिओ ब्रँकोवरच्या जीवनाच्या फॅक्टरींत हजर झालेला आहे !

सत्यकथा : फेब्रुवारी १९६१

●●●

# ब्रा सी लि या

सॉव पावलोला विमानांत बसलों, खिडकीबाहेर नजर टाकली, आणि थोड्याच वेळांत ब्रासीलिया ही नवी राजधानी उभारण्याचें प्रयोजन मनाव ठसण्यास सुरुवात झाली. आमचें विमान खडकाळ डोंगर, भरड जंगलें, अजस्र माळ, अफाट नद्या ओलांडून जात होतें. मैलोन् मैलांचा मुलूख मार्गे सरकत होता. खडक, रान, माती, पाणी यांच्या रंगीबेरंगी बेरजेचे, गुणाकाराचे आडवे–उभे नमुने

उगवत होते, मावळत होते. निसर्गाचें अनेक प्रकारचें, अनेक तऱ्हांचें, दर्शन होत होतें; पण तें बहुतांशीं निर्जन दर्शन होतें. लोकांचें, लोकांच्या उद्योगाचें, शेतीवाडीचें, वसाहतीचें दर्शन क्वचित् होत होतें. एखादा रस्ता दिसलाच तर तो रानांत नाहींशा होणाऱ्या पाऊलवाटेसारखा लगेच नाहींसा होई.

निसर्गाचें इतकें रांगडें दर्शन मला पूर्वी कधीं झालें नव्हतें आणि या दर्शनांत ब्रासीलियाच्या निर्मितीचें रहस्य सापडलें.

पोर्च्युगीझ ब्राझीलला आले, आपल्या मातृभूमीच्या शंभरपट प्रदेशावर त्यांनीं अंमल स्थापन केला – पण केवळ कागदोपत्रीं ! ते आंत पोचलेच नाहींत. आतां जो प्रदेश मी अंतराळांतून पाहत होतों त्या, आणि त्याच्या पलीकडच्या अफाट प्रदेशावर त्यांची नजर पडलीच नाहीं, ते फक्त समुद्रकिनाऱ्यावर पसरले. त्यांनीं बसवलेलीं शहरें समुद्रकिनाऱ्याला लटकलीं. पुढें ब्राझीलिअन्स स्वतंत्र झाले. पण म्हणून त्यांची नजर आंत वळली असें नाहीं. त्यांनीं डोंगर ओलांडले नाहींत, नद्या पार केल्या नाहींत, जंगलें तोडलीं नाहींत. पूर्वीप्रमाणें समुद्रकांठच्या खोऱ्यांतच जीवनाचे खेळ खेळण्यांत ते धन्यता मानूं लागले. एक प्रचंडांतली प्रचंड नदी आपल्या राष्ट्रांतून वाहते याचा अभिमान वाहण्यास ते विसरले नाहींत, पण त्या ॲमेझॉन नदीचें पाणी चाखणें तर सोडाच, पण तिचें फारसें दर्शनहि त्यांनीं घेतलें नाहीं – अद्यापहि घेत नाहींत. ब्राझील हा विस्तारानें उभ्या जगांत तिसऱ्या नंबरचा देश आहे, पण त्याच्या सत्तर टक्के प्रदेशांत लोकवस्तीचें प्रमाण चौरस किलोमीटरमागें एक असें आहे – म्हणजे शास्त्रीय परिभाषेंत हा एवढा मुलूख ' निर्जन ' आहे ! ब्राझीलच्या निम्म्या भागांत रबराचीं झाडें आपोआप गवतासारखीं उगवतात व वाढतात, पण ब्राझीलचें रबराचें उत्पन्न जगाच्या सव्वा टक्का आहे ! भूगर्भ संपत्तीबद्दल बोलायलाच नको – तिचा कोणाला अंदाजच नाहीं.

अशा परिस्थितींत देशाची नैसर्गिक प्रकृति आणि लोकांचें जीवन यांच्यांत संगति निर्माण होण्याचा संभवच नव्हता. लोकांचें जीवन संकुचित राहिलें, कृत्रिम बनलें. त्यांचीं शहरें कृत्रिम बनलीं. मैलोन् मैल मुलूख मोकळा बेकार पडलेला असतांना रिओसारख्या शहरांचा विस्तार फूटपट्ट्यांनीं वाढविण्यासाठीं समुद्र मागें हटविण्याचा उद्योग सुरू झाला. तिकडे अफाट प्रदेश अगदीं अक्षत पडलेला असतांना इकडे कड्याकपारांच्या आधारानें झोंपड्या-

घरें उभीं राहिलीं. आडवा प्रदेश ओस पडला आणि उभ्या इमारती उंचावूं लागल्या. जमिनीला बांध पडायचा तो समुद्राला पडूं लागला. एकंदरींत ब्राझीलचें जीवन भरवशाच्या भूभागाकडे पाठ फिरवून समुद्राच्या बेभरवशी पृष्ठभागावर संचार करूं लागलें.

ब्राझीलच्या जीवनांतली ही कृत्रिमता काढून टाकण्याचा एकच उपाय होता – तो म्हणजे राजधानी रिओहून उठवून अंतर्भागांत नेणें. सभोवतालच्या प्रदेशांत आर्थिक चैतन्य खेळविण्याचें अमोघ सामर्थ्य राजधानींत असतें. राजधानी समुद्रकिनाऱ्यावरून उठवून अंतर्भागांत नेली तर या सुपीक प्रदेशाचीं कवाडें आपोआप उघडतील, हा रामबाण उपाय ब्राझीलिअनांना फार पूर्वींपासून माहीत होता. ब्राझीलच्या स्वातंत्र्याचीं उषास्वप्नें पाहणाऱ्या 'इन्कॉन्फिडेन्ते मिनेरोज' या क्रांतिकारकांनीं १७८९ सालींच या महामंत्राचा उच्चार केला होता. १८२२ सालीं लिस्बॉव दरबारांतल्या एका मानकऱ्यानें या स्वप्नस्थ राजधानीचें नामकरणहि करून टाकलें. ब्राझीलच्या स्वातंत्र्याचे तीर्थरूप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या होसे बोनिफासिओनी या 'ब्रासीलिया' नांवावर आपल्या पसंतीचा शेरा मारला. १८९० च्या हंगामी राज्यघटनेंत या कल्पनेला अधिकृत स्वरूप आलें, आणि १९३४ सालीं त्यावर पक्क्या राज्यघटनेचें शिक्कामोर्तब झाला. १९४६ च्या राज्यघटनेंत ही नवी राजधानी 'सेंट्रल प्लेटो' वर न्यावी असें नमूद झालें, आणि १९५३ मध्यें या ठिकाणाचे अक्षांश–रेखांशहि पक्के करण्यांत आले.

हें ठिकाण म्हणजे देशाच्या धुरीणांच्या मर्जीची बाब, असा प्रकार नव्हता. त्याला जणूं दैवी योजनेचा आधार होता. या पुण्यभूमीचें, अक्षांशाच्या तपशिलासकट दर्शन, १८८३ मध्यें, संत डॉन बॉस्को यांच्या दिव्य दृष्टीला झालेलें होतें. त्यांना दृष्टान्त झाला होता कीं, १५–२० अक्षांशाच्या दरम्यान एक मोठें नदीचें पात्र असेल. तिचा उगम एका सरोवरांत झालेला असेल. तेथल्या डोंगराच्या उदरांत अमाप खनिज संपत्ति असेल. ही संपत्ति बाहेर आली कीं तेथें एक मोठी संस्कृति अवतरेल आणि मग कल्पनातीत वैभवाची निर्मिति होईल. दूध आणि मध यांचे पाट वहातील. ध्येयभूमीचेंच दर्शन घडेल. हें सारें तिसऱ्या पिढीस प्रत्ययास येईल.

ही तिसरी पिढी म्हणजे आजचाच काल. पण साधुपुरुषाच्या या भविष्यवाणीवर पटल आलें होतें. नव्या राजधानीची कल्पना जाहीरनामे आणि राज्यघटनेचे खर्डे यांतच अडकून राहिली होती. तिची जाणीव अगदीं नव्हती असें नाहीं, पण तिची तीव्र ओढ नव्हती. कळत होतें, पण वळत नव्हतें. पण अखेर तो क्षण आला. १९५५ च्या अध्यक्षीय निवडणुकीच्या धूम-धडाक्यांत उमेदवार ज्यूसिलिनो क्यूबित्स्चेक यांच्या एका सभेंत एका मत-दारानें थोडेंसें वात्रट बुद्धीनेंच विचारलें, "ब्रासीलियाचें काय?" आणि क्यूबित्स्चेक तत्काळ उत्तरले, "मी ती बांधीन." तोंपर्यंत त्यांनीं ब्रासीलियाचा फारसा विचार केलेला नव्हता. भाविक हिंदु, गायीच्या शेपटीला ज्या मरगळ बुद्धीनें स्पर्श करतात तशाच बुद्धीनें त्यांनीं या कल्पनेला अधूनमधून स्पर्श केलेला होता. पण या सभेंत शब्द गेला, आणि तो त्यांच्या अंतःकरणाला भिडला. अधिकारावर आल्यापासून तीन महिन्यांच्या आंत त्यांनीं ब्रासीलि-याच्या उभारणीसाठीं कंपनी निर्माण केली, आणि वर्षभराच्या आंत लुसिओ कोस्टांची योजना अमलांत येण्यास सुरुवात देखील झाली. ब्राझीलिअनांच्या अस्सल बेदरकारीनें ब्रासीलियाचें बांधकाम सुरू झालें. त्यासाठीं काचपोलादादि सामान रिओहून विमानानें न्यावें लागलें, पण त्याचा हिशेब त्यांनीं केला नाहीं. नोटांची गिरणी चालवून अर्थकारण धोक्यांत आणलें (डॉलरचा भाव ६५ क्रुझेरोंवरून १८५ क्रुझेरोंवर आला!) पण त्याची पर्वा केली नाहीं. ब्रासीलि-याला येऊन राहण्याच्या बाबतींत कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि मंत्र्यांना बडतर्फीच्या धमक्या द्यावा लागल्या, पण त्याची डर बाळगली नाहीं आपली मुदत संपण्याच्या आंत ब्रासीलियाचें उद्घाटन करण्याचा एकच ध्यास त्यांनीं घेतला, आणि कसलीहि क्षिति न बाळगतां त्यांनीं तो पार पाडला. ते थोडे अधिक विचारी, अधिक हिशेबी, आणि अधिक व्यवहारी असते तर हा पराक्रम त्यांच्या हातून झाला नसता!

बाल्झाकच्या कादंबऱ्यांप्रमाणें ब्रासीलियाची निर्मिति आर्थिक कारणां-मुळें झालेली आहे, पण तिच्या रूपलेखनांत काव्याचा आत्मा ओतलेला आहे. तिच्या रूपानें एकाद्या महाकवीचें स्वप्नच जणूं साकार झालें. म्हणूनच तिची सुरुवात सरोवराच्या निर्मितीपासून झाली. जिनीवा, कँडी, नैनिताल, दलात यांना सरोवरांचें अधिष्ठान निसर्गानेंच दिलें, पण ब्रासीलियाच्या सरोवराची

निर्मिति मानवानें केलेली आहे. हें सरोवर निर्माण करण्याची क्रिया म्हणजे एखाद्या कवितानिर्मितीची क्रिया ! डॉन बॉस्कोच्या दिव्य दृष्टीनें या प्रदेशांतल्या नदीचा उगम सरोवरांत पाहिला होता. ब्रासीलियाच्या काव्यात्म निर्मात्यांनीं, या दिव्य कल्पनेचा काव्यमय व्यत्यास करून, नदीच्या पात्रांत सरोवराची निर्मिति केली. आपल्या चार उपनद्यांसह वाहणाऱ्या पारानोआ नदीला त्यांनीं धरण घातलें आणि कोंडलेलें पाणी या उपनद्यांच्या खोऱ्यांत कसें जमतें आणि पसरतें याची गंमत पाहत ते बसले. परिणामीं सरोवर निर्माण झालें आणि सांबराचीं शिंगें दोन बाजूंना पसरतात तसें फाट्याफुट्यांसह पसरलें. पसरलें आणि आपल्याच निर्मित्यांना आव्हान करतें झालें कीं — बांधा, माझ्या या रूपाला शोभेल अशी राजधानी बांधा. अनेकांनीं हें आव्हान स्वीकारलें, पण लुसीओ कोस्टांच्या उत्तरांत प्रतिभेची एक स्वैर फेक होती. त्यांनीं तपशीलवार मानचित्रें तयार केलीं नाहींत. प्रतिकृतींचा खटाटोप मांडला नाहीं. नमुने सादर केले नाहींत. प्रबंधवजा विवरण केलें नाहीं. पांचसहा सुट्या कागदांवर कांहीं कल्पना मांडल्या, आकृति रेखाटल्या आणि पाठवून दिल्या. पण परीक्षामंडळ खूष झालें. सर विल्यम हॉलफर्ड म्हणाले, " आधुनिक नगररचनाशास्त्राच्या सिद्धान्तांत विसाव्या शतकानें घातलेली ही मोठीच भर आहे. "

लुसिओ कोस्टांच्या कल्पनेंत नव्या नव्या राजधानीच्या कल्पनेची जणूं पुनरावृत्ति झाली. राजधानीचें ठिकाण निश्चित करण्यासाठीं नकाशाच्या मध्यभागीं एखादी फुली मारावी त्याप्रमाणें सरोवराच्या दोन हातांनीं वेढलेल्या भागाच्या मध्यभागीं फुली मारून कोस्टांच्या योजनेस सुरुवात झाली. त्यांनीं फुली मारली. फुलीची उभी रेघ खालीं ओढून सरोवराला भिडविली. फुली होती तिचा क्रूस झाला. ब्राझील हें कॅथॉलिक राष्ट्र — फुलीला पावित्र्य प्राप्त झालें. मग फुलीची आडवी रेघहि वाढली — दोनहि बाजूंनीं वाढली आणि सरोवराला भिडली. उभ्या रेघेवर सार्वजनिक इमारतींची योजना झाली आणि आडव्या रेघेवर राहण्याच्या घरांची रांग लागली, आणि क्रूसाच्या सांगाड्याला विमानाचें रूप आलें. कोस्टांची आकृति आधुनिक बनली नि अद्ययावत् कल्पनांनीं मुसमुसूं लागली. अभिजात आणि आधुनिक अशा उभय तत्त्वांचा संस्कार तिच्यांत होऊं लागला.

लुसिओ कोस्टांचे एके काळचे विद्यार्थी ऑस्कर निमेये यांनीं या योजनेवर तशाच अभिजात आणि आधुनिक वास्तुशिल्पाचा साज चढविला. त्याचीं रंगदार छायाचित्रें मीं पाहिलेलीं होतीं. भरदार वर्णनें वाचलेलीं होतीं. आणि ब्रासीलिया म्हणजे निर्जन वनांत अवचित अवतरलेली एक स्वप्नपुरीच असें मला वाटलें होतें. ब्रासीलियाची एकेक इमारत म्हणजे बिलोरी स्वप्नाशिल्प. ब्रासीलियाचा विस्तार म्हणजे या शिल्पकृतींनीं कोरलेलें अवकाश; आणि ब्रासीलियाचें सरोवर म्हणजे या स्वप्नपुरीच्या प्रतिबिंबांनीं खुललेला एक विशाल आरसा, अशीं कल्पनाचित्रें मीं रंगाविलीं होतीं.

पण ब्रासीलियाच्या विमानतळावरून सरोवराच्या तरल दर्पणाचें आणि निमेयेंच्या स्वप्नशील वास्तुशिल्पाचें दर्शन घेण्याचा प्रयत्न मीं केला होता. पण तो अपेशी ठरला होता. एकदोन इमारतींचें निसटतें चौकोनी दर्शन होण्या-पलीकडे अधिक कांहीं दिसलें नव्हतें. विमातळावर उतरलों, गार वाऱ्याचा झोत आला, आणि मग मात्र बरें वाटलें. पण लगेच लाल लाल माती वाऱ्या-वर पिंगत आली आणि तिचा मारा चुकविण्यासाठीं धडपड सुरू झाली. विमानतळावर लाल तकतकीत मातीचा सडा पडलेला होता आणि तो वाऱ्या-बरोबर उठत भिराभिरत होता. अंगावर जेव्हां येत नव्हता तेव्हां सुंदर दिसत होता. त्याला जरा बाजूला टाकून ब्रासीलियाच्या आकाशरेषेचें दर्शन घेण्याचा प्रयत्न केला. सलग आकाशरेषा अशी नव्हतीच – होती ती टेकड्यांची, अंधुक, फिकट ! मधूनच चारदोन इमारती दिसल्या; इमारती म्हणण्यापेक्षां इमारतींचें सांगाडे ! दोन संलग्न इमारतींचा एक मनोरा दिसला तो मात्र उन्हांत तळपत होता. एकंदर निराशेंत एवढीच आशेची रेखा होती.

जरा वेळानें बसमधून निघालों. अधाशी नजर खिडकीवाटे पाहूं लागली, भिरभिरूं लागली. पण निराशच झाली. राजधानी अर्थात् दूर होती, पण तिच्या वैभवशाली सौंदर्याचें एखादें प्रसादचिन्ह दिसायला काय हरकत होती ! लाल लाल माती माझ्या कोकणी अंतःकरणाला ओढ लावीत होती. तिचा तकतकीत रंग गोड वाटत होता. पण या मातीचे ठिकठिकाणीं जमलेले ढिगारे – गवत, कचरा यांनीं भरलेले ढिगारे कसेसेच वाटत होते. कोकणी दृष्टि लाल मातीचें हिरव्यागर्द झाडाशीं साहचर्य शोधते, पण येथली झाडी हिरवीहि नव्हती आणि गर्दहि नव्हती. भुरटें करपट गवत आणि मधूनमधून

वाढलेलीं खुजट, करपट झाडें, एवढेंच काय तें दिसलें, आणि त्यांच्यामुळें सभोंवार पसरलेला विस्तृत माळ ओका, आक्रसलेलाच भासला! दिलासा शोधणारी दृष्टि त्या झाडांच्या म्हणण्यापेक्षां झुडपांच्या आकारांत गुंतण्याचा प्रयत्न करीत होती. एकेक झाड म्हणजे आधुनिक केवलाकार शिल्पाचा नमुना म्हणावा असें होतें. पण त्यांच्या मरगळलेल्या अवतारांत जीव नव्हता, आणि नजर बांधून ठेवण्याचें सामर्थ्य नव्हतें. शेजारीं बसलेल्या एका ब्राझीलिअन गृहस्थाला म्हटलें,

" हा माळ इतका मस्त आहे, हवा इतकी उत्तेजक आहे, मग हें रान इतकें मरगळलेलें कां ? "

" अहो, " तो उत्तरला, " ब्राझीलियाच्या भोंवतालचा मुलूख अगदीं नापीक आहे, पण तेंच तिचें भाग्य ठरणार आहे. "

" तें कसें काय बुवा ? "

" ही राजधानी कां बांधली तें ध्यानांत घ्या म्हणजे ताबडतोब लक्षांत येईल. " तो म्हणाला. " हा ब्रासीलियाचा खटाटोप कां? ब्राझीलचा आंतला मुलूख उघडण्यासाठीं ना! राजधानीच्या सभोंवतालचा निकटचा प्रदेश सुपीक असता तर हें कितपत सिद्धीस गेलें असतें! राजधानीला हव्या त्या वस्तू येथेंच निर्माण झाल्या असत्या, या एवढ्याच भागाचा विकास झाला असता तर पलीकडचे भाग निदान कित्येक वर्षें तरी मागसच राहिले नसते काय? आतां राजधानीच्या पैशाचा स्पर्श या दूरच्या भागांना होईल आणि त्यांचा उद्धार होईल. "

मीं मनांत म्हटलें, ' डॉन बॉस्कोच्या दूध-मधाचे पाट वाहण्याच्या भविष्याचें काय ? ' आणि लगेच माझें मींच उत्तर दिलें, " साधुसंतांचीं वचनें अशीं परमार्थानें घ्यायचीं नसतात. कांहीं म्हटलें तरी पाट वाहतीलच – मधाचे नाहीं तरी मद्याचे ! "

पण माझा ब्राझीलिअन मित्र या प्रश्नाकडे अशा वात्रट बुद्धीनें पाहूं शकत नव्हता. राष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न त्याच्यापुढें होता, म्हणून त्याचें गंभीर विवेचन सुरूच होतें. तो सांगत होता, " आणि हा येथला भाग नापीक आहे याचा आणखी एक फायदा आहे – त्यामुळें राजधानीचें राजस स्वरूप निर्धोक राहील. "

" म्हणजे – ! " मीं प्रश्नार्थक चेहरा केला.

" म्हणजे असं कीं, ब्रासीलियामुळें होणाऱ्या आर्थिक उद्धाराचें जे कोणी सूत्रधार असतील – म्हणजे ते व्यापारी, कारखानदार, भांडवलवाले – ते दूर राहतील, आणि ब्रासीलियाचें शुद्ध राजकीय स्वरूप कायम राहील. "

" शंका आहे, " मीं म्हटलें, " भांडवलदारांचे अदृश्य हात कुठपर्यंत पोचतील सांगतां येणार नाहीं – "

" निदान येथे जवळपास कारखाने उगवून ते येथल्या सुंदर सुंदर इमारतींची शान तरी मारणार नाहींत..."

ही शान अद्याप दूरच होती. अद्याप आमची बस काठच्या रानावर धूळ उडवीतच चालली होती. जरा वेळानें ती एका पक्क्या रस्त्यावर येऊन पोचली. क्षणभरांत तिनें एक वर्तुलाकार फिरत घेतली, नंतर तळरस्त्यावर उतरली. आणि समोरच्या रस्त्याखालून पलीकडे जाऊन तिनें रस्तेबांधणीच्या एका आधुनिक तंत्राचा पाठ आम्हांला दिला. आम्ही आतां शहराच्या अव्वल भागांत शिरलों होतों, पण कांठच्या इमारतींचे अद्याप कोथळेच दिसत होते. त्यांच्या पोलादी आंतड्याच्या दर्शनानें त्यांच्या ताकदीची कल्पना येत होती, पण सौंदर्याची काच त्यांच्यावर अद्याप चढायची होती. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला या इमारती बांधणाऱ्या कामगारांच्या गोणपाट-पत्र्याच्या झोपड्या होत्या, आणि त्या या सुंदर इमारतींच्या पायांत कोणतें स्फोटक द्रव्य पुरून ठेवलेलें आहे याची जाणीव करून देत होत्या. आमची बस पुढें चाललीच होती. जरा वेळानें एका पुऱ्या झालेल्या इमारतीचें आवार लागलें. देलिओ उचोआ नांवाच्या वास्तुशास्त्रज्ञानें त्या बांधल्या अशी माहिती शेजारच्या माणसानें दिली. त्या पाहून कप्पेदार कपाटाची आठवण झाली. ( 'एखाद्यानें रेडिओच्या केसला कितींनीं गुणलें म्हणजे एवढी इमारत तयार होईल असा हिशेब मांडला असता. ) माझें लक्ष एका फ्लॅटच्या खिडकींतून आंत गेलें आणि आंतलें फर्निचर, पडदे वगैरे दिसले – आणि, ही अखेरीस 'अधिकाऱ्यांची नगरी,' श्रीमंती जीवनाच्या खुणाच ती मिरवणार असा विचार मनांत आला. लगेच मघांचा या इमारतींच्या स्फोटक पायाचा विचार आठवला, नि ध्यानांत आलें कीं अगदीं कामगारांचें राज्य आलें तरी अधिकारी वर्ग असाच राहणार. ही जाणीव झाली, आणि या नगरीच्या चिरंजीवपणाची एक विचित्र साक्ष

मिळाली ! पण ती मनांत फार वेळ घोळण्यास अवसरच मिळाला नाहीं. लगेच 'अवर लेडी फातमा'चें चर्च दृष्टींत आलें, आणि त्याच्या अपूर्व आकारानें लक्ष खेचून घेतलें. घेतां घेतां एक सुखद जाणीव निर्माण झाली. पण ती फार वेळ टिकली नाहीं. लगेच ध्यानांत आलें कीं या चर्चचा आकार बेडौल आहे. पहिली सुखद जाणीव झाली होती ती त्याच्या आधुनिकतेमुळें. म्युनिखला सेंट मॅथ्यूजचें आधुनिक चर्च कांहीं दिवसांपूर्वीच पाहिलें होतें. तें अतिशय मनांत भरलेलें होतें. चर्च आणि आधुनिक वास्तुशिल्प यांची सांगडच आवडलेली होती, मनांत घोळलेली होती, म्हणून ही पहिली प्रतिक्रिया अनुकूल झाली. पण ती विचाराच्या पहिल्या स्पर्शानें जमीनदोस्त झाली. फातिमाच्या चर्चमध्यें भूमितीच्या रेखांनीं कसल्याशा पक्ष्याची आकृति सूचित होत होती, आणि तरी ती वास्तु बेडौल वाटत होती. कां तें ध्यानांत आलें नाहीं. सुदैवानें आमची बस एक वळण घेऊन चर्चसमोरच येऊन उभी राहिली आणि ती इमारत डोळे भरून पाहायला मिळाली. पण वास्तूचा विचार आकारास येण्यापूर्वींच चर्चच्या व्हरांड्यांत बाकड्यावर, दारापाशीं, भिंतीपाशीं गप्पा मारीत असलेले लोकांचे गट आढळले, आणि ब्रासीलियाच्या आजच्या त्रुटित जीवनाची सामुदायिक सांगता या चर्चमध्यें कशी होत असेल याची कल्पना आली. हें चर्च बेडौल कां याचाच शोध मी करूं लागलों, आणि ध्यानांत आलें कीं या इमारतींत प्रमाणाचा प्रमाद आहे. तिचें छप्पर प्रमाणाबाहेर मोठें आहे, आणि म्हणूनच तिच्या दर्शनानें एक प्रकारची शांततुष्ट वृत्ती निर्माण होण्याऐवजीं एका चमत्कारिक विसंवादी जाणिवेनेंच मन अस्वस्थ होतें. या चर्चच्या भिंतीवर पोर्सेलेनच्या रंगीत तुकड्यांची नक्षी होती ती तर मुळींच आवडली नाहीं. रिओच्या 'मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन'च्या पोर्चच्या भिंतीवरची शिंपल्यांची नक्षी नावडली होती त्याची एकदम आठवण झाली. ती इमारत आणि हें चर्च, दोनहि ऑस्कर निमेयेंनीं बांधलेल्या – दोनहि आपल्याला आवडलेल्या नाहींत, हें चर्च तर मुळींच नाहीं; आणि ब्रासीलियांत शिल्प पाहायचें तें निमेयेंचें ! काय होणार नकळे !

पण इतक्यांत आमची बस पुढें निघाली आणि थांबली – आणि जें काय दिसलें त्यानें क्षणभर भान हरपलें !

आम्ही राजाध्यक्षांच्या ' अरुण-प्रासादा ' समोर उभे होतों. प्रासादाच्या सौंदर्यानें आमची नजर बांधली होती. क्षणभर तें सौंदर्य तापदायक वाटलें. इतर साऱ्या जाणिवा उस्कटत अंतःकरणाला भिडलें. इतकें तें विलक्षण होतें. आजवर अनेक सुंदर इमारती पाहिल्या होत्या. नव्या पाहिल्या होत्या, जुन्या पहिल्या होत्या. म्युनिखला एक नवी इमारत दाखवितांना तेथल्या एका वास्तु-शास्त्रज्ञानें नव्याजुन्या इमारतींतला फरक छान सांगितला होता. "जुन्या इमारती झाडासारख्या जमिनींतून वरवर येतात; नव्या विमानासारख्या जमिनीवर येऊन टेकतात." म्युनिखची इमारत विमानासारखी टेकली आहे असें कांहीं वाटलें नव्हतें. त्या वास्तुशास्त्रज्ञाच्या उद्गारांनीं ज्ञानाचा प्रकाशपडला असें दाखवितांना सत्यापेक्षांमीं शिष्टाचाराचाच आधार अधिक घेतला होता. पण आतां एकदम त्या प्राध्यापकांच्या उद्गारांची प्रतीति आली. विमानाला जी एक आकाराची शुद्धता असते, एक तरलता असते, एक प्रकारचें कसदार सौंदर्य असतें त्याची साक्ष येथें मिळाली. नव्या वास्तुशिल्पांत जुन्याची प्रतिष्ठा प्रत्ययास येत नाहीं, असें जें थोडेंसें वाटत होतें त्याचेंहि साफ निरसन झालें. जुन्या इमारतींना नक्षीदार कठड्यांचे, स्तंभांचे, शिल्पांचे अलंकार चढवितांना वास्तुशास्त्रज्ञांची प्रतिभा रमून जाई—यांतच प्रतिष्ठा आणि शान शोधी; त्यांतलें येथें कांहीं नव्हतें. एक साधा चौकोनी आकार, पण त्याचेंच एक सलग शिल्प बनलें होतें. विमान हें एक शिल्पच असतें, तसें शिल्प. त्याच्यासारखेंच कलदार, त्याच्यासारखेंच तकतकीत, त्याच्या रेषेसारखीच शुद्ध, सलग, स्वच्छ रेषा आणि त्याच्यासारखी आकारची आराधना. अर्थात् येथें पोलादाच्या चमकदार चौकटी आहेत, आणि काचेची किमया आहे. काचेनें वैभवाचा उल्हास उभा केला आहे. पण या इमारतीचें खरें वैभव तिच्या स्तंभांत आहे — आजवर कोणी कधीं उभारलें नव्हतें. अशा स्तंभांत आहे. त्यांचा आकार निराळा आहे, त्यांचा संगमरवरी पोत निराळा आहे, त्यांची वास्तुशास्त्रीय योजना निराळी आहे. एखाद्या नर्तकानें आपल्या हाताच्या पंज्यावर संबंध नर्तकी ऐटीनें तोलून धरावी, तसे या प्रासादाचें छपर या स्तंभांनीं तोलून धरलें आहे, — आणि बांधकामाच्या आधुनिक युक्त्यांमुळें छपराबरोबर सारा प्रासादहि तोलून धरला आहे. आणि शिवाय प्रासादाच्या शुद्ध चौकोनी आकाराचा कडकपणा दूर करून त्याला एक मजेदार सौम्यता, मार्दव आणि काव्यमयता

आणली आहे. या स्तंभांचा आकार म्हणजे निमेयेंच्या प्रतिभेची एक विलक्षण लकेर आहे. खंजिराचें पातें, जहाजाचें शीड, केवड्याची पात, विमानाचा पंख – तुमच्या प्रकृतीप्रमाणें हवें तें साम्य तुम्ही त्यांत शोधूं शकतां, पण त्या स्तंभांच्या रांगेनें या प्रासादाला एक स्वाभाविक रुबाब प्राप्त करून दिला आहे. त्या अभिजात ग्रीक स्तंभांच्यापेक्षां या आधुनिक स्तंभाची प्रकृति वेगळी आहे, पण त्यांचा डौल तसाच आहे, आणि मुख्य म्हणजे दरबारी वातावरण निर्माण करण्याची त्यांची शक्ति तशीच आहे.

प्रासादाच्या समोर पाण्याचें तळें आणि तळ्यांत आल्फ्रेडो केश्चिआती यांची एक शिल्पकृति आहे. पाण्यांतल्या प्रतिबिंबामुळें प्रासादाची तरल काव्यात्मकता द्विगुणित झाली आहे, आणि या शिल्पकृतीमुळें तळ्याच्या काव्यमयतेला एक सघनता आली आहे. ही शिल्पकृति म्हणजे केशरचना करीत बसलेल्या दोन स्त्रिया. या स्त्रियांच्या अंगाची पुष्ट मादकता त्यांच्या केसांच्या स्वैर कलापांत चांगली भिनून जाते. पण आपलें चित्त क्षणभर त्या कृतींत रंगलें, दंगलें, म्हणजे ध्यानांत येतें कीं या कृतीचें सौंदर्य त्याच्या मस्त विषयांत नाहीं, तर त्या हातांत केस धरलेल्या मूर्तींनीं कोरलेल्या शुद्ध अवकाशाच्या आकारांत आहे. त्या शिल्पकृतीकडे पाहतां पाहतां मला पूर्वी कधीं जाणवलें नव्हतें इतकें जाणवलें कीं शिल्प म्हणजे खरोखर अवकाशाचे प्रयोग!

आम्हांला आंत बोलवीत होते, पण आमचे नेत्र हें आसमंत निरखिण्यांतच दंग होते. हा प्रासाद, त्याचें पाण्यांतलें प्रतिबिंब, या प्रतिबिंबांत मिसळलेलें त्या शिल्पाचें प्रतिबिंब, आणि या प्रतिबिंबांना ओझरता स्पर्श करणारीं तळ्याकांठच्या तालवृक्षांचीं प्रतिबिंबें – साऱ्यांचा कसा एक अप्रतिम पट बनला होता. त्याचा पोत निरखण्यांत, स्तंभांच्या प्रतिबिंबांची तालवृक्षांच्या प्रतिबिंबांशीं तुलना करण्यांत, आणि या साऱ्यानें निर्माण झालेल्या वातावरणाचें अबोध अभावित पान करण्यांत (कीं, त्या वातावरणांत आपलें सारें चित्त ओतून आपण पूर्ण रितें बनण्यांत?) गढून गेलेली बुद्धि एका निकराच्या हाकेनें भानावर आली, आणि आतां आंत गेलेच पाहिजे याची जाणीव झाली. आंतलें वैभवसुद्धां पाह्यचेंच होतें, तेव्हां मी तळयावरच्या रस्त्यानें आंत जाऊं लागलों. तों एक ध्यान आडवें आलें. स्टेनगनवर हात ठेवून उभ्या असलेल्या पोलिसाचें ध्यान! येथें नुसतेंच सौंदर्य नाहीं, 'कायदा आणि सुव्यवस्था' हि


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ..................
क्रमांक .................... नों दि: ..................

आहे असें त्याला सुचवायचें होतें. पण ही ‘ कायदा–सुव्यवस्था ’ इतकी केविलवाणी कां तें मला कळेना !

मीं दरवाजांतून आंत पाहिलें पाऊल टाकलें आणि धक्का बसला. आतांपर्यंत जाणवलेल्या तरल, कोमल, काव्यमय सौंदर्यावर कसला तरी विदारक आघात होत आहे असें वाटलें. आम्हीं ज्या हॉलमध्यें प्रवेश केला होता, त्याच्या भिंती आरशांनीं मढविलेल्या होत्या, आणि जी एक भिंत आरसामय नव्हती, ती सोन्याच्या वर्खानें मढविलेली होती. तिच्यावर काळ्या अक्षरांत प्रेसिडेंट ज्यूसिलिनो क्यूबित्‌चेकचा एक संदेश काळ्या अक्षरांनीं रेखलेला होता, मला तें सारेंच दर्शन ओंगळ वाटलें, ग्राम्य, असंस्कृत वाटलें. अरुणप्रासादाचें स्वप्नशिल्प निर्मिणाऱ्या निमेयेंनीं हें केलें तरी कसें ? त्यांत नुसताच रुचिभंग नव्हता, वास्तुशास्त्राच्या प्राथमिक नियमांचा भंग होता. या आरशामुळें आंतला अवकाश नष्ट झाला होता, प्रकाश बिघडला होता, आंत आवश्यक असलेल्या विश्रब्ध वातावरणाचा निकाल लागला होता, आणि एक प्रकारची स्वैर उत्तानता तेथें उसळली होती.

हॉलमधून आम्ही लाउंजमध्यें गेलों. लाउंजमध्यें सौंदर्य विहरत होतें. सरल व वक्र रेषांची संगति साधणारें फर्निचर, बाहेरच्या करपट माळावरून दगड, माती, शेवाळ, काटक्या, हिरवळ आणून तयार केलेली स्वैर पुष्परचना, चिनी पड्यावरची लाखी कलाकुसर, भिंतीवरची क्व्हलर्कॅण्टीची केवलाकार चित्राकृति — येथें सारें कांहीं सुंदर होतें, या गोष्टींनीं पाहुण्यांत निर्माण केलेला उत्साह सुंदर होता, राष्ट्राध्यक्षांची आम्हां सर्वांबद्दलची आपुलकी सुंदर होती, या आपुलकीमुळें फुललेले चेहरे सुंदर होते — पण या साऱ्यावर हॉलमधल्या आरशांच्या स्मृतीचें सावट पडलें होतें. त्या आरशांनीं आणलेल्या प्रकाशाच्या पडछाया सैरावैरा नाचत होत्या. राष्ट्राध्यक्षांनीं स्वतः आग्रह करून दिलेल्या पेयांत या स्मृति बुडविण्याची युक्ति अनेकांनीं अवलंबिली. ज्यांना हें मानवत नव्हतें ते प्रासादामागच्या बागेंत गेले, तेथल्या मरिआ मार्टिन्सच्या केवलाकार शिल्पाच्या अवकाशांत आसरा शोधूं लागले, आणि अधिक सोपा मार्ग म्हणून त्या शाखामय शिल्पाचा पार्श्वभूमीसारखा उपयोग करून एकमेकांचा फोटो काढूं लागले.

जेवतांना मला या आरशाचा थोडासा निराळा प्रत्यय आला. आम्ही मागच्या व्हरांड्यांत जेवायला बसलों होतों. हॉलमधला एक आरसा समोर दिसत होता. शेजारीं हॉलच्या दरवाजाची मोकळी जागा. आरशांत आमच्या मागच्या टेकडीचें प्रतिबिंब दिसत होतें, आणि शेजारच्या मोकळ्या जागेंतून समोरची टेकडी दिसत होती; आणि ही टेकडी आणि आरशांतलें प्रतिबिंब एकमेकांत अशीं कांहीं जुळूनमिळून गेलीं होतीं कीं आपण एकच टेकडी पाहत आहों असें क्षणभर वाटलें, आणि ब्रासीलियाच्या अद्यापपर्यंत न जाणवलेल्या एका वैशिष्ट्याचा बोध झाला. ब्रासीलियाच्या नव्वद चौरस मैल टापूला ज्या टेकड्यांचें कडें आहे त्यांची उंची आणि आकार जवळजवळ सारखा आहे. जेवण झाल्यावर बाहेर आलों आणि प्रासादासमोरच्या पटांगणांत उभा राहून स्वत:भोंवतीं फिरलों. प्रासादासमोरच्या शिल्पापेक्षांहि हें वैशिष्ट्य आतां मला अधिक आकर्षक वाटलें. इतर मंडळी अरुण-प्रासादालगतच्या शंखशिंपल्यांच्या जातींत शोभणाऱ्या चर्चचें दर्शन घेण्यांत गुंतली होती. या चर्चच्या आकाराची फार तारीफ झालेली आहे, पण मला तरी ती पटली नाहीं. बर्लिनच्या गाभण कालवाच्या आकाराच्या काँग्रेस-हॉलचें रूप मला जसें आवडलें नाहीं तसेंच या चर्चचेंहि आवडलें नाहीं. पण बार्लिनच्या त्या सभागृहांत सभागृहाचें वातावरण जसें पुरेपूर जाणवतें, तसेंच या चर्चमधलें प्रार्थनामय वातावरण जाणवतें. तेथला साधेपणा खरेंच विनम्र आणि विलीन करणारा आहे.

लुसिओ कोस्टांनीं ब्रासीलियाचें जें केंद्र कल्पिलें आहे तें अरुण-प्रासादापासून दूर आहे. एक दिवस तें गर्दीनें आणि गडबडीनें घुमून निघेल, पण आज तेथें फक्त एक तीन मजली सांगाडा आहे. कोस्टाच्या योजनेच्या आडव्या-उभ्या रेषांच्या युतीनें तो अद्याप रंगायचा आहे आणि तो रंगला तरी ब्रासीलियाच्या सौंदर्याचा वेध घेण्यासाठीं अरुण-प्रासादापासून प्रारंभ करण्यांत एक औचित्य आहे, अर्थ आहे. राष्ट्राध्यक्षांचें तें निवासस्थान आहे, आणि अर्थात् राजधानींत त्याला आद्यस्थान मिळायलाच हवें. पण नैसर्गिक दृष्ट्याहि त्याला आद्यस्थान असायला हवें. ब्रासीलियांत सकाळची उष:प्रभा फाकते ती प्रथम या प्रासादावर. (म्हणून तर त्याचें नांव अरुण-प्रासाद.) सूर्यकिरणांची सोनेरी सळसळ सरोवराच्या पाण्यावर उमलली कीं तिचें पहिलें

दर्शन होतें. तें या प्रासादांतून. तेव्हां ब्रासीलियाचें खरें दर्शन घ्यावयास आम्ही अरुण-प्रासादांतून निघालों तें योग्यच झालें. थोड्या वेळानें आमच्या बसेस् ब्रासीलियाच्या त्रिगुण-चौकांत (प्लाझा ऑफ द थ्री पॉवर्समध्यें) थडकल्या — आणि आम्ही खालीं उतरलों ते तेथल्या दृश्यानें डोळे विस्फारीत! त्या चौकाची थोरवी आणि भव्यता तशीच आहे. एका बाजूला अरुण-प्रासादाशीं स्पर्धा करणारी राष्ट्राध्यक्षांच्या कचेरीची इमारत. दुसऱ्या बाजूला अत्युच्च न्यायालयाची तशाच प्रकृतीची इमारत, आणि समोर सत्तावीस मजल्यांचा दुहेरी मनोरा असलेली आणि अर्धगोलाचा एक सुलट आणि एक उलट असे घुमट आपल्या डोक्यावर धारण केलेली कायदे मंडळाची विलक्षण इमारत. या तीन शिल्पकृतींनीं कोरलेलें एक अवाढव्य आकाश म्हणजे हा चौक. या चौकांत उभें राहिलें म्हणजे एथन्सच्या ॲक्रोपोलिसवर आणि ॲगोरांत एकदम उभें राहिल्यासारखें वाटतें. ग्रीक वास्तुशास्त्रापेक्षां ब्रासीलियाच्या प्रकृति अर्थातच वेगळी आहे, पण पार्थेनानमध्यें भव्य, उदात्त, विशाल भावना निर्माण करण्याची जी शक्ति आहे तीच या चौकांतल्या इमारतींत आहे, आणि या चौकांत आहे. राज्याच्या त्रिगुणात्मक शक्तीची वास्तु एका चौकांत उभारण्याची कल्पना कोस्टा-निमेयेंनीं अमेरिकेच्या राजधानीकडून घेतली असावी. (आमच्या दिल्लीच्या विजयचौकांत तीच कल्पना दिसते. फक्त सुप्रीम कोर्टाची इमारत दूर नेऊन तिचा उच्छेद करण्यांत आला आहे.) पण कल्पना कोठूनहि घेतली असली तरी तिच्या अभिव्यक्तींत जी शक्ति आली आहे तिच्या तुलनेसाठीं ॲक्रोपोलिसवरच गेलें पाहिजे. वस्तुतः कोस्टा-निमेयेंच्या कल्पनेंत थोडी अधिक ऐट दिसते. ॲक्रोपोलिसला एथन्सच्या त्या मध्यवर्ती डोंगराच्या ताकदीचा आणि उंचीचा आधार आहे. पण कोस्टा-निमेये हे ले कार्बुशिएचे शिष्य आहेत. निसर्गाचा आधार घेण्यापक्षां निसर्गावर मात करण्याच्या बुद्धीनेंच ते प्रेरित झालेले असणार. हिमालयाच्या पायथ्याशीं चंदिगड बांधूनसुद्धां हिमालयाच्या टेकड्यांचा उपयोग करून घेण्याची कल्पना, अगर त्या टेकड्यांच्या पायथ्याशीं निर्मिलेल्या तळ्याच्या भोंवतीं शहर वसविण्याचीं कल्पना ले कार्बुशिएना सुचली नाहीं किंवा सहन झाली नाहीं. या तळ्याच्या भोंवतीं अर्धें एकावर एक उंचावत जाणाऱ्या टेकड्यांवर आणि अर्धें सपाटीवर असें चंदिगड वसलें असतें तर त्याच्या चौकोनी दर्शनाचे बंगले आज जे

एकसुरी वाटतात ते तसें न वाटतां त्या चौकोनी पुरोभागांचा एक सुंदर पट निर्माण झाला असता, आणि जिनिवा वा कॅण्डीचें निसर्ग-निर्मित वैभव चंदिगडला प्राप्त झालें असतें. पण तेंच नेमकें कार्बुशिएना नको असावें. लुई कोस्टांनीं सुद्धां एवढें मस्त सरोवर शेजारीं असूनहि त्याचा उपयोग करून घ्यायचें प्रथम नाकारलें, त्याचेंहि कारण हेंच दिसतें. त्या भव्य विशाल सरोवराला साजेशी नगररचना त्याच्या शेजारीं वसवून निसर्गाला आव्हान देण्याच्या पोटीं हा चौक जन्मला असला तरी, निसर्गावर मात म्हणजे रांगडी रचना ही बुद्धि जशी चंदिगडला बाधली तशी ब्रासीलियाला बाधली नाहीं, हें त्या राजधानीचें मोठेंच भाग्य होय. याचें श्रेय अर्थातच निमेयेंच्या सौंदर्यसाधक प्रतिभेला आहे. ले कार्बुशिएचें शिष्यत्व जें काय असेल तें असो, पण भरदार भक्कम वास्तु निर्माण करण्यापेक्षां तरल नाजूक वास्तु निर्माण करण्याकडे त्यांच्या प्रतिभेचा कल आहे. त्यांच्या हातांत लोहाराचा हातोडा नसतो, शिल्पकारांची छिनी असते. त्यांच्या अरुण-प्रासादांत यामुळेंच एक हलकी–फुलकी लकेर आली आहे, आणि भव्य-विशाल चौकांतल्या भव्य-विशाल वास्तूंतहि ही तरलता आहे. आणि म्हणूनच त्यांना स्वप्नशिल्पाची चारुता प्राप्त झाली आहे. पण या इमारतींचें पृथगसौंदर्य हें या चौकाचें वैशिष्ट्य नव्हेच. राष्ट्राध्यक्षांच्या कचेरीच्या काचेचें वैभव राजस आहे, अगर न्यायालयासमोर तालवृक्ष दरबारी रुबाबानें उभे आहेत, अगर कायदेमंडळाच्या आडव्या चौकोनी इमारतीमागें चौकोनी मनोरा उभा करून आणि तिच्या डोक्यावर दोन अर्धगोल परस्परविरोधी अवस्थेंत ठेवून गोल आकारांची गंमत निर्माण केली आहे, हें मुळीं या चौकाचें वैभव अगर वैशिष्ट्य नव्हेच. या इमारतींच्या आकारांनीं, त्यांनीं परस्पराशीं साधलेल्या काटकोनांनीं, त्यांच्यामधल्या अंतरांनीं कोरून शिल्पमय बनविलेलें अवकाश म्हणजे हा चौक – तेंच त्याचें वैभव. अर्थात सौंदर्याला सदोषतेचा शापच आहे. नाहीं तर या अशा अलौकिक चौकांत म्युझियमच्या इमारतीचा ठोकळा आणून टाकण्याची अवदसा ब्रासीलियाच्या निर्मात्यांना कां आठवली असती ?

या चौकाचें कसें नि कोठून दर्शन घेऊं, कसे नि कोणत्या कोनांतून फोटो काढूं असें आम्हांला झालें. त्यासाठीं कांठच्या उंचावलेल्या रस्त्यावरून समोरच्या उंच मैदानावर पळण्याची कसरत करावी लागली, पळतां पळतां,

आणि ठिकठिकाणाहून क्यामेऱ्याचे कोन लावतांना या कोरलेल्या अवकाशाच्या भव्यतेची कल्पनाहि आली. नुसते फोटो घेऊन अर्थातच समाधान झालें नाहीं. कायदेमंडळाच्या इमारतीच्या गच्चीवर चढून त्या विशाल अर्धगोलांना हात लावल्याशिवाय समाधान होत नव्हतें. (आणि त्यांना हात लावतांना आकाशांतल्या गोलांना हात लावल्याच्या—खोट्या—अनुभवाची शिरशिरी क्षणमात्र अंगांत उठली!) कायदेमंडळासमोरच्या मैदानावर चढतउतरत जातांना लहानपणीं उड्या मारतांना आलेल्या अनुभवाची थोडीशी पुनरावृत्ति झाली, आणि समोर मैदानावर उभें राहून निश्चल दृष्टीनें तें दृश्य मनाच्या आवाक्यांत आणतांना थोडासा समाधि लागण्याचाहि आनंद झाला. कांहीं तरी अपूर्व, भव्य, उदात्त पाहण्याच्या अकल्पित अनुभवानें या साऱ्या आनंदाला जो आगळेपणा आला होता तो आतां पुनः त्या ठिकाणीं गेलों तरी मिळणार नाहीं, आणि हेंच ब्रासीलियाच्या भेटीचें मोठें सार्थक होतें. त्या ठिकाणीं तसें तासचे तास धावून, थांबून आणि हेंच पाहात राहून या आनंदाची परिसीमा पाहतां आली असती, पण आम्हांला वेळ नव्हता — लवकर परतून रिओचें विमान गाठायचें होतें.

आणि आतां फारसें कांहीं पाहायचें उरलेंच नव्हतें. म्हणजे इतर इमारती जमिनींतून उगवायच्याच होत्या — किंवा जमिनीवर टेकायच्या होत्या. लुसिओ कोस्टांच्या कल्पनेंतून शहराच्या केंद्राची मोठी भव्य योजना बाहेर पडलेली आहे. शहराचे उभे — आडवे अक्ष जेथें मिळतात, तेथें एक भलामोठा तिमजली प्लॅटफार्म (येथून बसेस् सुटणार); त्याच्याभोंवतीं करमणुकीचें केंद्र, व्यापारी केंद्र आणि अर्थव्यवहाराचें केंद्र; प्रत्येक केंद्राची वास्तुशास्त्रीय रचना म्हणजे एकेक प्रयोग — पण तो प्लॅटफॉर्म सोडल्यास यांतलें कांहींच अद्याप उभें नव्हतें. मंत्रिमंडळाच्या इमारती कायदेमंडळासमोरच्या उंचावलेल्या मैदानावर हारीनें उभ्या होत्या, पण त्यांच्यांत पाहण्यासारखें असें कांहींच नव्हतें. त्या मैदानावरहि अद्याप लाल धूळच होती, लुसलुशीत हिरवळ उगवलेली नव्हती, आणि म्हणून सपाट पृष्ठभागावर दृष्टि फिरविण्याचा सौम्य आनंदहि घेण्यासारखा नव्हता. अर्थात् कोपऱ्यावरचा कॅथिड्रल हा एक चमत्कार अद्याप पाहायचा होता. बस वळत असतांना तो डोळे भरून पाहून घेतला. अखेरीस एखाद्या वर्तुलाकार मुकुटाप्रमाणें दिसणारी ही वास्तु

आतां परांचीनें वेढलेली असतांना काटेरी मुकुटाप्रमाणें दिसत होती. खिस्ताला अर्पण करायला याहून समर्पक वस्तु दुसरी कोणती ! ही देखील एक निमेयेंची प्रतिभाशाली फेक. यांतसुद्धां काचेचा अमाप उपयोग त्यांनीं केला आहे, पण आंत आरशांचा उपयोग होणार नसल्यानें आंतलें प्रार्थनामय वातावरण शाबूत राहील अशी आशा वाटते.

आमच्या बसेस धूळ उडवीत परत निघाल्या. धुळीनें दृश्यें धूसर बनत होतीं, पण माझी दृष्टि आतां एकंदर अवकाशाचा वेध घेण्यांत, त्याच्या मर्यादा हुडकण्यांत, आणि त्याचें मर्म शोधण्यांत गढून गेली होती. लुसिओ कोस्टांच्या एकंदर अवकाशावर आमची दृष्टि फिरलीच नव्हती. पश्चिमेकडच्चीं खेळाचीं आणि शर्यतीचीं मैदानें, राखीव जंगल, सभागृहाचा चौक, कायदेमंडळाच्या मनोऱ्याशीं समतोल राखणारा चित्रवाणीचा मनोरा, वगैरे कांहींच दृष्टिपथांत आलें नव्हतें. पण कल्पना कार्य करीत होती, आणि कोस्टा–निमेयेंनीं सरोवराच्या द्रवरूप चैतन्याशीं स्पर्धा करणारी घनमय चैतन्याची आकृति कशी रेखली, आणि तिचा विकास होऊन सरोवरांत घुसलेल्या भूभागाचा समावेश त्यांच्या योजनेंत कसा झाला, आणि शहर आणि सरोवर यांची प्राणमय युति कशी जमली यांचीं चित्रें मनासमोर उमलत होतीं. आज अर्थात् ब्रासीलियांत बराचसा निर्जीव सांगाडाच आहे. त्यांत आत्मा ओतणारे सेंद्रिय – सचेतन जीव अद्याप दूरच आहेत, पण त्यांच्या वाटा उघडल्या आहेत. त्यांचीं पावलें पडूं लागलीं आहेत – आणखी दहा वर्षांत या सांगाड्यांत जीवनाचा प्रकाश फुलेल आणि सरोवरावर जीवनाच्या लहरी खेळूं लागतील.

– अशा गोड कल्पनेंत बस विमानतळावर येते. विमानाला वेळ असतो. आंत विलक्षण गर्दी असते म्हणून मी बाहेर येतां, हिंडतां, दृष्टि इकडे तिकडे फिरवितों, नि ध्यानांत येतें कीं विमानतळाची लाकडी इमारत हंगामी आहे आणि तिचा आकार बोटीसारखा आहे – आणि तो सांगतो आहे कीं आज येथें येणारे लोक प्रवासी आहेत. ते येतात, आणि जातात. पण ते एक दिवस स्थायिक बनतील, आणि ही बोट निघून जाईल !

आणि मग येथें जो विमानतळ होईल तो ब्रासीलियाच्या चमत्कारांना शोभेसाच असेल. जगांतला पहिला भूगर्भ विमानतळ ब्रासीलियांतच अवतरणार आहे. भूमिगत कचेऱ्यांतले प्रवासी लिफ्टनें वर येतील आणि सरळ विमानांत पाऊल टाकतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ विः ....................
क्रमांक ........................ नों विः ....................

●●●

सत्यकथा, एप्रिल १९६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४२६३
संग्रह शाखा

REFBK C014263
REFBK-0014263